म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

REFBK-0010286

# जमिनीवरचीं माणसं

लेखक

शान्ताराम

९०२८५
REFBK-0010286

महाराष्ट्र प्रकाशन
अमरावती

मूल्य रुपये तीन नवे पैसे पन्नास केवळ

प्रकाशक
प्र. दि. वेदरकर
महाराष्ट्र प्रकाशन
अमरावती

प्रथम आवृत्ति : १५ नोव्हेंबर १९५९

मुद्रक
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
सदाशिव : पुणे २

सर्वाधिकार सुरक्षित

# जमिनीवरचीं माणसं

शान्ताराम

अनुक्रमणिका

जमिनीवरचीं माणसं ५
ब्रह्मदेवाच्या अक्षता १९
रात्र ३६
चमत्कारिक माणूस ५१
मायादेवी ६४
कांहीं झालं नाहीं ७७
दोघांनीं लिहिलेली गोष्ट ९०
प्रवास ९९
व्यवहार ११०
मोठ्यांची गोष्ट १२६
अण्णा १४०
झुंज १५०

अनु. क्र. २५८७९ दि. निबंध
९८०० ३।६।

# जमिनीवरचीं माणसं

९२८५

अगदीं कथाकादंबरींत घडते तशी घटना स्नेहलतेच्या आयुष्यांत घडली. कॉलेजला दिवाळीची लांब सुट्टी लागली म्हणून साड्या, पुस्तकं यांनीं खच्चून भरलेली ट्रंक घेऊन ती बडनेरला गाडीच्या डब्यांत शिरली. बायकांच्या डब्यांत न शिरतां ती पुरुषांच्या डब्यांत शिरली हा योगायोग.

प्रवास दुपारचा, त्यांत दोन-तीन तासांचा, तेव्हां पुरुषांचा डबा काय आणि स्त्रियांचा काय दोन्ही सारखेच. शिवाय बायकांच्या डब्यांतल्या कलकलाटापेक्षां पुरुषाचा डबा बरा. स्त्रियांच्या डब्यांत न सापडणारं स्त्रीदाक्षिण्य पुरुषांच्या डब्यांत हमखास मिळणार. स्नेहलतेला तो अनुभव आलाच. तिची ट्रंक व्यवस्थित लागली नव्हती. खिडकीशेजारीं तिला पहिल्यांदा बसायला मिळालं नव्हतं. त्या डब्यांतल्या एका तरुण प्रवाशानं त्या दोन्ही बाबतींत तिला मदत केली. तो तरुण लाघवी होता. त्याच्याकडे सारखं पाहावं, असं तिला वाटूं लागलं. पण संकोचामुळें तिला मन आवरावं लागलं. पण तो तरुण निःसंकोचपणानं बोलला, वागला. आपण मुंबईला नोकरीच्या शोधासाठीं कसे चाललों आहोंत, बहुतेक आपल्याला नोकरी मिळण्याची खात्री कशी आहे इत्यादि सगळ्या गोष्टी त्यानं मनमोकळेपणानं सांगितल्या. त्याला स्वतः बोलण्याइतकीच इतरांना बोलतं करण्याची कलाहि साधली होती. स्नेहलतेकडून त्यानं तिचं नांव, अमरावतीला ती कोणत्या कॉलेजांत

व कोणत्या वर्षाला आहे ती माहिती, अकोल्याला तिचे वडील कुठं राहतात आणि काय करतात इत्यादि सगळी हकीगत काढून घेतली. अकोल्याला स्नेहलतेला घ्यायला तिचे वडील स्टेशनवर आले होते, म्हणून त्यानं तिचा शब्दांनीं निरोप न घेतां डोळ्यांनीं सुचवलं, "ओळख राहू द्या !" तें तिला सांगायची आवश्यकता नव्हतीच. तो तिच्या ओळखींत कायम राहणार होता. त्याचं नांव काय ? इतक्या गोष्टी बोलूनहि ती त्याला तेवढं विचारायची विसरली होती. त्याचं नांव तिला माहीत नसलं तरी ती त्याला विसरणार नव्हती—विसरू शकत नव्हती. त्याचा चेहरा, त्याचं बोलणं; त्याचे हावभाव सगळं तिच्या हृदयावर रेखलं गेलं होतं—तिनं तें गुपित आपल्या हृदयाशीं बाळगून ठेवलं होतं आणि त्याची जपणूक केली पाहिजे, अशा भावनेनं की काय, ती आपल्या हृदयावर आपले पंजे ठेवून घरांत शिरली.

तें गुपित स्वतःशींच राखण्याचा तिनं प्रयत्न चालवला असतांनाच तीन दिवसांनंतर तो तरुण एकाएकी तिच्या घरीं प्रकट झाला. तिच्या वडिलांना त्यानं तिची मागणी घातली. एकाएकीं घरांत येऊन आपल्या मुलीची मागणी करणारा तो तरुण पाहून तिच्या वडिलांना काय बोलावं तें कळेना. त्यांना आश्चर्य वाटलं होतं. त्यांना रागहि आला होता. तें त्या तरुणाच्या लक्षांत आलं. तिच्या वडिलांचा संशय घालवण्यासाठीं त्यानं सांगितलं, "माझं नांव विजय वढे. दोन-तीन दिवसांत रेल्वेतल्या उच्च अधिकाऱ्यांच्या जागांसाठीं निवड झालेल्या उमेदवारांची यादी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होईल. त्यांत माझं नांव वाचून तुम्हांला वाटलं तर मला लिहा. हा घ्या माझा पत्ता !"

त्यानं सांगितल्याप्रमाणें खरोखरच त्याची निवड वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली. इतका चांगला जांवई आपल्या घरीं चालत आला, हें स्वप्न कीं सत्य असा स्नेहलतेच्या वडिलांना प्रश्न पडला. नशीब असं प्रसन्न होईल असं त्यांना कधीं वाटलं नव्हतं. मास्तरकीच्या मर्यादित उत्पन्नांतून पोरीचं शिक्षण त्यांनीं केलं असलं, तरी स्वतःला घेतलेल्या चिमट्याचं एवढं पारितोषिक मिळेल, असं त्यांना कधींच वाटलं नव्हतं. मुलीला शिक्षण

देतांना त्यांची अटकळ अशी होती की, तें तिला पुढें नोकरीसाठीं उपयोगी ठरेल. स्नेहल आणि तिचा नवरा अशीं दोघेंहि मिळवतीं असलीं कीं आपल्याला झाला तसा पैशासाठीं त्रास त्यांना व्हायचा नाहीं. त्या दृष्टीनं आपल्या बरोबर काम करीत असलेल्या एका तरुण शिक्षकाला—वसंत सराफला—त्यांनीं मनांत ठेवलं होतं. वसंत आणि स्नेहलच्या परिचयाला म्हणूनच त्यांनीं यापूर्वी उत्तेजन दिलं होतं. पण विजय बढेच्या रूपानं घरीं चालत आलेला भाग्याचा अव्हेर करायचा का ? हा प्रश्न शेवटीं स्नेहलचा होता. त्यांचा अधिकार केवळ सल्लागाराचा. शिक्षकाच्या धंद्यानं त्यांना पैसा दिला नसला तरी उदार वृत्ति दिली होतीच. तो महत्त्वाचा प्रश्न सोडविण्याचं स्वातंत्र्य त्यांनीं तिला दिलं. स्नेहलनं तो प्रश्न केव्हांच सोडवून टाकला होता. विजयची गाडींत ओळख झाली तेव्हांच; त्याचं नांवहि तिला कळलं नव्हतं तेव्हांच तिनं तो प्रश्न सोडवून त्याचं उत्तर हृदयाशीं जपून ठेवलं होतं. तिच्या वडिलांनीं तिचा निर्णय विचारतांच तिनं तो चटकन् बोलून दाखवला.

स्नेहलता इतक्या तडकाफडकी निर्णय करूं शकली आणि तितक्याच चटकन् बोलूं शकली याचा तिच्या वडिलांना थोडासा विस्मय वाटला. त्यांची अशी अपेक्षा होती की, तिनं या प्रश्नाचं उत्तर निश्चित करतांना थोडाफार विचार करावा, सावधगिरीनं जें ठरवायचं तें ठरवावं. भाग्याला असा अचानक फुलोरा आला कीं, माणसानं सावध असावं. पण हा अनुभवाचा पोक्तपणा स्नेहलता कशी दाखविणार ? अनुभवाचा संथपणा तिच्याकडून वडिलांनीं अपेक्षिला नसला, तरी सावधपणानं विचार करायला आणखी एक विषय कायम होताच—वसंत सराफचा. पण त्या विषयाचा देखील कां विचार करावा हेंहि तिच्या लक्षांत आलं नाहीं. वडिलांनीं त्याला पसंत केलं होतं, पण तें मनांतल्या मनांत. त्याला कांहीं जाहीर आश्वासन नव्हतं दिलं. वसंत सराफला तीहि चांगलं ओळखीत होती. पण चांगलं ओळखणं निराळं आणि विजय बढेविषयीं जें मनांत उचंबळूं लागलं तें निराळं. वसंत सराफाविषयीं तिचं मत फार चांगलं होतं; पण एखाद्याच्या विषयीं चांगलं मत असणं

निराळं आणि त्याच्याशीं जिवाभावाचं सख्य जोडणं निराळं. निर्णयामुळें वसंत सराफची निराशा होणार होती, हेंहि तिला ठाऊक होतें. त्याबद्दल तिला सहानुभूतिहि वाटत होती. पण सहानुभूति निराळी आणि प्रेम निराळं. वसंत सराफचा तिचा सहवास जुना. त्या मानानं विजय बढेशीं परिचय ओझरता. पण तिच्या मनांत उगवलेल्या भावनेची उत्कटता कालगणनेच्या मापानं ठरवायची नव्हती. जें वर्ष वर्ष घडत नाहीं तें क्षणांत अवतरतं. तेंच तिच्या हृदयांत प्रकट झालं होतं. तेंच निर्णयांत प्रतीत झालं होतं.

रेल्वेच्या डब्यांत झालेली भेट. त्या भेटीनं रेल्वेंतल्या अधिकाऱ्याशीं जन्मगाठ घालून दिली. मुंबईला नोकरीचा शेवटचा टप्पा पार करावयाला गेलेला विजय बढे मुंबईला दोन तीन मुलीहि त्या मुक्कामांत बघून घेणार होता. पण अचानकपणें त्यानं स्नेहलतेला गाडींत पाह्यलं आणि पूर्वीं ठरवलेल्या मुली त्यानं नुसत्या बघितल्या देखील नाहींत. तो सरळ स्नेहलतेची मागणी घालायला तिच्या घरीं आला. सगळा योगायोग अकल्पित, अघटित. त्या विशिष्ट गाडीऐवजी त्यांनीं दुसऱ्या कुठल्याहि गाडीनं प्रवास केला असतां, तरी हें घडलं नसतं. पण त्या गाडीनं त्यांच्या जीवनाच्या वाटा एकमेकांत मिसळून टाकल्या. अगदीं कथा-कादंबऱ्यांत घडावी तशी घटना.

त्या घटनेला पंधरा वर्षांहून अधिक काळ लोटला. पंधरा वर्षांपूर्वींचा प्रसंग; पण स्नेहलतेच्या हृदयावर तो पूर्वींच्याच ताजेपणानं कोरला गेला होता.

त्या पंधरा वर्षांत पुष्कळ घडलं. लग्न, त्यानंतरचा उन्मत्त सहवास. तोहि मागें पडला. मुलंबाळं झालीं. सगळे आनंदाचे प्रसंग ते यथाक्रम घडणारच होते. व्यवहाराच्या एका प्रकरणांतून दुसरं प्रकरण निघत होतं आणि आयुष्याचा ग्रंथ वाढत होता. त्या ग्रंथाला यशाची, आनंदाची बांधणी मिळाली होती. त्या सगळ्या सुखाचं, आनंदाचं मूलकारण—ती आगगाडींतील भेट, तो योगायोग. व्यवहाराच्या वाटेनं सगळ्यांनाच जावं लागतं, पण त्या व्यवहाराचा आरंभ अकल्पितांत असला कीं, आयुष्याच्या गद्य-व्यवहाराला स्वप्नाचं काव्य लाभतं. स्नेहलतेला वाटायचं, आपल्या आयुष्यांत असं कांहीं

तरी लोकोत्तर आहे, आपल्या जीवनांत वेगळेपणाची गोडी आहे. त्याचं कारण तो मुख्य प्रसंग. आनंदाला यशाची जोड देणाऱ्या घटनाहि घडत गेल्या. विजयचा अधिकार वाढला, प्राप्ति वाढली, आरामाचीं साधनं वाढलीं. त्या आरामांत निरनिराळ्या जागा, निरनिराळे प्रांत, निरनिराळे लोक, आसमंतांतील विविधता पाहण्याची संधि अनेकदां आली. पण हें अकल्पित नव्हतं.हें होणारच होतं उच्च रेल्वे अधिकारी आणि त्याची सहचरी यांच्या आयुष्यांत हें व्हायचं नाहीं तर मग तें होईल तरी कुणाच्या आयुष्यांत? संवयी बदलल्या. कल्पना बदलल्या. विश्वास आणि श्रद्धा यांची धार बोथटली. दृष्टींत व्यापकता आली. विचारांत सहिष्णुता वाढली. कित्येक जुन्या चालीरीति हास्यास्पद वाटूं लागल्या. बऱ्याचशा आचरणांतून गळल्या. शिष्टाचाराचे नवे संकेत अंगवळणीं पडले. हें सगळं होणारच होतं. जें जें होत होतं, त्यांतलं बरंचसं स्नेहलतेला आवडत होतं. पण त्यांना त्या पहिल्या प्रसंगाच्या काव्याची, उदात्ततेची सर येत नव्हती. तो पहिला प्रसंगच इतका महत्त्वाचा आणि चिरस्थायी होता कीं, त्याच्या आधारावर ती आयुष्यांत एखाद्या सुखान्त कादंबरींतल्या नायिकेप्रमाणें वावरत होती. नायिकेचंहि वय हळूहळू वाढतं. नायिकेचंहि शरीर यथाकाल सुटूं लागतं, नायिकेलाहि मुलें होतात. प्रेयसीची भूमिका मागें पडून गृहिणीची भूमिका, मातेची भूमिका तिला करावी लागते. स्नेहलतेच्या नांवांतसुद्धां बदल झाला होता. आतां तिला लोक स्नेहलताबाई म्हणूं लागले होते. लताबाई. तो शब्द कांहींसा विसंगत वाटत होता. हे सगळे बदल व्हायचेच. त्यांतले कांहीं तिला आवडत होते, कांहीं नावडत होते, पण चीड मात्र कोणच्याच बदलाची येत नव्हती. पतीला ती पहिल्यांदा ‘ विजय ’ अशा एकेरी नांवानें संबोधीत असे. पुढें मुलं मोठीं होऊं लागलीं. नवऱ्याचा एकंदर मोठेपणा वाढूं लागला. ‘ विजय ’ अशी तोंडभर हांक मारण्याऐवजीं ‘ बढे ’ म्हणून लौकिकाला साजेलसा तटस्थपणा दाखविण्याची जबाबदारी आली. ‘ विजय ’ मागें पडला. ‘ बढे ’ हि वापरांतून ओसरूं लागला. जुन्या पद्धतीचे ‘ ते ’ ‘ हे ’ तोंडांत फिरून बसले. असे बारीकसारीक बदल होतच होते, पण त्यामुळें स्नेहलताबाई चिडत

नसत. अशा बदलांनीं चिडायचं काय कारण ? लोकव्यवहाराप्रमाणें हें व्हायचंच्च. वैशिष्ट्य होतं तें व्यवहाराच्या आरंभांत. तो आरंभ काव्यात्मक होता; आयुष्यभर पुरेल इतका काव्यात्मक होता; सगळ्या व्यवहाराला समाधानाच्या उंच, विरल वातावरणांत उचलण्याइतपत समर्थ होता.

अगदीं कथा-कादंबऱ्यांत घडावी तशीच घटना स्नेहलताबाईंच्या आयुष्यांत घडत होती—पुन्हा एकदा पण जुन्या अचानकपणानं घडत होती.

श्री. वि. ना. बढे, रेल्वेंतलि एक उच्चाधिकारी, वयाची चाळीशी उलटून गेल्यावर तीन मुलांचे पिता असूनहि, सुशील, सुस्वरूप, सुविद्य अशी पहिली पत्नी असतांना पुनः प्रेमांत पडले होते. वय निराळं होतं. रूपहि बदललं होतं. बरंच कांहीं बदललेलं होतं. पण प्रेमांत पडण्याचा आवेग मात्र जुनाच होता. किंबहुना हा आवेग अधिक प्रबळ होता. विजय जेव्हां स्नेहलतेच्या प्रेमांत पडला होता, तेव्हां मार्गांत बंधनं नव्हतीं. दोघंहि तरुण होतीं. दोघांचीं हृदयं एकमेकांकडे झुकलीं होतीं. वडिलांच्या रूपानं कसलाहि अडथळा मार्गांत नव्हता. पण आतांचा प्रकार वेगळा होता. सामान्यतः आतांचं वय प्रेमांत पडण्याचं नव्हतं. शिवाय या प्रेमाला अनेक बंधनं होतीं. कारण स्नेहलताबाईंचे पति श्री. वि. ना. बढे हे एक प्रतिष्ठित उच्चाधिकारी होते. त्यांच्या प्रतिष्ठेला हें नवीन कृत्य शोभत नव्हतं. अधिकाराचा आणि प्रतिष्ठेचा प्रश्न सोडला, तरी सामाजिक बंधनाचा विवेक करायलाच हवा होता. श्री. बढे या वेळीं प्रेमांत पडले होते. ते एका पुरंध्रीच्या—जिला नवरा होता, मुलं होतीं. सौ. सुब्रह्मण्यम्‌च्या प्रेमांत पडणं ही कांहीं मामुली घटना नव्हती. एका विवाहित गृहस्थानं आपल्या बरोबरीच्या दुसऱ्या एका गृहस्थाच्या पत्नीवर प्रेम करावं ही भयंकर घटना होती आणि ती बेमुर्वतपणें घडत होती.

असं कसं झालं ? रेल्वेच्या अधिकाऱ्याच्या त्या वस्तीचा मुख्य शहराशीं फारसा संपर्क येत नसे. कामाच्या निमित्तानं, सामाजिक समारंभांच्या निमित्तानं, सणावारांच्या निमित्तानं तींच तीं माणसें एकमेकांच्या परिचयांत आणि सान्निध्यांत येत. त्याच त्या माणसांच्या गांठी-भेटी होत आणि त्या

गांठी पक्क्या होत. म्हणून तर श्री. बब्यांचं आणि सौ. सुब्रह्मण्यम्चं जमलं नसेल ? पण त्यांच्या त्या विपरीत संघटनाचं हें स्पष्टीकरण बरोबर नव्हतं. लोकवस्तीपासून दूर असलेल्या रेल्वेच्या वसाहतींत राहण्याची बब्यांनाहि नव्हाळी नव्हती; सुब्रह्मण्यम् दंपतीलाहि नव्हती. इतक्या वर्षांत जें झालं नाहीं तें आतांच कसं झालं ?

कशाच्या बळावर सौ. सुब्रह्मण्यमनं एवढी विलक्षण मोहिनी घातली होती ? ती बया दिसायला बरी होती यांत शंकाच नाहीं. बोलायची पण धीटपणानं. पण भलत्या वयांत मनुष्याला उलथून पाडायला बरं दिसणं आणि बरं बोलणं एवढे दोनच गुण का पुरेसे होते ? त्या गुणांचं स्नेहलताबाईंनाहि वरदान मिळालं होतं. त्या दोघींत आकर्षकपणासाठीं क्रम लावायचा झाला, तर कुणाची निवड प्रथम करावी, असा कुणालाहि प्रश्न पडला असता आणि बहुधा त्या प्रश्नांचा कल स्नेहलताबाईंच्याकडे पडला असता. असं असूनहि या वयांत जिच्यासाठीं बब्यांच्या तोल जात होता, तिच्याजवळ असं काय होतं की, जें त्यांच्या पत्नीच्या—स्वतः निवडलेल्या पत्नीच्या, पंधरा-सतरा वर्षें संसार गोड करूं शकलेल्या पत्नीच्याजवळ नव्हतं ? अशा कुठल्या अपूर्वाईवर ते भाळले होते ?

स्त्रियांच्या कोणत्या वैशिष्ट्यावर पुरुष भाळतात ? एका स्त्रीसह संसारांत रमल्यानंतर दुसऱ्या स्त्रीकडे पुरुष कां वळतात ? या त्यांच्या आकर्षणाला प्रेम म्हणायचं कीं मोह ? या आकर्षणाला मोह म्हणायचं, वासनेचा आवेग म्हणायचा तर तींच नांवें पहिल्या आकर्षणाला कां लावूं नयेत ? पुरुषाचं प्रेम म्हणजे नुसतं एक आकर्षणच असतं का, कीं जें कांहीं काळानतर लवकर किंवा उशिरा विझलंच पाहिजे ? पुरुषाचं प्रेम म्हणजे नुसतं एक कुतूहलच का, कीं ज्याला नित्य नवीन विषय मिळालाच पाहिजे ? आपणहि केवळ एक विषयच का ? स्नेहलताबाईंना ती कल्पनासुद्धां सहन होत नव्हती. त्यांचं मन आक्रोशून विचारीत होतं, पुरुष एका स्त्रीकडून दुसरीकडे कां जातो ? कसा जातो ?

पुरुष जरी चंचल असला तरी स्त्रिया त्याला उत्तेजन कां देतात ? सौ.

३५०८८ नों. दि. २३-५-६७

सुब्रह्मण्यम्ला कसं कळत नव्हतं कीं, ती आपल्या हातानं आपल्याचपैकीं एकीचा नाश करीत होती ? एकीचा संसार पाडून त्याच्या रिठावर आपल्या प्रेमाची इमारत बांधण्यांत कसलं आसुरी समाधान होतं ? याला प्रेम म्हणायचं कां ? इतरांच्या शिव्याशापाची धनी झालेली भावना म्हणजे प्रेम का ? दुसरीच्या सुखाच्या होळीकडे आनंदानं, तुच्छतेनं पाहावयाला लावणारी दुष्ट भावना म्हणजे प्रेम का ? सौ. सुब्रह्मण्यम्ला हें सर्व कळायला हवं होतं. पण तें कळत नव्हतं, म्हणून तर हा प्रकार घडत होता. या प्रकरणापासून तिला परावृत्त कसं करणार ? कोण करणार ? तिनं स्वतःला त्या मार्गापासून वळवण्याची तर आशाच नव्हती.

सौ. सुब्रह्मण्यम् त्या कुमार्गापासून स्वतः परावृत्त होत नसली तरी तिच्या झिंज्या धरून तिला मागें खेचण्याचं पौरुष तिच्या यजमानांनीं कां दाखवूं नये ? या सगळ्या प्रकाराची कुणकुण ऐकूं येतांच त्याचं रक्त कसं तापलं नाहीं ? ' झुंझारराव ' नाटकाचा प्रयोग स्नेहलताबाईंनीं पाहिला होता. त्याचं मूळ इंग्रजी रूप त्यांना परिचित होतं. कॉलेजांत शिकत असतांना त्यांनीं ' ऑथेल्लो ' वाचला होता. त्यांच्या प्राध्यापकांनीं सांगितलं होतं कीं, ' ऑथेल्लो ' नाटकांतली मूळवृत्ति सनातन असल्यामुळेंच तें नाटक इतकीं वर्षं लोकांना आवडत आलं होतं आणि पुढेंहि आवडणार होतं. शेक्सपिअरच्या मर्मभेदी प्रतिभेनं प्रकाशांत आणलेला पुरुषी स्वभाव श्री. सुब्रह्मण्यम्ला सोडून कुठं गेला होता ? बायकोच्या नुसत्या निराधार संशयावरून तिच्या फुलासारख्या जीवनाला कुस्करून काढणारा तो सुप्रसिद्ध सनातन पुरुषस्वभाव कुठं गेला होता ? झुंझाररावांसारखं वेड श्री. सुब्रह्मण्यम्च्या डोक्यांत शिरलं तर तें बब्यांच्या नरडीच्या घोट घ्यायला धांवेल, हें स्पष्ट दिसत असूनहि ती कल्पना स्नेहलताबाईंना सोडवत नव्हती. पण ती एक कल्पनाच. इथं सत्य असं होतं कीं, बायकोच्या चाळ्याकडे हा प्रत्यक्षांतला नवरा—नवऱ्यासारखा नवरा—असूनहि दुर्लक्ष करीत होता. एवढंच नव्हे, तर संबंध रेल्वे-वस्तींत सगळे लोक कुजबुजायला लागले होते कीं, बायकोचं जाळं टाकून सुब्रह्मण्यम् बब्यांच्याकरवीं आपलं नोकरींत कांहीं भलं करून घेण्याच्या विचारांत होता.

शी .... शी .... स्नेहलताबाईंना किळस आली होती. त्यांना कांहीं सुचेनासं झालं होतं.

स्नेहलताबाईंना काय करावं, काय बोलावं तें मुळींच कळेनासं झालं होतं. त्या काय करणार ? कुणाशीं बोलणार ? खुद्द बब्यांशीं बोलायचा त्यांनीं प्रयत्न करून पाहिला. नरम आवाजांत त्यांनीं बोलून दाखवलं. तणतणत त्यांनीं तें बोलून दाखवलं .पण बोलण्याचा कांहीं उपयोग नव्हता. बढे त्या विषयावर कांहीं बोलायला तोंड उघडायला देखील तयार नव्हते. पत्नीशीं वागण्यांत बढे कुठंहि चुकत नव्हते. कांहीं चुकून बोलत देखील नव्हते. पण आपल्या त्या करणीलाहि ते चुकत नव्हते. वरवरचा सगळा देखावा पूर्ववत् चालू होता. समारंभाला जाणं, मुलांशीं वागणं, व्यवहाराच्या रूढी पाळणं सगळं वरवरून पूर्वींसारखंच चाललं होतं• पण स्नेहलताबाईंना तें नको होतं. त्यांना जें हवं होतं तें सौ. सुब्रह्मण्यमूला मिळत होतं.

काय करावं तें सौ. बब्यांना कळत नव्हतं. जिवाचा निर्धार करून बढयांच्या संसारावर लाथ मारून निघून जावं ? बब्यांचा संसार ? त्यांचं आणि आपलं अशी भेदाची कल्पनासुद्धां त्यांच्या मनांत कधीं आली नव्हती. कायदा त्यांना संरक्षण द्यायला तयार होता. पण तें कसलं संरक्षण ? त्या संरक्षणासाठीं त्यांच्या मनाची तयारी नव्हती, इच्छा नव्हती. कायदा त्यांच्या पोटाचा प्रश्न सोडवूं शकत होता. प्रश्न पोटाचा नव्हता, प्रश्न हृदयाचा होता. प्रश्न स्नेहलताबाईंच्या हृदयाचा होता. स्नेहलताबाईंचं वय वाढलं असलं तरी हृदय तेंच होतं–स्नेहलतेचं हृदय–कोंवळ्या, शुद्ध भावनांनीं भरलेलं प्रेमानं उचंबळणारं हृदय, प्रीतीच्या पावित्र्यानं ओथंबलेलं हृदय. त्या कोवळ्या शुद्ध भावनांच्या त्या पवित्र आनंदाच्या प्रतिकृति त्यांच्या मुलांच्या रूपानं घरांत विश्रब्ध संस्कारांच्या छत्राखालीं वाढत होत्या. तें छत्र मोडण्याचा भयंकर प्रसंग आला होता. त्या घटनेला वाढूं दिलं, तर त्यांच्या चिमुकल्या हृदयांना तो आघात कसा सहन होणार ? हा आघात रोखून धरलाच पाहिजे. त्यासाठीं काय वाटेल त्या धैर्याची आवश्यकता असली तरी तें दाखवलंच पाहिजे. त्या धैर्याच्या जोरावर–प्रेमाच्या पोटीं

निघणाऱ्या धैर्याच्या आधारावर सौ. सुब्रह्मण्यम्‌चा प्रतिकार करायलाच हवा होता. मुळूमुळूं रडून मनांतल्या मनांत अनेक प्रश्नांचं आणि अनेक उत्तरांचं उभं आडवं जाळं विणून हा प्रतिकार साधणार नव्हता. अधिकाराच्या जाणिवेनं सौ. सुब्रह्मण्यम्‌च्या पुढें उभं रहावयाला हवं आणि तिला मागें फिरवायला हवं.

स्नेहलताबाई सौ. सुब्रह्मण्यम्‌ला जाब विचारायला उभ्या राह्यल्या तेव्हां त्यांना एकदम आठवलं कीं, पुष्कळदां पाह्यलेल्या, रस्त्याच्या कडेला ओचे खोवून कचाकचा भांडणाऱ्या अडाणी स्त्रियांपेक्षां त्यांची स्थिति निराळी नव्हती. त्या साम्याची आठवण येतांच त्या स्वतःशींच शरमल्या. त्यांचा आवेश ओसरल्या-सारखं त्यांचं त्यांनाच वाटलं. पण तें क्षणभरच. केवळ अडाणी स्त्रियांशीं असलेल्या साम्यामुळें आपलं मन कां दचकावं ? त्यांना आपल्या मनाच्या बेगडी-पणाचा, नकलीपणाचा, दुर्बलतेचा राग आला. स्त्रिया शिकल्या काय, अडाणी राह्यल्या काय; सुस्थितींत असल्या काय, गरिबींत असल्या काय सगळ्या सारख्याच. स्त्रिया म्हणून त्यांचे प्रश्न सारखे, त्यांच्या आपदा सारख्या. कदाचित् त्यांचे उपाय, त्यांचीं अस्त्रंहि सारखींच असतील. निश्चयाचें बळ एकवटीत स्नेहलताबाईंनीं सौ. सुब्रह्मण्यम्‌ची खरडपट्टी काढली. सुब्रह्मण्यम् मुळींच चिडली नाहीं. ओठावर बेफिकीरीचं स्मित खेळवीत, ऐकलेलं, न ऐकल्यासारखं करीत तिनं स्नेहलताबाईंना हवं तें बोलूं दिलं. चिडायचं तिला तरी कांहींच कारण नव्हतं. सगळी परिस्थिति आपल्या बोटावर नाचविण्याचं सामर्थ्य त्या वेळीं तिच्याजवळ असल्यामुळें ती शांतपणें सगळं ऐकून घेत होती. सौ. बढेच नीति, कर्तव्य, संसार, प्रेम, समाज, माणुसकी अशा प्रकारचे शब्द आळवून आळवून, शिरा ताणून सारखं बोलत होती. आपल्या बोलण्याला प्रत्युत्तर मिळत नाहीं, असं बघून ती अधिक तावातावांत बोलूं लागली, चिडूं लागली, थकूं लागली. शेवटीं ती रागानं, हताशपणानं नुसती थरथरूं लागली. तिचे ओठ थरथरत होते, पण ओठांतून शब्द निघत होते किंवा नाहीं हें तिचं तिलाच नीट कळत नव्हतं. तिला वाटलं, पुरे झाले हे शब्द, पुरे झाला हा वादविवाद. शब्द म्हणजे नुसती वाफ. तिचा परिणाम होऊं

द्यायचा नाहीं असं एखाद्यानं ठरवलं कीं, कुणी कितीहि शिरा ताणल्या, हातवारे केले तरी उपयोग व्हायचा नाहीं. त्या ठिकाणीं शब्दांची मात्रा चालत नव्हती. तिथं कृतीची आवश्यकता होती. मागचा पुढचा विचार न करतां करावयाची कृति. त्या कृतीच्या परिणामाचीं चित्रं स्नेहलताबाईंच्या डोळ्यांसमोर नाचूं लागलीं होतीं. सौ. सुब्रह्मण्यम्‌चा गळा दाबला गेला होता. तिच्या ओठावर खेळणारं छबी स्मित कोरडलेल्या, पांढऱ्या फटफटीत ओठांत पुरलं गेलं होतं. तें दृश्य पाहून बेभान होत स्नेहलताबाई पळत सुटल्या आणि श्री. बब्यांच्या अंगावर चालून गेल्या. बब्यांना त्याची जाणीव नव्हती. कसली तरी गुलगुलीत स्वप्नं पाहात ते घोरत पडले होते. त्या घोरण्यांतच त्यांचा गळा दाबला गेला. बब्यांचा तो निश्चेष्ट देह पाहून त्यांनीं एकदम किंकाळी फोडली. त्यांचा हात स्वतःच्या कपाळाकडे गेला. कपाळावरचं कुंकू बोटांना लागलं आणि आपल्या बोटावरून रक्त निथळत असल्याचं त्यांना दिसलं. त्यांच्या डोळ्यापुढें अंधार दाटूं लागला आणि त्या अंधारांत आपलीं पोरं रडत ओरडत पळत आहेत, असा त्यांना भास झाला. त्यांनीं स्वतःच्या कानांत बोटं घातलीं, स्वतःच्या डोळ्यांत बोटं घातलीं, स्वतःचा गळा दाबला. " नाहीं, मी असं होऊं देणार नाहीं ! असं मी होऊं देणार नाहीं ! " असे शब्द त्या पिचलेल्या गळ्यांतून बाहेर पडत होते.

सौ. सुब्रह्मण्यम्‌नं त्यांना शांतपणानं सांगितलं, " काय होऊं देणार नाहीं म्हणतां तुम्ही ? शांत व्हा, असे डोळे फिरवून काय बघतां ? "

स्नेहलताबाई शांत झाल्या. क्षणापूर्वीं त्यांच्या डोळ्यांपुढें अक्राळ-विक्राळपणें नाचलेलीं तीं चित्रं विरलीं होतीं. त्यांच्या हृदयाची धपधप कमी कमी होत होती. आपण आतांपर्यंत काय बोललों हें त्यांना नीट आठवत नव्हतं. त्या शांत झाल्यावर, पूर्ववत् दिसूं लागल्यावर सौ. सुब्रह्मण्यम्‌नं शांतपणें विचारलं,

" हें सगळं तुम्ही मला कशाच्या जोरावर ऐकविलंत ? "

" माझ्या प्रेमाच्या ! "

" प्रेम करण्याचा हक्क एकटा तुमचाच नाहीं मलाहि तुमच्यासारखा प्रेमावर हक्क सांगतां येईल ! "

" तुझं कसचं प्रेम ? शरीराच्या वासनेला गोंडस नांव देऊन कां उगीच फसवाफसवी करत्येस ? "

" माझं प्रेम म्हणजे शरीराची वासना काय ? कां बरं ? तुझं तेवढं हृदय आणि इतरांचं तेवढं शरीर का ? "

स्नेहलतेला काय बोलावं तें कळत नव्हतं. तिचा आवेश अजिबात नाहींसा झाला होता. आपल्या भूमिकेंत लंगडेपणा आहे, असा तिला संशय येत होता आणि तो संशय तिला हतबल करीत होता. उरलंसुरलं तिचं अवसान नाहीसं करायचा सौ. सुब्रह्मण्यम्‌नं निर्धार केला होता. पहिल्यांदा तिनं नुसतं ऐकण्याचं काम केलं होतं. तिनं पुष्कळ ऐकून घेतलं होतं. आतां ती ऐकवणार होती आणि असं ऐकवणार होती कीं, स्नेहलतेजवळ प्रत्युत्तरासाठीं शब्दहि राहूं नयेत.

" तुझं कसलं प्रेम ? कुठला त्याग करून तूं प्रेम मिळवलंस ? कुठलीं बंधनं तोडून तूं प्रेम जिंकलंस ? मला माझ्या नांवलौकिकाचा त्याग करावा लागला. सामाजिक बंधनं तोडण्याचं धैर्य मला दाखवावं लागलं. त्यागानं पोसलेलं, धैर्यानं वाढवलेलं माझं प्रेम प्रेम नव्हे आणि सुखासुखी चालत आलेलं, चैनीच्या घड्या तुझ्या मार्गावर टाकणारं तुझं शहाणपण म्हणजे प्रेम का ? "

स्नेहलतेला उत्तर सुचत नव्हतं. आयुष्याच्या ज्या काव्यमय आरंभाचा तिला आतांपर्यंत अभिमान वाटत होता, ज्याचा तिला एवढा आधार वाटत होता, तें सगळं खोटं आहे, फसवं आहे, तकलुपी आहे अशी तिची खात्री झाली. त्या खात्रीनंतर आपल्या सबंध आयुष्याचा लहानपणा तिला जाणवला आणि पराभवाच्या अनुभवानें ती खिन्न झाली. तरी तिला वाटत होतं कीं यापेक्षां आपली कांहीं तरी अधिक किंमत व्हायला हवी. पण तें कसं पटवायचं ? कशाच्या आधारावर पटवायचं ? सुब्रह्मण्यम्‌च्या त्या हल्ल्याला कसं परतवायचं ? तिच्यापेक्षां आपला अधिकार मोठा आहे

हें कसं सिद्ध करायचं ? हृदयाची भाषा तें करायला पंगु ठरली होती. ती भाषा अतिशय बिनभरवशाची ठरली होती. त्याच भाषेनं सुब्रह्मण्यम्‌ची बाजू बिनतोड मांडली होती. वादविवाद करून जिंकण्याची ही बाब नव्हती. तरीहि स्नेहलतेला वाटत होतं, तिचा पक्षच खरा; तिचा अधिकारच मोठा. तें त्या बयेला कसं सांगायचं ? क्षणापूर्वीं डोळ्यांपुढें नाचून गेलेलीं भयंकर चित्रं खरीं करूनच का ? अखेर प्रेम प्रेम म्हणून जिवाशीं कवटाळलं त्याचीं हींच कटु फळं का ?

" बोलत कां नाहीं ? "

" बोलत्यें. "

स्नेहलतेला बोलण्याचं अवसान पुन्हा येत होतं. तिला काय हवं होतं ? तिचा नवरा, तिची प्रतिष्ठा, तिच्या मुलांचे संस्कार, तिचं घर. तें सगळं तिनं स्वतः कमावलं होतं आणि तें हिसकावून घ्यायला ती कुणालाहि पुढें धजूं देणार नव्हती. जें तिचं होतं तें तिचंच राहावयाला हवं होतं. तिचं काय होतं ? तिचंच सगळं होतं, हें समाजानं मान्य केलं होतं. तेंच ती सुब्रह्मण्यम्‌ला सांगणार होती. तें सांगतांना प्रेमाची भाषा फेंकून द्यावी लागली तरी ती तयार होती.

" तूं काय म्हणालीस कीं तुझंहि बब्यांच्यावर प्रेम आहे ? असंच ना ? तुझ्या प्रेमाला तूं पुरावा देऊं शकशील का ? "

" कसला पुरावा ? "

" तो परीक्षेचा प्रसंग निर्माण करायची ताकद माझ्याजवळ आहे. त्या ताकदीच्या जोरावर मी काय वाटेल तें करूं शकेन. तुझा गळा दाबूं शकेन. कुणाचाहि घात करूं शकेन. घाबरूं नकोस. तसं कांहीं मी करणार नाहीं. पंधरा-वीस वर्षं मी जपलं तें माझं प्रेम तसं मला करूं देणार नाहीं. तुला एकच सांगत्यें. तुझ्याच तोंडून वदवत्यें. बब्यांच्या प्रेमाच्या लांब बाता मारत्येस म्हणून तुझ्या तोंडातून वदवत्यें. बढे आहेत तोंपर्यंत तुला चैन करायची आहे. कदाचित् कांहीं मतलब साधायचा असेल. पण बढे गेले म्हणजे त्यांच्या नांवाचं कुंकू तूं पुसशील का मी ? "

स्नेहलतेला आवडणारी ही भाषा नव्हती. ज्या काव्यामुळें ती स्वतःला इतरांपासून वेगळी समजत असे, त्या प्रकारचं स्वप्न, काव्य त्या भाषेंत नव्हतं; ती भाषा एका व्यवहाराची होती, आचाराची होती, चारचौघींनं बोलावी तशी होती. पण ती भाषा परिणाम करणारी होती. त्या भाषेनं सुब्रह्मण्यम्‌ला थोडा वेळ तरी निरुत्तर केलं होतं.

सौ. सुब्रह्मण्यम् ही बाई चलाख होती. तशी ती नसती तर तिनं हा सगळा प्रकार केलाच नसता. आपला पराभव तिच्या लक्षांत आल्यावर व त्या पराभवाच्या जाणिवेंतून थोडीफार सावरल्यावर ती बोलूं लागली, “ म्हणजे तूं आतां प्रेमाच्या अधिकाराचं बोलणं सोडून कुंकवाची भीक मागूं लागलीस म्हणायची ! जा, ती भीक मी तुला दिली असं समज. माझ्याकडून तुला यापुढें कांहीं धोका होणार नाहीं. आपल्या नवऱ्याला सांभाळ; पण प्रेमाच्या भाषेनं तें जमणार नाहीं हें शहाणपण विसरूं नकोस. ”

“ प्रेम आणि सौभाग्य यांत भेद करणाऱ्या चवचाल लोकांपैकीं मी नव्हे हें लक्षांत ठेव. तें माझ्या रक्तांत नाहीं, संस्कारांत नाहीं, तें मी चालूं देणार नाहीं ! ”

सौ. वंदे त्या वयेच्या हुशार युक्तिवादाचा पराभव करून परतल्या. आतां त्यांच्यावर येऊं घातलेल्या संकटाची भीति त्यांना वाटत नव्हती. पण ज्या कल्पनेच्या आकाशांत त्या पंधरा-वीस वर्षं वावरत होत्या, तिथून एकदम जमिनीवर आल्यासारखं त्यांना वाटलं. भक्कम जमिनीचा तो आधार कायम राहणार होता. पण ती जमीन होती, आकाश नव्हतं एवढं मात्र निश्चित. त्या भुईवरच त्या जन्मल्या होत्या, वाढल्या होत्या, जगत होत्या. जगणं हेंच त्यांचं विहीत कार्य होतं, त्या कार्यांत कथा-कादंबऱ्यांसारखे प्रसंग असले तरी त्यांतील कल्पना, श्रद्धा, विश्वास साधारण माणसांचे होते. त्यांचं त्यांना वैषम्य वाटत नव्हतं, विषाद नव्हता, अभिमान वाटत नव्हता, अत्यानंद वाटत नव्हता. जमिनीवरच्या माणसांना आपण जमिनीवर आहोंत अशी ओळख पटल्यावर विशेष तें काय वाटणार ?

★ ★ ★

... ग्रंथ संग्रहालय, ...
... ३५०६९ ... दि: ...
... नों: दि: २३/६/७...

# ब्रह्मदेवाच्या अक्षता

२

नरहर रघुनाथ सहस्रबुद्धे हे पूर्वी तत्त्वज्ञानाचे एम्. ए. होते; पूर्वी म्हणजे फार वर्षांपूर्वी नव्हे; केवळ चार-पांच वर्षांपूर्वींच ते एम्. ए. होते. पूर्वी होते आणि आतां नाहींत असाच वाक्प्रयोग त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या पदवीच्या वर्णनासाठीं वापरणं योग्य ठरेल. कारण त्या ज्ञानाचा त्यांच्या सध्याच्या आचार-विचारांशीं सुतराम् संबंध नाहीं, या गोष्टीची त्यांना जाणीव असावी किंवा नसावीहि. एम्. ए. हीं अक्षरं त्यांच्या नांवाच्या पाटीवर झळकतात एवढं खरं. सध्यां नरहर रघुनाथ सहस्रबुद्धे उच्च पोलीस अधिकारी आहेत. त्यांच्या उच्च पोलीस अधिकाराची साक्ष त्यांच्या नांवापुढील आय्. पी. या अक्षरांनीं स्पष्ट होते. आपण केवळ पोलीस-अधिकारीच नसून एम्. ए. हि आहोंत हें लोकांच्या लक्षांत यावं ही इच्छा त्यांच्या मनांत दबा धरून बसली आहे; पण त्यांचं एम्. ए. पण लोकांच्या विशेष नजरेत भरत नाहीं. लोकांच्या नजरेंत भरतं त्यांचं तरुण वय, त्यांचा रुबाब, त्यांचा गणवेष, त्यांच्या नोकरींतील बढतीची शक्यता, त्यांची सत्ता, त्यांना आज व उद्यां मिळणारा पैसा, लग्नासाठीं योग्य वर म्हणून त्यांची लायकी.

लोक आपला उपवधु तरुण म्हणून विचार करतात, हें सहस्रबुद्ध्यांना आवडतं. ते स्वतःदेखील स्वतःचा असाच विचार करतात. अहोरात्र ते त्या

विचाराची जिवाभावानं जपणूक करतात. ऑफिसांत बसल्या बसल्या राज्यकारभाराचा कागदी शकट लेखणीच्या सामर्थ्यानं हाकलतां हाकलतां, सकाळीं हाताखालच्या पोलिसांची कवायत पाहतां पाहतां सहस्त्रबुद्ध्यांचं मन विवाहाचा विचार करीत असतं. त्यांचं वयच तसं आहे, चांगली अधिकाराची नोकरी आहे, पैसा आहे, सत्ता आहे, तारुण्य आहे; मग लग्नाचा विचार करायचा नाहीं तर, करायचा कशाचा ? आपलीं कामं व्यवस्थित करतां करतां हा विचारहि त्यांना व्यवस्थितपणें करतां येतो. एकाच वेळीं दोन कामांचा विचार करायची त्यांच्या तल्लख डोक्याला संवय आहे. त्या डोक्यांतल्या मेंदूला अनेक कपाटं आहेत. एकाच वेळीं एकाहून अधिक कपाटं उघडीं करून योग्य त्या गोष्टी त्यांत भरण्याचं कसब त्यांच्यापाशीं आहे. नेपोलियनला नव्हता का एकाच वेळीं अनेक गोष्टींचा विचार करतां येत ? ऑफिसमध्यें बसल्या बसल्या सहस्त्रबुद्धे वरचा आदेश खालीं पोचवण्याचीं, वरिष्ठांची आज्ञा समजून घेण्याचीं, हाताखालच्यांना हुकूम सोडण्याचीं, त्यांच्या अधिकारांत असलेल्या विभागांतल्या चोऱ्या, खून, बलात्कारादिकांची नोंद आणि फोड करण्याचीं विविध कामं करीत आहेत व त्याच वेळीं आपल्या भावी वधूचाहि विचार करीत आहेत. पत्नीविषयीं त्यांच्या ज्या कल्पना आहेत, त्यांना निश्चित आकार द्यायचं काम करण्यांत यांचं मन रमून गेलं आहे. हा आकार, हें रूप निश्चित होत नाहीं; पण तें सुंदर असणार यांत शंकाच नाही.

आपल्या संसाराची जोडीदारीण कशी असेल ? कलमी आंब्याच्या फाकीसारखी तिची आकृति असेल; तिचा वर्ण गोरा असेल, पण फिकट असणार नाहीं, त्यांत थोडीशी गुलाबी छटा तरळेल. तिचं नाक सरळ असेल, पण उभट नाहीं. दांत बारीक असतील, पण उंदराच्या दातांसारखीं कुरतडलेली पंक्ति असणार नाहीं तिच्या गालाला हंसतांच खळी पडेल, पण उगीच हंसायची संवय तिला असणार नाहीं. ती बोलेल कमी पण मुखदुर्बळ असणार नाहीं. प्रकाशशलाकेसारखं तिचं व्यक्तित्व प्रसन्न राहील, पण दाहक असणार नाहीं. कोंवळ्या उन्हाच्या तिरीपीसारखी ती आपलं आयुष्य सौम्य-

पणं उजळून काढील. नुसतं रूपच नव्हे, तर उच्च कुळाचा वारसाहि ती आपल्यासह घेऊन येईल. रेशमाच्या पोतांत जरीच्या काड्या असाव्या, तशा तिच्या सौंदर्यांत संस्कारांच्या छटा उमटायला हव्यात. नुसते घरगुती बाळबोध संस्कारच असून चालायचं नाहीं; त्यांच्यावर उच्च शिक्षणाची चकाकी हवी. चारचौघींत उठून दिसेल अशी सखी आपल्याला हवी; ती उठून दिसायला हवी, पण उठवळ मात्र वाटायला नको. पहाणाऱ्याचं लक्ष वेधून घ्यायला हवं. पण इतकं वेधून घ्यायला नको कीं, ज्यामुळें आपल्याकडे दुर्लक्ष होईल. हें सर्व तर हवंच; पण रिकाम्या हातानं तिनं आपल्याकडे येऊन चालणार नाहीं. येतांना तिनं आपल्याला साजेल असं धन आणायला हवं. फार धन नको, प्रत्यक्ष पैसा नको; फक्त मोटर हवी. आपल्यासारख्या अधिकाऱ्याजवळ मोटर नसावी, हें बरं नव्हे. मोटर नसल्यामुळें सारखा कमीपणा जाणवतो. तो भरून काढणारी पत्नी मिळायला हवी. एक मोटर म्हणजे तसं आपण फार मागत नाहीं.

आपल्यासारखा जोडीदार मिळावयाचा म्हणजे एवढं द्यायलाच हवं! पत्नीविषयींच्या आपल्या कल्पनेंत थोडाफार तपशिलाचा फेरफार करायला सहस्रबुद्ध्यांची तयारी आहे. तिचा रंग गुलाबी गोरा नसून पिवळसर गोरा असला तरी हे त्यांना चालेल; तिच्या उंचीच्या किंवा वजनाच्या मापांत थोडासा फरक असला तरीहि तो चालेल. शैक्षणिक पात्रतेसंबंधींहि आपल्या दृष्टींत उदारता आणायला ते तयार आहेत. तिचा स्वभाव शंभर टक्के चांगला नसला तरी ते तो गोड मानून घ्यायला तयार आहेत. अपेक्षा आणि प्रत्यक्ष यांत थोडंसं अंतर असायचंच, हें त्यांना मान्य आहे; पण कांहीं झालं तरी त्या तपशीलांचा परिणाम दृष्टीला सुखकारक ठरायलाच हवा. एका तपशिलांत मात्र बदल करायला ते मुळीच तयार नाहींत. त्यांना नुसतीच बायको नको; तिच्यासह मोटरही असायलाच हवी. त्या बाबतींत आपली अपेक्षा सोडायला ते मुळींच कबूल नाहींत.

कां कबूल व्हावं? त्यांच्या बरोबरीच्या अधिकाऱ्यांना जें मिळालं, तें त्यांनाच कां मिळूं नये? तशी त्यांची मागणी कांहीं फार नाहीं; तसा त्यांचा



ज. मा.....३.

स्वभाव फार दुराग्रही नाहीं. थोडंफार सोडायला, थोडंफार जुळवून घ्यायला त्यांची ना नाहीं. त्यांना स्वतःला कोरीकरकरीत शेव्हरोलेट गाडी आवडते. पण कुणीं त्यांना हिलमन नाहीं तर ऑस्टिन दिली तर ते कुरकूर करणार नाहींत. नव्या गाडीची मौज कांहीं और असते, हें त्यांना माहीत असूनहि ते किंचित् जुनी गाडी स्वीकारायला तयार आहेत. जुनी म्हणजे फार जुनी मात्र नको! दोन वर्षांनीं जुनी झालेली गाडी त्यांना चालेल. आणखी किती सूट द्यायची माणसानं आणि कां द्यायची? लग्न म्हणजे एक व्यवहार. माणसानं व्यवहाराला चोख असायलाच हवं. व्यवहारांतून प्रेम उत्पन्न होत नाहीं असं थोडंच आहे? पुढं प्रेम उत्पन्न होईलहि—होईलच. पण सुरवातीला व्यवहार बघायलाच हवा. आपलं लग्न म्हणजे प्रेमविवाह नव्हे.

बरं झालं, प्रेमविवाहाच्या जाळ्यांत आपण पडलों नाहीं! प्रेम म्हणजे आंतबट्ट्याचा कारभार. त्यांतून निसटलों हेंच बरं. हो, निसटलोंच! कारण कॉलेजच्या चवथ्या वर्षांत आपलीं पावलं त्या जाळ्याकडेच वळलीं होतीं. पण जाळ्यानंच आपल्याकडे पाठ फिरवली. हीं चालतींबोलतीं नखरेबाज जाळीं फार हिशेबी असतात. भक्ष्य घेतील तेंसुद्धा निरखून. त्या वेळीं निरखून पाहण्यासारखं आपल्याजवळ होतं काय? झालं तेंच बरं झालं! त्यानंतर आयुष्याची आखणी कशी मोजून झाली. आतांपर्यंतचं सगळं आयुष्य योजनाबद्ध होतं; पुढंहि तें तसंच राहील. त्यांत फेरफार नको. ठरवलं तें सगळं विचार करून, आसपास बघून. ठरवलं तेंहि फार नाहीं. चांगली मुलगी आणि चांगली मोटर; नुसती एक चालणार नाहीं.

सहस्रबुद्धयांच्या ऑफिसांत त्यांच्या टेबलाजवळच भिंतीवर एक कॅलेंडर फडफडत आहे. तें त्यांनीं तिथें लावलेलं नाहीं. त्यांच्या कारकुनानं किंवा एखाद्या पोलिसानं तें तिथें आणून लावलं असेल. त्या कारकुनाचा उद्देश सहस्रबुद्धयांना खूष करायचा असावा. कदाचित् निर्हेतुक बुद्धीनं कुणीतरी तें कॅलेंडर तिथें लावलं असेल. कांहीं का असेना, सहस्रबुद्धयांच्या मनाचं चित्र तें कॅलेंडर त्यांच्या डोळ्यांसमोर उभं करीत आहे. कॅलेंडर एका मोटर कंपनीचं आहे. एका कोऱ्या करकरीत मोठ्या मोटरींतून बाहेर येत

असलेल्या सुंदरीचं तें चित्र पाहून फुलाच्या पोटांतून बाहेर येणाऱ्या परीची त्यांना आठवण होते. मोटर, सुंदरी, फूल, परी, एकामागून एक निघून जाणारे दिवस—सगळं त्यांच्या डोळ्यांसमोर एकत्र नाचतं, सारखं फडफडत असतं.

कॅलेंडरचीं पानं फाडलीं जातात आणि दिवसांची माळ ओघळत जाते. सहस्रबुद्धयांचं आयुष्य व्यर्थ चाललं आहे असं लोकांना उगीच वाटतं. उगीचच नाहीं तर काय ? खरं म्हणजे त्यांच्या आयुष्यांत एकसारखं कांहीं ना कांहीं घडत आहे. तत्त्वज्ञानाची एम. ए. परीक्षा झाली. त्यानंतर उच्च अधिकार-पदाची विशेष परीक्षा झाली. त्यानंतर पोलीस विभागासाठीं निवड, प्रशिक्षण, नियुक्तिक झाली. कामाचा अनुभव वाढत आहे. नोकरींत नांव होत आहे. तत्त्वज्ञानाच्या आकाशी विषयांत लागलेली डोक्यांत चालण्याची उफराटी संवय मागें पडली आहे आणि आतां जमिनीवर पाय पक्के रोवून चालण्याची संवय अंगांत मुरूं लागली आहे. निरानिराळे गुन्हे हुडकून काढण्याचं कसब इतकं वाढत चाललं आहे कीं, ‘ लाथ मारीन तिथून गुन्हा काढीन ’ असा आत्मविश्वास वाटूं लागला आहे. लौकरच सबंध जिल्ह्याचा अधिकार मिळणार आहे. तरीहि लोकांना वाटतं, कीं सहस्रबुद्धयांच्या आयुष्यांत महत्त्वाचं कांहींच घडत नाहीं. त्यांचं आयुष्य खोळंबलं आहे अशीच लोकांची समजूत झालेली दिसते ! बरं, लोकांनीं काय वाटेल ती समजूत करून घेतली तरी ती आपल्यापाशींच ठेवावी. पण जिथं जावं तिथं तीच भुणभूण. लग्न, लग्न, लग्न ! जणूं कांहीं लग्न झालं नाहीं म्हणून आपल्यांत कांहींतरी उणीवच आहे ! होईल, लग्नहि होईल. असं वय तरी किती झालं आहे ? केवळ अठ्ठावीस वर्षं साहेब लोक नाहीं कां पन्नास-साठपर्यंत कुंवारे राहात ? आणि एखादे वेळीं लग्न नाहीं झालं तरी अडतं काय ? निदान माणूस मरत तर नाहीं ? मग उगीच ही भुणभूण कां ? लोक तगादा लावतात तर त्यांनीं आपल्याला पसंत येईल असं स्थळ सुचवावं. हेंहि नाहीं. उगीच त्रास देतात लेकाचे आणि अस्वस्थता वाढवतात !

साधं कुणाशीं बोलणं, कुणाच्या घरीं जाणं देखील कठीण होत चाललं आहे. कोण केव्हां लग्नाचा विषय काढील याचा नेमच उरला नाहीं. घरांत

तेंच, ऑफिसांत तेंच, संध्याकाळीं क्लबांत तेंच. लोकांशीं कसं बोलावं, कसं वागावं हेंच कळेनासं झालं आहे. आपण ज्यांच्या घरीं अनेकदां जाऊन आलों, अशा एका आय्. ए. एस्. अधिकारी मित्राला आपण आपल्या घरीं सहकुटुंब येण्याचं आमंत्रण दिलं तेव्हां तो एकटांच आला, सपत्नीक न येण्याचं कारण विचारलं, तेव्हां त्यानं उत्तर द्यायची टंगळमंगळ केली, म्हणून संध्याकाळीं क्लबांत त्याच्या बायकोलाच विचारलं, तेव्हां ती म्हणते काय—" अहो, तुमच्याकडे यायचं कसं ? तुम्हीं एकटे. ज्यांचं लग्न झालं नाहीं त्यांच्याकडे स्त्रियांनीं जायची रीत नाहीं हें तुम्हांला माहीत नाहीं कां ? अगोदर लग्न करा मग न बोलावतां येऊं ! " नका येऊं. इथं कुणाचं अडलं आहे ? म्हणे रीत नाहीं. वा रे रीत ! अजब आहेत एकेक चालीरीति.अशानं अविवाहित माणसाला पळच काढावा लागेल समाजांतून ! तसंच होऊं लागलं आहे. असं वाटतं, या सगळ्यांच्या मुसक्या बांधाव्या अन् सांगावं, ' एका पोलीस अधिकाऱ्याची थट्टा करतां काय ? पण मुसक्या तरी कशा बांधायच्या ? आपण काय करतो हें ज्यांना कळत नाहीं, त्यांना कडक शासन तरी कसं करायचं ?

कांहींजण उघड्या कार्डावरच लग्नाचा विषय लिहितात आणि तीं पत्रं पाठवतात. कुठं, तर ऑफिसच्या पत्त्यावर ! हाताखालचे सगळे कारकून आळीपाळीनं तीं पत्रं वाचत असले पाहिजेत; एरवीं त्यांच्या तोंडावर चावट स्मित कां असावं ? ऑफिसमध्यें कटकटीचं काम निस्तरत असतां कुणाचीतरी चिठ्ठी चपरासी आंत आणतो. सरकारी कामासाठीं कोण येतो आणि कोण फालतू गोष्टींसाठीं येतों हें सुद्धां या शिपायांना ओळखतां येऊं नये ? पोलीस खात्यांतल्या शिपायांना इतकी साधी गोष्ट हेरतां येऊं नये म्हणजे कहर झाला ! सरळ ब्रेटे आंत चिठ्या आणून देतात. कुणाला भेटत नाहीं असं सांगणंहि धोक्याचं झालं आहे. लोकशाहीचे दिवस हे. भेटीला येईल त्याच्याशीं बोललंच पाहिजे ! भर ऑफिसांत लग्नाच्या गोष्टी आणि त्याहि मोठ्या आवाजांत. अशा लोकांना आल्या वाटेनं परत नाहीं करायचं तर काय करायचं ? अशा लोकांच्या मुलींना काय वळण असेल तें दिसतंच आहे ! यांच्या पोरी नाकारल्या हा काय गुन्हा झाला ?

लेकाचे बदनामी करतात! आतांपर्यंत फक्त नऊ मुली नाकारल्या; पण लोक एकमेकांना सांगतात कीं, आंकडा नव्वदावर गेला आहे. नवाचे नव्वद करून सळो की पळो करायचा चंग बांधतां काय? अशानं मी गवसणार नाहीं म्हणावं! चारी बाजूंनीं आरडाओरड करून मला कोंडींत धरायची ही युक्ति मला नाहीं फसवूं शकणार! करा, वाटेल तेवढी आरडाओरड करा! मी फसणार नाहीं. मागें असंच एकदा एकानं जाळं टाकलं. सुंदर मुलगी आणि सुंदर गाडी माझ्यापुढें आणून उभी केली. त्यांना काय वाटलं, कीं त्या कोऱ्या चकचकीत गाडीनं हुरळून जाईन! गाडी नवीन होती; पण मुलगी जुनी होती. आम्ही पोलिसवाले. लोकांच्या भानगडी आमच्यापासून कशा लपतील? जुनी पोरगी दाखवतां काय? बदमाष लेकाचे. तुरुंगांत नाहीं डांबलं हा आपला चांगुलपणा झाला; पण तो लक्षांत घ्यायला कुणी तयार नाहीं!

लोकांचं सोडा, घरच्या माणसांना नको का कळायला? त्यांनाहि आपल्या-बद्दल सहानुभूति नाहीं, म्हणूनच आपले आईवडील एवढा मोठा बंगला गडीमाणसं, आपले आईवडील म्हणून मिळणारा मान—सगळं सोडून लहान भावाकडे रहायला गेले आहेत. त्याचा थोडका पगार, लहानसं घर, गडी-माणसांची वाण, एकंदर ओढाताणीची परिस्थिति त्यांना आवडते. जाऊं द्या! आपण आपल्याकडून त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केलाच आहे. महिन्या दोन महिन्यांत कांहीं ना कांहीं त्यांना पाठवतोंच. यापेक्षां आपण काय करणार? एकेकाला सुख भोगतांच येत नाहीं; त्याला आपण तरी काय करणार?

कॅलेंडरचीं पानं कमी होत चाललीं; दिवस भराभर उडून चालले. आतां कॅलेंडरवरचे महिन्यांचे कागद संपत आले. एक कागदच तेवढा फडफडत आहे. कॅलेंडरवरचें मोटरींतून उतरणाऱ्या सुंदरीचं चित्र जुनं होत चाललं आहे. सहस्रबुद्ध्यांचं आयुष्य आहे त्याच वळणांनीं चाललं आहे. कवायत, ऑफिस, दौरा, क्लब. अजून कॅलेंडरवरचं चित्र प्रत्यक्षांत उतरत नाहीं! इतकी का त्यांची महत्त्वाकांक्षा मुलुखावेगळी आहे? त्यांना हव्या तशा मुली त्यांना माहीत आहेत. नुसत्या मुली नव्हेत; बरोबर मोटर आणूं

शकणाऱ्या मुली त्यांना दिसत आहेत. त्या मुली त्यांना पसंत आहेत, त्यांच्यापैकी कुणाशींहि लग्न करायला ते एका पायावर तयार आहेत; फक्त एकच अडचण आहे !

त्यांना हव्या असलेल्या मुली आसपास आहेत; पण त्या सहस्रबुद्धयांना सांगून येत नाहींत ! त्याचं कारण त्यांना माहीत आहे. त्या माहितीमुळं कधीं कधीं त्यांना भयंकर त्वेष येतो. त्या मुली मोठ्या घराण्यांतल्या आहेत. त्यांना आणि त्यांच्या आप्तेष्टांना आपल्या घराण्याचा मोठा दिमाख वाटतो. खानदानीची ऐट आणून ते आपला विचार करीत नाहींत. खानदान ! अशा कित्येक खानदानी धुळींत मिळाल्या. लखनौला म्हणे सगळे टांगेवाले खानदानीचा वारसा सांगतात ! खानदानीच्या दिमाखांत फजीत झालेल्या आणि जन्मभर कुमारी राहून बदनामीचं ओझं डोक्यावर वाहणाऱ्या अनेक वय वाढलेल्या मुली—मुली कसच्या ! बायाच त्या !—त्यांना माहीत आहेत. म्हणे मोठं घर ! नांव मोठं आणि दर्शन खोटं ! म्हणे खानदान उपरकी टामटूम; अंदरकी राम जाने....राम जाने कशाला ? या खानदानीच्या बाहुल्यांतला पेंढा सगळ्यांनाच कळतो. आज खानदानीची ऐट मारणाऱ्यांचा कालचा इतिहास काय सांगतो ? गेल्या पिढींतली—फार तर दोन पिढ्यांपूर्वींची भिक्षावृत्ति, वाममार्गानं मिळवलेला कलंकित पैसा, हांजी-हांजी, उघड किंवा प्रच्छन्न दरोडेखोरी, बनवाबनवीचे धंदे, वैयक्तिक फसवणूक, राजकीय द्रोह, म्हणे खानदान ! फार तर दोन—तीन पिढ्या घरांत साचलेलं वैभव. आयत्या पिठावरच्या रेघोट्या. तें पीठ फार वर्षे टिकत नाहीं ! मग तोंडांत पूर्वींचा इतिहास, पूर्वजांचं गुणगान आणि हातांत नरोटी.

एवढी कशाला ऐट आणायची ? ऐट दाखवायची तीहि आपल्यासारख्याला ? पाहतां पाहतां वैभव येईल; ऐश्वर्य येईल, सत्तेला मर्यादा राहणार नाहीं. एका पिढींत सगळं सोनेरी होईल आणि आपलीं मुलं खानदानीचीं वस्त्रं घालून मिरवूं लागतील. समाज त्यांना डोक्यावर बसवील....पण लग्नच नाहीं, तेव्हां मुलं कशीं व्हायचीं ? म्हणजे मुळांतच अडचण उत्पन्न झाली ! हें असं होतं ! मन सगळ्या मर्यादा उल्लंघून

३५०६४ ... ९८०४

काळाचीं, स्थळाचीं, परिस्थितीची वळकटी बांधू पाहतं; पण कुठं ना कुठं वास्तवाच्या तटावर आदळतं, जखमी होतं आणि परत आपल्या स्थानावर परततं. नुसतं मनच जखमी होतं असं नाहीं; मनाबरोबर शरिरालाहि मार बसतो. शरीर अस्वस्थ होतं, घाबरतं, स्वतःवरील ताबा गमावून बसतं!

कॅलेंडरचीं सगळीं पानं झडून गेलीं आहेत. जुन्या कॅलेंडरच्या शेजारीं नवीन लावण्यांत आलं आहे... नवीन कॅलेंडरचींहि अर्धीं पानं संपत आलीं आहेत. त्याच्यावरहि एका सुंदरीचं चित्र आहे. ती एकटीच आहे; तिच्या शेजारीं मोटर नाहीं! नुसता स्त्रीचा चेहरा, तलम वस्त्रांत दडलेलं न दडलेलं तिचं यौवन, मोटर जवळ नसूनहि ती स्त्री सहस्त्रबुद्ध्यांच्या डोळ्यांत भरत आहे. जुन्या कॅलेंडरवरची मोटरवाली तरुणी जुनी होत चालली आहे, म्हातारी दिसूं लागली आहे! चित्रं का कुठं म्हातारीं होतात? म्हातारी होतात माणसं! आपण म्हातारे तर झालों नाहीं? छे छे, एकूणतिसाव्या वर्षीं का कुणी म्हातारं होतं? ऐन तारुण्यांत ही वार्धक्याची भावना? हे सगळे मनाचे चाळे आहेत. पण मनाच्या या चाळ्यांनीं शरीर फसतं, नाना तक्रारी करूं लागतं, वाकडं वागूं लागतं. नोकरानं केलेल्या सैंपाकाचा कंटाळा येतो. रात्रीं बंगल्याच्या एकान्तांत, फिरतीवर विश्रामस्थानांत सापांची भीति वाटते. कोल्हेकुईनें माणूस भांबावून जातो; किड्यांच्या किरकिराटामुळें झोंप येत नाहीं. कुठं एखादं पान पडलं किंवा पक्षी पंख फडफडवीत निघून गेला, तर माणूस भयंकर दचकतो? हे साप, हे कोल्हे, हे किडे, हीं पानं, हे पक्षी—सगळं आसमंतांत आहेत, कीं आपल्या मनांत? आपल्यालाच तेवढी भीति कां? शंका कां अशांति कां?

दिवस निघून चालले आहेत. सहस्त्रबुद्ध्यांना लौकरच एका संपूर्ण विभागाचीं सूत्रं मिळणार असून त्यांच्या सत्तेंत आणि उत्पन्नांत वृद्धि होणार आहे. लोकांनीं दिलेल्या मोटरीची वाट पहाणं त्यांना आतां परवडत नाहीं. मुली आणि मोटारी वेगवेगळ्या पहायला तें तयार होत आहेत. त्यांपैकीं मोटरी त्यांना दाखविण्यांत येत आहेत, पण मुली मात्र त्यांना फार कमी सांगून येत आहेत. मुली अगदींच सांगून येत नाहींत असं नाहीं; पण

पहिला झपाटा एकदम कमी झाला आहे. लोकांनीं त्यांचा नाद जवळजवळ सोडून दिला आहे. कशाला पोलीस अधिकाऱ्याच्या भानगडींत पडायचं ! पोलीसवाले लोक कधीं चिडतील आणि कधीं उलटून चावतील याचा नेम नाहीं !

लोक लग्नासाठीं आपल्या मागें लागत नाहींत या घटनेनं खूष होण्याऐवजीं सहस्रबुद्धे खिन्न होत आहेत. ' बरं झालं, कटकट गेली ! ' असा विचार त्यांच्या मनांत येत नाहीं. विचार येतात ते थेट उलटे ! आपलं मन आणि शरीर कच खाऊन केव्हां दगा देईल, याविषयीं त्यांचा त्यांना भंरवसा वाटत नाहीं. आपली इच्छा इतकी का अशक्य–कोटींतली आहे ? मोटर नाहीं तर नाहीं; निदान सुंदर बायको तरी कां मिळूं नये ? अशा सुंदर बायका समाजांत आहेत; पण त्या सगळ्या दुसऱ्यांच्या बायका ! आपल्या कल्पना दुसऱ्यांच्या बायकांच्या रूपानं साकार झालेल्या दिसतात. सहस्र-बुद्धयांना स्वतःची अतिशय खंत वाटते. ओळखीच्या बायकांकडे धड पाहण्याचं धैर्यहि त्यांना होत नाहीं. आपलं मन धोकेबाज झालं आहे; त्याला कसं ताब्यांत ठेवावं, हें त्यांना कळत नाहीं. स्वतःला सांवरण्याचा त्यांचा प्रयत्न आटोकाट चाललेला असतो आणि तरीहि तो फसतो !

सहस्रबुद्धे आपल्या कचेरींत बसले आहेत. त्यांच्या मनांत समोरच्या कामाशिवाय दुसरा कसलाहि विचार नाहीं; निदान त्यांच्या जाणिवेंत तरी नाहीं. एकामागून एक काम ते निस्तरत आहेत. तेवढ्यांत त्यांना दारावरचा शिपाई एक चिठ्ठी आणून देतो. चिठ्ठीवरचीं अक्षरं ते वाचतात—' मो. गो. काळे, ' त्यांना ओळख पटत नाहीं. कुणी का असेना, भेटीची परवानगी देण्यांत येते. शिपाई बाहेर जातो आणि चिठ्ठी पाठविणारी व्यक्ति आंत येते. एकदम मनांत भरेल अशी तरुण स्त्री. सहस्रबुद्धयांच्या कल्पनेंतल्या स्त्रीसारखी ती गोरी नाहीं. नसेना का ! सुंदर आहे यांत शंकाच नाहीं. सहस्रबुद्धयांची दृष्टि तिच्यावर खिळते. ती तरुणीच बोलूं लागते, " आमच्या हौशी नाट्यमंडळाचा आपल्या या शहरांत आज ' समाजसुधारणा ' या नाटकाचा प्रयोग आहे; प्रयोगाचं आमंत्रण आपल्याला द्यायला व सुव्यवस्था राखण्यांत आपलं साहाय्य मागायला मी आल्यें आहें. "

" आपल्या आमंत्रणाबद्दल आभारी आहें. आवश्यक ती पोलीस-व्यवस्था अवश्य राहील. "

" आपली आभारी आहें, " म्हणून ती तरुणी नमस्कार करते आणि निघून जाते.

दूर जाणाऱ्या तिच्या पाठमोऱ्या आकृतीवर सहस्रबुद्धयांचे डोळे खिळतात; त्यांचे डोळे तिचा पाठलाग करतात. आपल्या खुर्चीतून उठून ते तिच्या मागे जातात; शेवटीं तिच्या बिन्हाडीं पोंचतात. हा पोलीस अधिकारी इथें कशाला आला म्हणून ' मो. गो. काळे ' विचार करूं लागले. अधिकारीहि गोंधळतात ! त्यांना तिला सांगावंसं वाटलं, कीं तिच्या त्या नांवामुळं ते तिला पुरुषच समजले. त्यांना तिला सांगाववंसं वाटलं, कीं तिच्यासारखा व्यक्तीनं आपलं सौंदर्य, तारुण्य, गुण या नाटकाच्या घालमेलींत खर्च करूं नये; तिच्यासारख्यानं कशाला समाजसुधारणेच्या दगदगींत पडावं ? तिनं स्वतः सुख घ्यावं आणि इतरा कुणा भाग्यवंताला द्यावं. नाट्यसेवा, समाजसुधारणा इत्यादि कटकटीचीं कामं इतरांनीं, तिच्या पेक्षां दुय्यम दर्जाच्या व्यक्तींनीं करावीं....

सहस्रबुद्धयांच्या तोंडून असलं कांहीं निघत नाहीं. ते केवळ म्हणतात, " तुम्हांला नक्की किती शिपाई हवेत हें विचारायला आलों मी ! "

" तें ठरवायला आपणच अधिक योग्य नाहीं का ? "

" नाहीं, पण म्हटलं विचारून घ्यावं. "

" थँक्स, ठरवा आपल्याला वाटेल तें ! "

" बरंय, येतों मी ! "

" या. "

सहस्रबुद्धे तिथून निघतात. आपल्यामागें कुणीतरी सोबत्यांबरोबर हंसत आहे, कुणीतरी आपली खिल्ली करीत आहे, असा त्यांना भास होतो. स्वतःच्या मूर्खपणाचा त्यांना भयंकर राग येतो. फाडफाड करीत ते ऑफिसांत परततात आणि हाताखालच्या माणसांवर गरजतात. त्यांना भयंकर राग आला आहे; स्वतःचा आणि त्या हौशी नाट्यप्रेमी समाज-

सुधारिकेचा. म्हणे नाटक करणार! म्हणे समाजसुधारणा करणार! जें करायला हवं तें करायला नको. जें शोभेल तें करायला नको; भलत्याच गोष्टींच्या भरीला लागायचं आणि शेवटीं फशी पडायचं!.... पडेना, आपल्याला काय त्याचं? त्या नाटकाकडे ते ढुंकूनहि पाहात नाहींत.

बरोबरीचे लोक विचारतात, "का हो, नाटकाला दिसला नाहींत?" सहस्त्रबुद्धे उत्तर देत नाहींत.

कुणीतरी चावट अधिकारी इतरांना सांगतो, "नाटकाला आले नसले तरी विन्हार्डी जाऊन आले आहेत!"

दुसरा शहाजोगपणें पुटपुटतो, "अरे वा, हाहि शोक आहे का? तरीच!"

तरीच काय? एकेकाच्या मुस्कडांत लगावून विचारावं, 'तरीच काय? बोलत का नाहीं साफसाफ?

तें जुनं कॅलेंडर त्यांना पाहवत नाहीं. शिपायावर ते गुरगुरतात,

"हें जुनं कॅलेंडर इथं कशाला? काढून का नाहीं टाकत? एवढी देखील अक्कल नाहीं. गधडे लेकाचे!" शिपाई मुकाट्यानं तें कॅलेंडर तिथून उचलतो. पुन्हा त्याला वाटतं, कीं साहेबांनीं इतके महिने आळगलेलं कॅलेंडर फेकून कसं द्यावं?

तो विचारतो, "साहेब, हें चित्र बंगल्यावर पोचवायचं का?"

साहेब चिडतात; "जाळून टाक!"

शिपाई हिरमुसला होऊन गालांत थपडा बसल्यासारखा निघून जातो. सहस्त्रबुद्धे टेबलावरचा फोन उचलतात आणि शहरांतल्या मोटरविक्रेत्याशीं बोलतात. "हॅलो! मी सहस्त्रबुद्धे. परवां पाहिलेलं तें फोर्ड मॉडेल मला पसंत आहे!"

फोनवरून उत्तर येतं, "तें मॉडेल कालच्च विकलं गेलं. दुसरं आहे साहेब.!"

"जें असेल तें घेऊन या. या वेळीं दौऱ्यावर मी माझी स्वतःची गाडी घेऊन जाणार आहे. पैशाचा हिशेब मागाहून करूं!"

पैशाचा हिशेब आम्ही कधींच करीत नाहीं, साहेब! आपल्यासारख्याला वस्तु उत्तम दिली कीं, आम्हांला समाधान होतं!"

सहस्रबुद्धे फोन खालीं ठेवतात आणि एक शिवी हासडतात,

" हरामखोर साले ! "

स्वतःची गाडी हाकीत सहस्रबुद्धे दौऱ्यावर -निघाले आहेत. गाडी चालवतांना त्यांची छाती अभिमानानं भरून गेली आहे. रस्ता तुडवतांना समाज तुडवल्याचा विलक्षण आनंद त्यांना होत आहे. बेगुमान, बेपर्वा वृत्तीनं त्यांनीं गाडी भरधांव सोडली आहे. या वेळीं ते एका महत्त्वाच्या कामावर निघाले आहेत. जनतेला उपद्रव देणाऱ्या दरोडेखोरांच्या एका टोळीविरुद्ध करायच्या कारवाईत सहस्रबुद्धे जातीनं भाग घेणार आहेत. त्यांची बंदूक भरली आहे, ठेवणींत पुरेशा गोळ्या आहेत, छातींत हिंमत आहे, त्यांची स्वतःची गाडी भरधांव चालली आहे....

सहस्रबुद्धे ज्या कामासाठी निघाले, तें पार पडलेलें आहे. गोळ्यांच्या फेऱ्या झडून गेल्या आहेत; पाठलाग संपला आहे. सहस्रबुद्धयांच्या हाताखालील एक शिपाई जायबंदी झालेला आहे. दरोडेखोरांतील एक मारला गेला आहे. बाकीच्यांना पकडण्यांत आलं असून खेड्यांतल्या चौकींत कोंडून ठेवण्यांत आलं आहे. पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त आहे. मध्यरात्र टळून गेली आहे; थकलेले सहस्रबुद्धे आपल्या तंबूंत आराम करीत आहेत. पण यांच्या डोळ्याला डोळा लागत नाहीं ! कांट्याकुट्यांतून हिंडतांना, गोळ्यांची फैर चालू असतांना, दरोडेखोरांशीं झटापट करतांना जाणवली नाहीं ती भीति नुकत्याच मिळालेल्या यशाचं पोट फाडीत आहे ! अंधाराच्या कुशींतून कुशंकेचे, अस्वस्थतेचे, एकाकीपणाचे असंख्य किडे बाहेर पडत आहेत. सहस्रबुद्धयांना एकाएकी गळाल्यासारखं वाटत आहे. कुणीतरी आपल्या शेजारीं बसावं व आपलं डोकं थोपटावं, तरच आपल्याला झोंप येईल. शरीर थकलं आहे; पण झोंप येत नाहीं ! सहस्रबुद्धे राहुटीबाहेरच्या शिपायाला हांक मारतात.

तो आंत येऊन विचारतो, " हुजूर हुकूम ! "

सहस्रबुद्धे कड बदलवून पुटपुटतात, " कांहीं नाहीं, जा सावध राहा ! " शिपाई जातो. सहस्रबुद्धे पुन्हां झोंपायचा प्रयत्न करतात; पण जोंपर्यंत अंधार जागा आहे, अंधारांतील किडे जागे आहेत, त्यांच्या शरीरांत उसळूं

पाहणाऱ्या वासना जाग्या आहेत, तोंपर्यंत झोंप शक्य नाहीं. सहस्रबुद्धे या कुशीवरून त्या कुशीवर वळतात; त्या कुशीवरून या कुशीवर वळतात. पुन्हा शिपायाला हांक—पुन्हा तेंच—"कांहीं नाहीं. जा, सावध रहा!" दिवस उगवतो आणि सहस्रबुद्ध्यांचे डोळे मिटतात.

ते घरीं येतात तेव्हां बरोबरीचे बडेबडे अधिकारी त्यांच्या पराक्रमाची विचारपूस करतात. वर्तमानपत्रांत ती बातमी येते. चार मतलबी लोक त्यांची स्तुति करतात. पण त्या प्रशंसेनं त्यांचं पोट भरत नाहीं. पराक्रमी पुरुषाचं स्वागत सुंदर, सोत्सुक नयनांच्या पायघड्या घालून केलं पाहिजे; पण तें करणार कोण? पराक्रमी पुरुषाचा थकवा नाजूक स्पर्शानं घालवला पाहिजे; पण तें करणार कोण? पराक्रमी पुरुषाचं अभिनंदन लुसलुशींत करमाला घालून केलं पाहिजे, पण तें करणार कोण?

सहस्रबुद्धे आपल्या बंगल्यांत झोंपले आहेत. पंखा चालू आहे; पण त्यांच्या जिवाची तलखी वाढत आहे. झाडंझुडपं झोंपीं गेलीं आहेत. ज्यांना ज्यांना शक्य आहे, ते सगळे मायेच्या कुशींत दिवसाचा शीण विसरत शांत झोंपले आहेत. सहस्रबुद्धे पलंगावरून वारंवार उठतात आणि अंगणांत येऊन आकाशाकडे पाहतात. आकाशांतल्या ताऱ्यांचं चमचमणं पाहून ते चिडतात. ताऱ्यांच्या डोळ्यांतली खिल्ली त्यांना सहन होत नाहीं. ते परत बिछान्यांत तळमळूं लागतात. त्यांच्या खोलींतल्या दिव्याची उघडझाप पाहून बंगल्याच्या आवारांतल्या नोकराच्या झोपडींत हालचाल होते. नोकर येऊन साहेबांना विचारतो, "साहेब, बरं नाहीं वाटत का?"

" साहेब उत्तर देतात, "अंग दुखतं थोडं, चहा करायचा आहे."

सहस्रबुद्ध्यांचा नोकर मोठा चतुर माणूस आहे. अनेक पोलिस—अधिकाऱ्यांच्या बंगल्यांत काम करून त्याचे केंस पांढरे झाले आहेत. कुणाला काय केव्हां हवं याचं व्यवहारज्ञान त्याच्यापाशीं भरपूर आहे. तो म्हणतो, "तुम्हीं स्वस्थ पडा. मी बनीला उठवतो. म्हणाल तर डॉक्टरसाहेबांना बोलावतों!"

सहस्रबुद्धे सांगतात, "नको नको, डॉक्टरांची गरज नाहीं. बनीचीहि नाहीं. तुम्हीं लोक स्वस्थ झोंपा!"

बनी त्याच आवारांत राहते. साहेबांच्या बंगल्यावर काम करते. साहेबांच्या नोकराच्या ती नात्यांतली आहे. तिचं वय पस्तीसच्यावर आहे. नवऱ्याशीं न पटल्यामुळें ती अशी वेगळी राहते. साहेबांच्या घरीं करायचीं कामं तिला अवगत आहेत. साहेबांचा नोकर अधिक धिटाइनं बोलतो, “ साहेब, घरांत थोडी बरांडी असेलच; थोडी घ्या, थकून गेला आहांत ! झोंप येईल, आराम मिळेल. अंग फार दुखत असेल. बनी अंग छान चेपून देते ! ” त्याला माहीत आहे कीं, रात्रीच्या अशी वेळीं धिटाई, सलगी पचते. उगीच नाहीं त्यानं इतक्या वर्षांच्या नोकरींत आपले केस पांढरे केले !

सहस्रबुद्धे थोडी ब्रँडी घेतात. त्यांना बरं वाटतं. पोटांत थोडीशी आग पेटते. फडताळ शोधून थोडींशीं बिस्किटं खातात. त्यांचं शरीर जडावतं. आतांपर्यंत रुसून बसलेली झोंप त्यांच्या डोळ्यांच्या कडांवर गुदगुल्या करते. तोंच बनी खोलींत येते. बनी आंत आलेली त्यांना कळत नाहीं. मोठ्या घरांत मांजराच्या पावलांनीं वावरायची कला तिला चांगली साधली आहे.

सहस्रबुद्धे डोळे मिटतात. जवळजवळ त्यांना झोंप लागते, तोंच बनी त्यांचे पाय चेपूं लागते. सहस्रबुद्धे पाय झकटतात. बनीचं पाय दाबणं चालूच राहतं. सहस्रबुद्ध्यांना तो स्पर्श आवडतो. त्या स्पर्शानं पहिल्यांदा त्यांना सुस्ती येते; बनीचं पाय चेपणं चालूच राहतं. तिचीं सराईत बोटं संथपणें त्यांच्या पायांवरून फिरत राहतात. त्यांच्या पायांवरील केंस ताठ होतात. त्यांचं अंग एकदम तापून निघतं. सहस्रबुद्धे बनीचा हात जोरांत दाबतात. बनीला तें अनपेक्षित नसतं. ती आपला हात त्यांच्या हातांत राहूं देते. हळूहळू ती आपला हात त्यांच्या छातीवरून, कपाळावरून फिरवते. त्यांचं अंग तापतं. बनी आपले हात त्यांच्या छातीवर रोवते. तोंच त्यांना दरदरून घाम सुटतो. क्षणभर गात्रं बधिरतात. लगेच ते अंथरुणांतून ताडकन् उठतात; तिला हिसडा देतात आणि हाकलून लावतात. बनी आली तशीच मांजरपावलांनीं नाहींशीं होते !

सहस्रबुद्धे दिवा लावतात. त्या प्रकाशांत त्यांना एकदम हलकं वाटतं. आतां जें अनुभवलं तें सत्य कीं स्वप्न ? त्यांना कळतं नाहीं. सत्य असेल

तर आपल्या अधःपतनाची पराकोटि झाली. स्वप्न असेल तर आपलं मन एखाद्या खोल गुहेसारखं काळंकुट्ट असलं पाहिजे. तें स्वप्नच असलं पाहिजे, अशी ते स्वतःची समजूत घालतात. दिवा बंद करायची हिंमत त्यांना होत नाहीं. दिवा बंद केला कीं, अंधारांत त्या अंधारापेक्षांहि काळं स्वप्न आपल्याला दिसेल. नको, तो अनुभव नको, तें स्वप्न नको. ते दिवा तसाच राहूं देतात.

दिव्याच्या भणभणत्या उजेडांत त्यांना बसवत नाहीं ! ते आपली बंदूक हातांत घेतात आणि घराबाहेर पडतात. आपण कुठं चाललों हें त्यांना माहीत नाहीं; ह्या बंदुकीचं आपण काय करणार हें त्यांना माहीत नाहीं. पायाखालच्या रस्त्यानं ते थेट चालत जातात. मधून मधून ते आकाशाकडे पाहतात. आकाशांतल्या चांदण्यांकडे पाहून हळूहळू त्यांचं मन स्थिर होतं. मध्यरात्रीच्या झुळुका त्यांना स्पर्श करतात. डोकं शांत झाल्यासारखं त्यांना वाटतं. हळूहळू ते परतूं लागतात. सहस्रबुद्धे बंगल्यांत परततात तेव्हां नोकराच्या झोपडींतला दिवा मिणमिणत असतो. त्यांची चाहूल लागतांच दोन्ही दिवे बंद होतात. सहस्रबुद्धे अविचल मनानं आंत प्रवेश करतात आणि लिहिण्याच्या टेबलाशीं बसून वडिलांना पत्र लिहितात—

"....माझ्यासाठीं एक मुलगी सांगून आली असं तुमचं पत्र बऱ्याच दिवसांपूर्वीं मिळालं. त्या पत्राला उत्तर द्यायची सवड मला आज झाली. मध्यंतरी मी दरोडेखोरांच्या एका टोळीशीं झगडण्यांत गुंतलों होतों. कदाचित् वर्तमानपत्रांतून तुम्हीं वाचलं असेल. लवकरच मला बढती मिळेल आणि या गांवाहून माझी बदली होईल. सामानाची बांधाबांध करायला तुम्ही सौ. आईला पाठवून द्यावं. ती मुलगी तुम्हांला पसंत असेल तर निश्चित करून टाकावं. दुसरी एखादी मुलगी तुम्हांला पसंत असली तरी मला चालेल. व्यवहाराच्या अटींवर बोलणीं मोडूं नयेत. आपल्याला कुणावर अवलंबून राहायची गरज नाहीं. आपल्याला काय कमी आहे ? लवकर लवकर तुम्हीं दोघांनींहि इथं यावं. मला तुमची फार आठवण होते ."

पत्र संपवतांच सहस्रबुद्ध्यांना अतिशय मोकळं, निर्मळ वाटतं. पोहून स्वच्छ झाल्यावर यावी तशी गाढ झोंप त्यांना येते. झोंपतांना त्यांचा चेहरा

लहान मुलासारखा निष्पाप दिसतो. त्यांना गाढ झोंप लागते. स्वप्नं नाहींत कीं कांहीं नाहीं ! नुसती शांत बालकासारखी झोंप.

नरहर रघुनाथ सहस्रबुद्धे हा एक उमदा तरुण आहे. स्वतःच्या कर्तृत्वा-वरच तो आतांपर्यंत वाढला आहे. पुढेंहि वाढवतील असे कितीतरी गुण त्याच्याजवळ आहेत. नरहर रघुनाथ सहस्रबुद्धे वाईट माणूस नाहीं. मन कधीं चुकतं, कधीं भरकटतं, कधीं माणसाला पाडूं पाहतं ! सहस्रबुद्ध्यांचं मनहि असंच आहे. म्हणून काय झालं ? त्यांना चांगली सोबतीण मिळायलाच हवी, त्यांच्यासारख्याला चांगली पत्नी मिळायची नाहीं तर मग कुणाला मिळायची ?

* * *

# रात्र

## ३

दिवसभराचा शीण झाल्यावरहि, झोंपेची मनधरणी केल्यावरहि आपल्याला झोंप येऊं नये आणि पलीकडच्या खोलींत झोंपून राहिलेल्या आपल्या बायकोच्या लयबद्ध घोरण्यानं आपल्याला चिडवावं, असं कां ? — त्या प्रश्नानं सुप्रसिद्ध कायदेपंडित श्रीपादराव काळे चिडले.

चिडून त्यांनीं आपला हात डोक्याकडे नेला. टक्कल पडून गुळगुळीत झालेल्या डोक्याच्या भागावर त्यांचा हात पडल्यामुळे तिथंहि त्यांना कांहीं गवसलं नाहीं. ते अधिकच चिडले. पण चिडून झोंपेला बोलावतां येत नाहीं, हें त्यांना माहीत होतं. आपल्या अभ्यासिकेंतून ते बाहेर आले आणि अंगणांत बसायच्या हेतूनं त्यांनीं व्हरांड्यांतील एक खुर्ची उचलली. अंगणांत बराच गारवा असतांनाहि आपले धनी उघड्यावर बसण्याचा लहरीपणा करीत आहेत, हें आवारांतल्या नोकरांच्या झोंपडींत विडी पीत बसलेल्या नोकराच्या ध्यानीं आलं आणि त्यानं घाईघाईनं एक झुरका घेऊन विडी विझवली. मालकाच्या हातांतली खुर्ची घेत त्यानं विचारलं, " कुठं ठेवूं ? " नोकराच्या हाताला हिसडा देत श्रीपादराव खेंकसले, " तूं लुडबुड करूं नकोस. झोंप जा ! " त्यांच्याकडे आश्चर्यानं पहात नोकर आपल्या झोंपडीकडे निघून गेला आणि श्रीपादराव स्वतःशींच पुटपुटूं लागले, ' नको ते पुढंपुढं करतात आणि हवे ते घोरतात !'

अंगणांत बसल्या बसल्या त्यांची नजर चमचमणाऱ्या निळ्या आकाशाकडे गेली आणि त्यांनीं भला मोठा उसासा टाकला. काय उपयोग होता त्या निळाईचा ? तें आकाश सुंदर होतं; पण काय उपयोग होता त्या सौंदर्याचा ? त्यांना जाणवलेल्या सुंदरतेचं गहिरेपण कुणी तरी समजून घ्यायला हवं होतं. पण कुणाला नि काय समजावणार ? समज असलेलीं माणसं अशीं घोरतात थोडींच ? आणि घोरत नसलीं, चक्क जागीं असलीं तरी त्यांना उमजायला हवं. दिवसभरांत त्यांनीं थोडा का प्रयत्न केला होता आपलं मन मोकळं करायचा ? पण त्याचा कांहीं उपयोग झाला नव्हता !

सकाळपासून पक्षकारांचा ससेमिरा मागं लागला होता. आपल्याला पैसे दिले म्हणजे त्यांनीं आपल्या व्यक्तित्वाचा कब्जाच घेतला, अशी त्यांची समजूत होती. पण त्यांचं वागणं समजण्यासारखं तरी होतं. बोलूनचालून धंद्यासाठीं आलेलीं माणसं तीं ! त्यांना हृदयाचा ओलावा नको होता; त्यांच्याकडून स्नेहाच्या झऱ्याची अपेक्षा करण्यांत अर्थ नव्हता. त्यांच्याविरुद्ध श्रीपादरावांची तक्रार नव्हती. रुपये खण्खण् वाजवून नोटांच्या घड्या दुमडून त्यांनीं पक्षकारांचं नातं मान्य केलं होतं. त्या नात्यांतून आणखी कांहीं अपेक्षित नव्हतं. फार झालं तर आणखी रुपये वाजवून घ्यायचे. आणखी नोटा मोजून घ्यायच्या. जें नातं पक्षकारांशीं, तेंच थोड्याफार फरकानं नोकरचाकरांशींहि. आपण पैसे द्यायचे आणि मोबदल्यांत सेवा घ्यायची. त्या सेवेविषयीं त्यांची तक्रार नव्हती. सकाळीं स्नानाचं पाणी काढणाऱ्या गड्यापासून तों नको तेव्हां पुढंपुढं करणाऱ्या रखवालदारापर्यंत सगळ्यांनीं आपापलीं कामं केलीं होतीं. त्यांच्याकडून फारशा अपेक्षा नव्हत्या, तेव्हां अपेक्षाभंग कुठला असणार ?

नाहीं म्हणायला घरांतला टिपू कुत्रा डाराडूर झोंपला होता. वेळ रात्रीची होती, आणि कुत्रा भात्यासारखी जोरजोरांत छाती हालवीत झोंपला होता. खाऊन खाऊन जड झालेला कुत्रा झोंपणारच. त्याचा धनी मात्र जागा होता आणि बोंचऱ्या वाऱ्याचे प्रहार सहन करीत आकाशाकडे नुसता पहात बसला होता. दिवसभर मनाला ताण पडला होता; शरीराला

आराम मिळाला नव्हता. आजचा त्रास उद्यांहि असाच रहाणार होता. तरीहि श्रीपादराव झोंपले नव्हते; त्यांना झोंप येत नव्हती. त्यांच्या पत्नीच्या घोरण्याचा आवाज अंगणापर्यंत त्यांच्या कानावर येत होता. पूर्वीं त्यांची पत्नी अशी घोरत नसे. पण श्रीपादरावांचा धंद्यांत जम बसला, घरांत धनवृद्धि झाली आणि बायकोचं अंग सुटलं व तिला घोरायची संवय लागली.

केवळ घोरण्यावर श्रीपादराव चिडले नव्हते. त्यांचा स्वतःचा जरी फारसा विश्वास नसला, तरी ते स्वतःहि घोरतात असा प्रवाद होता. तो प्रवाद त्यांनीं आपल्या बायकोच्या तोंडून ऐकला होता; मुलांच्या मिस्किल कुजबुजण्यांतून ऐकला होता. स्वतः श्रीपाद-रावांना घोरण्याची संवय असली काय अन् नसली काय, केवळ तेवढ्यावर चिडण्यासारखा त्यांचा स्वभाव माथेफिरू नव्हता. श्रीपादराव चिडले होते, कारण त्यांना या वेळीं बायको झोंपलेली नको होती. त्यांना तिच्याकडून काय हवं होतं ? विशेष कांहीं नाहीं. केवळ जागेपणींचा सहवास. चार शब्द —साधेसुधे, कांहींसे विसंगत शब्द. तेच त्यांना आज मिळाले नव्हते, कित्येक दिवसांत मिळाले नव्हते. ते आणि पत्नी एका घरांत असूनहि एकमेकांपासून कितीतरी दूर होतीं. हा दुरावा आपल्याला सहन होत नाहीं असं तिला सांगावं असं त्यांना किती तीव्रतेनं वाटत होतं. पण तिला तें समजायला हवं ना ! दुपारच्या जेवणाच्या वेळीं कोर्टात जायची घाई असूनहि ते रेंगाळले होते; पण त्या रेंगाळण्याचा अर्थ तिला मुळींच कळला नाहीं. उलट नवऱ्याला आज जरा फुरसद दिसते आहे, असा तिनं गैरसमज करून घेतला, आणि कॉलेजांत असणाऱ्या आपल्या थोरल्या मुलाला एव्हांनाच कशा मागण्या येऊं लागल्या आहेत, सुनेविषयीं आपल्या काय काय अपेक्षा आहेत, इत्यादि गोष्टी सांगून तिनं त्यांचं डोकं शिणवून टाकलं होतं. भलत्या वेळीं भलत्याच गोष्टी काढण्याचा तिच्या संवयीचा त्रास चुकवण्यासाठीं त्यांना घाईघाईनं कोर्टाच्या दिशेनं पळ काढावा लागला होता. तरी तिनं त्यांना भंडावून सोडलंच. मोटारींत ते बसतात न बसतात, तोंच

३५०६ ... 23/6/90


तिनं त्यांच्याकडून पन्नास रुपये वसूल केले. कशाकरितां ? तर म्हणे त्यांच्या मुलीला शाळेचीं पुस्तकं घ्यायचीं होतीं. शाळेचीं पुस्तकं आणि त्यासाठीं पन्नास रुपये ? पण वाद घालायला श्रीपादरावांना वेळ नव्हता. खिशांतनं पन्नास रुपये काढून देऊन त्यांनीं स्वतःची सुटका करून घेतली. असतील कदाचित्, पन्नास रुपये लागतहि असतील शाळेच्या पुस्तकांसाठीं ! पण तिच्याजवळ काय पन्नास रुपयेहि नसतील ? पण कामाला जाणाऱ्या माणसाचं मन समजून घ्यायला हलुवारपणा हवा ना !—आपल्या पत्नीच्या हृदयांतली कोंवळीक संपली, असा कटु निष्कर्ष त्यांच्या मनानं काढला न काढला, तोंच त्यांच्या पत्नीनं त्यांना सांगितलं, "कोर्टांतून आज लवकर या बरं का !"

त्या शब्दांनीं श्रीपादरावांच्या मनांतली शंका बुजवून टाकली आणि तें आशेनं भरून आलं. दिवसभर वाद–प्रतिवाद, युक्त्या-प्रयुक्त्यांचं डोक्यांत तण माजलं. पण एखाद्या कोंवळ्या कोंबासारखी ती आशा त्यांच्या मनांत लसलसत राहिली होती. त्या आशेवर त्यांनीं आपलीं कामं लवकर लवकर संपवण्याची शिकस्त केली. कुठं ते घोटाळले नाहींत कीं रेंगाळले नाहींत. नवीन अशीलांचीं कोर्टांत भेट झाली; पण ती भेट न लांबवतां त्यांनीं त्यांना घरीं यायला सांगितलं. तें काम तोडून टाकल्याप्रमाणं संपवून ते लगबगीनं घराकडे निघतांच बरोबरीच्या स्नेह्यांनीं त्यांना क्लबमध्यें चलण्याची गळ घातली. त्या प्रतिष्ठित मित्रांना नकार देतांच त्यांनीं मुळींच मुलाहिजा ठेवला नाहीं. क्लबमध्यें चलण्याचा त्यांना इतका आग्रह झाला, तरी ते त्या प्रलोभनाला टाळूं शकले आणि किती उघड शब्दांत !—" मला घरीं जायलाच पाहिजे. बायको वाट पाहात आहे. लवकर परतायचं मीं तिला कबूल केलं आहे. बायकोला दिलेला शब्द तंतोतंत पाळण्याचा त्यांचा उत्साह एखाद्या तरुण प्रेमिकासारखा असल्याची त्यांच्या मित्रमंडळींची खात्री झाली आणि जुन्या खोडावरील कोंवळी पालवी बघत असल्यासारखे ते सगळे श्रीपादरावांकडे बघूं लागले. त्यांच्या त्या आश्चर्यमिश्रित दृष्टीकडे लक्ष न देतां श्रीपादराव कोर्टांतून तडक निघाले ते थेट घराच्या आवारांत

येऊन थांबले. आवारांतूनच त्यांनीं पाहलं, तों त्यांची पत्नी त्यांची वाटच बघत व्हराड्यांत उभी होती. ती प्रतीक्षा पाहतांच श्रीपादरावांची छाती जुन्या आठवणींनीं आणि नव्या कल्पनांनीं फुगून आली. आपण कामावरून परत यावं आणि बायकोनं वेणीफणी करून, साजशृंगार करून आपलं स्वागत करावं, हा जुना अनुभव आज नवा झाला होता. कितीतरी वर्षांच्या खंडानंतर तो अनुभव मिळतांच वाढलेल्या वयाचं ओझं आपल्या व्यक्तित्वावरून उतरून गेलं आहे आणि परत एकदां तारुण्याचे, उमेदीचे दिवस आपल्यासमोर उभे आहेत, असा त्यांना भास झाला. त्या दिवसांना आतांची निश्चिती नव्हती, संपत्ति नव्हती; होती धांवपळ आणि खटपट. शिकत असतांना घेतलेल्या खिळखिळ्या सायकलवरून आनंदाच्या घांपा टाकीत आपल्या तीन खणांच्या घराकडे आपण परतत आहोंत आणि दिवसभराच्या कष्टानं लाललाल झालेल्या तेजस्वी चेहऱ्यानं आपली पत्नी आपलं स्वागत करीत आहे, असं दृश्य त्यांना दिसलं नि क्षणभर ते जागच्या जागीं खिळले.

क्षणभरच ! तो भास क्षणांत दिसला आणि नाहींसा झाला. समोर दिसत होतं वास्तव. त्या वास्तवांतली त्यांची पत्नी तरुण राहयली नव्हती: ते स्वतः तरुण नव्हते; त्यांच्या आयुष्याला निश्चितीचं वैभव प्राप्त झालं होतं. त्यांना टक्कल पडलं होतं आणि त्यांची बायको लठ्ठ झाली होती. पण याहि वास्तवांत गोडी होती; स्वास्थ्य होतं. शिवाय या वास्तवावरहि क्षणांत नाहींशा होणाऱ्या भासांची झिलई होती. बायकोच्या अंगावरील स्वच्छ कपडे, तिच्या चेहऱ्यावरील प्रतीक्षा आणि आपल्या मनांत कोंदलेला उत्साह. त्या उत्साहांतच त्यांनीं चहा घेतला. त्या उत्साहाला वाफ येत होती; पण बायकोनं त्या उत्साहावर पाणी टाकलं.

“ तुम्हांला लवकर बोलवायचं कारण होतं. मला आतां मोटार हवीय् ! ” ती म्हणाली. “ बखल्यांचं घर एकदां नीट पाहून येत्यें. तशी कल्पना आहेच मला; पण बारीक बारीक गैरसोयी नजरेंतून सुटायला नकोत ! नाहीं तर फार अडचण होते. आज संध्याकाळीं एंजिनियरांशीं

पक्क करून घ्या. ते येणारचं आहेत. आपली स्वतःची इमारत हवी; भाड्याचं घर कितीहि चांगलं झालं तरी आपलं तें आपलंच. भाड्यावर पैसे तरी किती मोजायचे ? आपली हक्काची जागा हवी, म्हणजे मनासारखं सगळं करून घेतां येतं. बखल्यांच्याकडून सरळ घरीं येऊं कीं येतांना मंडळांत जाऊन येऊं ? तुम्हांला गाडीची गरज नसेल तर जाऊन येत्यें मंडळांत ! पुष्कळ दिवस गेलें नाहीं. आतां आमच्या कार्यकारिणीच्या निवडणुकी व्हायच्या आहेत. तुम्हांला एवढ्यांतच नकोय् ना गाडी ?"

श्रीपादरावांना गाडी नको होती, स्वतःचं घर कां असलंच पाहिजे, हें त्यांना कळत नव्हतं. बायकांच्या मंडळांतल्या निवडणुकीचं महत्त्व त्यांना पटलं नव्हतं. गाडी, मंडळं, निवडणुकी, घर, हक्काची जागा....'तुझं आहे तुजपाशीं, परी जागा चुकलासी.' हातचं सोडून पळत्याच्या मागं धांवायचं कशासाठीं ? सारा पसारा. ज्याच्यासाठीं हा पसारा तिकडेच दुर्लक्ष झालेलं, बिंब सोडून प्रतिबिंब उराशीं कवटाळायचं.

हा सगळा पसारा रात्रीच्या त्या प्रकाशांत विरघळून जावा — सगळं सगळं वितळून वाहून जावं आणि उरावीं आपण दोघं आणि आपल्या मायेच्या खुणा—आपलीं मुलं. आकाश निळं होतं. आकाश चमचमत होतं. तें तसंच रहाणार होतं. हा पसाराहि असाच रहाणार होता. रहाणार नव्हतं तारुण्य. रहाणार नव्हत्या मनाच्या ऊर्मि. रहाणार नव्हता स्नेहाचा ओलावा. रहाणार होता निसर्ग आणि व्यवहार....गार वारा बोचत होता. सगळीं-जणं झोंपलीं होतीं. श्रीपादराव तेवढे जागे होते. पण असं जागून तरी काय मिळणार होतं ? काय मिळालं नाहीं हें सांगण्याची जिथं चोरी, तिथं काय मिळण्याची शक्यता ? हें उघड्यावर बसणं, थंडीवाऱ्यांत देहाला त्रासवणं.... निदान शरीर तरी स्वस्थ असूं दे. मन जागेपणीं कुढतं, कष्टतं. त्यापेक्षां झोंप बरी. ती सगळं विसरायला लावते. पण ये म्हणतांच ती येत नाहीं. पण आतां पुष्कळ वाट पाहिली. येईल, कदाचित् झोंप येईल; या आशेनं श्रीपादराव घरांत वळले, जड पावलांनीं. जड अंतःकरणानं त्यांनीं पलंगावर अंग टाकलं. केव्हां तरी झोंप येणारच होती.

सकाळीं त्यांच्या लक्षांत आलं कीं, काल आपल्याला झोंप आली, एवढंच नव्हे तर चांगली गाढ झोंप आली. शरीर ताजं झालं होतं. मन प्रफुल्ल होतं. झोंपेनं मनावरचा तवंग खरवडून काढला होता. आतां कांहीं किल्मिष शिल्लक नव्हतं. कां असावं? असं काय घडलं होतं, कीं ज्यामुळें त्यांची झोंप जावी, समाधान जावं, तोल जावा? छे छे! कांहीं झालं नव्हतं. कांहींतरी कष्ट अधिक पडले असावेत. एरवी काल वाटलं तसं विचित्र विचित्र कां वाटावं? मनाचा नुसता लहरीपणा. मनाला एखाददिवशीं चक्कर येते, एवढंच. नाहीं तर सगळं व्यवस्थित चाललं होतं. वकिली, प्रतिष्ठा, घर, गाडी, संसार—सगळं कांहीं आपल्या रस्त्यानं सुरळीत चाललं होतं— वेगांत जातं होतं. त्या वेगाचा श्रीपादरावांना अभिमान वाटला. तो वेग आणखी वाढवण्यांतच खरा पुरुषार्थ होता. त्यासाठीं कच खाणाऱ्या मनाला, लहरीपणा करणाऱ्या मनाला भरकटूं द्यायला नको. त्याला ताब्यांत ठेवायला हवं, त्याला मागं खेंचून कामाला जुंपायला हवं. इतकं जुंपायला हवं कीं, इकडे तिकडे लक्ष द्यायला त्याला फुरसदच मिळूं नये.

श्रीपादरावांना मुळींच फुरसद नव्हती. पक्षकारांशीं देखील फार बोलायला त्यांच्याजवळ वेळ नव्हता. विनाकारण बोलत असतात लेकाचे! प्रत्येकाला वाटतं कीं, त्याचा एकट्याचा प्रश्नच तेवढा महत्त्वाचा आहे. नाहीं नाहीं तो तपशील सांगत बसतात. एवढं ऐकायला वेळ कुणाला आहे? गरज कुठं आहे? न्यायाधिशासमोर काय भाकडकथा सांगायच्या असतात? मुद्याची गोष्ट बोलायची आणि आपलं काम साधून घ्यायचं. त्यासाठीं नुसती जीभ लांब करून चालायचं नाहीं; त्याला डोकं लागतं! —तल्लख, कांटेकोर, चपल डोकं! असं डोकं कीं, ज्याच्यांत गोंधळ नाहीं, कच्चेपणा नाहीं, थकवा नाहीं. म्हणूनच फक्त गरज असेल तिथंच तें घालायचं, चालवायचं; बाकीच्या भानगडींत लक्ष द्यायला नको. आपण नसत्या कटकटींत लक्ष घातलं तर कुठं कुठं पुरणार? आणि मग बायको, सहाय्यक, गडी आहेत तरी कशाला? पण नाहीं म्हटलं तरी लोक स्वस्थ बसूं देत नाहींत; आपला वेळ घेतातच. म्हणूनच घरीं आलेल्या

एका सामाजिक कार्यकर्त्याशीं आपल्याला बोलावं लागलंच. श्रीपादरावांनीं पंचवीस रुपये त्याच्या हातावर ठेवून त्याला वाटेला लावलं. असंच युक्तीनं वागायला हवं. या लोकांचा तसा उपयोग नाहीं. पण यांना उगीच नाराज करण्यांतहि फायदा नाहीं. उगीच बदनामीचा ढोल पिटीत हिंडतात लेकाचे! म्हणे समाजसेवा करतात! करा बेट्यांनो! पांचपंचवीस रुपये घ्या, आणि रस्त्याला लागा. इथं श्वास घ्यायला वेळ नाहीं आणि लोक येतात राजकारणाच्या फालतू गोष्टी करायला! म्हणे तुम्ही येत्या निवडणुकींत उभे रहा. कशाला? मला माझा धंदा आहे. पण असं त्यांना साफ सांगतां आलं नाहीं. त्यांना होकार तर दिला नाहींच; पण नकारहि नाहीं. आशेवर झुलवत ठेवणं हाच राजकारणी लोकांशीं वागण्याचा उत्तम उपाय. असले सगळे उपाय आपल्याला पाठ आहेत. तुम्ही राजकारणांत या बोटावरची थुंकी त्या बोटावर नाचवतां म्हणून तुम्हांला अभिमान असेल; पण मीहि वकिलींत दीडदोन तपं घालवून चांगला फटलों आहे. माझ्याशीं गांठ आहे. सहज फसणारी ही असामी नव्हे. समाजकारण करा, राजकारण करा, कीं स्थापत्य करा; मी फसणारा नव्हे. त्या वास्तुशास्त्रज्ञाला वाटलं कीं, मी म्हणजे नुसता कायद्यांतला किडा! तसं नव्हे महाराज! ज्यानं कायदा पचवला आहे, त्याला तुमचं स्थापत्य आणि वास्तुशास्त्र म्हणजे हातावरचा मळ! मोठमोठ्यांची भंबेरी उडवली आहे मीं, हें लक्षांत असू द्या! स्वतःला वैद्यकीय शास्त्रांतले तज्ज्ञ समजणारे, ऐकेका मिनिटाचं मूल्य रुपयांत मागणारे, मी मी म्हणणारे कितीतरी डॉक्टर कोर्टाच्या आवरांत आपण साफ लोळवले आहेत. त्यांच्याच विषयांत आपण त्यांना चीत केलं आहे. मग साध्या वास्तुशास्त्रज्ञाचा काय पाड! म्हणे वास्तुशास्त्रज्ञ! म्हणजे पांढरपेशा गवंडी! घरांत बाईसाहेबांशीं मिठ्ठास बोलून त्यांना बनवणं सोपं असेल; पण इथं माझ्याशीं मुकाबला आहे. बाईसाहेबांना काय होतं, नाहीं नाहीं ते चोज करायला? मी असला अनागोंदी कारभार चालूं देणार नाहीं. डोळ्यांत तेल घालून मी सगळीकडे लक्ष देत असतों....

श्रीपादरावांनीं व्यवहारांत बारीक लक्ष घातलं; पण त्यांच्या लक्षांत पुष्कळशा नाजूक गोष्टी आल्या नाहींत, हें पाहून त्यांची पत्नी खट्टू झाली. श्रीपादरावांना आवडतात म्हणून तिनं मुद्दाम जेवायला जे पदार्थ तयार केले, त्यांचे श्रीपादरावांनीं नुसते बकाणे भरले. पण पदार्थ चांगले झालेत कीं वाईट झालेत हें एका शब्दानंहि तिला सुचवलं नाहीं. तिलाच राहवलं नाहीं म्हणून तिनं विचारलं, " आवडले नाहीं वाटतं ? " त्यावर श्रीपादरावांनीं वकिली उत्तर दिलं, " आवडल्याशिवाय का मीं खाल्ले असते ? " पत्नीनं आपला मुद्दा अधिक स्पष्ट केला , " पण बोललां नाहींत ते ! " श्रीपादराव वकील असे हरणार नव्हते. त्यांचं उत्तर तयार होतं " खाण्याच्या पदार्थांची प्रशंसा तोंडानं करायला हवी हें मला कबूल आहे; पण जेवतांना तोंड वाजवायचं तें खाण्यासाठीं, बोलण्यासाठीं नव्हे. ! " त्या उत्तरानंतर ती कांहीं बोलली नाहीं. बोलण्यासारखं पुष्कळ तिला सुचत होतं. शक्य असतं तर नवऱ्याला कोर्टांत न जाऊं देतां दिवसभर आपल्यापाशीं बसवून ती बोलत राह्यली असती. पण तें आतां तरी शक्य नव्हतं. कोणे एके काळीं तें शक्य होतं. आज त्याची केवळ आठवण होती. ती आठवण होतांच तिच्या डोळ्यांच्या कडा एकाएकीं ओल्या झाल्या. पण तिनं ताबडतोब डोळे पुसले. असं गहिंवरणं बरं नव्हतं. कुणी पाह्यलं तर काय म्हणतील ? लगेच तिला वाटलं, कीं तिचे डोळे पाणावले तरी कुणाचं तिकडे लक्ष जाणार नव्हतं. निदान ज्या माणसाचं लक्ष असावं त्याचं तरी लक्ष जाणार नव्हतं.—तें सत्य तिला बोचलं आणि वेदनेनं ती स्वतः-शींच विव्हळली,—चूपचाप न बोलतां. बोलायचं तरी किती ? सगळं काय बोलूनच दाखवायला हवं ? कांहीं कांहीं गोष्टी न बोलतां दिसा-यला, कळायला नकोत कां ? बोलून त्यांची शोभा का घालवायची ? चित्र काढून त्यावर चित्र कशाचं असा खुलासा का करायचा ? त्यापेक्षां चित्र न काढलेलंच बरं ! बोलून काय स्वारस्य टिकणार आहे ? बोलायचंच म्हटलं तर पुष्कळ आहे; फार मोठं आहे. पण पुष्कळ जाऊं दे;

३४०६९ ... [सत्र]

मोठं जाऊं दे; थोडंसं—लहानलहानशा गोष्टी तरी दिसायला हव्यांत ! मुद्दाम त्यांच्यासाठीं हौसेनं बाजारांत जाऊन नवीन टाय् आणला, नवीन बटणं आणलीं, रुमालावर नवीन सेंट शिंपडलं, तें सगळं न सांगतां ओळखतां येण्यासारखं नाहीं का ? कोटावर घरांतल्या बागेंत असलेला छोटा टपोरा गुलाब खोवला, तो तरी लक्षांत येईल कीं नाहीं, कोण जाणे ! ...

कायदेपंडिताच्या काळ्या अंगरख्यांत हें सगळं दडून जाईल; आणि लक्षांतसुद्धां येणार नाहीं. त्या काळ्या अंगरख्यानं किती नाजुक गोष्टी गिळून टाकायच्या ठरवल्या आहेत, कोण जाणे ! पण न जाणों, दुपारीं चहा पितांना तो अंगरखा काढला जाईल आणि कदाचित् या गोष्टींचं नशीब उघडेल. कदाचित् बरोबरचे कुणी लोक म्हणतील, 'वा: ! श्रीपादराव, मोठे रसिक दिसतां बुवा ! अगदीं न चुकतां कोटावर गुलाब खोवतां !' दुसरा एखादा मित्र म्हणेल, 'तें कांहीं विचारूं नका ! ताज्या गुलाबाचा वास तर आहेच; पण खिशांतल्या रुमालाचा सुगंधी इषारा तुमच्यापर्यंत पोंचला नाहीं वाटतं ?' आणखी एखादा मित्र म्हणेल, 'तुम्हीं नुसती सुवासिक रसिकता ओळखलीत; पण श्रीपादरावांची रंगविषयक मार्मिकता तुम्हांला कशी दिसत नाहीं हो ?' त्यावर श्रीपादराव उत्तर देतील, 'मित्रांनो, कशाला माझ्या अंगीं नसते गुण चिकटवतां ? तुम्हांला माझी थट्टा करायची असेल तर आपली तयारी आहे. पण प्रशंसा करायची असेल तर माझ्या बायकोची करा. परमेश्वराची कृपा आहे. तिच्यामुळंच कांहीं उणं पडत नाहीं. उलट आयुष्याला सुगंध आणि रंग लाभला आहे...' पण बहुधा ते कांहीं बोलायचे नाहींत. कितीहि उत्कटपणें वाटलं तरी तें त्यांना बोलून व्यक्त करणं जमत नाहीं. नुसते लाजतील आणि लाजेनं त्यांचा चेहरा, कानांचीं पाळीं, फार काय टक्कलसुद्धां लाललाल होईल. म्हणजे मग मित्र आणखीच थट्टा करतील आणि ते फारच लाललाल दिसूं लागतील नि तिथून पळ काढतील अन् घरीं येतील; पण बोलणार मात्र

नाहींत. त्यांना बोलायची फार नावड आहे. पण बोलण्याच्या धंद्यांत मात्र एवढं प्रावीण्य कसं मिळवलं त्यांनीं कोण जाणे ? बोलणं म्हणजे काम असं तर त्यांना वाटत नसावं ? असेलहि, तसं वाटत असेलहि. पण न बोललं तरी चालेल. नुसतं त्यांनीं घरीं लवकर यायला हवं. ते घरीं लवकर आले कीं न बोलतांहि मला सगळं समजेल. बोलायला तोंड उघडलंच पाहिजे असं नाहीं. चेहरा नुसता दिसला कीं पुरे, वेळेवर चेहरा दिसला कीं पुरे....

ती वेळ केव्हां येते याची श्रीपादरावांची पत्नी सारखी वाट पाहूं लागली. तिनं पुष्कळ वेळ वाट बघितली. मुलांचे फराळ, कपडेलत्ते— सगळं आटोपलं. मुलं खेळून परत यायची वेळ झाली, सर्वत्र दिवे लागले, तरी श्रीपादराव आले नाहींत. तिचा जीव कासावीस झाला. तिला एकदम भय वाटूं लागलं, म्हणून तिनं परमेश्वराची करुणा भाकली. तेव्हां कुठं तिला बरं वाटलं. पण अजूनहि श्रीपादराव आले नव्हते. कांहीं सुचेना म्हणून ती बाजारांत गेली आणि शर्टासाठीं त्यांच्या आवडीचं कापड घेऊन आली. तेवढ्यांतच श्रीपादराव घरीं परतले.

परत येतांच ते पुन्हा कामाला लागले. कामामुळेंच त्यांना वेळ लागला होता. एक तर कोर्टांतलीं कामं संपतां संपेनात. त्यानंतर ते क्लबांत गेले. तिथं जाणंहि एक प्रकारचं कामच. तिथंच अधिकाऱ्यांच्या ओळखी वाढतात. हक्काच्या भूमिकेवर न सुटणारे प्रश्न तिथं मैत्रीच्या नात्यानं सुटतात. तिथं श्रीपादरावांना जायलाच हवं होतं. घरीं वेळ वायां घालवण्यापेक्षां हंसतखेळत कामाचा पाया घालणं केव्हांहि अधिक शहाणपणाचं होतं. काम, काम, काम,! घरींदारीं काम ! तें करायलाच हवं. त्यांच्यासारख्या लब्धप्रतिष्ठित विधिज्ञानं काम करायचं नाहीं, तर काय पोराबाळांसारख्या गोष्टी खेळायच्या ? कीं नवथर तरुणासारखं बायकोच्या मागंमागं हिंडायचं होत ? काम करायलाच हवं होतं पैसे हवे होते. घराचं काम लवकरच सुरू होणार होतं. मुलाबाळांचीं शिक्षणं, पुढं कार्य, सामाजिक प्रतिष्ठेसाठीं होणारा खर्च हें सगळं पैशाशिवाय कसं होणार ? सतत काम करूनच पैसा मिळणार होता. फराळ, विश्रांति, जेवण सगळ्याचा उपयोग कामासाठींच. झोंपसुद्धां कामा-

साठींच. आजचं काम संपलं कीं उद्यांचं आहेच. म्हणूनच झोंप हवी होती. वक्तशीर झोंप हवी होती. त्या बाबतींत हयगय करून प्रकृति बिघडविण्यांत सुज्ञपणा नव्हता....सुज्ञासारखं श्रीपादरावांनीं काम केलं, सुज्ञासारखे ते जेवले आणि सुज्ञासारखेंच वक्तशीरपणें झोंपी गेले.

श्रीपादराव झोंपले, मुलं झोपलीं, गडीमाणसं कामं आटोपून आपापल्या घरीं झोंपायला गेलीं. लोकव्यवहाराआड आतांपर्यंत दडून राहिलेली रात्रीची शांतता सर्वत्र आपला अधिकार गाजवूं लागली, तरी श्रीपादरावांची पत्नी जागी होती. झोंपायची घाई कशाला? झोंपलं कीं स्वप्नं पडतात आणि झोंप उडाल्यावरहि स्वप्नं हृदयाशीं खुडखुडत राहतात. श्रीपादरावांच्या पत्नीला झोंप हवी होती; पण स्वप्नं नको होतीं. स्वप्नांचा तिला वाईट अनुभव होता. स्वप्नं खरीं करण्याच्या खटाटोपामागं माणसं लागतात, आणि तीं खरीं करून दाखवतात. स्वप्नं खरीं होतात आणि माणसं हरवतात. त्यांच्या कित्येक स्वप्नांची हीच कथा झाली होती. मुलंबाळं, गडी–गाडी, घरदार, वैभव, प्रतिष्ठा हीं सगळीं त्यांचीं स्वप्नं खरीं होत होतीं; पण त्याचबरोबर कांहींतरी हरवल्याचं, दूर गेल्याचं दुःखहि त्यांना त्रस्त करीत होतं. पलंगावर पडल्या पडल्या, खिडकींतून दिसणाऱ्या आकाशाच्या निर्विकार पट्ट्याकडे पहात श्रीपादराव काळ्यांची पत्नी त्याच दुःखाचा भोग सहन करीत होती. आपल्या सुटलेल्या शरीराकडे पाहून, कार्यप्रसंगांतून मिरवणाऱ्या आपल्या मोटारीकडे पाहून, नवनवीन योजनांतून झळकणाऱ्या उत्साहाकडे पाहून कुणालाच त्या दुःखाची ओळख पटली नसती. इतरांना कळण्यासारखं तें दुःख नव्हतंच. तें दुःख फक्त दोघांना कळण्यासारखं होतं; आणि त्या दोघांतला एकजण झोंपला होता. झोंपूं दे. त्याला अशीच निर्विघ्न झोंप येऊं दे. खिडकींत लोंबलेल्या आकाशाकडे पहात तिनें परमेश्वराचं स्मरण केलं आणि त्याला विचारलं, 'तुझा विसर मला पडूं नये म्हणून का हें असमाधान दिलंस? पण आम्हांला जें कांहीं मिळालं तें तुझ्याच कृपेमुळें. समाधानांत असूं कीं असमाधानांत, तुला आम्ही कसं विसरणार? मी कांहींच विसरलें नाहीं. जेव्हां हें वैभव नव्हतं, ही सुबत्ता

नव्हती तेव्हांचं कांहींएक मी विसरलें नाहीं. तुला विसरलें नाहीं, विसरत नाहीं म्हणून तर मधूनमधून मी अशी रात्रीची जागी असत्यें. ...'

श्रीपादरावांची पत्नी बराच वेळ जागी होती हें खरं; पण कोण किती वेळ जागूं शकणार ? केव्हां तरी नकळत ती झोंपली. कोण जागं आहे आणि कोण झोंपलं आहे याचं त्या घरांतल्या एकाहि माणसाला भान राह्यलं नाहीं. तसं भान फक्त चोरांना होतं. सगळीं केव्हां एकदांचीं निपचित झोंपतात ह्यांची वाट पहात ते दबा धरून बसले होते. सगळं घर झोंपतांच त्यांनीं घरांत प्रवेश केला आणि आपलं कृत्य सुरू केलं. ही पेटी उघड, ती घडी उस्कटून पहा, हें सामान परसांत आणून टाक, ती वस्तु खिशांत घाल.... पण चोरांना विषेश कांहीं करतां आलं नाहीं. त्यांच्या हालचालीचे आवाज थोडेसे वाढले न वाढले, तोंच टिपू कुत्र्यानं भुंकायला सुरुवात केली. त्याच्या त्या भुंकण्याला, त्याच्या अंगलगटीला घाबरून चोरांनीं आल्या पावलांनीं तोंड काळं केलं. आवारांतला रखवालदार, श्रीपादरावांची पत्नी, ते स्वतः, मुलं —सगळीं जागीं झालीं. चोरांनीं उस्कटलेला आपला संसार त्यांनीं पाह्यला. टिपूचं भुंकणं थांबेना, तें त्यांनीं थांबवलं, मोकळीं दारं, उघडया पेट्या, उस्कटलेले कपडे, अस्ताव्यस्त पडलेलीं भांडीं...

श्रीपादरावांनीं एकदां सगळं पाह्यलं आणि त्यांच्या लक्षांत आलं कीं, चोरांचा प्रयत्न फसला आहे; विशेष कांहीं गेलं नव्हतं. मुलं घाबरल्यासारखीं दिसत होतीं; त्यांना त्यांनीं शांत केलं नि अजून रात्र शिल्लक आहे, तेव्हां स्वस्थ झोंपा, असा सल्ला दिला. रखवालदाराला अधिक जागरूक असण्याविषयीं त्यांनीं बजावलं नि टिपूचे लाड केले. 'चल' अशी पत्नीला त्यांनीं खूण केली आणि तीं दोघंहि घराबाहेर पडलीं.

रस्त्यानं तीं शांतपणें चाललीं होतीं. कुणी कुणाशीं फारसं बोलत नव्हतं. थोडं बोलून फार समजण्याची ती वेळ होती. रस्त्यावर चंद्र-प्रकाश सांडला होता. दूरवर पोलिसांच्या बुटांची टप्टप् वाऱ्यावर विरत

होती. ती ऐकून दोघांनाहि मनाशीं हंसूं येत होतं. हंसत, हलकेहलके तीं चाललीं होतीं. श्रीपादरावांनीं आपल्या बायकोला म्हटलं, " आपण कुठं चाललों आहोंत, हेंसुद्धां तूं विचारलं नाहींस ! "

तिनं उत्तर दिलं, " मला गरजच वाटली नाहीं. "

तें उत्तर ऐकल्यावर श्रीपादराव थोडा वेळ शांतपणानं चालत राहिले. वारा गार होता. डोळ्यांवर सुस्ती येत होती. ती दोघंहि स्वप्नांत चालल्यासारखीं त्या चंद्रप्रकाशांत भटकत होतीं. मधेंच श्रीपादरावांनीं सांगितलं, घरांतनं बाहेर निघतांना पोलिसचौकीवर जाऊन वर्दी द्यायचा एक विचार मनांत होता; पण पुन्हा वाटलं, देऊं उद्यां वर्दी. आज काय अन् उद्यां काय ? नाहीं तरी विशेष चोरी झालीच नाहीं. मुख्य म्हणजे मला घरांतनं या वेळीं बाहेर पडण्याची संधि मिळाली. "

" मला पण ! हा चंद्र किती सुंदर आहे, नाहीं ? पत्नीनं विचारलं.

" आणि या सांवल्यादेखील कमी सुंदर नाहींत. "

" खरंच. "

तीं दोघ अशींच चंद्रप्रकाशांत भटकत होतीं. जातांना एका पोलिसाचं त्यांच्याकडे लक्ष गेलं. या भलत्या वेळीं हीं कोण फिरायला निघाली आहेत, असा विचार करीत डोळे बारीक करीत त्यानं त्यांच्याकडे पाहिलं. एक टक्कल पडलेला गृहस्थ आणि एक अंग सुटलेली बाई पाहातांच त्याचे बारके डोळे एकदम मोठे झाले आणि काय समजायचं तें समजून आपल्या वाटेनं तो बूट खाड्खाड् वाजवीत निघून गेला. श्रीपादरावांच्या पत्नीन त्यांना म्हटलं, " त्याला कांहींतरी विचारायचं होतं वाटतं ? "

" अग, त्यानं आपल्याला पुष्कळदां पाहिलं असेल ! "

" पण असं पाहिलं नसेल ? "

" असं आपण तरी एकमेकांना कुठं पाहिलंय् ? "

" पुष्कळ वर्षांपूर्वीं आपण अशीं एकमेकांना दिसलों होतों. आज पुन्हां तेंच बघायला मिळालं. "

" ही रात्र फार सुंदर आहे. "

" ती कधीं संपूच नये, असं वाटतं. "
" ती संपली तरी पुन्हा परत आणायला हवी. "
" मी एकटी कशी आणणार ? "
" मी आहें ना सोबतीला ! "
" पहा बरं, विसरूं नका. "
" पण तूं आठवण ठेवायला हवीस ! "

एकमेकांना विश्वास देत, आणाभाका घेत, तीं केव्हां तरी घरीं परतलीं. रात्रीच्या जागरणामुळं त्यांच्या चेहऱ्यावर एक नावाच तजेला आला होता....

★ ★ ★

... ... ... ... ...लयाय, ठाणे, स्थळ
नुक्रम ..३५०९९... दि: ..१।७।४।६९...
...१८७६... नों. दि. ..२३।६।७०

# चमत्कारिक मनुष्य

४

पंचावन्न–साठाच्या जवळपास वय असलेल्या माणसाला ' सोन्या ' हें नांव जरा चमत्कारिक वाटतं. त्यांतहि त्या माणसानं स्वतःला ' सोन्या ' म्हणवून घेणं अधिकच चमत्कारिक. सोनोपंत देशमुख स्वतःला ' सोन्या ' म्हणवून घेतांना जो अट्टाहास दाखवीत, तो बघून लोक त्यांना चमत्कारिक मनुष्यांत गणीत तें ठीकच होतं.

सेनोपंत एकदां एका गांवीं गेले आणि तिथं त्यांना आठवलं कीं, आपला शाळूसोबती याच गांवांत राहतो. त्याचा पत्ता काढीत सोनोपंतांची स्वारी त्या मित्राच्या घरीं पोंचली. त्या वेळीं तो मित्र घरीं नव्हता. मित्र पत्नीनं विचारलं, " हे घरीं आल्यावर त्यांना कोण आलं होतं म्हणून सांगूं ? " नेहमींच्या पद्धतीप्रमाणं सोनोपंतांनीं उत्तर दिलं, " सोन्या आला होता म्हणून सांगा. "

अर्थात् प्रत्यक्ष भेटींतच त्या मित्राला ' सोन्या ' कोण तें कळलं. यावर सोनोपंताचं म्हणणं असं कीं, मैत्रींत कसलीं आलीं ' पंत '; ' राव ' हीं संबोधनं ? एका दृष्टीनं तें खरं असलं तरी आपल्यासारख्या प्रौढ माणसांनं स्वतःला लहान मुलासारखं ' सोन्या ' म्हणवून घेणं चमत्कारिकच ! एकंदर सोनोपंत देशमुख ही व्यक्तीच चमत्कारिक.

सोनोपंतांचा थोरला मुलगा—चांगला वयस्करीचा लग्न झालेला मुलगा विषमानं वारला. सोनोपंतांचं वय त्या वेळीं पंचावन्नच्या जवळपास.

मराठी ग्रंथालय
१०२८६

नुकताच वारलेला मुलगा पंचवीसचा. वैधव्याच्या प्रहारांत सांपडलेली सून वीस वर्षांची. दुःखांत आणखी कारुण्य ओतायला कीं काय कोण जाणे, त्या तरुण विधवेच्या पोटांत नवा जीव आकाराला येत होता. प्रसंग दारुण नव्हता असं कोण म्हणेल ? सोनोपंतांनीं हंबरडा फोडला तेंहि साहजिक होतं. पण शोकालादेखील आंवर घालायलाच हवा ! सोनोपंतच जर ओक्साबोक्शीं रडूं लागले तर त्यांच्या सुनेनं कुणाकडे बघावं ? तिला कुणी धीर द्यावा ? सोनोपंतांच्या या जबाबदारीची आठवण त्यांना करून देण्यांत आली. पण दुःखाच्या आवेगांत सोनोपंत आपलं वय विसरले, आपला मोठेपणा विसरले, आपली जबाबदारी विसरले. जबाबदारीच्या उपरण्यानं आपल्या सुनेचे अश्रु पुसण्याऐवजीं ते नुसते रडूं लागले. मोठीं माणसं आपली जबाबदारी विसरूं लागलीं कीं, तो भार लहानांना उचलावा लागतो. सुनेनं धैर्याचं अवसान आणून सासऱ्याचं सांत्वन केलं तेव्हां कुठं सोनोपंतांचे अश्रु खळले. सुनेनं आपलं कर्तव्य धैर्यानं केलं असलं तरी सासऱ्याला आपल्या मोठेपणाचा विसर पडला होता हें खरंच. पण ही साधी गोष्ट सोनोपंतांच्या तेव्हांहि लक्षांत आली नाहीं आणि त्यानंतरहि नाहीं.

सुनेचे दिवस भरले आणि तिला मुलगा झाला. वैधव्यांत प्राप्त झालेल्या त्या आनंदाचं तिनं दुःखाचे कढ काढीत स्वागत केलं. यापेक्षां दुसरं ती काय करूं शकणार ? आनंदाला देखील काळवेळ नको का ? होऊं नये त्या वेळीं गोष्टी व्हायला लागल्या तर आनंदापेक्षां दुःखच अधिक होतं. नवऱ्याच्या मृत्यूच्या वेळीं बांधून ठेवलेले अश्रु त्याच्या पश्चात् जन्मलेल्या मुलाला पाहून फुटले तें पोर हंसूं लागलं, त्याचे आजोबा हंसूं लागले; पण सुनेच्या आंसवांना खंड पडत नव्हता. तिला मुलाचं हंसूं कळत होतं. लहान मुलाचं हंसणं काय अन् रडणं काय, सारं सारखंच ! पण मोठ्या माणसांना नको का कळायला कीं, केव्हां हंसावं आणि केव्हां रडावं ! नातू झाल्याचं सुख सोनोपंतांना लपवतां येत नव्हतं. त्यांच्या त्या सुखी, प्रसन्न हंसऱ्या चेहऱ्याकडे पाहून सुनेला आपलं दुःख आंवरतां येत नव्हतं. आपला राग आंवरतां येत नव्हता. कांहीं महिन्यांपूर्वींच घडलेला निर्घृण प्रसंग

सोनोपंत जणूं आजिबात विसरले होते,—जणूं त्या घरांत रडण्यासारखं कांहीं झालंच नव्हतं अशा भावनेनं ते वागत होते, हंसत होते. इतरांनींहि आपल्या-सारखंच वागावं, हंसावं असा त्यांचा आग्रह होता. तो आग्रह त्यांच्या सुनेला कळत नव्हता. त्या आग्रहाचा तिला जाच होत आहे ही गोष्ट सासऱ्याच्या गांवींहि नव्हती. नातू जन्मल्यावर ते इतके सुखी आणि प्रसन्न झाले कीं, त्या सुखामागं दुःख आहे, हें सुद्धां त्यांच्या ध्यानांत आलं नाहीं.

मोठ्या आनंदानं त्यांनीं नातवाचं नांव ठेवलं. तें काय, तर ‘ बाळासाहेब.’ स्वतःला सत्तान्नवाव्या वर्षी ‘ सोन्या ’ म्हणवून घेणाऱ्यानं आपल्या नुकत्याच जन्मलेल्या नातवाला ‘ बाळासाहेब ’, ‘ बाळाबाहेब ’ म्हणून आळवावं हें चमत्कारिक आहे, हें त्यांच्या मनांत देखील आलं नाहीं. सोनोपंत इतके आनंदांत होते कीं, सहानुभूतीच्या स्वरांत देखील कुणी त्यांचं सांत्वन केलेलं किंवा त्यांच्या धीराचं कौतुक केलेलं त्यांना आवडत नव्हतं. आरामांत स्वस्थ पडून मुलाच्या हातचे चार घांस खाण्याऐवजीं स्वतःच्या कष्टांनीं नातवाला भरवायचा प्रसंग सोनोपंतांवर यावा, ही घटना बघून कित्येकाच्या हृदयाचं पाणी होई. तें पाणी डोळ्यांतल्या डोळ्यांत दाबून ते लोक सोनोपंतांना म्हणत, “ सोनोपत, या वयांतसुद्धां काम करायचं तुमच्या नाशिबीं आलेलं पाहून वाईट वाटतं. परमेश्वराच्या राज्यां-तला न्याय कांहीं कळत नाहीं ! ”

पण सोनोपंतांना ही भाषा मुळींच आवडत नसे. ते रागावून उत्तर देत, “ त्यांत न कळण्यासारखं काय आहे ? माझं शरीर चांगलं नीट बघून घ्या. दिसतो का कुठं तुम्हांला एखादा बांक ? केंस थोडेसे पांढरे झाले आहेत; पण तरुणांचे देखील केंस पाढरे होतात. अशा मजबूत शरीरानं काम नाहीं करायचं तर काय नुसतं अंथरुणांत लोळायचं ? माझ्या शरीराला आराम सोसायचा नाहीं.

शरीराचं यंत्र उपयोगांत आहे तेंच बरं. त्याला आराम द्यायला गेलों तर तें बंद पडेल....आतां बोला, माझं हें यंत्र चालू रहावं अशीच तुमचीहि इच्छा नाहीं का ? ”

सोनोपंतांच्या या प्रश्नांना त्यांच्या परिचितांजवळ उत्तरं नव्हतीं. सोनोपंतांचं हें स्पष्टीकरण आणि हे प्रश्न ऐकून त्यांचे चेहरे हिरमुसले होत. ते पडलेले पहातांच सोनोपंतांना कळवळून येई. गद्‌गदलेल्या स्वरांत ते म्हणत, “ असा लहानसा चेहरा करूं नका बुवा ! माझ्याच्यानं तें पहावत नाहीं. ” आपल्या मित्रांचे सुकलेले चेहरे बघून सोनोपंतांच्या डोळ्यांत अश्रु उभे रहात; त्यांचा कंठ दाटून येई; डोळ्यांतलीं आंसवं एकदां झरझर वाहून गेलीं म्हणजे त्यांचा कंठ साफ होई आणि ते मित्रांना म्हणत; “चला, चहा घेऊं ! ” मित्रांनीं सोनोपंतांचं सांत्वन करण्याऐवजीं सोनोपंतच त्यांचं सांत्वन करूं लागत. हा सांत्वनाचा चहा ते कधीं हॉटेलांत देत तर कधीं घरीं. घरच्या चहाबरोबर कांहींतरी खायला करायला ते आपल्या सुनेला खुशींत सांगत. चिमुकल्या बाळासाहेबांच्या ओंठांना चहाचा आणि तयार झालेल्या पदार्थांचा स्पर्श मधूनमधून करीत. सोनोपंत मित्रांना आग्रह करीत आणि आपण स्वतःहि मजेंत येऊन खात, पीत, बोलत. बाळासाहेबांचं हंसणं किती मधुर आहे, त्यांच्या रडण्यांत देखील कसा करारीपणा आहे, आपल्या सुनेनं पुन्हा कॉलेजमध्यें जायला कशी सुरुवात केली आहे, सगळ्या मुलींतच नव्हे तर एकूण मुलांमुलींत ती अभ्यासानं आणि आपल्या बोलण्या-चालण्यानं कशी उठून दिसेल, इत्यादि गोष्टी ते रंगांत येऊन सांगत. आंतल्या खोलींत बसून सासऱ्याचं तें मैफलींतलं बोलणं ऐकून सूनबाई स्वतःशीं हुंदके देऊं लागे. सोनोपंतांच्या मैफलींत बसलेलीं माणसं पहिल्यांदां मख्खपणं बसलेलीं असत. पण बोलतां बोलतां सोनोपंतांची वाणी अशी खुलत असे कीं, हळूहळू ऐकणाऱ्यांचीहि कळी खुलूं लागे. त्या मैफलींत हास्यविनोदांचीं कारंजीं उडूं लागत आणि त्या तुषारांनीं चिंब झालेलं सोनोपंतांचं मन प्रसन्न होई. सोनोपंतांचं वागणं पाहून लोकांनींहि विचार केला कीं, त्यांच्या दुःखाची आठवण काढण्यांत शहाणपणा नाहीं. ज्याचं दुःख त्यानं मानायचं नाहीं, तर इतरांनीं तरी त्याची उजळणी कां करावी ? ... कदाचित् लोकांनीं कल्पना केली तेवढं दुःख सोनोपंतांना झालेलंच नसावं. मुलगा गेला तेव्हां ते ढसाढसा रडले हें खरं, पण तें तेवढ्यापुरतंच. आकाशांत ढग आले

आणि बरसून गेले; पुन्हा आकाश पूर्ववत् स्वच्छ—असाच प्रकार घडला होता. पण पंचावन्नहून अधिक वय असलेल्या माणसाचा थोरला मुलगा जावा ही घटना इतकी का साधी होती? इतक्या लवकर का ती विसरली जाऊं शकते? ... पण लोकांना स्पष्ट दिसत होतं कीं, सोनोपंत सगळं कांहीं विसरले होते. ते नेहमींप्रमाणं काम करीत होते, खात पीत होते, गप्पागोष्टी करीत होते, हास्यविनोदांत रमत होते. एवढं मोठं दुःख कपड्यावरील धुळीसारखं झटकून टाकणारं सोनोपंतांचं मन चमत्कारिक असलं पाहिजे, याविषयीं लोकांच्या मनांत संशय नव्हता. पण त्या संशयाचं पिशाच्च ज्यानं त्यानं आपल्या स्मृतींत गाडून टाकलं. त्या संशयाला डोकं वर काढून देण्यांत शहाणपणा नव्हता. सोनोपंत सर्व व्यवहारांत नुसता भागच घेत नव्हते, तर हिरीरी, उत्साहहि दाखवीत होते. त्यांच्या त्या उत्साहाला आपल्या संशयाचा अपशकून कां करा?

सोनोपंतांच्या उत्साहाला भरती येई ती लग्नं जुळवण्याच्या कार्यात. कुणी ओळखीच्या माणसानं आपल्या मुलीसाठीं स्थळ सुचवण्याची गोष्ट काढली कीं, सोनोपंतांच्या मनांत सनईचे सूर खेळूं लागल्यासारखे ते उल्हसित होत. लग्नकार्याचा विषय काढला कीं, परटाकडून आलेला आपला लांब कोट अंगावर चढवून; त्याला उपरण्याची जरीकांठीं झालर घालून पंत उत्साहानं पायांत पुणेरी चढाव सरकावीत म्हणत, "चला." बाहेर जाऊन व्यवहाराचीं बोलणीं करायची गरज नसली आणि इतर कांहीं खलबतं करायचीं असलीं तर पंत मांडी ठोकून समोरच्या माणसाला टाळी देत म्हणत, "बोला." उपवर मुलींच्या आणि लग्नाला योग्य अशा मुलांच्या पत्रिकांचा पंतांनीं सांठाच केला. दोन पत्रिकांतले ग्रह जुळले तर पंत म्हणत, "हें लग्न जमलंच पाहिजे!—" तें लग्न जमण्यासाठीं पंत जिवाचा आटापिटा करीत. चार ठिकाणीं जा, चारजणांना घरीं बोलाव, लोकांच्या गाठीभेटी घडवून आण, इत्यादि कामांत त्यांना शारीरिक आणि आर्थिक, अशी दोन्ही प्रकारची झीज सोसावी लागे. पण ती झीज त्यांच्या खिजगणतींतहि नव्हती. कधीं कधीं

त्यांना त्या कामांत दुरुत्तरहि ऐकावीं लागत, कधीं थोडासा अपमान सोसावा लागे. कधीं जाण्यायेण्याचे झटके सहन करावे लागत.— हें सगळं सोनोपंत मुकाट्यानंच नव्हे, तर आनंदानं सहन करीत. जणू कांहीं स्वतःच्या मुलीचं लग्न जमवायचं आहे, अशा वृत्तीनं ते वागत. गोखल्यांच्या अनूच्या लग्नाच्या वेळीं तर पंतांनीं आपल्या उत्साहाची धमालच उडवून दिली !

गोखल्यांच्या अनूचं लग्न हा एक मोठाच प्रश्न होऊन बसला होता. प्रत्येक मुलीचं लग्न होईपर्यंत तो एक प्रश्नच असतो; पण अनूचा प्रश्न थोडा निराळा होता. अनूच्या लग्नांत कांहीं अडचण येईल असं तिला पाहून कुणाला वाटलं नसतं. अनू दिसायला चांगली होती. पण तिचं तें दिसणंच तिच्या लग्नाआड येत होतं. आपण चांगल्या दिसतों, या गोष्टीची तिला वाजवीपेक्षां अधिक जाणीव होती. या जाणिवेमुळंच अनू फार नटायची.— कुणाच्याहि डोळ्यांवर येईल इतकी ती नटायची. केंस बांधण्याच्या नाना तऱ्हा तिला जशा माहीत होत्या, तशाच ते मोकळ्या सोडण्याच्याहि. रोज नवीन तऱ्हेनं केंस बांधायची तिची हौस पाहून तिच्या कॉलेजांतलीं मुलं तिची टवाळी करायचीं. त्यांतलीं सगळींच मुलं इरसाल मुळींच नव्हती. अनूच्या नटण्यांत असं कांहीं नक्की होतं कीं, जें पाहिल्या-शिवाय रहावत नसे आणि तें पाहिल्यावर कांहींतरी बोलल्याशियाय, कुजबुजल्यशिवाय चैन पडत नसे. अनूचा रंग परमेश्वराच्या कृपेनं चांगल्या-पैकीं होता. परमेश्वरानं दिलं तेंच इतकं चांगलं होतं कीं, त्यावर अधिक रंगकाम करायची गरज नव्हती. पण अनूला ओंठ लालभडक रंगवल्या-शिवाय, दोन्ही गालांवर गुलाबी ठिपके दिल्याशिवाय बरं वाटत नव्हतं. तिच्या कानांतलीं आभूषणं डोळ्यांतलं काजळ, साड्यांचे रंग, ब्लाउजचे प्रकार, तिचं पदर घेणं आणि झटकणं यांत कांहींतरी भडक जाणवत असे. त्यांत अनूचं वागणं, बोलणं.—पुरुषांशीं ती धिटाईनं वागायची, बोलतांना भुवया उंचवायची.... सगळं मुद्दाम केल्यासारखं दिसे. तिच्या वडिलांनीं— बाबासाहेब गोखल्यांनींच तिच्या या नटवेपणाला आळा घालायला हवा

होता. पण नटवेपणा म्हणून लोकांच्या लक्षांत चटकन् आलेला प्रकार बाबासाहेबांना पहिल्यांदां उमजलाच नाहीं. जेव्हां तो लक्षांत आला तेव्हां वयांत आलेल्या पोरीला बोलून दाखवायचं धैर्य त्यांना होईना.... एक तर मुलीला कपडयालत्त्यांची, थोडीफार नटण्याची संवय त्यांनींच लावलेली. दुसरं असं कीं, त्यांना वाटे, कां उगीच पोरीचं मन दुखवावं ? उद्यां लग्न झालं कीं, ती आपल्या घरीं जाणार ! थोडया दिवसांसाठीं कां उगीच तिचं आणि आपलं मन कडवट करा ? पण अनूचं लग्न लौकर जमण्याचीं लक्षणं दिसेनात. अनू तशी कॉलेजांत होती. तिला घरीं बसवायची वडिलांची इच्छा नव्हती. ' शिक्षण पूर्ण झाल्यावर आहेच लग्न ! ' असं इतरांशीं बोलायला ठीक होतं; पण मनांतनं त्यांना घाई झाली होती कीं, केव्हां एकदां अनूचं लग्न जमतं आणि काळजी दूर होते.

काळजी करण्यासारखीच परिस्थिति होती. अनूच्या नटवेपणाचं निमित्त करून लोक सैल जिभेनं वाटेल तें बोलत. अनूचं नांव उगीच पुष्कळ ठिकाणीं पसरलं होतं. अनू नटवी असली तरी वाईट मुलगी नव्हती. पण नटवेपणा म्हणजे छाकटेपणा अशी ज्यांची समजूत असते त्यांची समजूत घालणं फार कठीण असतं. त्या समजुतीमुळचं दोन-तीन स्थळांनीं अनूला नाकारलं होतं.

अनूच्या रहाणीवरून लोक बाबासाहेबांच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज बांधीत आणि भलत्याच अपेक्षा धरीत. एक-दोन ठिकाणीं अनू पसंत पडली होती; पण अपेक्षेप्रमाणं बाबासाहेब लग्नाला खर्च करीत नाहींत म्हणून तीं स्थळं हुकलीं होतीं. बाबासाहेबांची वकिली बरी चालत असली तरी अनू हें कांहीं त्यांचं एकुलतं एक अपत्य नव्हतं; आणखी दोन मुली होत्या, दोन मुलगे होते. लोक अनूचा नट्टापट्टा पहात आणि बाबासाहेबांच्या आर्थिक सुस्थितीच्या भलभलत्या, कल्पना करीत. लोक आपल्याला श्रीमंत समजत असतांना लहानशा चेहऱ्यानं त्यांच्यापुढं जाऊन त्यांना आपण श्रीमंत नसल्याचं सांगायचं बाबासाहेबांना तरी कसं जमणार ?

बाबासाहेबांवर एकूण कठीणच प्रसंग आला होता. बाबासाहेबांनीं

सोनोपंतांजवळ सगळी हकीकत सांगितली, तेव्हां पंतांना अतिशय वाईट वाटलं. या भल्या मणसावर असा प्रसंग आलेला ऐकतांच पंतांचं मन गहिवरलं आणि त्यांनीं बाबासाहेबांना आश्वासन दिलं, "तुम्ही कांहीं काळजी करूं नका.—अनूच्या लग्नाचं मी पहातों."

तें आश्वासन दिल्यावर सोनोपंतांनीं त्या प्रश्नाचा अभ्यास आरंभला. लोक अनूविषयीं काय बोलतात हें त्यांनीं पूर्णपणें शोधून काढलं. त्यासाठीं तरुणमंडळींत जाऊन बसायचं, त्यांच्याकरवीं आपली थट्टा करवून घ्यायची, तरुणांत तरुणांसारखं बाष्कळ बोलून आपली पायरी सोडायची, हे सगळे प्रकार त्यांनीं केवळ त्या प्रश्नाच्या सांगोपांग अभ्यासासाठीं केले. अनूला-देखील त्यांनीं बारकाईनं न्याहाळलं. तिचं नटणं, बोलणं, वागणं यांचा त्यांनीं अभ्यास केला, आणि निष्कर्ष काढला कीं तिचं लग्न जमवणं बाबासाहेब समजतात तसं मुळींच कठीण नाहीं. त्यांनीं काढलेला निष्कर्ष फार लोकोत्तर नसला तरी त्या प्राश्नाचा त्यांनीं बारकाईनं अभ्यास केला आहे एवढं त्यांतून स्पष्ट दिसत होतं.

पंतांनीं असा निष्कर्ष काढला कीं, अनूसारख्या पोरीशीं लग्न करायला बरोबरीचीं पोरं—आर्थिक दृष्ट्या बरोबरीचीं पोरं—घाबरतात. साधारण बऱ्यापैकीं उत्पन्न असलेले, चांगल्या दुय्यम प्रतीच्या नोकऱ्या करणारे तरुण तिला घाबरतात. तिच्या हौशी पुरवतां-पुरवतां आपला खिसा फाटेल, या जाणिवेनं ते घाबरतात. अनूसारख्या पोरीचं आकर्षण तर टाळतां येत नाहीं, आणि तिच्याशीं संसार करण्याची आर्थिक धमक नाहीं, अशा तरुणांचा त्रागा म्हणजे अनूविषयीं पसरलेले भलतेभलते प्रवाद ...

अनूचं लग्न व्हायला हवं एखाद्या उच्च अधिकाऱ्याशीं; पण उच्च अधिकार मिळालेले तरुणहि तिला नाकारतात याचं कारण ते फार हिशेबी असतात. शिक्षणांत खर्च झालेला अर्धा पैसा तरी लग्नांत निघाला पाहिजे, निदान मोटारीवर होणारा सगळा खर्च आपल्या लग्नांतून काढला पाहिजे, असे कांहींतरी त्यांचे हिशेब असतात. अशा हिशेबी पुरुषाशीं अनूसारख्या बिनहिशेबी मुलीची गांठ घालून देणं; संसारांतल्या बारीकसारीक सुखांच्या

दृष्टीनं योग्य नव्हे. अनू बिनहिशेबी, तसाच तिचा नवराहि बिनहिशेबी हवा. पै-पैशाचा हिशेब तर जाऊं दे, प्राणाचाहि हिशेब न करणारा तरुण तिच्यासाठीं शोधायला हवा....असा तरुण अर्थातच सैन्यांत सांपडणार.

सोनोपंतांनीं सैन्यांत अधिकारावर असलेल्या ओळखीच्या तरुणांची यादी तयार केली आणि त्यांच्यावर चालून जाण्याची मोहीम सुरू केली. पंतांना फारसा त्रास घ्यावा लागला नाहीं. पहिल्याच फेरींत त्यांनीं कॅप्टन अरविंद दाते या तरुण सैनिकाला वश केलं. अनूचं लग्न ठरलं, हुंडा नाहीं कीं आणखी कांहीं भानगडी नाहींत. कॅप्टन दात्यांनीं केलेली मागणी फार साधी होती. अनूला ते बघायला आल्यावर आणि अनू त्यांना पसंत पडल्यावर, त्यांनीं अशी इच्छा दर्शवली कीं, त्या मुक्कामांत अनूला फिरायला घेऊन जाण्याची, नाटका-सिनेमाला घेऊन जाण्याची त्यांना मोकळीक मिळावी. तशी अनुमति द्यायचं बाबासाहेबांच्या जिवावर आलं, पण पंतांनीं मोठ्या आनंदानं दात्यांच्या वतीनं रदबदली केली.

" आतां सगळं ठरलंच आहे तेव्हां इतकी उतावळी कशाला ? " या बाबासाहेबांच्या हरकतीला पंतांनीं उत्तर दिलं, " तें तुला कळायचं नाहीं. तरुणांच्या ऊर्मी तुला काय कळतील ? "

कॅप्टन दात्यांची ही मागणी मान्य केल्यावर त्यांची दुसरी एक मागणी मान्य करणं ओघानंच आलं. लग्नाच्या तिथीला दरम्यान एक महिना होता; त्या वेळांत अनूशीं पत्रव्यवहार करायची त्यांची इच्छा होती. बाबासाहेबांच्या वतीनं पंतांनीं तीहि इच्छा मान्य केली; पण एका अटीवर. ती अट त्यांनीं अनूला घातली— दात्यांच्या पत्रापैकीं निदान एक तरी आपल्याला वाचायला मिळालंच पाहिजे असा त्यांनीं आग्रह धरला. तो आग्रह त्यांनीं पुरवून घेतला. अनू ' नको ' म्हणत असूनहि पंतांनीं तिला आलेलं दात्यांचं एक पत्र वाचून काढल. गाल फुगवून बसलेल्या अनूला ते सांगूं लागले, " असल्या एका पत्रांत जी गोडी आहे, ती शंभर प्रेमकथांत आणि हजार कवितांत नाहीं !...."

बाबासाहेबांच्या प्रौढ मनाला पंतांचा हा बालिश उत्साह मानवत नव्हता.

पण त्यांनीं आपली नापसंती बोलून दाखवली नाहीं. अनूच्या लग्नाचा कठिण प्रश्न पंतांनीं सोडवला होता, हा काय लहान उपकार होता ? शिवाय नापसंती दाखवण्यांत अर्थहि नव्हता. सोनोपंत खूष असले कीं इतरांच्या पसंती-नापसंतीची ते वाट बघत नाहींत, हें बाबासाहेबांना पक्कं माहीत होतं.

अनूच्या लग्नांत बाबासाहेबांचा चेहरा काळजीनं काळवंडलेला दिसत होता; पण पंतांचा चेहरा फुलासारखा टवटवीत आणि प्रसन्न दिसत होता. वरवधूंची थट्टा कर, त्यांच्या बरोबरीच्या तरुण–तरुणींना डिवच, कुणी पोक्तपणाचा मुखवटा घातला असेल तर तो ओढून काढ, अशा नाना तऱ्हांत, खाण्यापिण्यांत, मिरवण्यांत पंत आपलं वय विसरल्याचं दिसत होते. या सगळ्या आनंदांत पंतांनीं आपला नातू बरोबर घेतला होता. त्याला ते आपल्या तालमींत तयार करीत होते. आनंदाला लग्नाच्या दोन तीन दिवसांची सीमा नव्हती. कारण कॅप्टन दाते एक महिन्याची रजा घेऊन आले होते. त्यामुळं सगळा आनंद आरामाच्या साथीवर चालला होता.

रजेच्या एक महिन्यापैकीं दोन दिवस लग्नांत, आठवडा आपल्या आईवडिलांकडे आणि त्यानंतरचे दिवस परत सासुरवाडीला, असा दात्यांनीं कार्यक्रम आंखला होता. दात्यांच्या आईवडिलांकडे एक आठवडा राहून, त्यांची आणि एकमेकांची पूर्ण ओळख करून घेऊन अनू आणि दाते जेव्हां परत बाबासाहेबांकडे आलीं, तेव्हां पंतांनीं त्या लक्ष्मीनारायणाच्या जोडयाकडे डोळे भरून पाह्यलं; तरी त्यांच्या मनाचं समाधान होईना.

रजा संपल्यावर दाते अनूला तिच्या वडिलांकडे ठेवून कामावर परतणार होते. अनूच्या शिक्षणाचं शेवटलं वर्ष असल्यामुळं ती तें आटोपून टाकणार होती. पंतांना वाटलं, आतां कसलं शिक्षण घेऊन बसली ही ? संसारसुखापुढं ज्ञानाची कसली आली थोरवी ? पण या विचाराबरोबरच दुसरा एक विचार पंतांच्या मनांत उमटला. शिकते तर शिकूं दे बिचारीला. एकाच वर्षाचा तर प्रश्न आहे ! मग आहेतच संसाराच्या सगळ्या जबाबदाऱ्या. त्यापेक्षां चाललं आहे तें शिक्षण संपलं तर पदवी तरी मिळेल तिला. नटण्याथटण्याची हौस आज ना उद्यां मावळली कीं, विद्येच्या दागिन्याचं तिला अधिक

महत्त्व वाटेल...पण कांहीं झालं तरी संसाररसाचा स्वाद तिला आतां कुठं चाखायला मिळाला न मिळाला, तोंच एक महिन्यांतच तिला विरहाचा अनुभव सोसावा लागू नये. दाते सैनिक असल्यामुळं कर्तव्याच्या हांकेला ते धांवून जाणारच. पण एक महिन्याहून लहान असणारं आपलं प्रेम एकटं सोडून त्यांना जावं लागू नये...

पंतांना वाटलं, हा एक महिन्याचा अवधि फारच लहान आहे. तो लांब असायलाच हवा. दात्यांची रजा संपूंच नये असं पंतांना अनूइतक्याच तीव्रतेनं वाटूं लागलं. अनूनं ती इच्छा बोलून दाखवली नाहीं तरी पंतांना रहावेना. रजा वाढवायचा आग्रह ते दात्यांना करूं लागले. त्यांचा प्रेमळपणा पाहून बहुतेक स्तब्ध राहिले; कांहींच्या ओठांना बारीक हंसरी दुमड पडली. आपल्या सूचनेचं इतकं मंद स्वागत कां व्हावं हें पंतांना कळेना; पण त्याची पर्वा न करतां ते आग्रह करीतच होते कीं, दात्यांनीं आपली रजा वाढवायला हवी.

दात्यांची रजा वाढली नाहीं, उलट ती एकाएकी कमी झाली. सुटी अर्धी संपली न संपली, तोंच दात्यांना वरिष्ठ कचेरीकडून हुकूम आला कीं, त्यांनीं ताबडतोब कामावर रुजूं व्हावं. एवढंच नव्हे, तर दात्यांची बदली काश्मीरच्या रणक्षेत्रावर म्हणजे अधिक जबाबदारीच्या आणि धोक्याच्या क्षेत्रावर झाली होती. सैन्याचं शिक्षण दात्यांच्या अंगांत भिनलेलं होतंच. आज्ञा होतांच त्यांनीं सामानाची तयारी केली. ती फारशी करायची गरज नव्हतीच. त्यांच्या मनाची तयारी नेहमींचीच होती. पंतांना मात्र धक्का बसला. आनंदाचे दिवस एकदम थांबल्यामुळं अनूच्या मनाची काय स्थिति झाली असेल, या कल्पनेनं त्यांच्या जिवाचं पाणी पाणी झालं. दात्यांना निरोप द्यायला पंत इतरांच्यासह स्टेशनवर गेले, तेव्हां त्यांच्या पायांत गोळे आले होते.

गाडी सुटायला थोडासाच अवकाश होता. गाडी केव्हां एकदांची सुटते आणि मनावरचा ताण सुटतो असं प्रत्येकाला वाटत होतं. पण वरवर त्यांतलं कांहींएक न दाखवतां प्रत्येकजण कांहींतरी बोलत होता. अनू

दात्यांना सांगत होती, ' वारंवार पत्र पाठवीत जा. दाते अनूला म्हणत होते, ' शेवटचं वर्ष आहे, तेव्हां अभ्यास नीट कर. ' बाबासाहेबांची पत्नी दात्यांना कोणत्या डब्यांत कोणतं फराळाचं साहित्य दिलं आहे तें सांगत होती. बाबासाहेब सगळ्यांना ठाऊक असलेलं अगगाड्यांचं वेळापत्रक जोर-जोरात वाचून दाखवीत होते. अनूचीं भावंडं एकमेकांस काश्मीरच्या लढाईचीं आणि तिथल्या सौंदर्याचीं ऐकीव वर्णनं ऐकवीत होतीं....पंत स्तब्ध होते. त्यांचा कंठ दाटून आला होता. संसाराच्या गोडीची नुकतीच ओळख झालेल्या तरुण जोडप्याला कर्तव्याच्या कठोर अधिकारानं वेगळं करावं, या घटनेनं ते हादरले होते. त्या जोडप्यापैकीं एक लढाईच्या मैदानावर चालला होता. त्या वेळीं प्रत्यक्ष लढाई स्थगित झाली होती हें खरं; पण लढाईचं मैदान म्हणजे लढाईचं मैदान. पंतांच्यानं बोलवत नव्हतं. मधूनमधून उपरण्याच्या सोग्यानं ते नाक डोळे पुशीत होते. स्टेशनच्या आवारांत भटकणारं एखादं एंजिन मधेंच जोरांत शिटी मारी, त्या कर्कश आवाजानं पंत दचकत आणि हृदयावर हात ठेवून आपल्याला सांवरण्याचा प्रयत्न करीत.

गाडी सुटण्याची शेवटची सूचना देण्यांत आली. सगळीं दात्यांच्या डब्या-पासून दूर सरकलीं. दाते डब्याच्या खिडकींतून डोकं काढीत बाहेर पाहूं लागले. सगळ्यांचे चेहरे एकदम बदलले. आतांपर्यंत बांधून ठेवलेला धीर सुटला. सगळ्यांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. तें लपवण्यासाठीं कुणी डोळे चोळायचा, तर कुणी मान फिरवायचा व्यर्थ प्रयत्न करून पाहूला. अनूच्या दबलेल्या ओठांना न जुमानतां तिच्या गळ्यांतून हुंदका बाहेर पडला. तीच गत पंतांचीहि झाली. अनूनं कसाबसा हुंदका आवरला. हातांतल्या रुमालानं हलकेच डोळे पुसले. गालांवरूनहि तिनं हलकेच रुमाल फिरवला. पंतांना तें जमलं नाहीं. त्याच्या कंठांतून बाहेर पडलेल्या हुंदक्यानं त्यांच्या डोळ्यांतून आंसवांना आपल्याबरोबर बाहेर काढलं. पंतांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रु वाहूं लागले. पंतांचा अश्रुपात थांबत नव्हता. गाडी सुटली तेव्हां इतर सगळे हवेंत हात उंचावीत, रुमाल हालवीत डोळ्यांसमोरून दिसेनासे होत जाणाऱ्या कॅप्टन दात्यांना निरोप देत होते. गाडी स्टेशनांतून निघून गेली, तेव्हां

सगळीं घराकडे परतलीं. प्रत्येकाचा चेहरा बराचसा पूर्वीसारखा, बराचसा स्वच्छ दिसत होता. पंत मात्र चालतां चालतां मुकाट्यानं स्वतःशींच रडत होते. सगळीजण स्थिरचित्त झाल्यावरहि पंतांचं रडणं चालू असावं हें बघून सगळ्यांना पुन्हा एकदां वाटलं कीं, पंत जरा चमत्कारिक आहेत. पंतांनीं इतकं कां रडावं हें कुणालाच कळत नव्हतं. बाबासाहेबांना वाटलं, पंतांना आपल्या मुलाची एकाएकीं आठवण आली असावी. या वयांत गेलेला मुलगा कोण कसा विसरूं शकणार ?....

पंतांना मुलाची आठवण विशेषतेनं झाली नव्हती. तशी त्याची त्यांना सदोदितच आठवण येई. मुलाची आठवण तीव्रतेनं न येतांहि पंत रडत होते. कारण त्यांना त्यांच्या जवळच्या माणसांचा थांग लागला नव्हता. या जवळच्या माणसांचा स्वभाव, वागणं, हंसणं, रडणं यांपैकीं कांहींहि पंतांना कळत नव्हतं; म्हणून ते रडत होते. सुखाच्या क्षणीं पूर्णतेनं सुखाचा अनुभव न घेणारीं, सुखाचा अनुभव मोकळेपणानं न दाखवणारीं, दुःखाचा अनुभव तीव्रतेनं न घेणारीं, दुःखाचा अनुभव हृदय फाडून व्यक्त न करणारीं, सुखदुःखाचं प्रतिबिंब चेहऱ्यावर उमटतांच, संकोचासाठीं, देखाव्यासाठीं, व्यवहारासाठीं, कुणी काय म्हणेल, कुणी बघेल तर, या विचारासाठीं तें प्रतिबिंब पुसून काढणारीं माणसं पंतांना कळत नव्हतीं. म्हणून ते रडत होते. अशीं माणसं आपल्यापैकीं असावीं म्हणून ते रडत होते...

पंतांच्या रडण्याचं कारण इतरांना समजणं शक्यच नव्हतं. पंतांसारखा चमत्कारिक माणूस त्यांना कळणं शक्य नव्हतं. त्यांना एवढंच कळत होतं कीं, पंत चांगले असले तरी जरा—जरा काय, बरेच—चमत्कारिक आहेत...

* * *

# मायादेवी

५

लहानलहान मुलं रांगेंत उभीं राहिलीं आणि कार्यक्रमाची सुरवात म्हणून हात जोडून गाऊं लागलीं, " मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा !...." काळींसावळींच मुलं पण मोहक–भरल्या आभाळाच्या रंगाची, ओल्या धरतीच्या वर्णाचीं. रूप कुणाचं फारच उजळ असलं तर फार फार तर गव्हासारखं. गोर-गरिबांचीं कुणब्याधाणब्यांचीं गोंडगवाराचीं पोरं यापेक्षां अधिक उजळ कशीं असणार ? पण होतीं नाकींडोळीं नीटस, चुणचुणीत. निळी चड्डी आणि पांढराशुभ्र शर्ट घातलेलीं पोरं आणि त्यांचं तें गाणं श्रोत्यांच्या, प्रेक्षकांच्या कौतुकाला पुरं होतं. गांवाची शीव ज्यांनीं ओलांडली नाहीं अशीं तीं पोरं दगडाच्या देशाची, फुलांच्या देशाची, राकट देशाची काणि कोमल देशाची प्रार्थना म्हणत होतीं. त्यांतला प्रत्येक शब्द समजून उमजून. नुकत्याच उमलूं लागलेल्या त्यांच्या मनाच्या डोळ्यांची दीठ विस्तारली होती. पाहणारे त्यांचं कौतुक करीतच होते. पण त्यांना शिकवून तयार करणाऱ्या मायाताईंचं कौतुक किती करावं, आदर किती करावा हें त्यांना कळत नव्हतं. त्या चिमुकल्या मुलांना त्यांच्या अशिक्षित, दरिद्री, धाणेरड्या जगांतून उचलून त्यांना आशा-आकांक्षांच्या, स्वप्नांच्या, ध्येयाच्या, आदर्शांच्या जगांत नेणारी मायाताईंची करामत म्हणजे त्या मुलांचं तें गाणं आणि त्यानंतर त्यांनीं करून दाखविलेले क्वायती खेळ, प्रहसनं.

मुलांच्या खेळानंतर मायाताईंनीं उपस्थित स्त्री–पुरुषांना संस्थेची ओळख करून दिली. फार छोटीशी ओळख. लांबलचक भाषण करण्याची मुळीं गरजच नव्हती. त्या मुलांनींच आपल्या कृतींनीं श्रोत्यांना जें कांहीं सांगायचं तें सांगितले होतं. मायाताई केवढं मोठं कार्य करीत होत्या याचा आणखी इतर पुरावा काय द्यायचा? सुशिक्षित, श्रीमंत वा पांढरपेशा वर्गांतल्या पोरांनीं याच गोष्टी केला असत्या तर तें समजण्यारखं होतं, विसरण्यासारखंहि होतं. पण ज्या घरांत सुधारणेचा किरण वर्षानुवर्षं शिरला नाहीं त्या घरांत जन्मलेल्या या बाळांच्याकडून हें सगळं करवून घेण्यांत केवढी निष्ठा, केवढं कौशल्य, केवढी सहनशीलता आणि केवढी तळमळ कामीं आली आहे हें जाणण्याइतपत प्रेक्षक सुबुद्ध होते. कार्यक्रमाच्या अखेरीला त्याच मुलांनीं 'जन गण मन' ला सुरवात केली. आपल्या वसतीच्या पलीकडे पाहणं, आपल्या गांवच्या सीमा ओलांडणं ज्यांच्या आईवडिलांनाही पिढ्यान् पिढ्या माहिती नव्हतं त्या मुलांचा प्रवास महाराष्ट्रापासून सुरू झाला होता आणि भारतापर्यंत पोंचला होता. दृष्टीचा एवढा विस्तार, जाणिवेचा एवढा व्याप त्या मुलांना नुसता, झेपतच नव्हता तर आवडतहि होता. त्याची साक्ष त्यांचे लुकलुकणारे डोळे देत होते. त्या साक्षीनं एकच गोष्ट श्रोत्यांच्या मनावर वारंवार बिंबली होती–मायाताईंचं समाजकार्य, समाज बदलविण्याचं त्यांचं कर्तृत्व.

मुलांचा कार्यक्रम संपल्यावर श्रोत्यांना प्रदर्शन दाखवण्यांत आलं. शिवण्याचीं कामं, विणण्याचीं कामं, उपयोगाच्या वस्तु, शोभेच्या वस्तु. त्या कोणी तयार केल्या होत्या? त्या मुलांच्या गावंढळ आयांनीं. त्या गांवढळ स्त्रियांच्या बोटांत केवढी कलाकुसर लपलेली आहे तें मायाताईंनीं बरोबर ओळखलं होतं. त्याच कलाकुसरीचं हें प्रदर्शन होतं. वरून ओबडधोबड दिसणाऱ्या टेकड्यांच्या पोटांत कलेचीं केवढीं कोठारं भरून होतीं तें मायाताईंनीं पूर्ण ओळखलं होतं. आणि अज्ञान, अडाणीपणा, भित्रेपणा यांच्या दाबाखालीं लपलेलीं तीं कोठारं मोकळीं केलीं होतीं. प्रशंसा, कौतुक, आदर एवढ्याच शब्दांनीं तें कर्तृत्व मापलं जाऊं शकत होतं. कार्यक्रम संपल्यावर

प्रेक्षकांतल्या प्रत्येकाच्या मनांत आणि तोंडांत एकच भाव होता, मायाताई-विषयींच्या प्रशंसेचा. मुख्य पाहुण्यांनीं प्रसंगाचा अधिकार म्हणून तो भाव बोलून दाखवला. कार्यक्रमाला आलेल्या उदार लोकांनी संस्थेसाठीं देणग्या जाहीर केल्या. सगळ्यांनीं टाळ्या वाजवल्या. त्या सगळ्यांचा अर्थ एकच होता. मायाताईंच्या समाजकार्याचं अपरंपार कौतुक. एवढ्या लहान वयांत एवढं मोठं काम. अध्यक्षांनीं बोलून दाखवलं आणि इतरांनीं नुसतं जाणून घेतलं तें त्यांचं वय आणि त्यांचं तें काम.

मायाताईंच्या वयाचा विचार मात्र निरनिराळ्या लोकांच्या मनांत निर-निराळ्या तऱ्हेनं उमटला. तीस-पस्तीस वर्षांच्या समवयस्क नायकांना आपण नुसत्या वयानंच वाढलों अशी कमीपणाची जाणीव झाली. तो कमीपणा त्यांनीं 'आपल्याला समाजकार्याचा अनुभव नाहीं; पण घर, संसार मुलं यांचा मात्र मायाताईंपेक्षां पुष्कळ अनुभव आहे. स्वतःचा संसार हा खरा, बाकीचं सगळं लटकं' अशा असूयेनं आणि तुलनेनं भरून काढला. ज्यांना आपली जिज्ञासा आवरतां येत नव्हती त्यांनीं एकमेकांना विचारलं, "का हो, समाजकार्याला मायाताई आपलं सबंध जीवन आर्पण करणार आहेत कीं काय?"

त्या सुसंस्कृत प्रश्नाचा सरळसरळ प्राकृत अर्थ असा होता कीं मायाताईंचं लग्न कां जमलं नाहीं, लग्नाचा त्यांचा विचारबिचार नाहीं कीं, काय? अनुभवी स्त्रियांना मायाताईंचं कौतुक करतां करतां स्वतःच्या डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्यासारख्या वाटल्या. इतके सगळे गुण असूनहि एकटे-पणानं आयुष्य घालवावं; मुलांची इतकी आवड असतांना, त्यांना वळण लावण्याची इतकी कुशलता असतांना ती आवड आणि वळण दुसऱ्यांच्या कुशींत जन्मलेल्या मुलांच्या कामास यावी—हें त्यांना कोरड्या डोळ्यांनीं पाहवत नव्हतं. खरं म्हणजे समाजकार्यकर्तीचा विचार करतांना केवळ तिनं समाजांत घडवून आणलेल्या बदलाचाच विचार करावा, इतर कांहीं मनांतहि आणूं नये, हें त्यांना माहीत होतं. तेवढा अनुभव त्यांना होताच.

पण कदाचित् त्या अनुभवानचं त्यांना सांगितलं असेल—इतर सगळं गौण, ज्याचा त्याचा संसार तेवढा महत्त्वाचा. अनेकांचीं आयुष्यं सुधरवून

कां कुठं स्वतःच्या आयुष्यांतील उणीव भरून काढतां येते ? उणीव ज्या प्रकारची असेल त्याच प्रकारची तिची भरपाईहि पाहिजे. अनुभवाच्या त्या डोळ्यांना मायाताईंचे ते गुण न द्रवतां पाहवत नव्हते. त्या गुणांच्या अधिकतेचा एकच परिणाम होत होता. त्या उणीवेचा अधिकपणा स्पष्ट करणं, गुण पाहण्याऐवजीं उणीव शोधणं हें एरव्हीं सहानुभूतीच नसेल पण त्या अनुभवी पोक्त बायांना मायाताईंविषयीं इतकी सहानुभूति वाटत होती कीं, ती सहानुभूतीच मायाताईंच्या जीवनांत काय काय नाहीं ही जाणीव त्यांच्या हृदयांत कोरत होती. आज व आणखी कांहीं वर्षं या जाणिवेला कांहीं अर्थ होता. पांच-सात वर्षं उलटून गेलीं कीं, मग कोण कशाला त्यांचा लग्नाचा विचार करणार ? आजच तो विचार करायला हवा होता. ज्या वेळीं जें व्हायला हवं त्या वेळीं तें व्हावं म्हणून विचार करायचा; वेळ टळली आणि काळ मागें पडला कीं सगळा विचार आपोआपच मागें पडणार होता.

मायाताईंचं अजून लग्न कां झालं नव्हतं ? अजून ? माणूस जून व्हायला लागलं कीं हा 'अजून'चा प्रश्न उभा राहणारच. त्यांच्या वयाची तिशी पाहतां-पाहतां उलटून गेली होती. काय पाहतां पाहतां ? लग्नाची वाट पाहतां पाहतां उलटून गेली होती. लग्न झालं नाहीं म्हणून त्यांच्या व्यक्तित्वाची प्रगति थांबली नव्हती. कुणा एका घटनेवर अडखळून पडणारं पंगु व्यक्तित्व त्यांचं नव्हतं. म्हणूनच समाजकार्याची इमारत त्यांच्या प्रयत्नांतून आकाराला येत होती आणि आपल्या व्यापानं व सौंदर्यानं अनेकांच्या आकर्षणाला, कुतूहलाला, प्रशंसेला पात्र होत होती. हें सगळं खरं होतं; पण हेंहि खरं होतं कीं, वय उलटून चाललं होतं आणि लग्न झालं नव्हतं. लग्न त्यांना करायचं नव्हतं कीं काय ? तो विचारहि त्यांच्या मनांत आला नव्हता की काय ? मनांत आलेलं सगळं घडून येतंच असं नाहीं. पण मनांत यायचं तें कसं येणार नाहीं ? तें मनांत खूपदां येत होतं आणि मन कुरतडून काढत होतं. समाजकार्याचा लेप चढवूनहि कुरतडलेल्या मनाचं दुःख थांबत नव्हतं. ठणक थांबत नव्हती.

तें कसं थांबणार ? चारचौघींसारखीच जिची वाढ झाली तिला चारचौघींचीं सुखं मिळालीं नाहीत तरी चारचौघींचीं दुःखं सुटत नाहींत. फार तर तीं दुःख दाबतां येतील, विसरतां येतील. माणूस इतरांच्यापेक्षां निराळं असलं तरी असून असून किती निराळं असणार ? मायाताईंचे विचार चारचौघींपेक्षां निराळे होते. त्यांच्या इच्छा चारचौघींसारख्याच होत्या. विचाराच्या निराळेपणानं समाजकार्याचे कपडे चढवलेच होते, पण त्या-कपड्यांनीं इच्छा नुसत्या झाकल्या होत्या; दाबल्या नव्हत्या. त्या इच्छाहि वाढत होत्या. त्यांना लपवण्याचा निष्फळ प्रयत्न करणारे समाज-कार्याचे कपडेहि वाढत होते. दहा-पंधरा वर्षं हें असंच चाललेलं होतं. दहा-पंधरा वर्षं असंच चालणार होतं. हें असं होईल अशी त्यांनाहि कल्पना नव्हती. त्यांना ओळखणाऱ्याना देखील कधीं वाटलं नव्हतं, त्यांच्या आईवडलांच्या स्वप्नांतहि कधीं आलं नव्हतं. पण जें स्वप्नीं दिसूं नये तें घडत होतं आणि आपल्या मुलीच्या वाढत्या गौरवाचं गुणगान करावं कीं तिच्या अतृप्त अपूर्ण जीवनासाठीं डोळे ओले करावे हें त्यांना कळत नव्हतं. डोळे ओले झालेच तर ते ताबडतोब पुसून काढायची संवय त्यांनीं लावून घेतली होती. समाजाला वळण लावणाऱ्या मायेनं आपल्या आईवडिलांना तेवढं एक वळण लावणं अपरिहार्य होतं. तिच्या वाढत्या मोठेपणाचाच तो एक भाग होता. पण त्यांना एवढं मोठेंपण आपल्या मुलींसाठीं नको होतं, तिलाहि तें सुरवातीला नको होतं. पण तें मोठेंपण वांट्याला आल्यावर आपल्याकडून तें निभवण्याची ती परकाष्ठा करीत होती. आयुष्याच्या नाटकांत वांट्याला आलेली भूमिका आवडो अगर नावडो, वठवणं आवश्यक होतं. त्याच भूमिकेची लोकांना हळूहळू संवय होत चालली होती. त्या भूमिकेआड असलेला खरा चेहरा लोक हळूहळू विसरत चालले होते. त्या चेहऱ्यावरील दुःखाचे कढ, अतृप्तीच्या सुरकुत्या इतरांना दिसायला नको होत्या. कीर्तीच्या पिवडीनं सारं कांहीं लपवायला हवं होतं. त्या नाटकामुळें गोरगरिबांच्या आयुष्यांत रस येत होता हें काय कमी मोलाचं होतं ?

मायाच्या लग्नाआड इतके दिवस काय येत होतं? तिचं रूप? तिच्या रूपांत बोल ठेवायला जागा देणारं असं कांहीं नव्हतं. तिचा वर्ण गोरा-भरारा नसला तरी तो सावळ्यापेक्षां उजवा होता. रंगाची फारच चिकित्सा करणाऱ्या एखाद्यानं फार तर तिला निमगोरी म्हटलं असतं. चंदनाचं खोड दिसतं तसा तिचा रंग दिसत असे. तोहि रंग पुष्कळांना आवडतो. पण, मायाच्या रंगावर कुणी खूष झाला नव्हता, नाखुषहि झाला नव्हता. डोळ्यांत भरण्यासारखा तिचा रंग नव्हताच मुळीं. एकूणच तिचें नाक डोळे, बांधा, तारुण्याच्या खुणा, हालचाल यांच्यांत इतकं बरं अथवा इतकं वाईट असं कांहींहि नव्हतं—कीं जें लोकांच्या लक्षांत चटकन् यावं. नाहीं म्हणायला तिच्या कपाळाचं एक वैशिष्ट्य होतं. एखादी दरड पुढें यावी तसं तिचं कपाळ उंच होतं. त्या पुढें आलेल्या उंच कपाळामुळें त्याच्या सावलींत नाक, डोळे, ओंठ, फार काय, हनुवटी लपल्यासारखी वाटे. तिची कुणाशीं भेट झाली तर पहिल्या क्षणांत ओंठ बोलले, डोळे भिडले असं वाटण्याऐवजी कपाळ पुढें होऊन आपली मुद्दाम ओळख करून देत आहे असं जाणवें.

कदाचित् केंस मागें ओढून घट्ट अंबाड्यांत करकचले गेल्यामुळें तसा भास होत असावा; पण तें निश्चित सांगतां येत नव्हतं. कारण आपले केंस फार घट्ट असतात असं तिच्याहि लक्षांत असावं. तिनं ते मुद्दाम सैलसर बांधून नवीन केशरचना करून पाहिली होती. पण तिच्या कपाळाचा उभटपणा मात्र लपण्याची तिची तिलाच खात्री नव्हती. इतकंहि असून त्या कपाळांत बेडौलपणा होता असं कुणाला म्हणतां आलं नसतं. कधीं कधीं तिचं तिलाच वाटे कीं, आपले ओठ पूर्वीं थोडेसें फुगीर होते. पण आतां चिमून आंत गेले आहेत. पण तें फक्त तिचं तिलाच कळलेलं दिसत होतं. इतरांच्या तें लक्षांतहि आलं नव्हतं. तिच्या चेहऱ्यामोहऱ्याची आणि अंगकाठीची बारीकसारीक वैशिष्ट्यं कुणीं जवळून पाहिलींच नव्हतीं. जितक्या जवळून आपल्याला कुणीं पाहावं असं तिला वाटणं साहजिक होतं तितक्या जवळून तिला कुणीं बघितलंच नव्हतं. नाहींतर चंदनाच्या रंगाची तिची त्वचा कशी

मऊ आहे हें केवळ तिचं तिलाच ठाऊक राहिलं नसतं. तिला कळत नव्हतं, कुणालाच कळत नव्हतं कीं कशामुळें तिच्याशीं जवळीक करण्याचं कुणाच्याच कसं मनांत आलं नव्हतं! त्या कपाळाला आणि त्यानं सूचित होणाऱ्या बुद्धिमत्तेला तर लोक भीत नव्हते? पण भिण्यासारखं काय होतं? तिच्यापेक्षां कितीतरी अधिक बुद्धिमान स्त्रियांचीं लग्नं झालीं नव्हतीं का? तिला वाटे, लोक समजतात तशा आपण खरोखर बुद्धिमान नाहीं. कां उगीच लोकांनीं आपल्याला बुद्धिमत्तेचा छाप मारून बाजूला सारावं? समाजकार्य करायला बुद्धिमत्ता का लागते? त्याला लागतो जिव्हाळा. ज्या जिव्हाळ्यानं भोंवतालीं गर्दी जमवली, त्याला एकेक माणूस एकेकटा आपलासा करणं कां जमूं नये? पण तें जमलं मात्र नव्हतं. स्वतःच्या व्यक्तित्वांतील वैगुण्याची तिला पुष्कळदां खंत वाटे. तिला वाटायचं, आपण थोड्या अवखळ कां नाहीं? थोडासा हावरटपणा, थोडासा आगाऊपणा, थोडासा मूर्खपणादेखील आपल्या स्वभावांत कां नाहीं? कशाला हा शांतपणा? कशाला हा आत्मविश्वास? कशाला हा इतरांना मार्गदर्शन करणारा मोठेपणा? त्या आत्मविश्वासनं आणि मोठेपणानंच तिचा घात केला होता. त्या मोठेपणाचा दूरदूरच्या लोकांवरच नव्हे तर खुद्द तिच्या आईवडिलांवर देखील प्रभाव पडला होता. त्या प्रभावामुळेंच तींदेखील तिच्याशीं अदबीनं जपून, अंतर राखल्यासारखीं, तिला काय वाटेल या शंकेच्या भाराखालीं असल्यासारखीं प्रत्येक वेळीं वागत आलीं होतीं.

इतर आई-बापांच्यासारखीं तीं जर वागलीं असतीं, एखाद्या बाहुलीला जपावं, तिचं लाडकौतुक करावं, मनाला वाटेल तेव्हां आणि तसा सोहळा उरकून घ्यावा अशा सामान्य पद्धतीप्रमाणें जर तीं वागलीं असतीं तर मायाला हा मोठेपणाचा गौरव मिळाला नसता. पण तिच्या नशिबांतच मोठेपण, गौरव, कौतुक, आदर इत्यादि सगळं लिहिलं गेलं होतं. या मानसन्मानाचा हा सगळा लेख नीट मावावा म्हणून तर परमेश्वरानं तिचं कपाळ मोठं केलं नसेल? लोकांना तें मोठं कपाळ दिसत होतं; पण त्याच्या आंत सतत पडणारे अस्वस्थतेचे, अतृप्तीचे वाढत्या इच्छांचे वण कसे दिसणार?

लोकांनी फक्त एवढचं दिसत होतं कीं, मायाताईनीं जें मोठं कार्य हातीं घेतलेलं आहे, त्या कार्याची आपण स्तुति केली पाहिजे. त्या कार्याला मदत केली पाहिजे. त्या कार्याची पोंच मायाताईंशीं अदबीनं अभिवादन करून, आदरानं नमस्कार करून दिली पाहिजे.

कार्यक्रम संपला. सगळ्यांनीं आदर व कौतुक दाखवून त्यांचा निरोप घेतला. मायाताई किती मोठी व्यक्ति आहे हें सगळ्यांना पटलेलं दिसत होतं. आपण किती लहान आहोंत ही जाणीव त्या मोठ्या कार्यक्रमच्या पार्श्वभूमीवर तिला स्वतःला बोचत होती.

एवढे लोक आले आणि गेले. सगळ्यांनीं कसं बरोबर अंतर राखलं. अंतर राखलं नाहीं तें फक्त एका व्यक्तीनं–नको त्या व्यक्तीनं. अवघ्या गांवांत नादानपणासाठीं प्रसिद्ध असलेल्या श्रीरंग देशपांडेनं. सगळीं माणसं परत जाण्याची त्यानं वाट पाहिली. माया कार्यक्रमांतून जवळजवळ मोकळी झालेली पाहतांच तो थेट तिच्याजळ आला. रस्त्यावरचा धुळीचा लोट एकदम अंगावर यावा तसा तो तिच्याजवळ आला. मायाचा हात एकदम आपल्या हातांत घेऊन तिचं हस्तांदोलन करत तो म्हणाला, "वा वा! एकदम पसंत. आपण तर अगदीं बेदद्द खूष आहोंत. तुम्हीं मला ओळखलेलं दिसत नाहीं. मी श्रीरंग देशपांडे!" श्रीरंगाला कोण ओळखत नव्हतं! वयाची पास्तिशी उलटून गेल्यावरहि ज्याचा उडाणटप्पूपणा खळला नव्हता असा श्रीरंग देशपांडे. त्यानं आतांपर्यंत काय केलं नव्हतं? बापाची बनावट सही करून बँकेंतून पैसे उचलले होते; आणि आपलेच दांत आणि आपलेच ओंठ यांच्याविरुद्ध तक्रार तरी कशी करायची, असा बाका प्रसंग वडिलांच्या पुढें उभा केला होता. बरं झालं या असल्या बेजबाबदार वागण्याचा प्रसाद त्यानं फक्त आपल्या आईवडिलांनाच दिला होता. बरं झालं त्याला हक्काची बायको नव्हती. नाहींतर त्याचा त्रास सोसणारं आणखी एक माणूस यापेक्षां अधिक किंमत तिला राहिली नसती. खावं, प्यावं, मजा करावी, मन मानेल तसा पैसा उडवावा, मन मानेल तिथून तो उचलावा, भानगडी निस्तरण्याचं काम वडिलांच्यासाठीं मागें ठेवून मोकळं व्हावं–असं वागणारा श्रीरंग.

त्याला कोण ओळखत नव्हतं? त्याच्या मनानं काय घेतलं होतं कुणास ठाऊक, त्यानं अचानक मायाचा हात धरला आणि कडकडून तिच्याशीं हस्तांदोलन केलं. कुटलाहि मनुष्य आतांपर्यंत तिच्या इतक्या जवळ आला नव्हता. जवळ आला तो श्रीरंगासारखा मनुष्य. माया गोंधळली. पण समाजकार्यांच्या अनुभवानं तिची गोंधळण्याची ताकदहि कमी करून टाकली होती. आजूबाजूला असलेल्या ज्या दोन-चार लोकांनीं तो प्रसंग पाहिला ते मात्र चिडले, गोंधळले. मायाताईसारख्या मोठ्या व्यक्तीशीं लगट करणारा हा फालतू माणूस हाकलून दिला पाहिजे, असं त्यांना वाटलं; आणि त्याच्च रोखानं त्यांचे पाय हालले, हात वळवळले. पण त्यांनीं पाहिलं आणि ऐकलं कीं, मायाताई श्रीरंगाला आस्थेनं विचारत होत्या, " खरंच ? तुम्हांला इतकं आवडलं ? "

श्रीरंग उत्तर देत होता, " फारच्च. संपूर्ण ओळख करून घ्यायची मला ! "

" छान जरूर, जरूर. "

तें पाहतांच आणि ऐकतांच लोकांच्या हालचाली क्षणभर थिजल्या आणि लगेच आपापल्या वाटांनीं पांगल्या.

झाडावर चाकूनें कोरलेल्या आकृतीवर पावसाचं पाणी पडलं कीं ती जशी फुगते तसा तो प्रसंग तिच्या हृदयावर दिवसेंदिवस टरटरून उमटूं लागला. प्रसंग, प्रसंग कसला, अतिप्रसंगच्च तो. त्या प्रसंगानं तिला चीड यायला हवी होती, राग यायला हवा होता, शरम तरी वाटायला हवीच्च होती असं तिची बुद्धि तिला सांगत होती; पण तें तिला पटत नव्हतं. त्या प्रसंगाच्या चित्रावर तिरस्काराचे फराटे ओढून तिनं तें पुसून काढायला हवं होतं. पण हा झाला केवळ तार्किक विचार. ती करत होती तें निराळंच्च. आठवणींचं पाणी घालून ती त्या चित्राला फुगवत होती. आंधळ्या वागण्याच्या धारदार पात्यानं ती तें चित्र अधिक कोरींव करत होती. जाणूनबुजून आंधळं वागणं. श्रीरंग एक वाईट माणूस आहे. ज्याला जवळहि उभं राहूं देण्याची लायकी नाहीं असल्या प्रकारचा तो एक माणूस आहे, हें तिला माहीत होतं; पण रुचलेलं एखादं गाणं आळवावं तशी ती तो प्रसंग

आपल्या मनांत घोळवत होती. श्रीरंग हा वाईट होता हें 'खरं, पण तोच प्रसंग एखाद्या चांगल्या माणसानं केला असता तर आपल्याला नको का होता? चांगला माणूस मिळत नाहीं आणि माणूसहि मिळत नाहीं; अशा परिस्थितींत स्वतःची कुचंबणा कां करून घ्यावी? शिवाय अमुक माणूस चांगला आणि तमुक वाईट अशा भेदाला समाजसुधारणेचं कंकण बांधलेल्या व्यक्तीनं तरी कां थारा द्यावा? साधारण माणसांनीं साधारण शंका मनांत कुजबुजूं द्याव्यात; पण आपण त्या शंकांना शरण कां जावं? जें होतं आहे त्याला समाजसुधारकाच्या निर्भयतेनं तोंड कां देऊं नये?

" बाई, तुम्ही रागवणार नसाल तर मी एक लहान तोंडीं मोठा घास घेणार आहें. " संस्थेंतला एकनिष्ठ सेवक गणपत शिंपी मनाचा हिय्या करून तिला म्हणाला.

गणपतची आपल्यावर भक्ति आहे, प्रेम करण्याच्या लायकीचा तो एक साधा-सुधा विश्वासू साथीदार आहे हें मायाला माहीत होतं. संस्थेविषयीं असो कीं व्यक्तीविषयीं असो, फारसं बोलणं गणपतच्या स्वभावांत नव्हतं. त्याला फक्त एकच ठाऊक– मायादेवी ज्या मार्गानं जातील` त्या मार्गानं इमानदारीची शिदोरी घेऊन जाणं. अशा गणपतला कांहींतरी बोलायचं होतं. कशाहीसंबंधीं तो वाटेल तें बोलला तरी त्याला तसा अधिकारच होता. मग ही प्रस्तावना कां?

" बोल, बाबा गणपत, बोल. माझ्याशीं बोलतांना तुला रे कसलं लहान तोंड अन् मोठा घास?"

" नाहीं बाई, पायरी सोडून बोलल्याबद्दल रागावूं नका. सांगितल्याशिवाय राहवत नाहीं म्हणून सांगतों, श्रीरंग देशपांडे हा इसम बरा नाहीं. तुमच्या-सारख्यावर त्याची सावली देखील पडायला नको!"

मनाचा धडा करून गणपत बोलायचं तें बोलला खरा, पण तें बोलणं होतांच एखाद्या लहान मुलासारखा चेहरा टाकून जमिनीकडे पाहात उभा राहिला.

गणपतला काय सांगावं? गणपतचा राग येणं तर शक्यच नव्हतं.

" गणपत, आपण आपल्या संस्थेंत काय शिकलों?"

गणपत चुपचाप उभा होता. " गणपत, आपल्या संस्थेचा बाणा काय आहे ? बोल ना. मीं तुम्हांला आणि तुम्हीं मला आतांपर्यंत काय शिकवलं ? "

माणसं बदलूं शकतात. त्यांना बदलविण्याची तयारी मात्र पाहिजे. " शिक्षकांच्या समोर एखादं पाठ केलेलं वाक्य विद्यार्थ्यानं बोलावं तसं बोलून गणपत निघून गेला. जमिनीकडे पहातच.

" माणसं बदलू शकतात. त्यांना बदलवण्यासाठीं तयारी पाहिजे. कां नाहीं ? श्रीरंग देशपांडे बदलेल काय ? आपण त्याला बदलवूं शकूं काय ? कां नाहीं ?.... "

" माया तुझ्यासारखीला मीं सांगावं असं नाहीं; पण मोठ्यांच्या वाटेवर अंधार असला कीं कंदील दाखवण्याचं काम लहान देखील करूं शकतात. म्हणून म्हणतें. "

" काय ? "

" मीं परवा पाहिलं. तुझी लहानपणापासूनची एक मैत्रीण म्हणून मला तुला कांहीं सांगायचा अधिकार आहे. "

" काय पाहिलंस ! काय सांगणार आहेस ? "

" परवां तुम्हां दोघांना संध्याकाळीं फिरायला जातांना पाहिलं मीं. "

" आणखी काय पाहिलंस ? "

" आणखी कांहीं पहायला नको म्हणूनच हें सांगतें आहें. "

" विमल, तुला माझ्याकडे माझ्या आईवडलांनीं पाठवलं कीं, तुझ्या नवऱ्यानं ? खरं सांग, तुला माझ्याकडे पाठवण्यांत आलं आहे कीं नाहीं ? "

" तसंच का समजेनास ! "

" मला असं उडवाउडवीचं उत्तर नको. खरं सांग तुला माझ्याकडे कुणीं पाठवलं ? "

" माया, माणसाचं कर्तृत्व कितीहि मोठं असलं तरी त्याला अहंकाराचा वारा लागूं नये. "

" अरे वा ! तूं तर शिकवायला लागलीस ! खरंच विमल, येतेस का ग आमच्या संस्थेंत शिकवायला ? आतां नाहीं तरी तुला तीन मुलं आहेतच.

पुरें झालीं नाहीं का ? तुझ्या नवऱ्याला म्हण कीं ' आतां पुरें झालं, मोकळें करा मला. ' खरंच विमल, येच तूं माझ्या संस्थेंत, माझ्यापेक्षांदेखील चांगलं काम करशील ग तूं ! "

" असं काय ग बोलतेस ? " विमलनं हुंदका गिळला. पण माया आपले हुंदके गिळूं शकली नाहीं. हुंदके देत देत बळेंबळें हंसत हंसत ती म्हणाली, " विमल, बरं झालं तूं आलीस. कुणाला तरी सांगावंस वाटतच होतं. कुणाच्या तरी करवीं माझ्या आईवडलांना कळवावंसं वाटतच होतं. तूं खूष होशील, ते खूष होतील, आपल्या सगळ्या मैत्रिणींना आणि त्यांच्या नवऱ्यांना सांग. सगळ्यांनीं खूष व्हायला हवं. माझं श्रीरंगाशीं लग्न ठरलं आहे. "

" माया ! "

" अग जा; आनंदाची बातमी ताबडतोब सर्वांना सांग. जा म्हणतें ना ? मला एकटीला रडून घेऊं दे. तुम्ही लोक मला रडायची देखील मोकळीक देणार नाहीं का ? अग, सासरीं जातांना तूं नव्हती रडलीस का ? माझं आतां वय उलटून गेलं आहे. म्हणून का माझा रडण्याचा हक्कहि तुम्ही हिरावून घेणार ? जा म्हणतें ना ! एकदां मला मोकळेपणानं रडूं द्या. म्हणजे मग सासरीं पाऊल ठेवतांना बरं वाटेल नाहीं ? मला जरूर पडेल तेव्हां मात्र धीर द्यायला येशील अं. अनुभवी आप्तमित्रांचा आधार हवा नाहीं का ? जा, लवकर जा आणि माझ्या आईवडलांना सांग आनंदाची बातमी. "

विमलला मायानं पिटाळून लावलं आणि मनसोक्त रडून घेतलं. एकांतांत तिला असं रडतांना कुणीं बघणं बरं नव्हतं. कांहींहि झालं, कांहींहि होणार असलं तरी ती एक प्रख्यात समाजकार्यकर्ती होती.

तिला रडतांना फक्त श्रीरंग पाहूं शकला. तिथपर्यंत पोंचायचा अधिकार त्याला मिळालाच होता. अधिकाधिक मिळणार होता.

" अग रडायला काय झालं ? सुप्रसिद्ध समाजसेविका मायादेवी असं मुळुमुळु रडतात असं लोकांना कळलं तर काय वाटेल ? "

" काय वाटणार आहे ? प्रसंगीं रडावं कसं हें समाजाला शिकविण्याची मी पूर्वतयारी करत आहे असं त्यांना वाटेल, दुसरं काय ? "

" अग पण रडायला कारण ? "

" आपलं लग्न होणार आहे. "

" कधीं ? "

" उद्यां . "

" ठरलं का ? "

" हो, पक्कं. "

" वा छान ! " म्हणत श्रीरंग हंसत सुटला. त्याचं हंसणं कांहीं केल्या थांबेना. तिला वाटलं, निदान या वेळीं त्यानं असं हंसूं नये. थोडसं गंभीर व्हावं.

" पण यांत रडण्यासारखं काय आहे ? मला तर याचा कांहीं अर्थच कळत नाहीं ! "

" मला तरी कुठं कळला आहे ? प्रत्येक घटनेला अर्थ हवाच असं कुठाय ! घटनेला फक्त एकच माहीत असतं—घडणं. "

श्रीरंगाला तें कळलं नाहीं. त्याला कळावं, इतरांना कळावं, कळत नसलं तर आपण समजावून द्यावं असाहि विचार तिच्या मनांत आला नाहीं.

* * *

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# कांहीं झालं नाहीं

## ६

आंतल्या खोलींत पलंगावर डोळे मिटून पडल्या पडल्या गुणवंतराव जिकडे लक्ष द्यायचं तिकडे नीट लक्ष देत होते. लक्ष डोळ्यांनीं द्यायचं नव्हतंच. कान जागे असायला हवे होते. डोळ्यांना उगीच शीण कशाला द्या ! पुढल्या खोलींत चाललेलं गायन, वादन, गोंधळ—सगळं कांहीं त्यांचे कान नीट टिपीत होते. थोड्या वेळानं पुढच्या खोलींत जाऊन कुणा विद्यार्थ्याला शाबासकी द्यायची, कुणाची कानउघाडणी करायची, कुणाला ताल समजावून द्यायचा, कुणाला सूर स्पष्ट करून सांगायचे, कुणाला गायनाच्या वर्गात शिक्षकांच्या तात्पुरत्या गैरहजेरींत कसं वागायचं तें शिकवायचं—पडल्या पडल्या गुणवंतराव मनाशीं ठरवीत होते. झोंपायच्या खोलीला लागून असलेल्या निरुंद जागेंत त्यांची पत्नी त्यांच्यासाठीं चहा आणि कांहींतरी खायला तयार करीत होती. चहा पिऊन झाला कीं, गुणवंतराव पुन्हा पुढच्या खोलींत जाणार होते आणि पुन्हां तासातासानं येणाऱ्या–जाणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना संगीताचे धडे देणार होते.

विद्यार्थी काम करीत असतां आपण आराम करणं योग्य नव्हे हें त्यांना माहीत होतं. पण करायचं काय ? सकाळपासून रात्रीं झोंपेपर्यंत एकसारखी विद्यार्थ्यांची रीघ लागलेली असायची. रात्रींहि पुष्कळदं धडां आराम मिळत नव्हता. संगीताचा षौक करायचा म्हणजे रात्रीचा आराम

मैफलीला वाहण्याची तयारी असायलाच हवी. अशा परिस्थितींत आरामासाठीं थोडा वेळ कुठून तरी उचलायलाच हवा होता. या परिस्थितीवर खूष व्हावं कीं होऊं नये हें त्यांना नीट ठरवतां येत नव्हतं. विद्यार्थ्यांच्या या गर्दीमुळं चारितार्थाला निश्चिती प्राप्त झाली होती. बस्स, तेवढंच एक समाधान. बाकी दर तासाला पांच रुपये संगीत शिक्षकाला दिले कीं, सगळी संगीतसाधना संपली, अशा समजुतीनं येणाऱ्या विद्यार्थ्यांपासून कसलं समाधान मिळणार होतं ? क्वचितच एखाद्या विद्यार्थ्याला संगीताची तळमळ होती; क्वचित् एखाद्याला संगीताचं वरदान निसर्गानं दिलं होतं. बाकीचे सगळे कशाला संगीताकडे वळले होते कोण जाणे ! संगीत शिकण्याची लायकी नसणारेहि आपल्या वर्गात येतात म्हणून तर योगक्षेमाची आपल्याला काळजी नाहीं हें गुणवंतरावांना कळत होतं आणि म्हणूनच आपल्या संगीतशाळेचा दरवाजा सगळ्यांच्यासाठीं त्यांनीं मोकळा ठेवला होता. पोटाचा प्रश्न होता. तो नसता तर त्यांनीं बहुतेक विद्यार्थी-विद्यार्थिनींना चक्क सांगितलं असतं, ‘ पुरे झाला हा अत्याचार, ताबडतोब इथून चालते व्हा ! गाढवांनीं गायचा प्रयत्न करूं नये. त्यांनीं ओझीं वहावीं, काय वाटेल तें दुसरं काम करावं; पण गाण्याचा प्रयत्न करूं नये. जा इथून. कां मला व्यर्थ वेठीला धरतां ....’ पण असं म्हणून चालणार नव्हतं. अन्नदाता मूर्ख असला तरी त्याला तसं सागतां येत नाहीं. मनाला न आवडणारी ही परिस्थिति मुकाट्यानं सहन करणं यांतच शहाणपणा होता. इतर सगळा मूर्खपणा हातून इतकीं वर्षे सतत घडल्यानंतर आतां शहाणपणाला वाव नव्हता. आतांपर्यंत जें जें एकामागून एक घडत गेलं होतं, त्यांतूनच ही परिस्थिति उत्पन्न झाली होती. हें सगळं असं होईल—संगीत-शिक्षकाचा पेशा आपल्या वांट्याला येईल हें तरी आपल्याला कुठं माहीत होतं ? माहीत केवळ एवढंच होतं कीं, बालपणापासून आपल्या गळ्यांतून कुठलाहि सूर, कुठलीहि तान, कुठलाहि आलाप सहज निघत असे; कोणचेंहि वाद्य आपलीं बोटं लीलेनं वश करूं शकत होतीं.

जें वांट्याला आलं त्यांत तसं नाखूष होण्यासारखं काय होतं ? संगीताच्या

षौकापायीं मध्येंच शिक्षण सोडावं लागलं होतं हें खरं; पण तें शिक्षण पूर्ण झालं असतं तरी असं काय लोकविलक्षण हातीं लागणार होतं ? एखादी बरीवाईट नोकरी किंवा वकिली, यापेक्षां जें लाभलं तें काय वाईट होतं ? पैसा मिळत होता. थोडंफार नांव मिळालं होतंच. या दोन्ही बाबतींत आणखी प्रगति होईल अशीं चिन्हंहि स्पष्ट होतीं. मानसन्मान मिळत असला तरी तो मनासारखा नव्हता. मानसन्मान क्वचितच मनासारखा मिळतो. मानसन्मानालासुद्धां मर्यादा असतातच. जें आपल्याला मिळालं तें तरी कितीजणांना मिळतं ? आपलाहि हेवा करणारे कांहीं कमी नाहींत. आपलं लग्न झालं तेव्हां आपल्या विरुद्ध टीकेचं काहूर उठलं तें तरी कां ? लोकांना आपला हेवा वाटला म्हणूनच. बायको पदवीधर आणि नवरा तिच्यापेक्षां कमी शिकलेला असला म्हणून काय झालं ? थोडंसं नित्यापेक्षां निराळं असलं तरी आपल्या लग्नांत विपरीत असं काय दिसलं लोकांना ? आपलं कृत्य त्यांना इतकं गर्ह्य कां वाटावं ? आपल्या संगीतनैपुण्यावर भाळून तिनं आपली निवड केली. कॉलेजांतल्या संगीतसभांत झालेल्या मैत्रीची परिणती जिवाला भारून टाकणाऱ्या स्नेहांत झाली. त्या स्नेहापायीं तिनं वडिलांच्या घरीं मिळत असलेल्या ऐषआरामाकडे पाठ फिरविली आणि संगीत शिक्षकाच्या संसारांत साथ केली. यांत एवढं टीकास्पद काय होतं ? केवळ असूया. केवळ ईर्ष्या. केवळ द्वेष. आपण तिला फसवलं असं तिच्या आईवडिलांना वाटलं तें एक समजण्यासारखं होतं. संगीत शिक्षकाशीं विवाह म्हणजे असंगाशीं संग असं त्यांना क्रोधाच्या आवेगांत वाटणं साहजिक होतं. मुलीसंबंधीं त्यांच्या ज्या कांहीं श्रीमंती आशा होत्या, त्या माझ्यामुळं खुडल्या गेल्या असं वाटून त्यांना क्रोधाचा झटका येणं साहजिक होतं. झटकाच तो. तो असा वेगांत आला तसाच ओसरून गेला. पण लोकांनीं माझ्याविषयीं अविश्वास, संशय, दुःख कां धरावा ? मीं फसवणूक केली असं त्यांनीं कां समजावं ? कुणी फसलं असेल तर तें मीच. तिचं आपल्यावर प्रेम असलं, आपल्या कौशल्यामुळं ती कांहीं काळ बेहोष झाली असली, तरी तिला संगीताचं अंग नाहीं, ज्ञान नाहीं. आपल्यासारख्याशीं

समरस होणारं मन तिच्या शरीरांत नाहीं. तिच्याकडे पाहून कधीं कधीं वाटतं कीं, आपल्या चुकीचं ती जिवंत प्रतीक आहे. तारुण्यांत डोकं घालवून केलेल्या कृतीची ती साक्ष आहे. कांहींहि असो, त्या कृतीशीं आपण एकनिष्ठ राहतों. या संसारांत आपल्याला जसं असमाधान आहे तसंच तें तिलाहि असण्याचा संभव आहे, ही शक्यता आपण कधीं डोळ्यांआड केली नाहीं. फसवणून झालीच असेल तर ती दोघांचीहि झाली. कुणी कुणाला मुद्दाम, बुद्धया फसवलं नाहीं. फार तर तारुण्याच्या पहिल्या उसळींत चूक झाली असं म्हणतां येईल; पण फसवणूक कदापिहि नाहीं. तिला फसवण्याचा उद्देश स्वप्नांतसुद्धां आपल्या मनाला शिवला नाहीं. तिलाच काय, कुणालाहि कधीं फसवण्याची भावना आपल्याला शिवली नाहीं. फसवायचंच असतं तर तिलाच काय आणखी कुणाला तरी अजून सहज फसवतां येईल. तेवढं सामर्थ्य, तेवढी शक्यता अजूनहि आहे. पण आपलं सामर्थ्य आपण मुद्दाम विसरलों. तें विसरण्याचा प्रयत्न दररोजच आपण सतत करीत असतों. मोह टाळणं किती कठीण आहे हें लोकांना काय माहित ? त्यांना नुसतं शिव्या देणं समजतं.

त्यांची पत्नी तेवढ्यांत खाऱ्या पुऱ्या आणि चहा घेऊन आली. तिच्याकडे पहातांच त्यांना तिची कींव आली. श्रीमंताची पोर सारी श्रीमंती लाथाडून आपला संसार सजवायला तयार झाली ती कोणत्या सुखासाठीं ? आपण तिला कसलंच सुख देऊं शकलों नाहीं, या जाणिवेनं त्यांना खंत वाटूं लागली. सगळ्यांना होतात तशींच आपल्याला देखील मुलं असतीं तरी बिचारीच्या आयुष्यांत कांहीं संगीत उत्पन्न झालं असतं. पण तें नशिबांत नाहीं. इतर सुख तरी आपण तिला देऊं शकलों का ? तशी खायलाप्यायला आपल्याला ददात नाहीं. कसलीच काळजी नाहीं; तरी सुखाचं अस्तर आपल्या आणि तिच्या जीवनाला नाहीं. एवढं खरं. अजून काय झालं आहे ? आतां तर आपल्या संसाराला पांच-सहा वर्षं झालीं, जें जें नाहीं तें तें सगळं आपल्याला यथाकाल मिळेल. पण यथाकाल केव्हां ? काळाकडे पहात तिनं कुठवर बसायचं ? तोंपर्यंत तिला आपण कांहींतरी सुखाची भावना नको का द्यायला ? साधे चार प्रेमानं ओथंबलेले शब्द तरी आपल्या तोंडून आतां कां निघूं नयेत ? प्रेमाचे शब्द

म्हणजे नाटकांतील अलंकारिक भाषा नव्हे. योग्य वेळीं कौतुकाचे चार कण मिळाले तरी तिला ते पुरतील. तेहि आपण तिला देत नाहीं. तिनं केलेल्या चहा पुऱ्या आपल्याला अतिशय आवडल्या. ‘ छान झाला आहे चेत ! ’ एवढे चार शब्दसुद्धां आपल्या तोंडून निघाले नाहींत. बोलावंसं वाटूनहि आपण बोलून दाखवीत नाहीं. हा दोष कुणाचा ? तिच्याकडे पहातांच आपल्या बोलण्याला स्फुरण कां येत नाहीं ? आपला तर दोष खराच; पण तिच्यांतहि कांहींतरी कमी आहे. एरवीं आपण वर्गांतल्या सामान्य विद्यार्थी—विद्यार्थिनींची अवास्तव स्तुति करतों, मग पत्नीशीं बोलतांनाच आपली जीभ कां अडखळावी ? एके काळीं आपण जगाला न जुमानतां तिच्यावर प्रेम केलं हें खोटं कीं काय ? आपल्याला त्या वेळीं वाटलं तें प्रेम नव्हतं कीं काय ? मग होतं काय ? केवळ भूक ? छेः छेः ! केवळ भुकेसाठीं तिनं इतका त्याग नसता केला. केवळ भुकेसाठीं तिनं सर्वस्वाचं विसर्जन केलं नसतं. तिच्या त्यागाची आपल्याला एवढी महती वाटूनहि तिच्याविषयीं कौतुकाचे शब्द आपल्या तोंडांतून वेळेवर कां निघत नाहींत ? तिला पहातांच पूर्वींचा उदारपणा आपल्या शब्दांतून सळसळत कां नाहीं ? तिचं आत्मसमर्पण आपल्याला पटलं आहे कीं नाहीं ? आत्मसमर्पण करून तिनं आगळीच भक्ति दाखविली, आगळंच धैर्य दाखवलं, आगळीच निष्ठा दाखवली, हें आपल्याला पटलं नाहीं कीं काय ? तसल्या समर्पणाविषयीं आपल्या मनांत संशय आहे कीं काय ? तिच्या मोठेपणापेक्षां आपल्याला स्वतःच्याच आकर्षकतेचं अधिक मोल वाटतं कीं काय ? तसलं आत्मसमर्पण आपल्यासाठीं करायला लावण्याची शक्ति आपल्यांत अजून आहे असं तर आपल्याला वाटत नाहीं ? असला विचार करून मनांत निर्माण झालेली गुंतागुंत उकलणार तरी आहे काय ?....हा कसला आराम ? शरीर स्वस्थतेचं सोंग करीत पडलं आहे; पण मन सारखं धडपडत आहे. या अवखळ मनालाहि स्वस्थ पडायला लावलं पाहिजे. लोक आपल्याला कलावंत म्हणतात, आणि वर असंहि सांगतात कीं, या अस्वस्थतेंत आपल्या कलेची बीजं आहेत. काय असेल तें असो, नीट आराम आपल्या नशिबीं दिसत नाहीं....

असा वरकरणीं आराम करीत गुणवंतराव पडले असतां बाहेरच्या खोलींतून राजा वैद्य आंत आला. राजा वैद्य हा गुणवंतरावांचा आवडता शिष्य. आपल्या हाताखालील विद्यार्थ्यांपैकीं राजा वैद्यालाच संगीताचं अंग आहे असा त्यांचा विश्वास होता. गुणवंतरावांनीं आपल्या गैरहजेरींत संगीताच्या वर्गाचं काम चालवायचे अधिकार राजाला दिले होते. संगीतांतली त्याची गति, गुणवंतरावांविषयींची त्याची श्रद्धा, आणि गुणवंतरावांचं त्याच्यावरील प्रेम सर्वांना स्पष्ट दिसत होतं आणि त्याची हुकुमत सगळा वर्ग मान्य करीत होता. विद्यार्थ्यांना प्राथमिक धडे देण्याचं, त्यांच्या चुका सुधरवण्याचं पुष्कळसं काम त्याच्यावर सोंपवण्यांत आलें होतं व तें तो चांगल्या प्रकारें करीत असे. एखादी अडचण आली तरच तिचं निराकरण करण्यासाठीं तो गुणवंतरावांकडे धांव घेत असे. अशीच कांहींतरी अडचण आली असली पाहिजे हें ओळखून गुणवंतरावांनीं पलंगावरून उठत त्याला विचारलं, " काय राजाभाऊ, कांहीं अडचण ? मी इतक्यांत वर्गांत येणारच होतों ! "

" तुम्हांला बोलवावयालाच आलोंय मी ! " राजा वैद्यानं उत्तर दिलं.

" हो, पण कांहीं अडचण आलीय् कां ? "

" शीला बेंद्रे आली आहे. "

" तुम्हीं द्या ना तिला धडे ! "

" मीं तसं करायचा प्रयत्न केला, पण ती ऐकत नाहीं. "

" म्हणजे ? "

" ती माझं ऐकायला तयार नाहीं. "

" म्हणते काय ती ? "

" तिला शिकवायचा मला काय अधिकार आहे, असं ती म्हणते. "

" असा प्रश्न विचारायचा तिला काय अधिकार आहे ? "

" तुम्ही वर्गांत आलांत तरच ती ऐकायला तयार आहे. तिचं पाहून इतर विद्यार्थीहि असहकार करतील. "

" परत जाऊन तिला तातडतोब सांगा कीं, तिच्या शिकवणीची मला

जरूर नाहीं. चार विद्यार्थी वागतात तसं ज्यांना वागायचं नाहीं, त्यांना माझ्या वर्गात स्थान नाहीं. जा सांगा तिला. स्वतःची अधिक शोभा न करतां ताबडतोब वर्ग सोड म्हणावं!"

"हें मीं सांगण्याऐवजीं तुम्हींच सांगितलेलं बरं. माझ्या शब्दांना ती थोडीच जुमानणार आहे?"

"तिनं तुमचा अपमान केला आहे, म्हणून मुद्दामच तिला हांकून लावायचा मी तुम्हांला अधिकार देतों. जा, खडसावा तिला. तुमचं ऐकणार नसेल तर मी आलोंच मागोमाग!"

राजाभाऊ निघून गेल्यावर गुणवंतरावांची पत्नी भेदरून त्यांना म्हणाली, "अंमळ शांतपणानं वागावं!"

"शांतपणानंच वागणं चालू आहे. हा प्रकार घडेल अशी माझी अटकळ होतीच. तिच्याशीं कसं वागायचं तें मीं शांतपणानं पूर्वींच ठरवून ठेवलं आहे."

"हो, पण श्रीमंताची मुलगी आहे ती. तेव्हां थोडासा विचार केलेला बरा!"

"असेल श्रीमंत आपल्या घरची. कुणाच्या श्रीमंतीनं मी दिपणारा नव्हें. तुला सांगायला हवं का हें? ती श्रीमंत असेल; स्वतःला देखणी समजत असेल; पण असल्या गोष्टींचा माझ्यावर परिणाम व्हायचा नाहीं. हेंच मी तिला समजावणार आहे."

गुणवंतरावांना पुढल्या खोलींत ताबडतोब जाणं आवश्यक होतं. पुढल्या खोलींत गोंधळ वाढला होता. शीला राजाभाऊचं ऐकत तर नव्हतीच, उलट त्याची टवाळी करूं लागली होती. तिचीं दुरुत्तरं ऐकून राजाभाऊ हतबुद्ध झाला होता आणि नेहमीं आपल्यावर जरब ठेवणाऱ्या राजाभाऊची शीला हेटाळणी करूं लागलेली पाहून, वर्गातल्या इतर विद्यार्थी—विद्यार्थिनींना आनंद झाला होता. एकमेकांकडे पाहून तीं फिदीफिदी हंसूं लागलीं होतीं. गुणवंतरावांनीं वर्गात प्रवेश करतांच पहिल्यांदां त्या विद्यार्थ्यांना दाटलं, "वर्गात तमाशा करायला काय झालं?" सगळींजणं चूप झालीं. शीला ताठरपणें उभी होती. तिच्या चेहऱ्यावर चुकीची किंवा पश्चात्तापाची जाणीव मुळींच

दिसत नव्हती. तिच्याकडे पहातांच गुणवंतरावांचा राग वाढण्याऐवजीं त्यांना तिच्या गुमान वृत्तीचं एकाएकीं कौतुक वाटूं लागलं, पण तें क्षणभरच. तिनं राजाभाऊंचा विनाकारण अपमान केला होता, इतर विद्यार्थ्यांत बेशिस्त आणली होती. तिला शिक्षा व्हायलाच हवी होती. पण जें काय करायचं तें शांतपणानं करायला हवं, त्याचा उगीच बभ्रा व्हायला नको, म्हणून त्यांनीं इतर विद्यार्थ्यांना सांगितलं, " तुम्ही घरीं जाऊं शकतां. आज तुमचा वर्ग इथंच संपला. " मुलं आपापलीं अवजारं संभाळीत जाऊं लागलीं. एक-दोघांचा पाय उचलत नव्हता. आपण गेल्यानंतर जो प्रसंग रंगणार तो नक्कीच पहाण्यासारखा असणार, पण तो आपल्याला बघायला मिळणार नाहीं, म्हणून त्यांना वाईट वाटत होतं.

इतर विद्यार्थी–विद्यार्थिनी निघून गेल्यावर गुणवंतरावांनीं एकदम शीलाची खरडपट्टी काढली नाहीं. आंतल्या खोलींतून येतांना त्यांनीं तसाच विचार केला होता-वर्गांत जायचं आणि लगेच शीलाला फाड्फाड् बोलून हांकून लावायचं असा विचार त्यांनीं केला होता; पण तो विरघळला. काय बोलावं तें त्यांना नीट आठवेना. म्हणून ते शीलाकडे नुसतेच बघत राहिले. त्यांच्या लक्षांत आलं कीं, इतर विद्यार्थ्यांना घरीं पाठवण्यांत आपला हेतु वर्गांतल्या प्रकाराची वाच्यता कमी करण्याचा तर होताच, पण शीलासंबंधीं बोलतांना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहिल्याचा हवाला देतां येऊं नये, असंच त्यांचं धोरण होतं. शीलाच्या वागण्याचा आपल्याला राग आला आहे, नेहमींहि येतो हें खरं; पण तिच्या प्रत्यक्ष उपस्थितींत त्या रागाचा पारा उतरतो हेंहि तितकंच खरं होतं· श्रीमंतीवर पोसलेल्या तिच्या हट्टी, हेकेखोर, आग्रही स्वभावाचं आपल्याला कांहींतरी आकर्षण वाटतं. त्या आकर्षणामुळं तिच्या-विषयींच्या रागाचं टोंक ती समोर असतांना बोथट होतं; एवढंच नव्हे, तर तर तिच्याविषयीं आपल्याला सहानुभूति वाटूं लागते....अशीच कांहींशी भावना आपल्याला आपल्या पत्नीविषयींहि वाटत आली असल्याची जाणीव गुणवंतरावांना झाली आणि मनांतल्या मनांत ते गोंधळले. आपल्या हृदयाची ही चमत्कारिक लकब इतर कुणाच्या यापूर्वींच लक्षांत आली नसेल ना ?

वर्गातल्या मुलांमुलींनीं आपल्या मनाचा हा कमकुवतपणा ओळखला तर नसेल ना? मघांशी तीं कुजबुजत होतीं, गालांतल्या गालांत हंसत होतीं, परत जातांना शीलाकडे आणि आपल्याकडे आळीपाळीनं पहात होतीं, तें कशासाठीं? आपल्याला त्यांनीं ओळखलं आहे असं तर त्यांना दाखवायचं नव्हतं? राजाभाऊंच्या लक्षांत तरी खरा प्रकार कशावरून आला नसेल? तेवढ्यासाठींच तर तो शीला वर्गात येतांच आपल्याला बोलवायला आला नसेल ?....आपल्या पत्नीला तर आपला संशय येत नाहीं? तिच्या चेहेऱ्या-वरील औदासीन्याचा अर्थ काय? ती तर नेहमीं आंत असते. पुढच्या खोलींत काय चालतं हें तिला काय कळणार? पण कुणी सांगावं भिंतीला डोळे असतात आणि वाचा देखील असते. शिवाय आपल्या पत्नीला कुणी सांगायला कशाला हवं? पांच-सात वर्षांच्या सहवासानंतर ती काय आपल्याला ओळखत नाहीं?... पण लोक समजतील तसा प्रकार मुळींच नाहीं. आपल्याला शीलाबद्दल कांहीं....कांहीं वाटत नाहीं. आपण तिच्यावर भाळलों असं जर कोणी समजत असेल तर तें निराधार आहे. तिनं आपल्याला मोह घालावा असं तिच्यांत आहे तरी काय? असेल श्रीमंती, असेल रूप; पण श्रीमंती आणि रूप यांनीं दिपून जाणारे आपण आतां राहिलों नाहीं. तारुण्याच्या पहिल्या प्रहरांत कदाचित् आपण तसे असूं; पण आतां आपल्याला श्रीमंतीच्या सीमा समजल्या आहेत. आतां आपल्याला रूपाचा तळ कळला आहे. तात्कालिक आकर्षणाचं वैय्यर्थ आपण जाणलं आहे. शीलानं आपल्याला मुळींच मोहिनी घातलेली नाहीं. यापुढं आपल्या कलेशिवाय कुणाची वा कशाचीहि मोहिनी आपल्याला भुलवूं शकणार नाहीं. जिथं सामान्यतः लोक घसरतील, तोल सोडतील, तिथं स्थिर रहाण्याचं खंबीर सामर्थ्य आतां आपल्या व्यक्तित्वांत निर्माण झालेलं आहे. या सामर्थ्याविषयीं इतरांना शंका असेल तर असूं दे; आपल्याला त्याविषयीं दृढ विश्वास आहे. प्रश्न एवढाच आहे कीं, सामर्थ्य अंगांत असलं तरी तें सौम्यपणानं वापरायचं कीं आड-दांडपणें? शीला हट्टी, हेकेखोर, दुराग्रही, मनस्वी, गर्विष्ठ असली तरी अजून लहान आहे. तशी ती लहान नसेल, पण आपल्यासारख्या अनुभवी, प्रगल्भ,

विचारी व्यक्तीच्या मानानं ती लहानच आहे. तिला शिक्षा तर करायचीच, पण ती सौम्यपणानं, शांतपणानं करायला हवी. उगीच आक्रस्ताळेपणा करून काय मिळणार आहे? पण शिक्षा करायलाच हवी. तिच्याविषयीं नुसता विचार कुठवर करायचा?....

गुणवंतरावांनीं शीलाकडे रोखून पाहिलं. पण पहाण्यामुळं ती डगमगली नाहीं. तिनंहि त्यांच्याकडे रोखून पाहिलं—इतकं रोखून कीं, दृष्टींतला बोंचकपणा सहन न होऊन गुणवंतरावांनीं आपली मान विरुद्ध दिशेला वळवली. जणूं त्यांनींच कांहींतरी गुन्हा केला होता, जणूं शिक्षा त्यांनाच होणार होती. राजाभाऊ शांतपणें हा चाललेला प्रसंग नुसता बघत होता. त्याला आपली ही मऊ वागणूक बघून काय वाटत असेल? छे: छे! इतकं मऊ असून चालायचं नाहीं. चारजण जिथं जमतात तिथं कांहीं व्यवस्था ठेवायची असली, तिथं कांहीं विशिष्ट वातावरण ठेवायचं असलं, तर चालकाला मधून मधून ताठर व्हावं लागतंच. प्रसंगीं निष्ठूर व्हायची देखील त्याची तयारी हवी. निष्ठुरतेची इथं कांहीं गरज नाहीं म्हणा! सरळ सौम्यपणानं सांगावं आणि प्रकरण निकालांत काढावं, झालं....

त्यांनीं शांतपणें बोलायला सुरुवात केली, "हें पहा शीला, आज तूं फार चूक वागलीस. दुसऱ्या कुणाची मी मुळींच गय केली नसती; पण मी तुला मुद्दाम आणखी एक संधि देत आहें. कधीं कधीं माणसाचं डोकं एकाएकीं फिरतं आणि त्या भरांत त्याच्या हातून भलत्याच गोष्टी घडतात, भलतेच शब्द निघून जातात. मला वाटतं, तसा प्रकार तुझ्या हातून घडला आहे आणि आतां तुला पश्चात्ताप देखील होत असेल. म्हणून माझी अशी सूचना आहे कीं, तूं राजाभाऊंची क्षमा मागावी. झाली घटना विसरण्याची मी त्यांनाहि विनंती करतों. तुम्ही दोघांनीं माझी सूचना ऐकावी. वर्गांत आतां इतर कुणी नाहीं आणि कुणाच्या कानांवर कांहीं जाणार नाहीं अशी मी खात्री देतों."

"मला कुणाची भीति आहे?" शीला फणकारली.

"असं म्हणून कसं चालेल? लोकांचा विचार करावाच लागतो

माणसाला. हें प्रकरण आपण इथंच व्यवस्थितपणें संपवूं. तरुणपणीं चुका होतातच. राजाभाऊची तूं एकदां माफी मागितलीस कीं पुन्हा खेळीमेळीचं वातावरण उत्पन्न होईल. ”

“ राजाभाऊची काय, कुणाचीच मी माफी मागणार नाहीं. तो कोण ? तुम्हांला असेल त्याचा लाड. मी त्याला मुळींच किंमत द्यायला तयार नाहीं. मी तुमच्या वर्गात आल्यें ती तुमच्यासाठीं,या उपऱ्या माणसासाठीं नव्हे! ”

“ शीला, बोलतांना नीट बोलावं ! ”

“ नीट आणि खरंच बोलत्येंय्. उगीच मधें मधें करणारा हा राजाभाऊ कोण भडभुंजा आला ? ”

“ शीला, तोंड संभाळ ! ”

“ आणि नाहीं संभाळलं तर काय करणार तुम्ही ? ”

“ या वर्गातून हांकून काढीन ! तुझ्यासाठीं यापुढं माझ्या वर्गाचा दरवाजा बंद आहे. समजलीस ? ”

“ ही मी चालल्यें. भलत्यासलत्याचं ऐकणारी मी नव्हे. त्याला तर मी शिव्या देत्येंच; पण तुम्हांलाहि खरंखरं ऐकवून जात्यें. तुम्हीहि भ्याड आहांत. मीं तुम्हांला ओळखलं आहे. बोलतां एक, करतां दुसरं· नुसतेच भित्रे नाहीं, तर दांभिक आहांत, फसवे आहांत. ही चालल्यें मी. पण पुन्हां सांगत्यें, तुम्ही भित्रे, दांभिक, फसवे, खोटे आहांत, आणि हा तुमचा राजाभाऊ भडभुंजा आहे. ”

शीला निघून जातांना तिला अडवावं आणि तिची गालफडं फोडून टाकावीं असं गुणवंतरावांना वाटलं; पण ती कल्पना मनांत येतांच ते भेदरले. शीलाच्या कोंवळ्या गालांना जखम करायची ? छेः छेः ! असा विचारहि आपल्या मनांत यायला नको....मग करायचं काय ? नुसतं ऐकून घ्यायचं ? नाहीं नाहीं तें ऐकून घ्यायचं ? भित्रा ? दांभिक? फसवा ? खोटा? आपण कुणाला भितों ? कुणाला फसवलं ? कुणाशीं खोटेपणानं वागलों ? शीलानं आपल्याला शिव्या कां दिल्या ? तिच्या शिव्यांत कांहीं अर्थ आहे का ? तिच्या शिव्या थोड्याश खऱ्या आहेत असं आपल्याला कां वाटूं लागलं आहे ?... आहे, खरं आहे

तिचं म्हणणं. आहोंत, आपण भित्रे आहोंत. आपल्याला भीति वाटते लोकांची आणि स्वतःची. तसं नसतं तर शीलाचा सगळा दिमाख आपण हिसकावून घेतला असता. तिला आपल्या बोटांवर नाचवलं असतं. तिची तयारी होती. आपलं सामर्थ्य होतं. पण आपण भ्यालों. आयुष्यांत जें एकदां केलं तें — तेंच पुन्हा करण्याची शक्यता होती; पण आपण भ्यालों आहोंत, आपण दांभिक आहोंत. श्रीमंतीचा, वैभवाचा, रूपाचा आपल्याला मोह वाटतो; सतत वाटणार आहे आणि सतत आपण तो लपवणार आहोंत. शीलानं तो उघडा पाडला आणि आपल्याला हिणवून ती निघून गेली. नाहीं तर ती गेली म्हणून आपल्याला वाईट कां वाटावं ? खोटेपणा नाहीं तर काय ? आपण जगालाच नव्हे, तर स्वतःलासुद्धां बजावीत असतों कीं, आपलं लक्ष केवळ कलेकडे आहे, आपण शिस्तीच्या बाबतींत दक्ष असतों, ध्येयापुढं आपल्याला व्यक्तीची मातब्बरी वाटत नाहीं....तें सगळं खोटं आहे. विशिष्ट व्यक्तींची आपल्याला भुरळ पडते. नवीन नवीन व्यक्तींची भुरळ आपल्याला पडते. आपण भुलतों आणि भुलवूं शकतों म्हणून मनांतल्या मनांत स्वतःचं कौतुक करतों. स्वतःचं कौतुक, स्वतःचं समाधान, स्वतःचा मोठेपणा, स्वतःचा आराम, स्वतःचा लौकिक, हेंच आपल्याला हवं आहे; पण हें सगळं लोकांना कळायला नको आहे. आपल्याला शीला हवी होती; पण तिला तें कळायला नको होतं. आपल्या आरामासाठीं आपल्याला राजाभाऊहि हवा आहे, पण तें त्याच्या लक्षांत यायला नको आहे. आपल्याला आपली पत्नीहि हवी, पण आपल्या मनाला वाटेल त्याच वेळीं, ही सगळी फसवणूक आपल्याला बिनबोभाट हवी आहे. शीलानं बोभाटा केला. आपल्याला ओळखलं, आपल्याला उघडं पाडलं....

" माझ्यामुळेंच हा प्रसंग घडला. मी दोषी आहे. मी आपली क्षमा मागतों. " इतका वेळ स्तब्ध असलेला राजाभाऊ म्हणाला.

" छेः छेः ! झालं तें ठीक झालं ! त्यांत तुम्हांला किंवा मला कां वाईट वाटावं ? तुमचा दोष नाहीं."

गुणवंतरावांना झाला प्रकार आंतून अस्वस्थ करीत होता. राजाभाऊच्या-

मुळंच हा प्रसंग घडला अशी शंका त्यांच्या मनांत स्थिर होत होती. मात्र स्पष्ट बोलून दाखवण्याची त्यांची तयारी नव्हती. त्यांना तशी संवय नव्हती....

नवीर्न वर्गाचीं मुलं यायची वेळ झाली होती. राजाभाऊचं वर्गात नीट लक्ष लागणार नव्हतं; गुणवंतरावांचंहि लागणार नव्हतं. राजाभाऊनं तें ओळखलं आणि सुचवलं, "यापुढचे वर्ग आज बंद ठेवावे असं मला वाटतं. आपलं लक्ष लागणार नाहीं."

गुणवंरावांनीं उत्तर दिलं, "छेः छेः! लक्ष न लागायला काय झालं? तसं कांहींच घडलं नाहीं. आपलं काम ठरल्याप्रमाणं चालायलाच हवं. आपण कलावंत माणसं.—आपल्या कामापासून आपण हलतां कामा नये. पुढल्या तासासाठीं वाद्यं लावायचीं असतील तर करूं या तें आपण. मी आत्ता आलों. पाणी पिऊन येतों."

आंतल्या खोलींत ते पाणी पीत असतां त्यांच्या पत्नीनं विचारलं, "काय झालं?"

"काय व्हायचं? वर्ग चालू आहेत. दुसरं काय होणार?"

पाणी पिऊन गुणवंतराव वर्गांत आले आणि कांहींच झालं नाहीं अशी स्वतःची समजूत घालीत कामाला लागले.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [स्थलांतर]
अनुक्रम 84092 दि: 17.8.95
क्रमांक 9 [illegible] नों. दि. 23/6/80

# दोघांनीं लिहिलेली गोष्ट

७

पुष्कळ दिवसांत मीं कांहीं लिहिलं नव्हतं. मधून मधून चुकल्याचुकल्यासारखं वाटे. क्वचित् थोडीशी खंत वाटे. कधीं वाटे आपण कांहीं दिवस लिहिलं नसलं तरी अनुभवलं पुष्कळ. अनुभवापेक्षां कांहीं लिहिणं मोठं नाहीं. कधीं वाटे, आपण आपल्या आळसाचें उगीच समर्थन करीत आहोंत. तूं जेव्हां मला विचारसरंल, " पुन्हा लिहायला केव्हां सुरुवात करणार ? " तेव्हां तेव्हां, मी म्हणालों, " आज उद्यांत डोक्यांत कल्पनांचं पीक उभं झालं आहे. तें काढायला सुरुवात करतोंच इतक्यांत ! " कांहीं दिवस तूं वाट बघितलीस अन् त्या दिवशीं झोंपायच्या वेळेला माझ्या उशाशीं पेन व कोरीं पानं आणून ठेवलीस. झोंपायच्या पूर्वीं लिहायला सुरुवात करायची, थोडा वेळ लिहून झोंपीं जायचं, झोपेंतून मध्येंच उठून पुनः लिहूं लागायचं या माझ्या जुन्या संवयीची तूं किती आतुरतेनं वाट पहात होतीस. माझ्या शेजारच्या पलंगावर तूं झोपली होतीस. पण माझी खात्री आहे कीं, तुला झोंप आली नसेल. माझ्या उशाशीं ठेवलेल्या सामानाचा उपयोग मी करतों कीं नाहीं हें तूं डोळे किलकिले करून पुष्कळदां पाह्यलं असशील. कदाचित् तुला झोंप आलीच असेल तर तुला स्वप्न पडलं असेल कीं, मी लिहायला परत सुरुवात केली आहे. शब्दांच्या सरींवर सरी माझ्या पुढ्यांतल्या कागदावर पडत आहेत आणि अर्थाच्या वर्षावानं

माझं साहित्य ओलंचिंब झालं आहे. खरोखरच त्या दिवशीं लिहायला बसायचा माझा विचार होता. कोरीं पानं मीं पुढ्यांतल्या उशीवर ठेवलीं आणि लिहायला म्हणून मी ओणवा झालों. तोंच माझं लक्ष खिडकींतून बाहेर गेलं. ढगांच्या गाद्यांवर कलंडलेल्या चंद्राकडे पाहतांच मी बेभान झालों आणि मीं तुला हलवून उठवलं. तुला मीं म्हटलं, " अग झोपल्येस काय ? चंद्र तर बघ ! " कड बदलवीत तूं म्हणालीस, " मला झोपूं द्या. मला बरं नाहीं. " मी कसचा तुला झोपूं देतों ? तुला गुदगुल्या करीत मी म्हटलं, " अग तुला बरं नाहीं, म्हणून तर चंद्र पहा म्हणतों मी. चंद्राला औषधिपति म्हणतात तें उगीच नव्हे ! मी दाखवलेला चंद्र बघ तर एकदा ! चटकन् बरं वाटेल तुला, आणि मी तुला चंद्र दाखवला. खोलींतला दिवा बंद करून आपण दोघांनीं सुस्त लोळत पडलेला तो चंद्र पाह्यला. तूं मला विचारलंस, " आतां लिहिणारना तुम्ही ? " एव्हाना आकाशांतला ढगांचा बिछाना चुरगळला गेला आणि चंद्र दुलईआड लपला. लपलेल्या चंद्राला शोधतां शोधतां मी तुला सांगितलं, " आतां कसलं लिहिणं ? अग लिहिण्यापेक्षां असल्या जगण्यांत अनंतपट आनंद आहे. " तूं सुखाच्या सुस्तींत कांहीं बोलली नाहींस. पण तुला बरं वाटत असल्याची माझी खात्री झाली. लिहिण्याचा माझा बेत उधळून लावणाऱ्या त्या खट्याळ चंद्राला धन्यवाद देत मी झोपेच्या स्वाधीन झालों.

गोड झोंपेला वाईट स्वप्नाचा शाप मिळावा तसा त्या मोहक रात्रीनंतरचा दिवस उजाडला. रोजच्यासारखी तूं मला चहाचा कप हातांत घेऊन उठवायला आली नाहींस. शेवटीं माझी झोंप स्वतःलाच कंटाळली. आळोखे-पिळोखे देत मी उठलों. तूं आपल्या अंथरुणावर सुस्त पडली होतीस. मला आश्चर्य वाटलं; शंका वाटली. तुझ्या अंगाला हात लावला तों माझं अंग भीतीनं थरथरूं लागलं. तुला भयंकर ताप भरला होता. त्या तापांत देखील माझ्या जेवणाची व्यवस्था कशी करायची तें सांगायला तूं विसरली नाहींस. मला भडभडून आलें. मला स्वतःची शरम वाटूं लागली. आयुष्यांत पहिल्यांदाच चंद्र पाह्यल्याप्रमाणें मी मूर्खासारखा वागलों.

माझा मूर्खपणा तुला भोंवला. स्वतःच्या मूर्खपणाला कोणतं शासन द्यावं तें मला कळेना. तापानं कण्हत तूं म्हणालीस, “ काळजी करूं नका. स्वस्थ मनानं तुम्ही आज लिहायला सुरुवात करा बरं ! ” स्वस्थ मन ? माझं मन कसं स्वस्थ राहील ? तुझी समजूत घालण्यासाठीं मी म्हणालों, “ हो आज करतोंच सुरुवात. ” त्या दिवशीं कागदावर कांहीं तरी चिताडण्याचा प्रयत्न मीं केला. पण मला माहिती होतं कीं तें सोंग होतं. माझ्या मनांतला भीतीचा कल्लोळ लपविण्यासाठीं केलेलं तें लिहिण्याचं सोंग वठणार नव्हतं. पण तुझ्या समजुतीसाठीं मी कांहीं तरी कागदावर रेखाटीत होतों. पण लिहून लिहून मी लिहिणार तरी काय ? माझ्या अविवेकाची जाणीव असं रौद्र रूप दाखवूं लागली कीं तिच्या धाकानं मनांतली सगळीं कथानकं, कल्पना, शब्दकला दडी मारून बसली. वरचा बर्फाचा थर वितळल्याशिवाय आंत दबलेला फुलोरा कसा प्रकट होणार ? माझं लेखन फुलारून यायला एकच उपाय होता— तुझा तांप उतरून तुझी प्रकृति पूर्ववत् निकोप होणं. तुझ्या टवटवीत चेहऱ्याकडे पाहूनच माझ्या लिखाणाला बहर येणार होता. तोंपर्यंत मनावर आलेला अपराधाचा भार सहन करणं, सहन करण्याचा प्रयत्न करणं, स्वतःला दोष देणं, दैवाची आण भाकणं आणि हें सगळं तुला दिसून तुझी प्रकृति आणखी बिघडूं नये म्हणून काळजी घेणं; लिहिण्याचं सोंग करणं; एवढंच माझ्या हातीं होतं. “ डॉक्टर, काळजीचं तर कारण नाहीं ? ” हा प्रश्न मी किती आर्ततेनं विचारला तें माझं मला माहीत. माझ्या आर्ततेची डॉक्टरांनासुद्धां त्या साध्या नेहमींच्या प्रश्नावरून कशी कल्पना येणार ? एखाद्या भीतीची वा व्यथेची धार स्वतःला जाणवावी पण इतरांना सांगतां येऊं नये यापेक्षां अधिक असहायता कोणती ? लेखकानं असं असहाय व्हावं म्हणजे त्याचा संपूर्ण पराभव—अत्यंत असह्य पराभव. डॉक्टर नुसतं म्हणाले, “ नाहीं तसं कांहीं म्हणतां येत नाहीं. दोन-तीन दिवस बघायला हवं. ” दोन-तीन दिवस. मला तर पळं देखील सहन होत नव्हती. त्या तीन दिवसांत माझी काय अवस्था झाली हें मलाच माहीत. दुपारीं माझ्या कामांत माझं लक्ष लागत नव्हतं; कुणाच्या सहवासांत रस

वाटत नव्हता; कशांतच कांहीं राम वाटत नव्हता. तीन दिवसांनंतर डॉक्टरांनीं निदान केलं. ते निदान ऐकून होता नव्हता तोहि धीर सुटला. विषमाचं तें निदान ऐकतांच बसलेला धक्का मीं कसा सहन केला कोण जाणे ! तूं अगदीं निपचित पडून असायचीस. डॉक्टरांनीं सांगितलं, " शुश्रूषा उत्तम व्हायला हवी, मग काळजीचं कारण नाहीं. " माझ्या काळजीचा अदमास त्यांना कसा येणार ? ते म्हणाले, " कांहीं दिवसासांठीं एखादी परिचारिका असल्यास उत्तम. अर्थात् खर्च येईल. " खर्चाची मला पर्वा नव्हती. तुझ्यासाठीं काय वाटेल तो खर्च मीं केला असता. पण पैसे देऊन कदापि मिळणार नाहीं ती सगळी सेवा मीं तुला वहायचा निश्चय केला. माझ्या हातून घडलेल्या अपराधाचं, मोहाचं प्रायश्चित्त घ्यायचा एकच उपाय मला दिसत होता– सेवेचा.

त्या दिवसांत तुझ्या शुश्रूषेसाठीं मीं काय केलं त्याचा उच्चार कशाला करायचा ? उजव्या हातानं डाव्या हातासाठीं कांहीं केलं तर त्याविषयीं बोलायचं का असतं ? पण मी बोललों नाहीं तरी ज्यांना दिसलं ते बोललेच. त्यांच्या बोलण्यामुळें मला बरं वाटलं आणि तेवढाच धीर आला. तुझ्या समाचाराला आलेल्यांपैकीं एक स्नेही मला काय म्हणाला ठाऊक आहे ? तुला कसं ठाऊक असणार ? तापानं तूं टिपसी पडून असतांना तुला कसं कळणार ? लेखकाशीं बोलायचं म्हणजे चमत्कृतीनं भरलेल्या शब्दांत बोलायला हवं अशी त्या बिचाऱ्याची समजूत होती. तुझ्या शुश्रूषेंत मी सगळं कांहीं विसरल्याचं बघून तो म्हणाला, " दाईची रीत आणि आईची प्रीत या दोन्ही गुणांचा तुमच्या वागण्यांत संगम झाला आहे. " त्याच्या बोलण्याची पद्धत कृत्रिम होती यांत शंकाच नाहीं. पण त्याच्या म्हणण्यांत सत्य होतंच. ऐकायला चमत्कारिक वाटलं तरी तें खरं होतं. आईनं निर्व्याज प्रेमापोटीं मुलाला जपावं, अगदीं त्याच प्रेमानं मी सगळं कांहीं करीत होतों. निर्व्याज प्रेम. त्यांत अपेक्षा नव्हती; मला कधींमधीं उलथून टाकणाऱ्या मोहाचा त्या प्रेमाला वासमुद्धां नव्हता. अर्थात् मीं जें जें कांहीं केलं, सोसलं तें आनंदानंच. तुझ्या त्या तापामुळें माझं मन काळोखलं होतंच. त्या काळोखांत, त्यांतल्या त्यांत सुखाचा किरण एकच–मला जेवढं शक्य

होतं तेवढं मी तुझ्यासाठीं करीत असल्याचा आनंद. तुझ्यासाठीं असं तरी मीं कां म्हणावं ! तुझं माझं असा भेद उरलाच नव्हता. अनेक माणसं समाचाराला येत पण त्या सगळ्या गर्दींत मला एकटेपणाची जाणीव बोचे, तूं अंथरुणावर असहायपणें पडून होतीस म्हणून. समाचाराला आलेल्या अनेकांच्या सहवासाची शून्यता मनाला पटे आणि आपल्या दोघांच्या दृष्टीनं संसार, जग म्हणजे केवळ आपण दोघंच अशी साद मनाला ऐकूं येई. ती साद ऐकतांना मी सगळा त्रास विसरत असे. त्रास जणूं होत नव्हताच. तुझ्या उशाशीं बसून कधीं औषधं दे, कधीं पाणी दे, कधीं थंड पाण्याच्या घड्या तुझ्या कपाळावर ठेव, कधीं तुझ्या कोमेजलेल्या चेहऱ्याकडे बघत मनांतले कढ दावून ठेव असं कांहीं ना कांहीं करीत असतांना मी असा वागत होतों कीं, मला कुठलाच त्रास होत नव्हता. सुरुवातीला तुझ्या समाधानासाठीं मी कांहीं तरी लिहिण्याचा प्रयत्न करीत होतों. मी लिहायला बसलेला पाहून तुझ्या शुष्क ओठांवर स्मिताच्या खुणा उमटत. पण पुढे पुढे माझ्याकडे बघायचं, कौतुकानं स्मित करायचं बळहि तुझ्या थकलेल्या देहांत राह्यलं नाहीं. मी लिहीत आहें हें तुला पाहतां येत नव्हतं. तेव्हां लिहिण्याच्या प्रप्रंचांत मला तरी कुठली गोडी वाटणार ? हाताशीं घेतलेले कागद बाजूला सारून मीं त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. हृदय पिळवटून काढणाऱ्या एकेका क्षणापुढें त्या शब्दांच्या भाष्याला कसली किंमत ? मी बाजूला सारलेल्या माझ्या त्या अपुऱ्या लिखाणाकडे समाचाराला आलेल्या एकाचं लक्ष गेलं आणि तो म्हणाला, " इतकं सगळं न त्रासतां करायचं आणि वर लिहिण्यासाठीं मन शांत ठेवायचं म्हणजे किती तपश्चर्येचं काम असलं पाहिजे नाहीं ! मी त्याला काय उत्तर देणार ? तुझ्यासाठीं लिहिण्याचीच काय पण इतर कोणतीहि तपश्चर्या मी करायला तयार होतों–कुणाच्या कौतुकाची अपेक्षा न करतां. अपेक्षा एकच होती; तूं लवकर लवकर बरी व्हावीस एवढी–एवढीच; पण तेवढीच अपेक्षा होती असं कसं म्हणायचं ? आणखी एक इच्छा मनांत होती. कुठल्याहि कष्टाला न लेखणारं, मोहापलीकडचं केवढं अपरंपार प्रेम आपल्या आयुष्यांत आहे हें दाखविण्याची अतिशय इच्छा

होती. त्या इच्छेसाठीं मी पडतील ते कष्ट झेलायला तयार होतों. तुझ्या त्या भयंकर तापाला! माझीच चूक कारण झाली ही भावना मनांतून काढायचा तोच एक मार्ग मला दिसत होता. प्रेमाच्या वाटचालींत मोह हा एक अपघात होता हें तुला पटलं तरच डाचणारी भावना माझ्या मनांतून निघणार होती. तेवढ्यासाठीं तुझ्या तापांत अहोरात्र झिजण्याचा निश्चय मी केला होता. त्या दिवसांत मी जेवण विसरलों, काम विसरलों, झोंप विसरलों, सगळं कांहीं विसरलों. तुझ्या प्रकृतिपलीकडे दुसरं मला दिसतच नव्हतं. "तुम्ही स्वतःच्या प्रकृतीची देखील काळजी घ्यायला हवी. झोंपेकडे दुर्लक्ष करूं नका," असं मला सांगायचा धीर तरी इतरांना कसा झाला? काळाशीं तुझी झुंज चालू असतां मी माझ्या प्रकृतीचा क्षुद्र विचार कसा करणार? तापाचा दुष्टावा वाढतच होता. बारा दिवस झाले तरी तुझ्या तापाला उतार नव्हता. तुझी शुद्ध मधून मधून जात होती. तापांत तूं मध्येंच बरळूं लागलीस कीं, माझ्या हृदयाचे ठोके बंद झाल्यासारखं वाटे. अशा वेळीं मला झोंपेकडे लक्ष द्यायला सल्ला देणाऱ्यांच्या शहाणपणाविषयीं काय म्हणावं? तेराव्या दिवशीं तर तुझी शुद्ध वारंवार जाऊं लागली. तापांत त्या दिवशीं कितीदां तरी बरळलीस; कधीं स्पष्ट तर कधीं अस्पष्ट. एकदां तूं म्हणालीस, "आपल्या दोघांचं लिहा गडे. मी लिहूं का?" मला भडभडून आलं. तुझी इच्छा पूर्ण करायचं कर्तव्य पार पाडायलाच हवं म्हणून मी लिहायला बसलों. हादरलेल्या मनःस्थितींत मी कसलं लेखन करूं शकणार? घाबरून मी डॉक्टरांना बोलावणं पाठवलं. त्यांनीं तुझी प्रकृति पाहून थंडपणें उत्तर दिलं, "तुम्हीं व्यवस्थित शुश्रूषा केली आहे. हे दोन दिवस जपायला हवं. ताप वाढल्यामुळें रोगी बरळूं लागतो. पण तसं काळजीचं कारण नाहीं," डॉक्टरांच्या थंड वृत्तीचा मला राग आला. पण रागावून उपयोग काय? म्हणे तसं काळजीचं कारण नाहीं. तसं म्हणजे कसं? म्हणे मी उत्तम शुश्रूषा केली. त्याचं प्रशस्तिपत्र मिळावं म्हणून कांहीं आसुसलेला नव्हतों.

त्या दिवशीं रात्री केव्हां तरी चुकून माझा डोळा लागला. फार वेळ मी झोपलों नसेन. पण त्या थोड्या वेळांत मी झोपेमध्यें जें पाहिलं, जें

अनुभवलं तें काय थोडं होतं ? मी काय पाह्यलं तें कसं सांगूं ? पण लपवायचं तरी कशाला ? स्वतःला स्वतःपासून कांहीं मी लपवूं शकत नव्हतों.

मी पाह्यलं—नको तें पाह्यलं. जें घडूं नये म्हणून जिवाची पराकाष्ठा केली तें घडलं होतं. तेरा दिवसांची आपली काळाशीं चाललेली झुंज अयशस्वी झाली होती. मी हरलों होतों. एकटा होतों. या जगांत तूं नव्हतीस; मी एकटाच होतों. तें भयंकर स्वप्न पडतांच मी खडबडून जागा कसा झालों नाहीं ? तें स्वप्न मी रेंगाळू कसं दिलं ? कधीं कधीं एखादं स्वप्न पडलं कीं तें स्वप्न आहे असं कांहांसं अंधुकसं कळून आपण तें स्वप्न रेंगाळूं देतों किंवा तोडून टाकतों. कांहीं क्षण कळत नाहीं कीं तें स्वप्न कीं वास्तव ? तें भयंकर स्वप्न मी तोडून काढायला हवं होतं. तें मी केलं नाहीं. मी त्यापुढं गेलों—स्वतःची शरम कशी लपवूं ? मी तें स्वप्न रंगूं दिलं. मी त्या स्वप्नांत रंगलों.

मी एकटा नव्हतों. माझं घर विस्कटलं नव्हतं माझा संसार जसा पूर्वीं होता तसाच चालू होता. फक्त त्यांत तूं नव्हतीस, बाकी सगळं व्यवस्थित चाललं होतं. त्या व्यवस्थित संसारावर मी खूष होतों; माझी बायको खूष होती. एकमेकांना प्रसन्न करण्यासाठीं, एकमेकांच्या बारीकसारीक लहरी सांभाळण्यासाठीं आम्ही झटत होतो. ती जें जें म्हणेल तें तें मी आनंदानं करीत होतों. जें हरवलं त्याचा विषाद नव्हता. जें सापडलं त्यांतच धन्यता वाटत होती. स्वप्नांतल्या माझ्या बायकोची प्रत्येक इच्छा पूर्ण करायला झटत होतों. कुत्र्यानं धन्यापुढें शेपटी हलवावी तसा मी सारखा तिच्याभोंवतीं घोटाळत होतों आणि तिची इच्छा झेलण्यांत स्वतःला कृतकृत्य समजत होतों. दिवाणखान्यांत लावलेला आपल्या दोघांचा फोटो तिनं पाह्यला; पण सुरवातीला ती कांहीं बोलली नाहीं. त्या जुन्या फोटोशेजारींच आम्हां दोघांचा नवा फोटो आला. इथपर्यंतची माझी वागणूक पुष्कळांना समजूं शकेल, पण त्यापलीकडे माझ्या हातून घडलेल्या वर्तनाचा जाब कसा द्यायचा ? त्या वर्तनाचा एकच अर्थ—माझा मोहप्रवण स्वभाव. माझ्या नव्या बायकोनं आपला जुना फोटो काढून टाकायला मला सांगितलं. तिनं असं कां सांगावं ? पण तिनं एक सांगितलं असेल, पण मीं कां ऐकावं ? माझ्या

भूतकाळाशीं मीं बेइमान कां व्हवं ? पण मी तुझ्याशीं बेइमान झालों. तुला मी पार विसरलों. केवळ मी माझ्या दुर्बल मोहाला तेवढा विसरलों नाहीं. तो फोटो मी तिथून काढला आणि कोठीघरांतल्या रद्दींत टाकून दिला. तिची इच्छा पूर्ण झाल्यामुळें माझी बायको हंसली आणि खरं सांगूं, तिच्या हास्याला मीहि हास्यानंच प्रतिसाद दिली.

त्या स्वप्नाच्या रात्रीच तुझा ताप उतारीला लागला. दुसऱ्या दिवसापर्यंत ताप पूर्णपणें उतरला. डॉक्टर म्हणाले, " आज ताप उतरण्याचा दिवस होताच. आतां आणखी कांहीं दिवस शुश्रूषा करायची. पण त्याची काळजी नाहीं. ताप हरला. तुमची शुश्रूषा यशस्वी झाली. हा माझ्या ओषधांचा विजय नसून तुमच्या शुश्रूषेचा आहे. " त्या वेळीं तुझा क्षीण चेहरा फुलला आणि तूं माझ्याकडे अभिमानानं पाह्यलंस. त्या अभिमानाला मी किती अपात्र आहे हें तुला काय ठाऊक ?

आपला रोगी सुधारायला लागल्याचं पाहून डॉक्टर फारच खुशींत आले होते. थोडंसं बोलून त्यांचं समाधान होणार नव्हतं. " खरं सांगतों तुम्हांला. धंद्यामुळें मी पुष्कळ जोडप्यांना जवळून बघितलं आहे. पण तुमच्यासारखा प्रेमळ, वाटेल ती झीज सहन करणारा साथीदार मिळण्याचं भाग्य फार थोडया मुलींना लाभलं आहे. " डॉक्टरांचे ते शब्द ऐकतांच तुझे डोळे चमकूं लागले आणि वाळलेली वेल फुलीं फुलून आल्यासारखी तूं सुंदर दिसूं लागलीस. पण तुझ्या चेहऱ्याचं निष्पाप सौंदर्य माझ्याच्यानें पाहवेना. डॉक्टरांची ती व्यर्थ बडबड मला ऐकवेना. मला वाटलं कीं त्यांना म्हणावं, " डॉक्टर, झीज सोसण्याच्या माझ्या तयारीची कां उगीचं तारीफ करतां ? तिची आवश्यकता नाहीं. तुम्ही आपलं बिल द्या. तीहि झीज सोसायला मी या क्षणीं तयार आहे. पण कृपा करून मला उगीच अधिक लाजवूं नका."

मी किती वाईट मनुष्य आहे, माझं सगळं चांगुलपण किती वरपांगी आहे हें त्यांना माहीत नाहीं हें तर ठीकच आहे. पण इतक्या जवळून तूं मला बघितलं असूनहि तुला सुद्धा माझ्या वाईटपणाची कल्पना नाहीं. माझं कौतुक करायची तुला वाईट खोड लागलेली आहे. तुला वारंवार बजावून सांगतो, माझ्या गुणांचं कौतुक करणं सोड. ते सगळे गुण

वेगळी आहेत. त्यांच्या आंत माझा खरा स्वभाव दडलेला आहे—मी म्हणजे स्वार्थ; मी म्हणजे मोह.

त्या स्वप्नानं मला चांगलाच उघडा केला आहे. कशासाठीं मीं तुझी अहोरात्र शुश्रूषा केली? कशासाठीं मीं सगळे कष्ट मुकाट्यानं सहन केले? तुझ्यासाठीं कीं माझ्यासाठीं? माझ्या स्वार्थासाठी; माझ्या मोहासाठीं! त्या मोहामुळेंच तुला आजाराची शिक्षा झाली. त्या मोहापायींच मीं तुझ्या जागीं दुसरीची कल्पना केली आणि त्या कल्पनेला पूर्ण शरण गेलों. एका बाजूला सेवेचं, शुश्रूषेचं, कष्टाचं त्यागाचं नाटक करायचं आणि दुसऱ्या बाजूला मोहाचं, स्वार्थाचं स्वप्न भिंतक्या मारीत बघायचं. तुला या विसंगतीची चीड यायला हवी. मी खरा कसा आहें हें तुला कळायला हवं. तें तुला स्पष्ट स्पष्ट सांगायची हिम्मत मला होत नाहीं— कां कोण जाणें; पण कधीं तरी तुझ्या हातीं हे कागद पडतीलच आणि नाहीं पडले तरी तूं सावधपणानं, चौकसपणानं, मला न्याहाळलंस तर तुला माझं खरं स्वरूप कळेलच.

बरी झाल्यावर मी तुम्हांला विचारलं, ‘ माझ्या आजारांत तुम्ही कांहीं लिहिलं काय ? ’ तुम्ही म्हणालांत ‘ नाहीं. ’ पण आजाराच्या सुरुवातीला तुम्ही कांहीं तरी लिहीत असल्याचं मला नव्हतं का दिसलं? कशाला तुम्ही ते कागद आलमारींत दडवून ठेवले? स्वतःच्या मनापासून तुम्ही जें लपवलं नाहीं तें का कुठं आलमारींत लपूं शकणार आहे? तापामध्यें मी काय बरळत होत्यें हें मला कसं आठवणार ? “ आपल्या दोघांचं लिहा गडे ! मी लिहूं का ? ” असं बडबडल्यें का मी ? असेल, बडबडलें असेन, पण मी ती बडबड आतां खरी करणार आहे. मला तुमच्यासारखं लिहितां येत नाहीं. पण तुमच्याविषयीं तुम्ही जें लिहिलं ना तें मी पूर्ण करणार आहें. खरं सांगूं?— रागावूं नका— तुम्ही लिहिलेलं सगळं वाचून मला काय वाटलं तें सांगूं? मला फारसं कांहीं कळत नाहीं. लिहितां तर येत नाहींच. पण तुम्हांला मी ओळखल्यें, तुम्हांला सांगूं तुम्ही कोण आहांत, कसें आहांत ? तुम्ही किनई वेडे आहांत— वेडे !

★ ★ ★

# प्रवास

अनुक्रम ३५०९९
विभाग
क्रमांक
नों. दि. २७/५/६७

८

मुंबईहून सुटणाऱ्या कलकत्ता-मेल मध्यें चांगली ऐसपैस जागा मिळवायची म्हणजे वेळेपूर्वी निदान अर्धा-पाऊण तास स्टेशनवर जायला हवं, हें आयुष्यांत मुंबईची विसावी खेप करणाऱ्या वसनजीभाईंना अर्थातच ठाऊक होतं. केवळ चार आणे जादा देऊन तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत जागा राखून घ्यायचं व केवळ एक तास अगोदर येऊन बिस्तरा पसरून एक सबंधच्या सबंध बांक अडवायचं लोकप्रिय कोष्टक वसनजी-भाईंनाहि माहित होतं. पण काळबादेवींतील त्यांचा व्यवहार उशीरां संपल्यामुळें ते जेव्हां बोरीबंदरच्या अकरा नंबरच्या प्लॅटफॉर्मवर धापा टाकीत येऊन पोहोचले, तेव्हां तीनशें मैलांपेक्षां अधिक प्रवास करणाऱ्या उतारूंचे डबे भरले होते. डब्यांतल्या गर्दींत उतारू किती व जागा अडविण्यांत त्यांना मदत करणारे त्यांचे आतेष्ट किती हें गाडी हलल्याशिवाय कळणं कठिण होतं.

वसनजीभाई दबत दबत एका डब्यांत शिरले. जागा मिळवण्यासाठीं आंतल्या लोकांशीं हुज्जत घालण्याचा आततायीपणा त्यांनीं केला नाहीं. जरा मऊपणानं घेतलं कीं यश ठेवलेलंच, ही शिकवण त्यांच्या व्यवहारकुशल मनानं आत्मसात् केली होती. शिवाय, सोबत त्यांची धर्मपत्नी असल्यामुळें निदान स्त्रीदाक्षिण्याखातर तरी त्यांना जागा मिळण्याची निश्चिती वाटत

होती. तसेंच झालेंहि. एका बांकावर अंथरूण घालून बसलेल्या एका तरुण जोडप्याशेजारीं ते उकिडवे बसूं लागले, तोंच त्या तरुण जोडप्यानें त्यांना जागा करून दिली. तो तरुण त्यांना म्हणालाच, " नीट बसा ना आपण ! असं करू या, आपण दोघे या कोंपऱ्यावर बसूं. दुसऱ्या टोंकाला बायका बसतील." सगळ्या वस्तू महागल्या असल्या तरी अजून माणुसकी अधून-मधून स्वस्तांत मिळूं शकते हें बघतांच वसनजीभाईंनाहि आनंद झाला.

पण सुखासुखी मिळालेली ती जागा वसनजीभाईंच्या मनांतून लवकरच उतरली. कारण तो तरुण पति आपल्या तरुण पत्नीसाठीं फलाटावर कांहींना कांहीं खाद्यपदार्थ वारंवार आणूं लागला. उंची चॉकोलेट, ओले अंजीर, बदामपुरी, माहीम हलवा, चिकू असे निरनिराळे नग आणण्यासाठीं तो वारंवार उठे व फलाटावर जाई. आणलेले पदार्थ तीं दोघं शेजारच्या लोकांनाहि देत. वसनजीभाईंची पत्नी संकोचून कांहीं खात नाहीं हें बघ-तांच तें तरुण जोडपं तिला आग्रह करूं लागलं. विशेषतः तो तरुण फारच लाघवी होता. त्यामुळें वसनजीभाई अस्वस्थ होऊं लागले. अखेर एकदां तर तो त्यांच्या पत्नीला म्हणाला, " अहो खा कीं, अशा लाजूं नका, जिवाची मुंबई करा ! " त्याचं वाक्य ऐकतांच त्यांची पत्नी खरोखरच लाजेनें चूर झाली आणि लाजत लाजत तिनं चार ओले अंजीर घेतले. ते बांक सोडून समोरच्या बांकावर बसायला मिळालं तर बरं, असा विचार वसनजीभाई करूं लागले.

बोरीबंदरवरून गाडी हलली. फलाट, फेरीवाले, गडबड, गर्दी मागें लागली न लागली तोंच दादर आलें. फिरून उतारू, फेरीवाले, हमाल इत्यादींची झुम्मड सुरू झाली. सुदैवानें वसनजीभाईंच्या डब्यावर उतारूंची फारशी गर्दी झाली नाहीं. फक्त चार माणसं आंत शिरली व तीहि दुसऱ्या बाजूच्या दोन बांकावर बसलेल्या उतारूंत मिसळून गेलीं. त्या दोन बांकांवर नागपूरला लग्नासाठीं जायला निघालेल्या एका सलग कुटुंबाचा ताबा झाला, व नागपूरचा उन्हाळा, तिथलं लग्न, वधूचे नाक-डोळे इत्यादि विषयांत त्या बांकावरील मंडळी रंगून गेली. नवीन आलेल्या

त्या चार जणांमुळें डब्यांतला गोंधळ वाढला, पण आपल्याच माणसांबरोबर दाटीदाटीनं बसण्याच्या त्यांच्या तयारीमुळें दुसऱ्या बाजूला बसलेल्या वसनजीभाई आणि मंडळीच्या जागांवर मात्र टोळधाड आली नाहीं.

दादर गेलं. उपनगरं भरभर जाऊं लागलीं. खारा वारा, गाडीनं सांधे बदलतांना होणारा खडखडाट, विरुद्ध दिशेनें येणाऱ्या लोकलमुळें कानावर आदळणारा आवाजाचा झोत, माशांचा उग्र दर्प, मागें पडूं लागला. लहान लहान स्टेशनांची दखल न घेतां गाडी पुढें निघून जाऊं लागली. ठाणें यायच्या पूर्वींच वसनभाई त्या तरुण जोडप्याच्या बांकावरून उठून समोरच्या खिडकीशेजारच्या बांकावर सपत्नीक स्थानापन्न झाले. तसं करतांना त्या बांकाच्या मालकाची त्यांनीं परवानगी मागितली व ती त्यांना मिळाली. ' मी मूर्तिजापूरला उतरणार आहे, ' या शेटजींच्या प्रस्तावाचा अर्थ त्या बंगाली प्रवाशानं ताबडतोब ओळखला. ' ठीक आहे. मी कलकत्त्याला चाललोंय. छत्तीस तासांच्या प्रवासांत दहा तास झोंप मिळेलच. आपण अनमान न करतां बसा. ' तोंडावर कृतज्ञतेचे भाव आणीत शेटजी खिडकीशेजारच्या बांकावर बसले. त्या बंगाल्यापासून दूर त्याला पाय पसरायला पुरेशी जागा ठेवून शेटजी खिडकींतून येणारा वारा अंगावर घेऊं लागले. त्यांची धर्मपत्नी बांकाच्या कडेला दरवाज्यापाशीं बसली.

वसनजीभाईंच्या या स्थलांतराला त्या तरुणानं मुळींच हरकत घेतली नाहीं. त्याला पुन्हां सबंध बांक मिळालें. ठाण्यानंतरच्या छोट्या बोगद्यांत गाडी शिरतांच तो आपल्या बायकोला चिकटला व तीं पतिपत्नी स्पर्शाच्या गुदगुल्या अनुभवूं लागलीं. मधुचंद्राहून नुकतीच परतल्यासारखीं नवथर उत्साहानं तीं दोघं स्पर्शानं, दृष्टीनं, मृदु वचनानं एकमेकांचं कौतुक करीत होतीं.

समोरच्या बांकावर बसलेली धर्मपत्नी तें युगुल अनिमिष नेत्रांनीं बघत होती. शेटजींचे डोळे अर्धवट मिटलेले दिसत असले तरी तेहि त्या तरुण जोडप्याच्या प्रणयकेली बघण्याचं सौख्य अनुभवीत होते. सिनेमांत बघायला मिळतं तसलं प्रेम वसनजीभाईंना फुकटांत बघायला मिळत होतं.

हिरव्या रंगाची तंत्रोऱ्याच्या गवसणीसारखी निमुळती पँट, बफ् लेदरचे पांढरे शू, अंगावर सळसळ करणारा सिल्कचा सायीच्या रंगाचा बुशशर्ट, मनगटावर सुरेख घड्याळ आणि चेहऱ्यावर यशस्वी प्रेमिकाचा उत्साह, असा त्या तरुणाचा थाट होता... त्याच्या तरुण पत्नीनं मुंबईतल्या ताज्या फॅशनप्रमाणें एका स्वस्तशा पातळावर महागशी कलाकुसर सिंध्याकडून करून घेतली होती. पातळाला शोभेल असा चिकनचा गुळगुळीत ब्लाउज तिनं घातला होता. तिच्या गळ्यांतलं मंगलसूत्र होतं मिन्याचं. तें मंगळसूत्र आहे हें ओळखूं न येण्याइतकं तें सुंदर होतं. तिच्या एका हातांतल्या बांगड्यांचा घड सळसळ करीत होता आणि दुसऱ्या हातावर इवलंसं घड्याळ चमूचम् करीत होतं. मध्येंच सगळ्या बांगड्या कोपऱ्यापर्यंत उतरवून त्या पुन्हां खालीं करतांना होणारी तिची हालचाल व त्याचबरोबर हालणारीं कर्णफुलं तिला खुलून दिसत होतीं.

तीं दोघं कधीं एकमेकांना चिकटत, कधीं एकमेकांच्या कानांत कुजबुजत, थोडंसं बोलून बरंच समजत, कधीं एकमेकांकडे पहात स्मित करीत, कधीं एकमेकांकडे न पाहिल्याचं नाटक करीत, कधीं दोघंहि खिडकीबाहेर झपाट्यानें अंधारांत बुडणाऱ्या टेकड्या आणि क्षितिज बघत आणि बाहेरच्या अनंत अवकाशांत त्यांना न दिसणारें कांहींतरी एकमेकांच्या डोळ्यांत शोधूं लागत. कधीं तीं एकमेकांशीं लटका वादविवाद करीत. "चुकलंच माझं जरा, आणखी लांबवायला हवी होती सुटी." "कांहीं नको. मुंबईला आणखी राहिलो असतो तर उगीचच खर्च वाढला असता. तुम्ही कीं नाहीं गडे, फारच खर्चीक आहांत." "अग खर्च करायलाच हवा. तुम्ही बायका फारच चिक्कू ! चांगले सेकंडमधून गेलों असतों, पण तुझ्या कंजूषपणामुळेंच हा त्रास होतोय बघ !" "कांहीं त्रास नाहीं. कसला आलाय हो त्रास ? चांगली जागा मिळाली." "नसती मिळाली तरी जिथं तूं आहेस तिथं कसला त्रास ? 'ती रेल न ती, नंदनवन तें तेंची,"

"पुरे करा तुमचं कवित्व !" इ. इ.

कसाऱ्याच्या घाटांत चढतां चढतां गाडी बोगद्यांत शिरली तेव्हां बाहेरचा

अंधार आणि डब्यांतला प्रकाश आणि तें जोडपें पाहून वसनजीभाईंना वाटलं कीं, डबा सिनेमाच्या पडद्यासारखा दिसतोय. डब्यांतल्या त्या सिनेमांत आपल्याकडे अगदींच दुय्यम भूमिका असल्याची कल्पना त्यांच्या मनांत येतांच त्यांचं मन हुळहुळूं लागलं, चिरचिरूं लागलं.

लग्नाला निघालेल्या त्या पलीकडच्या बांकावरील वऱ्हाडानं इगतपुरीच्या स्टेशनवर जेवणाचं एक ताट मागवलं व जवळच्या फराळाची जोड देत जेवायला सुरुवात केली. वसनजीभाईंच्या त्या बंगाली शेजाऱ्यानं एका पानांत स्टेशनवरून थोडसं मटन आणि पोळ्या आणल्या. माशांची कढी आणि भात न मिळाल्याची कुरकूर करीत तो हाडूक चघळूं लागला. तें तरुण जोडपं डायनिंग कारमध्यें जाऊन बसलं. जातांना त्यांनीं शेटजीला विनंती केली, " एक-दोन स्टेशनांनंतर आलोंच आम्ही, तोंपर्यंत आमची जागा बघा कृपा करून. " सर्व मंडळी खाण्यापिण्याला लागलेली बघतांच शेटजींच्या धर्मपत्नीनं शेटजींकडे आशाळभूतपणें पाह्यलं. शेटजींनीं तिकडे दुर्लक्ष करीत बराच वेळ स्वतःच्या नाकाच्या शेंड्याकडे बघितलं. पण गाडी सुटायच्या वेळीं पैशाच्या पिशवीचे कसे ढिले करावे त्याप्रमाणें त्यांनीं स्वतःच्या हिशेबी वृत्तीचे बंध सैल केले व खारी बुंदी आणि दहींवडे विकत घेतले. गाडी सुरू झाल्यावर एंजिन भक्भक् करूं लागलं आणि ' कशासाठीं, पोटासाठीं 'च्या तालावर शेटजी सपत्नीक खाऊं लागले.

खातां खातां शेटजी त्या तरुण जोडप्याचा विचार करूं लागले. अशीं हौशी जोडपीं त्यांनीं मुंबईला अनेक बघितलीं होतीं. शरीरावर जास्तींत जास्त वस्त्राच्छादन घालणाऱ्या लोकांपासून तों नाइलाजास्तव केवळ अडचण म्हणून कपडे वापरणाऱ्या लोकांचे चैनी रंगढंग त्यांनीं मुंबईला अनेकदां पाहिले होते. गुजराथी, पारशी, मराठी, पंजाबी, हिंदुस्थानांतल्या व हिंदुस्थानबाहेरच्या अनेक लोकांच्या ख्यालीखुशालीचे नमुने त्यांना मुंबईत दिसले होते. जीव रमवायच्या नाना तऱ्हा, मनांत आणलं असतं तर ते मुंबईत शिकूं शकले असते. मोहाचे, उधळखोरीचे, खुषीचे, विलासाचे, प्रसाधनांचे अनेक प्रकार मुंबईला त्यांना मिळूं शकले असते. विलासाच्या वाटेला लागणारा

पैसाहि त्यांच्याजवळ होता. कदाचित् त्या तरुणाला एका महिन्यांत मिळत नसेल तेवढी त्यांची एका दिवसाची कमाई असेल. पण त्याचा थाट, रुबाब, चैन....आणि आपली राहणी? नाहीं म्हणायला आपल्या गळ्यांत सोन्याची एक सांखळी आहे, पण ती चैन म्हणून नव्हे, परंपरागत प्रतिष्ठेची ती एक खूण आहे. तसाच विचार केला तर आपल्या बायकोच्या कानांत हिऱ्याच्या कुड्या आहेत, पण त्या हिऱ्यांच्या तेजालाहि सर येणार नाहीं अशी त्या तरुण जोडप्याच्या चेहऱ्यावरील सुखासमाधानाची दीप्ति—ती आपल्या नशिबांत नाहींच....गाडी वेगांत चालली होती. वारा अंगाला चाटून जात होता. शेटजींचे विचार धांवत होते....त्या तरुणाला ज्या मुंबईचं दर्शन घडलं ती मोहक, सुंदर, उत्साही आहे; तिच्यामुळें सगळ्या चित्तवृत्तींना फुलोरा येतो; उलट आपल्यावर ज्या मुंबईचा प्रभाव पडला आहे ती रुक्ष, घामट, उदास आहे. त्यानं समुद्रचौपाटीवर मुंबई बघितली असेल आणि आपण वीसदां मुंबई पाहिली ती काळबादेवी-भुलेश्वरच्या गजबजलेल्या बाजारपेठेंत. बाजाराचंच वातावरण आपल्या आयुष्याला लाभायचं होतं तर निदान फोर्टमधलं रंगीबेरंगी बहुढंगी वातावरण आपल्या नशिबीं कां येऊं नये? पण नशिबाला तरी दोष देण्यांत काय अर्थ? वीसदां आपण मुंबईला गेलों आणि कोरडे परतलों. पण फार तर दोनचारदांच मुंबईला जाऊन आलेल्या त्या तरुण जोडप्याचा कसा कायापालट झालाय? आपण मात्र शरीरानं कुठंहि वावरत असलों तरी मनानं मात्र आपल्या मूर्तिजापूरच्या कापसाच्या कोठ्यां-तच अडकलेलें असतों....गाडी जोरजोरांत 'कशासाठीं! पोटासाठीं!' हें कर्कश धृपद गात होती आणि शेटजींची अस्वस्थता वाढत होती.

नाशिकला तें तरुण जोडपं परत डब्यांत येऊन बसलं. आल्याबरोबर ती तरुण पत्नी झोंपीं गेली. तो तरुण बांकाच्या कोपऱ्यावर बसून राहिला. त्या लहानशा बांकावर पाय पसरणं मोठं अवघड होतं; पण तरुणानं तिचे पाय आपल्या मांडीवर हलुवारपणं ठेवले-तेव्हां तिला गाढ झोंप लागली....एव्हांना वसनजीभाईशेजारचा तो बंगाली घोरायला लागला होता. दुसऱ्या बांका-वरच्या त्या कुटुंबानं बांकावर व खालच्या फळ्यांवर अंथरुणं टाकलीं होतीं.

पड[illegible]ल्या तें कुटुंब जोरजोरानें चर्चा करीत होतं. मुंबईच्या लोकांनीं आपल्या मुली नागपूरकडे द्याव्या कीं देऊं नये ? मुंबईतल्या एकेका खोलीच्या राहणींत तयार झालेली ती मंडळी डब्यांतल्या जागेवर एकंदर खूष दिसत होती व खुषींतच जोरजोरानें एकमेकांशीं वाद घालीत होती. नागपूरकडे सुबत्ता आहे तेव्हां तिकडे संबंध अवश्य जोडावे असं एका बाजूचं म्हणणं होतं, तर दुसऱ्या बाजूनं ठाम सांगण्यांत येतं कीं, त्या मागासलेल्या भागाशीं संबंध नको ! या दोन आत्यंतिक मतांच्या मधलं असं एक मत दिसत होतं, कीं, नागपूर–वऱ्हाडकडे मुली द्याव्यात, पण तिकडल्या मात्र करून घेऊं नयेत. याच मताची शेवटीं सरशी होणार असा रंग दिसत होता... वसनजीभाईंचे डोळे पेंगळूं लागले होते, पण झोंपायला पुरेशी जागा नव्हती. त्यांची पत्नी समोरच्या बांकावर नवऱ्याच्या मांडीवर पाय ठेवून झोंपलेल्या त्या तरुणीकडे असूयेनं बघत होती.

त्या तरुणानं मुंबईला घेतलेल्या प्लॅस्टिकच्या झोंकदार डबींतून सिगरेट काढली व शेटजींना दिली. ' नको नको ' म्हणत शेटजींनीं सिगरेट घेतली. तो तरुण त्यांच्याशीं मोकळेपणें बोलूं लागला. शेटजींच्या धंद्याविषयीं, कापसाच्या बाजाराविषयीं, जरीला, कंबोडिया इत्यादि कापसाच्या जातींविषयीं माहिती त्या तरुणानं मोठ्या आस्थेनं विचारली. " कापसाचा सट्टा खेळतां कीं नाहीं तुम्ही ? " असा मिस्किल प्रश्न त्या तरुणानं विचारतांच शेटजींनीं ताबडतोब उत्तर दिलं, " नाहीं. आपला व्यवहार नगदीचा आहे. " वसनजीभाईंनींहि एक मिस्किल प्रतिप्रश्न विचारला, " पगाराशिवाय वरचं उत्पन्न किती मिळतं तुम्हांला ? " त्या तरुणानें मात्र साफ उत्तर दिलं, " बँकेंत वरचं उत्पन्न पुष्कळ मिळूं शकतं, पण मी ज्या कामावर आहें तिथें विशेष वरचं उत्पन्न मिळत नाहीं. एखादे वेळीं तुमच्यासारखा व्यापारी खूष झाला तर मिळतं कांहीं तरी, पण तें क्वचितच. " बोलतां बोलतां वसनजीभाईंनीं विचारलं, " तुम्हीं मुंबईला कशाला गेलां होतां ? " त्या तरुणाचं " सहज " हें उत्तर त्यांना विशेषसं समजलं नाहीं. एक प्रश्न विचारावा कीं विचारूं नये असें करतां करतां शेटजींनीं विचारलाच, " तुमचं लग्न केव्हां झालं ? "

" सात वर्षं झालीं. " या उत्तरावर त्यांचा विश्वासच बसेना. वसनजीभाईच्या लग्नाला देखील इतकीं वर्षं झालीं नव्हतीं, पण एवढ्या थोड्या वेळांत आपण कसे बुरजड आणि नीरस झालों आहोंत आणि हा तरुण आणि त्याची पत्नी कशीं ताजी व टवटवीत आहेत हें त्यांना कळेना. त्यांच्या हिरवेपणाचं वसनजीभाईना कौतुक वाटलं आणि वैषम्यहि.

त्या दोघाचं संभाषण जसं अचानक सुरू झालं तसंच अचानक तें बंद झालं. त्या तरुणाच्या मनांत एक खेळकर कल्पना स्फुरली आणि त्यानं आपल्या बायकोच्या तळव्यांना नखानं गुदगुल्या सुरू केल्या. त्याची पत्नी झोंपेंतच लटक्या रागानें म्हणाली, " नका ना त्रास देऊं. झोंपूं द्या ना मला ! " " मलाहि झोंपायचंय ! " त्या तरुणानं हंसत हंसत बायकोला सांगितलं. " मग झोंपा ना ! " पत्नीची सूचना मिळतांच त्या तरुणानें बायकोच्या मांडीवर डोकं ठेवलं व तो बिनदिक्कत आडवा झाला. दहा मिनिटांत तीं दोघंहि लहान बाळासारखीं गाढ झोंपीं गेलीं.

त्या निद्रित जोडप्याकडे पहात वसनजीभाई स्वतःचा शोध घेऊं लागले. आपण कधीं मुंबईला ' सहज ' गेलों नाहीं. अजून आपले वडील जिवंत असतांना जेव्हां पहिल्यांदा आपण मुंबईला गेलों तेव्हांच काय ती ' सहजवृत्ति ' आपल्यांत थोडीफार होती. ' त्यावेळीं आपल्याबरोबर आलेला आपला समवयस्क मित्र छगन या तरुणापेक्षां कांहीं कमी खुषरंग नव्हता. छगन गुलहौशीपणामुळें वांया गेला, बरबाद झाला, बदमान झाला. छगनच्या मार्गानं आपण गेलों नाहीं हेंच बरं झालं. स्वभावतःच आपण भित्रे असल्यामुळें पापभीरू आणि धर्मभीरू आहोंत हें बरंच आहे. छगनचा वागण्याचा मार्ग धोक्याचा होता....पण या तरुणाच्या वागण्यांत तसा धोका कुठं आहे ? त्याचा मार्ग छगनपेक्षां निराळा आहे, आपल्यापेक्षांहि निराळा आहे आणि आनंदी आहे. त्याला सहज मिळणारं सुख आपल्याला मिळालं नाहीं, मिळणार नाहीं. आपण मुंबईत नाहीं आणखी कुठं नंदनवनांत गेलों तरी ' सहज ' नाहीं जाणार. नंदनवनांतहि आपण व्यापारासाठींच जाऊं का ? इतक्यांदां आपण मुंबईला गेलों, पण बायकोला सहज तिथं कधींच नेलं

नाहीं. ती आजारी नसती आणि डॉक्टरनं सल्ला दिला नसता तर यावेळीं तरी आपण तिला आपल्याबरोबर नेलं असतं का? त्या तरुणाच्या बायको-सारखी आपली बायको प्रफुल्लित दिसत नाहीं. कशी दिसेल? त्या तरुणा-सारखा उत्साह आपल्यांत नाहीं. कसा असेल? 'शेटजी' या बोजड नांवाचं ओझं आपल्यावर असतांना आपण खेळकर राहूं शकूं?

वसनजीभाईंच्या पत्नीच्या मनांतहि असेच कांहीं विचार खेळूं लागले. पण ती स्त्री असल्यामुळें तिच्या पोटांत कोणतीच कांहीं गोष्ट फार वेळ राहूं शकत नव्हती. तिला जें अंतर्यामीं जाणवलं तें तिच्या वागण्यांत प्रकट होऊं लागलं. आतांपर्यंत गाठोड्यासारखी चूपचाप बसलेली ती हालचाल करूं लागली. त्या झोंपी गेलेल्या जोडप्याकडे बघत ती वसनजीभाईंच्या जवळ-अगदीं जवळ सरकली. आपली हनुवटी थेट वसनजीभाईंच्या कानाशीं लावत ती हळूच त्यांना सांगूं लागली, "वारा कसा गार गार आहे, नाहीं? बाहेर बघा, चंद्र उगवूं लागलाय. त्या दोघांचं लग्न होऊन आपल्यापेक्षांहि जास्त वर्षे झालीं आहेत असं मघा तो तरुण म्हणाला. नाहीं का?" वसनजीभाई बोलत नव्हते, पण सगळं ऐकत होते. सगळं त्यांच्या मनांत रुजत होतं.

मनमाड निघून गेलं तरी पलीकडल्या बांकांवरील कुटुंबीयांचीं बोलणीं चालूच होतीं. इतका लांबचा प्रवास करणारी ती मंडळी अजून झोंपत कां नाहीं याचा वसनजीभाई विचार करीत होते. त्यांना स्वतःला झोंपायचं होतं. त्या तरुण जोडप्यासारखं मोकळेपणानं झोपायचं होतं. पण डब्यांतली सगळी मंडळी झोंपल्याशिवाय तें कसं जमणार? कां जमूं नये? तें तरुण जोडपं नाहीं का वाटलं तेव्हां वाटलं तसं झोंपीं गेलं? त्यांत काय वाईट झालं? आपणच एवढा विचार कां करावा? एवढा संकोच कां करावा? एवढी भीति कां धरावी? त्या तरुण जोडप्याला जमतो तसा मोकळेपणा आपल्याला कां साधूं नये? आपणच आपल्या हृदयाला हजार कुलुपं कां लावावीं? लहान मुलांच्या निर्भर हंसण्यांत जो मनमोकळेपणा असतो तो या जोडप्याच्या वागण्यांत आहे; तो आपण आत्मसात कां करूं नये?

वसनजीभाईंनीं दरवाज्याशेजारीं पडलेली मोठी ट्रंक आपल्या बांकाला

भिडवून एक सलग फळी तयार केली व त्यावर चादर पसरीत आपल्या बायकोला म्हटलें, " किती वेळ जागायचं ? जागरण तुझ्या प्रकृतीला मानवत नाहीं. झोंप तूं. मीहि थोडा वेळ डोळे मिटतों. अनायासें दरवाजाहि कुणाला उघडतां येणार नाहीं." त्यांच्या वागण्यांतला बदल त्यांच्या पत्नीनं ओळखला व ती चटकन् आडवी झाली. ती नीट झोंपलेली बघतांच वसनजीभाईनींहि विरुद्ध दिशेनं पाय पसरले. त्या बंगाल्याला आपले पाय लागणार नाहींत ही काळजी घ्यावी लागल्यामुळें त्यांना आपले पाय आंखडून घ्यावे लागले; आपला सारा भार डोक्याकडे फेंकावा लागला. पाय आवरून अळीवळीसारखीं तीं झोंपलीं. गार वारा झोंवल्यामुळेंच शिरशिरी मधून मधून अंगांत भरत होती कीं आणखी कशामुळें तें त्यांना नीट कळेना.

वसनजीभाई आणि त्यांची पत्नी दोघंहि घोरूं लागलीं. पण ही झोंप त्यांना सर्वस्वीं अपरिचित होती. सुषुप्ति आणि जागृति यांच्या मधोमध एका अननुभवित अवस्थेंत तीं दोघं तरंगत होतीं.—मातीच्या घटाचं चूर्ण होऊन सूक्ष्म मृत्कण हवेंत तरंगावे तशीं तीं विरळ अवस्थेंत वावरत होतीं. त्यांच्या कानावरून गेलेला आवाज कुठूनतरी दुरून आल्यासारखा त्यांना वाटत होता. पुष्कळशा गोष्टींचा भास होत होता, पण त्यांचा प्रहार जाणवत नव्हता. अंगाखालचें लांकडी बांक किंवा लोखंडी ट्रंक त्यांना खुपत नव्हती. केवळ त्यावरील चादरीची जाणीव होत होती; व ती जाणीवहि त्या चादरीसारखी विरविरीत आणि मुलायम होती. शेटजींचा हात आपल्या पत्नीच्या गळ्यांतील मोत्यांचा हार चांचपडत होता; पण इतक्या हळुवारपणें कीं जणूं तो त्या मोत्यांवरून न फिरतां नुसता त्यांच्या पाण्यावरून सरकत होता. त्यांची पत्नी मधूनमधून त्यांचं डोकं कुरवाळीत होती. अगदीं हलक्या हातानं, पाण्याच्या लाटांना व लहरींना स्पर्श करावा, पण पाण्याला मात्र धक्का लागूं नये अशा कमालीच्या हलक्या हातानं.

भुसावळ मागें टाकून गाडी वऱ्हाडांत शिरली. वाऱ्याला गुर्मी आणि गरमी चढूं लागली. झोंपेनं आपलं जाळं सर्वत्र पसरवलं; तरी वसनजीभाईंच्या

डब्यांतील तें कुटुंब लग्नाच्या गोष्टी जोरजोरांत करीतच होतं. त्यांचे शब्द वसनजीभाईंच्या कानांवर अस्पष्टपणें पडत होते—आठवणीसारखे अस्पष्ट शब्द. त्या शब्दांची, त्या मंडळीच्या अस्तित्वाची, वसनजीभाईंना पर्वा नव्हती. ज्या मोकळेपणानं तें तरुण जोडपं जागेपणीं एकमेकांच्या सहवासाचा आनंद घेत होतं, त्याच मोकळेपणानं वसनजीभाई आपल्या पत्नीच्या सान्निध्याचं सुख अनुभवीत होते—अर्धवट झोंपेंत, अर्धवट जागृतींत. त्या सुखाचा आरंभ त्यांना माहित होता, आणि त्याला अंत असूं नये असं त्यांच्या मनाला, हृदयाला, शरीराला वाटत होतं....

पण कमलतंतु एखाद्या हिसक्यानं तुटावा, तशी 'मूर्तिजापूर' या स्टेशनवरील आरोळ्यांनीं त्यांची सुखसमाधि भंगली, उंचावरून खालीं धडकन् आदळल्याचं दुःख वसनजीभाईंना व त्यांच्या पत्नीला झालं.

मूर्तिजापूर स्टेशनचा पूल ओलांडून ते बाहेर पडले. "मालक, टांगा?" असा दोन टांगेवाल्यांनीं प्रश्न केला व लगेच त्या टांगेवाल्यांच्या लक्षांत आलं कीं टांगा करणारं हें गिऱ्हाईक नव्हे. वसनजीभाईंना ते चांगलं ओळखत होते. एक पोरगेलासा हमाल पुढं झाला. त्यानं शेटजींचं सामान उचललं व त्यांच्या घराच्या दिशेनें तो चालूं लागला. त्याच्या मागोमाग वसनजीभाई चालूं लागले व त्यांच्या मागें त्यांची पत्नी.

रात्र मादक होती; पण वसनजीभाई आणि त्यांची पत्नी एकमेकांत दहा पावलांचं अंतर राखून घराकडे चालली होतीं. मूर्तिजापूर हें त्यांचं गांव होतं. आपल्या गांवांत वागण्याचे नियम निराळे होते. ते नियम नुकत्याच संपलेल्या प्रवासासारखे गोड नव्हते; अगदीं गद्य आणि रुक्ष असले तरी तेच त्यांच्या जीवनाचे साथी होते, नियंते होते.

चालतां चालतां दोघांनींहि स्टेशनकडे वळून पाह्यलं. दूरवर पुष्पदीपांसारखी डब्यांची रांग वेगांत निघून जात होती. गाडी आपल्या नेहमींच्या प्रवासाला चालली होती....पण तिच्या एका डब्यांत एक नवथर स्वप्न, एक ललित स्मृति ती आज वाहून नेत होती!

* * *

# व्यवहार

१

वामनच्या खोलींत टपालवाल्यानं टाकलेला लिफाफा त्यानं पाहिला आणि पत्त्याचीं अक्षरं पाहून तो विचार करूं लागला. अक्षर त्याच्या वडिलांचं होतं. आपल्या वडिलांनीं तो बंद लिफाफा कां पाठवला असेल तें त्याला कळेना. लिफाफा फोडायचा अन् आंतला मजकूर झरझर नजरेखालून घालायचा कीं त्या पत्रामुळें मनांत आलेल्या सगळ्या शंका शांत झाल्या असत्या. पण तो लिफाफा एकदम फोडायचा विचार त्यानं रेंगाळत ठेवला आणि त्यासंबंधीं तो नुसता विचार करूं लागला. वडिलांच्याकडून लांबलचक पत्राची तो अपेक्षा करीत नसे. वडिलांना वाटलंच तर ते एखादं कार्ड मधून मधून घालीत. न वाचतांच त्या कार्डावरचा मजकूर वामनच्या लक्षांत येई. "प्रकृतीची काळजी घ्यावी. इकडे सर्व ठीक आहे" या मजकुरांत झालाच तर शब्दांचा फरक होई. बाकी सगळं तेंच. तेंहि कार्डापेक्षां दर महिन्याला येणाऱ्या मनिऑर्डरच्या कपट्यावर वाचायचीच त्याला संवय झाली होती. लिहून लिहून त्याचे वडील लिहिणार तरी काय होते! मुलाला अघळपघळ लिहायचे शब्दच संपत चालले होते. मुलगा जसजसा मोठा होत चालला होता तसतशी शब्दांची देवाण-घेवाण कमी होत होती. आतां तर जवळ जवळ अबोला सुरू झाला होता. त्या पितापुत्रांचं भांडण मुळींच नव्हतं. पण मुलगा वयांत आला आहे ही भावना उभयपक्षीं

वाढत होती; आणि लिहिण्या-बोलण्यांतला मोकळेपणा ओसरूं लागला होता. आपल्या दोघांत शत्रुत्व नसलं तरी निदान औपचारिकपणा नक्कीच वाढला आहे; ही जाणीव उभयपक्षीं होती. असं असतां बंद पाकिटांतून आलेलं तें पत्र ?....

आतांच एक महिन्यापूर्वी नाताळच्या सुट्टींत तो भरपूर घरीं राहून आला होता. त्यावेळीं तर त्याला फार तीव्रतेनें जाणवलं होतं कीं, आपल्यांत आणि वडिलांच्यामध्यें एक विचित्र दुरावा उत्पन्न झाला आहे. पितापुत्रांतले सगळे व्यवहार सरळ चालू असतां मध्येंच निर्माण होणाऱ्या कोरडेपणाचा दोष जसा आपल्याकडे नाहीं तसाच तो आपल्या वडिलांच्याकडे नाहीं हें त्याला कळत होतं. ही दुराव्याची भावना काल्पनिक आहे हेंहि त्यानं ओळखलं होतं. पण ती भावना त्यांच्या मनाचा अधिकाधिक कब्जा घेत आहे हा अनुभवहि तो विसरूं शकत नव्हता. ती भावना अशी कांहीं विचित्र होती कीं, आपल्याला वडिलांशीं आणि वडिलांना आपल्याशीं अघळपघळ बोलायचं आहे, लिहायचं आहे हें त्याला तिच्यामुळें पटत नव्हतं. बोलायचं लिहायचं झालंच तर कांहीं तरी खटका उडवणारंच बोललं, लिहिलं गेलं पाहिजे अशी त्याची मनोमन खात्री झाली होती. त्या खटक्याचं कारण त्या नाताळच्या सुटींतच त्याच्या हातून घडलं होतं. जें घडलं होतं तें वडिलांना कळलं तर नसेल ?

त्यानं लिफाफा फोडून मजकूर वाचला आणि त्याची खात्रीच पटली कीं सुट्यांत त्यानं पेरलेल्या गौप्याचा स्फोट झाला असला पाहिजे. वडिलांनीं फारसं लिहिलं नव्हतं. पण थोडंसंच लिहिल्यामुळें त्याच्या मनांतल्या शंका चेतवल्या गेल्या होत्या. “ तुम्ही तावडतोब घरीं निघून यावं. अभ्यासाची सबब सांगूं नये. तावडतोब निघून यावं. प्रत्येक दिवस मोलाचा आहे असं समजून तावडतोब घरीं यावं. ”

या वाक्यांतून काय काय अर्थ निघूं शकत होता त्याला मर्यादा नव्हती. पण वामननं सुट्यांत जें केलं होतं त्याच्याच भोंवतीं पत्रांतले ते शब्द नाचूं लागले आणि तो घाबरला. पण पुन्हा त्याला वाटलं घाबरायचं काय कारण

३५०८८

आहे ! आपण जें केलं तें घाईनें केलं असलं तरी पापाच्या वासनेनं केलं नाहीं ! हें आपल्या हातून घडलं आणि तेंच निमित्त आपल्या वडिलांना पुरेसं वाटलं. जणू आपल्या हातून चूक घडण्याची ते वाटच बघत असल्यासारखे आपल्याकडे पहायचे. आतां त्यांना संधि मिळाली. पण या चुकीसाठीं जर ते आपल्याला छळणार असले तर आपण प्रतिकार करूं. हो, चूकच. ती होईपर्यंत आपल्या लक्षांतच तिचा भयंकरपणा आला नाहीं, पण चूक झाली तरी कधींच सुधारतां येणार नाहीं अशा प्रकारची चूक नव्हे. सुरुयांत शीलाचा आणि आपला संबंध वाढला—इतका वाढला कीं, सगळ्या मर्यादा तट्‌तट् तुटत गेल्या....पण तें करीत असतांना शीलाला फसवण्याचा आपला उद्देश नव्हता. जें केलं त्याची जबाबदारी टाळण्याची इच्छा नव्हती, जें झालं होतं तें लपवून ठेवण्याचा बेत नव्हता. परीक्षेचे दोन महिने संपले कीं सगळं आपण आईला सांगणार होतोंच आणि हेंहि सांगणार होतों कीं मला तिच्याशीं लग्न करायचं आहे. आमचा विवाह निसर्गानं लावून दिला आहेच, आतां त्याच प्रवेशाचा प्रयोग फिरून एकदां निमंत्रित पाहुण्यांच्या-समोर करायला मी तयार आहे. पण मी लग्न करणार तें शीलाशींच. तिच्याशिवाय मी इतर कुणाशीं लग्न केलं तर तो हलकटपणा होईल. आम्ही इतक्या पुढं गेलों आहोंत कीं आतां मागं फिरणं शक्य नाहीं.

आईचा पाठिंबा आपल्याला मिळेलच.आतांपर्यंत तिचीच सावली आपल्याला मिळाली आहे. शीला सुरुयांत आपल्या घरीं येत होती, आपल्याशीं कितीतरी वेळ बोलत बसायची, पुष्कळदां ती आपल्या जवळ असली कीं, घरांत कुणीच नसायचं, आई असली तरी ती मुद्दाम असून नसल्यासारखी दाखवायची. आईला सगळं दिसत होतं. जें चाललं होतं तें तिला संमत नसतं तर तिनं आपल्याला स्पष्ट तसं सांगितलं असतं. तिची सम्मति होतीच—नव्हे प्रोत्साहन होतं, पाठिंबा होता. तो ती आतांहि देईल. द्यायची तिची इच्छा असेल. पण वडिलांच्या पुढं तिचं चालेल कां ? वडिलांच्या पुढं तिला नेहमींच नमावं लागत आलं आहे. त्यांना प्रतिकार करण्याचं धैर्यच तिच्यांत नाहीं. वडिलांना भिऊन जर तिनंहि आपला पाठिंबा आंत ओढून घेतला

तर ? तर मी त्या दोघांनाहि सांगेन, “ दोन भटुरडे आणि चार थेरडे यांच्या साक्षीची माझ्या प्रेमाला जरूर नाहीं ! तुम्हांला त्यांची जरूर असेल तर मला तुमची जरूर नाहीं. हा मी घरांतून चाललों ! चाललों तो कष्टानं नव्हे–अगदीं आनंदानं चाललों–शीलाच्या हातांत हात घालून चाललों. ”

वामन वडिलांच्या पत्राप्रमाणें घरीं यायला निघाला तेव्हां प्रवासांत तो सारखी इच्छा करीत होता कीं आपल्या कल्पनेपुढें येणारा अटीतटींचा प्रसंग कदाचित् उत्पन्नच होणार नाहीं. आईचा आपल्याला आधार आहे; वडीलहि कदाचित् समजुतदारपणा दाखवतील. तसा समजुतदारपणा त्यांनीं दाखवला तर आपणहि आपली चूक कबूल करूं–बोलून नव्हे. पण बोलायची आवश्यकताच उरणार नाहीं. माझ्या आणि शीलाच्या चेहऱ्याकडे पाहून त्यांना पटायला हवं कीं गोष्टी ज्या वेगानें घडल्या त्या वेगावर आमचा ताबा राहणं शक्य नव्हतं. शीलाची आठवण येतांच त्याला ती पहिल्यांदा त्याच्या खोलींत शिरली तेव्हांचा तिचा चेहरा आठवला. एखाद्या चिमणीनं घरटं बांधायला एखाद्या खोलींत भुरकन् यावं तशी ती आली. आपण तिला येऊं दिलं आणि तिनं आपल्या हृदयांत घरटं बांधलं. आपल्या संमतीनं सहकार्यानं बांधलं; जग पाहत असतां तें पाहत नाहीं अशा बेभान वृत्तीनं बांधलं. आतां तें घरटं उस्कटून टाकण्याचा प्रयत्न कुणी केला तर–मग ते आपले वडील असले तरी–आपण तुटून पडणार. तुटून पडायलाच हवं. तिनं मागेंपुढें पाहिलं नाहीं. तिच्याबरोबर आपणहि मागेंपुढें बघितलं नाहीं. आतां भिऊन कसं चालेल ? या भीतींत आपल्याला कमीपणा आहे आणि शीलाला यातना आहेत. नाहीं, त्या यातना तिला होऊं द्यावयाच्या नाहींत.

जिनं सुखाची रांगोळी घालून स्वतःला खूष केलं आणि आपल्या आयुष्याला शोभा आणली तिला अंतर द्यायचं ? कशासाठीं ? वडिलांच्या हट्टासाठीं ? आईच्या पडखाऊ स्वभावासाठीं ? आतां आई–वडिलांची पर्वा नको; आईची देखील नको. शीलाच्या सहवासांत आपल्याला नाहीं का वाटलं कीं आईचं आपल्यावर कितीहि प्रेम असलं तरी तें प्रेम आपल्याला पुरं पडत नाहीं ? ’ आपल्याला नाहीं का वाटलं कीं आईला आपलं कितीहि

कौतुक असलं तरी त्या कौतुकांत शीलाची उत्कटता नाहीं ? आईला आपण नाजूक खेळणं वाटतों —असं खेळणं कीं, जें जपलं पाहिजे. शीलाला आपण दैवत वाटतो —असं दैवत कीं जें जीवाभावानं पुजलं पाहिजे. तिनं आपल्याला पुजलं, आपण जें कांहीं केलं तें पूजेच्या, भक्तीच्या, आनंदाच्या पातळीवरून. त्या उंचीवरून कुणी आपल्याला ओढून काढलं तर आपण प्रतिकार करूं पण प्रतिकाराचा प्रश्न न निघाला तर बरं. आतांपर्यंतचं आयुष्य कसं कौतुकांत, प्रेमांत गेलं. आतांच ही नवी भाषा कशाला ?

कदाचित् तसंच होईल. कदाचित् वडिलांनीं आपल्याला निराळ्याच कारणासाठीं घरीं बोलावलं असेल. पण असं कोणतं निराळं कारण असूं शकेल ? आपली परीक्षा महिन्या दीड महिन्यावर आली. ती संपली कीं एकूणच परीक्षा संपल्या. त्यानंतर निकाल होईपर्यंत घरींच राहणार आहोंत आपण. निकाल लागल्यावर कुठं कामधंदा मिळाल्यावर—तो मिळेलच—तेवढी पुण्याई आपण शिक्षणाच्या क्षेत्रीं मिळविली आहेच—कामधंदा मिळाला तरी आपण पळून थोडेच जाणार आहोंत ? मग ही घाई कां ? नक्कीच त्यांना सगळा प्रकार समजला असला पाहिजे.

सगळा प्रकार ? —त्या कल्पनेनं त्याचा थरकांप झाला. त्याला अतिशय भीति वाटली आणि सुखाच्या लहरींनींहि त्याच वेळीं त्याचं मन कंपित झालं. स्त्री—पुरुषांत जें जें घडणे शक्य आहे तें सगळं त्या सुट्टींत आपणां दोघांच्या हातून घडलं आणि संपलं असं नव्हे. कसं संपेल ? एक घडलं कीं त्यांतूनच दुसरं उपजतं असा हा प्रकार ! दुसरं कांहीं उपजायला लागलं कीं काय ? आपल्या गुप्त प्रेमाला कोंब फुटूं लागला असेल कीं काय ? तसं असेल तर आपण ताबडतोब शीलाकडे गेलं पाहिजे, तिला आपल्या बाहु-पाशांचा आधार दिला पाहिजे. या वेळींच तिला आपल्या आधाराची अतीव आवश्यकता आहे. मग तिनं आपल्याला तसं कां कळवूं नये ? कसं कळवणार ? सुखाची वार्ता सुहृदांना आनंदानं आणि अभिमानानं सांगण्या-ऐवजी बिचारीला अपमानाच्या टोचण्या सहन कराव्या लागत असतील !—लज्जेच्या दगडी भारानं बिचारीचा जीव दडपून गेला असेल ! —आनंदानं

उजळलेलं तोंड आतेष्टांना दाखवून त्यांच्याकडून मायेचा आणि कौतुकाचा स्पर्श मिळवण्याऐवजीं बिचारीच्या भाग्याला अवहेलना, तिरस्कार, कटु शब्द आले असतील. आणि त्याला कारण आपण! बिचारी गुदमरून गेली असेल.

छे! छे! आपल्याला तिच्याकडे उडत गेलं पाहिजे. तिला सांगितलं पाहिजे, "वेडे! असं मुळुमुळू रडायचं कशाला? बघ, वर बघ. अग, मी आलों आहे. मी तुझ्या पाठीशीं असतांना तुला कशाची भीति? कोण तुला टाकून बोलतं? कोण तुझा अपमान करतं? तुला छळण्याचा त्यांना काय अधिकार आहे? कुणाला एक शब्दसुद्धां मी उणा–अधिक बोलूं देणार नाहीं. तुला काय वाटलं, मी फसवीन? निराधार अवस्थेंत सोडीन? वेडे! इतका का मी वाईट आहे? जग कितीहि वाईट असलं तरी मी तसा नाहीं. आपण दोघं निराळीं आहोंत. जगाला आपल्या आनंदांत मी लुडबूड करूं देणार नाहीं. मग कुणीहि असो–आई, वडील, सगेसोयरे! आपल्याला कुणाकुणाची पर्वा नाहीं. तूं आणि मीं! बस्! सगळीं नातीं, सगळं जग आपल्या दोघांच्या बाहेर नाहीं. जें कांहीं आहे तें सगळं आपल्या दोघांतून नव्यानं निर्माण होत असतांना जुन्या जगाला भ्यायचं? जुन्या जगाची पर्वा करायची?

त्या सुख्याच्या पूर्वी शीलाला आपण किती तरी वर्षांपासून ओळखत होतों. वेटाळांत राहणाऱ्या इतरांशीं जसा आपला संबंध होता तसाच तिच्या घराशींहि. अनेक घरांपैकीं एक घर. अनेक ओळखींपैकीं एक ओळख. अनेक मुलींपैकीं एक मुलगी. अनेकांपैकीं एक. पण आतां अनेकांचा संबंध तुटला. एक एकरूप झालं. आतां केवळ एक. या एकांत स्थलाच्या मर्यादा वितळल्या—या एकांत कालाचा भेद विरघळला–या एकोप्यांत सगळं जुनं वितळलं आणि मुशींतून निघणाऱ्या वस्तूसारखं नवं नातं, नवं जग नव्या जीवाच्या रूपानं आकाराला येऊं लागलं. एक काळ होता कीं, ती कोण आणि आपण कोण अशी स्थिति होती–एक काळ होता कीं तिचं आयुष्य आणि आपलं आयुष्य निरनिराळ्या पातळ्यांवरून जात होतं. त्या पातळ्या एकमेकांत मिसळल्या. तो काळ नामशेष झाला.

आतां सगळी कालगणना नवी—आतां सगळं आयुष्यच नवं—आतां सगळीं सुखदुःखं नवीं ! तिचं सुख हेंच आपलं सुख. तिच्या यातना याच आपल्या यातना. तिचा जीव हाच आपला जीव. तिचा मुलगा—हो मुलगाच होणार—हाच आपला मुलगा. हो मुलगाच होणार. मुलगा होणार आणि आपल्या आईवडिलांना आपण सांगणार, " तुमचा अनुभव मलाहि मिळाला आहे. तोच अधिकार मला मिळाला आहे. पण तो अधिकार मी तुमच्यासारखा गाजवणार नाहीं. पहा, मी आपल्या मुलाला कसं स्वातंत्र्य देतों. जुन्यानं नव्याला कां स्वातंत्र्य देऊं नये ? नवं जुन्यांतून निघालं असलं तरी तें स्वतंत्र आहे. या स्वातंत्र्याला विरोध केला तर नव्याचा प्रतिकार तुम्हांला सहन होणार नाहीं. तुम्हीं समजून वागा. नाहीं तर मी प्रतिकार करीन—प्रतिकार करीन. "

तो घरीं आला तेव्हां त्याला एक विचित्र प्रकारची सामसूम बोंचूं लागली. आपलं लक्ष नसतां कुणी चिमटा काढावा, आणि त्या चिमट्यानं सावध व्हावं व चिमटा ज्या बाजूला बसला तिकडे लक्ष द्यावं तोंच दुसऱ्या बाजूनं चिमटा बसावा; थोडा वेळ चिमटे थांबावे व ती सगळी गम्मत होती असं वाटूं लागावं तोंच पुन्हां चिमटा बसावा अशी जाणीव त्याला घरच्या माणसांची नजर करून देऊं लागली. ' ताबडतोब घरीं यावं ' इतकं आग्रहानं लिहिणाऱ्या वडिलांनीं त्या लिहिण्याचा अर्थ स्पष्ट करण्याची उत्सुकता तर दाखवली नाहींच, पण नेहमींची साधी चौकशीहि केली नाहीं. निदान त्यांनीं विचारलं असतं, कीं ' गाडींत गर्दी खूप होती का ? ' तरीहि त्याला जाणवणारं पोकळीचं वातावरण भरून निघालं असतं.

वडील न बोलले तर न बोलेत. नेहमीं तो प्रवासावरून आला कीं त्याच्या पाठीवरून हात फिरवीत, त्याचा चेहरा कुरवाळीत ' किती सुकलास रे ! अभ्यास झाला म्हणून काय प्रकृतीची काळजी घ्यायची नसते ? ' अशा साध्या शब्दांत गाढ माया दाखवणारी त्याची आईही बोलली नाहीं. जेवायचं ताट तेवढं त्याच्यापुढें सरकवण्यांत आलं. त्याला सपाटून भूक लागली असूनहि प्रत्येक घास घशांत घुटमळूं लागला. त्याला भयंकर गुदमरल्यासारखं झालं ! बाहेर माळरानांत जाऊन पोटभर रडल्याशिवाय

आपला कोंडमारा कमी व्हायचा नाहीं हें त्यानं ओळखलं. पण रडून कसं चालेल ? तोच रडायला लागला तर शीलानं काय करायचं ? प्रतिकाराची भाषा मनांत घेऊन इथं आलों तोंच ती बारगळूं लागली. असं झालं तर पुढें निभाव कसा लागेल ?

बोलायच्याही लायकीचे आपण राहिलों नाहीं अशी जर घरांतल्या आपल्या माणसांची समजूत असेल तर येणाऱ्या प्रसंगाला धैर्यानं भिडलं पाहिजे, तरच त्या प्रसंगाची भीति कमी होईल. ती भीति आपण कमी करायलाच हवी. आपल्यालाच जर त्या भीतीनं गलितगात्र केलं, तर शीलाची अवस्था काय होईल ? त्या भीतीनं आपल्याला नुसतं अस्वस्थच केलं आहे; पण बिचाऱ्या शीलाचा तर ती गळाच दाबूं लागली असेल—! छे, छे ! असं व्हायला नको. असं होऊं देतां कामा नये. आतां परीक्षेची खऱ्या परीक्षेची—वेळ आली. कॉलेजांतल्या परीक्षा आपण चुटक्या वाजवून दिल्या, त्यांतली उरली ती शेवटचीहि आपण नेहमींच्या सराईतपणानं पार करूं. पण ही खरी परीक्षा ! या परीक्षेंतून तरलं पाहिजे, शीलाला तारलं पाहिजे, आपल्या दोघांच्या प्रेमांतूनच जें सुख आकाराला येत आहे त्याला तारलं पाहिजे.

काय प्रकार आहे हें नक्की समजून घेण्यासाठीं त्यानं शीलाच्या घरीं धांव घेतली. तिथं त्याला कुणी आडवलं नाहीं. नेहमींचा औपचारिकपणा, संकोच सगळं टाकून तिच्या घरच्या माणसांनीं त्याची तिची तात्काळ भेट घालून दिली. कसला औपचारिकपणा ? कसला संकोच ? प्रसंग गुदरला कीं, असल्या देखाव्यांच्या भिंती भराभर ढासळतात आणि माणसाची गरज उघडी—नागडी समोर येते. शीलाची भेट त्याला ताबडतोब निःसंकोचपणें घेऊं देणाऱ्या त्या माणसांच्या चेहऱ्याकडे पाहून त्याला स्वतःची अत्यंत शरम वाटूं लागली. एखाद्या उनाड, उडाणटप्पू मवाल्यानं एखाद्या सभ्य व्यक्तीच्या अंगावरील तलम रेशमी वस्त्र हातांतल्या चाकून चूपचाप फाडून टाकावं आणि त्या निरपराध सभ्य व्यक्तीच्या प्रतिष्ठेचीं लक्तरं करावीं तसा प्रकार आपण केल्याची जाणीव त्याला झाली !!

पण लगेच त्याला वाटलं कीं, त्या सगळ्या माणसांना आवर्जून सांगावं, " मीं जें केलं तें हलकट उद्देशानं नव्हे, जाणूनबुजून नव्हे, तें माझ्या हातून घडून गेलं. त्याची जबाबदारी मी माझ्या डोक्यावर घ्यायला तयार आहे. तुमच्या प्रतिष्ठेला माझ्या हातून धक्का लागला हें खरं, पण माझी चूक सुधारायलाच मी इथं आलों. या परिस्थितींत माझ्या हातून तुमच्या नांवाला लागलेला डाग जेवढा पुसून काढणें शक्य आहे तेवढा मी काढणार आहे. तुमचं नांव आणि माझें नांव असा भेदभावहि माझ्या मनांत उरला नाहीं. शीला माझी आहे. तुम्ही तिचे आहांत, तसेंच माझेहि आहांत. मी तुमचा आहें. "

—शीला त्याच्याशीं बोलली थोडें; रडलीच फार ! तिची समजूत कशी घालावी हें त्याला कळेना ! जसं जमेल तसं त्यानें तिला आश्वासन दिलं. त्या आश्वासनामुळें शांत होण्याऐवजीं ती आणखीच मुसमुसून रडूं लागली. त्याला पुष्कळ कळून घ्यायचं होतं पण कळलं एवढंच कीं त्याचा अंदाज खरा होता ! जो प्रसंग उभा राहील अशी त्यानं कल्पना केली होती तो खरोखरच उभा झाला होता आणि शीलाच्या अंतर्यामीं हैदोस घालू लागला होता. तें तर त्यानं कल्पनेनं ओळखलं होतंच. पण त्याशिवाय त्याला आणखी माहिती हवी होती. त्याच्या आई-वडिलांना ती गोष्ट केव्हां समजली ? समजल्यावर त्यांच्या मनाची प्रतिक्रिया काय झाली ? दोन्ही घरच्या वडील माणसांचं कांहीं बोलणं झालं काय ? पण त्या प्रश्नांचीं उत्तरं एकसारखी रडत असणाऱ्या शीलाकडून त्याला मिळालीं नाहींत. तिच्या घरच्या माणसां-कडूनहि कांहीं नीटसं कळलं नाहीं. तीं रडत नव्हतीं; म्हणजे अश्रु ढाळत नव्हतीं, हुंदके देत नव्हतीं. पण आसूं न ढाळतां, हुंदके न देतां, दुःखाचा चीत्कार न काढतां माणसं मुक्यानें कशीं रडूं शकतात हें त्यांना पाहतांच दिसत होतं ! त्याला वाटलं, आपल्या दोन्ही गालफडांवर सारख्या थपडा मारून घ्याव्या व तीं फोडून काढावीं ! ! ....

तो शीलाच्या घरून निघाला आणि तडक आपल्या घरीं परतला. एकेक क्षण त्याचं हृदय घुसळून काढत होता. डोकं दुखून फुटतें कीं काय अशी

भीति त्याला वाटूं लागली होती. घरीं येतांच त्यानं सरळ आईच्या ओच्यांत डोकं खुपसलं आणि ढसढसा रडून घेतलं. मनाचा ताण वाहून गेल्यासारखें वाटतांच त्यानं हुंदके देत आईला सांगितलं, " आई ! मला शीलाशीं लग्न केलंच पाहिजे; ताबडतोब लग्न केलं पाहिजे. प्रत्येक क्षण मला आणि तिला असह्य झाला आहे. आई ! मला तुझा आधार हवा ! शीलाला तूं आपल्या कुशींत घे ! "

त्याच्या आईनं त्याचे डोळे पुशीत उत्तर दिलं, " आम्ही नको का म्हटलं ? तेवढ्यासाठीं तर तुझ्या वडिलांनीं तुला तांतडीनं बोलावलं. "

—आईचं हें उत्तर ऐकतांच त्याला आनंदाचा धक्का बसला. त्याला इतका आनंद झाला कीं, क्षणभर त्याचे ओंठ नुसते थरथरत राहिले. पण शब्द मात्र ओंठांतून निघत नव्हते.

" आई, बाबा माझ्यावर चिडले नाहींत ? ते माझा तिरस्कार नाहीं करीत ? "

" इतकी का आम्ही वाईट आहोंत ? एवढी का आम्हांला समज नाहीं ? जें झालं तें वाईट झालं—त्यामुळें त्यांना वाईट वाटलं. पण म्हणून तुझा ते तिरस्कार कसा करतील ? "

त्याला एकदम आनंद झाला आणि त्याच क्षणीं त्याला स्वतःची लाज वाटूं लागली. उगीचच आपण गैरसमज करून घेतला.—उगीचच आपण मनांतल्या मनांत वडिलांवर अन्याय केला. ज्यांनीं स्वतःच्या कल्पना विसरून आपल्याला न मागतां अभय दिलं त्यांच्याविषयीं आपण शंका घेतली. ज्यांच्या पायांशीं लोळण घ्यायची त्यांच्याशीं प्रतिकार करण्याची भाषा आपण बळावूं दिली.

" जा. तुझीच वाट पहात बसले आहेत ते. त्यांच्याशीं बोलून घे. पण कमी—जास्त बोलूं नकोस. आम्ही जुनी माणसं ! किती पहायचं आम्ही ! किती ऐकायचं आम्ही ! आधींच त्यांच्या मनाला खरचटलं आहे. आतां अधिक बोलून ओरखडे काढूं नकोस. जा बोल त्यांच्याशीं ! "

वडिलांच्या खोलींत तो गेला खरा, पण तिथं जातांच त्याच्या घशाला

कोरड पडली. वडील खालीं मान घालून कांहीं तरी वाचत होते. तो खोलींत आला हें त्यांच्या लक्षांत आलं, पण त्यामुळें त्यांच्या चेहऱ्यावर बारीक फरक देखील उमटला नाहीं. वडिलांच्याप्रमाणें खोलींतल्या सगळ्या वस्तु एकदम स्तब्ध झाल्या आहेत असा त्याला भास झाला. त्या खोलींतल्या स्तब्धतेचा भंग करण्यासाठीं त्याचे ओंठ थरथरले. आपण एकाएकीं कांपायला लागलों आहोंत हें त्याच्या लक्षांत आलं.

आपले हातपाय थड्थड् लवत आहेत हें त्याच्या लक्षांत येतांच त्यानं ती थड्थड् थांबविण्याचा प्रयत्न केला. त्या प्रयत्नामुळें त्याच्या शरीराचं कंपन थांबलं पण त्याचा एक पाय मात्र थडथडायचा थांबेना. लखवा झालेला भाग अलग हलत असावा तसा पाय जागच्या जागीं हलत असल्याचं त्यानं ओळखलं. भयंकर वेगांत रक्त पायांतून सळसळत आहे व रक्ताची ही सरसर गति थांबली नाहीं तर आपला तोल जाऊन आपण कोलमडूं अशी भीति त्याला वाटूं लागली. हो, तो भ्याला होता—नुसताच भ्याला नव्हता; शरमेनं खचला होता !

प्रवासांत जमवलेलं धैर्याचं गाठोडं सुटलं होतं व तें बांधायचा प्रयत्न त्याच्याच्यानं करवत नव्हता. कसचं धैर्य ? कसचा प्रतिकार ? सगळं खोटं होतं ! खरं एवढंच होतं कीं, करूं नये असला प्रकार त्यानं चूपचाप केला होता; अविचाराला बळी पडून सर्वांना खालीं मान घालायला त्यानं लावलं होतं. तें सगळं आपल्या हातून घडून गेलं असंहि त्याला वाटत नव्हतं. ‘ घडून जाणं ’ हा एक खोटा बचाव आहे हें तो स्वतःशीं कबूल करूं लागला. ! स्वतःच्या चुकीची कबुली स्वतःला देतांच त्याच्या पायाची थडथड कमी होऊं लागली. हो, चूकच होती ! नुसती चूकच नव्हे गुन्हा होता तो ! मुद्दाम केलेला गुन्हा ! असल्या गोष्टी करूं नयेत हेंच नव्हतं का त्याला घरांतल्या संस्कारांनीं शिकवलं ? असल्या गोष्टी करूं नयेत हेंच नव्हतं का त्याच्या शिक्षणानं सांगितलं ? असल्या गोष्टी करूं नयेत हेंच नव्हतं का त्याच्या समाजाचं म्हणणं ? संस्काराशीं, शिक्षणाशीं, समाजाशीं द्रोह केला होता ! म्हणे, हातून घडून गेलं ? असं कसं एकाएकीं घडून गेलं ? विजेचं चमकणं, धरतीचं

कंपन, उल्केचं स्खलन एकाएकी घडून येतं तसा का माणसाचा तोल जातो? जें केलं तें चूपचाप करण्याची योजना आंखण्याइतपत विचार होता तिथें तें करूं नये हा विवेक कसा राहिला नाहीं? नुसती चूक नव्हे—नुसता गुन्हा नव्हे—भयंकर गुन्हा!—मुद्दाम योजनापूर्वक केलेला गुन्हा!!

"बैस," वडिलांच्या त्या शब्दानं त्याच्या भणभणलेल्या डोक्यावर शीतल शिडकाव केला.

"मीं तुला घाईनं कां बोलावलं हें तुला माहीत आहेच. तूं असं करशील अशी मला कल्पना नव्हती." वडिलांच्या पहिल्या शब्दानं वाटूं लागलेला सुखद अनुभव फार वेळ टिकायचा नाहीं हें त्याला जाणवलं. रणरणत्या उन्हांतून घरीं येतांच डोक्यावर थंड पाण्याची घडी धरली कीं, पहिल्यांदां थंडगार वाटतं. पण थोडा वेळच; उन्हाची तडतड पुन्हां जाणवूं लागते. त्या सगळ्या अनुभवाला तोंड देणं त्याला भाग होतं. त्यानंच आपल्या करणीनं तें उन्ह उत्पन्न केलं होतं; त्याच्या झळा सोसणं त्याला भाग होतं.

"माझी चूक. झाली. मला क्षमा करा."

"एका चुकीवर प्रकरण थांबणार नव्हतं. वाईट वागलास ही पहिली चूक ती गुप्त ठेवण्याचा प्रयत्न केलास ही दुसरी चूक."

"करूं नये तें मीं केलं."

"आतां तरी मी सांगतों तसं वागा."

"म्हणूनच तुमचं पत्र हातीं पडतांच मी निघून आलों."

"आतां ताबडतोब लग्न उरकून टाका." ज्या संमतीसाठीं त्याचं हृदय उत्सुक झालं होतं ती मिळाली असूनहि त्याला आनंद वाटत नव्हता!—समाधान मिळालं नव्हतं!

"मी तुमच्या आज्ञेबाहेर नाहीं."

"मनापासून बोलतोस का?"

त्या प्रश्नाचा रोख त्याच्या लक्षांत आला नाहीं. त्यानं पुन्हां त्याच शब्दांचा उच्चार केला,

" मी तुमच्या आज्ञेबाहेर नाहीं. "

" म्हणूनच सांगतों, ताबडतोब लग्न करून टाका. "

त्याच्या मनांतली आशंका साफ पुसून टाकण्यासाठींच वडील ती संमति वारंवार उच्चारीत असावेत असं त्याला वाटलं आणि त्यांच्या संमतीविषयीं संशय घेणारं मन कसं चुकत होतं हें त्याला पटलं. ताबडतोब लग्न करणं आवश्यक—अत्यावश्यक होतं. लोकांच्या जिभा वळवळूं नयेत म्हणून त्या शिवून काढायचा तो एकच उपाय होता. ताबडतोब लग्न करणं नुसतं आवश्यकच नव्हतं, तर फायद्याचंहि होतं.

" लग्न करणं मला भागच आहे "—जें बोलायला तो आतापर्यंत धजला नाहीं तें बोलायची त्याला हिम्मत आली. वडिलांनीं जमिनीवरची नजर वर फिरवीत त्याच्यावर रोखली. त्यांच्या नजरेला नजर देण्याचा धीर अजून त्याला होत नव्हता. त्याच्या वडिलांच्या तें लक्षांत येऊनहि त्यांनीं त्याच्याकडे रोखून पाहिलं आणि सूर वाढवल्यासारखा करीत ते म्हणाले,

" लग्न करणं तुला भाग आहे ? तुला नव्हे, तिला भाग आहे. "

" एकच तें. "

" एकच नव्हे, नीट ऐक. काय सांगतों तें नीट समजून वाग. जर वागायचं नसलं तर तुझा तूं मुखत्यार आहेस. आतापर्यंत जें केलंस तेंच कुठं आम्हांला विचारून केलंस ? तेव्हां आतां तरी माझ्या म्हणण्याप्रमाणें वागशील असा नेम काय ? "

" नाहीं, नाहीं. तुम्हीं सांगाल तें ऐकायला अन् पाळायला तयार आहें. "

" मग लक्षांत ठेव—लग्न करणं तिला भाग आहे; तुला नव्हे ! "

" म्हणजे ? "

" म्हणजे काय तेंच सांगणार आहे. ऐकायला बरं नाहीं वाटायचं तुला. आमचं कुठलं सांगणं तुम्हांला बरं वाटलं आहे ? "

" नाहीं, तसं नाहीं. तुम्हीं सांगा. माझी चूक झाली. "

" दुसरी चूक आणखी करूं नकोस. पांच हजार नगदी मिळायला हवेत असं तिच्या वडिलांना मीं सुचवलं आहे. तूं त्यांच्या कह्यांत जाऊन

हे रुपये गमावूं नकोस. जातात कुठं ? हो ना करतां करतां होतीलच तयार द्यायला ! न द्यायला झालं काय ? चांगले आहेत ते घरचे. पण तूंच नांगी टाकलीस तर वेगळं ! तूं पक्का राहिलास तर पांच हजार तुला सहज मिळतील."

" म्हणजे त्यांची अडवणूक करूं ?"

" त्यांत कसली अडवणूक ? हा व्यवहार आहे." त्याच्या वडिलांनीं ते शब्द शांतपणें उच्चारले, पण त्याचं डोकं एकदम तापलं ! व्यवहाराचा तो वेदान्त ऐकून त्याला चीड आली ! वडिलांविषयींचा त्याचा जुना संशय एकदम उसळून आला आणि आपल्या दोघांत कसलं तरी शत्रुत्व आहे ही त्याची जुनी समजूत पक्की झाली ! त्यांच्याशीं एक शब्दहि बोलूं नये असं त्याला वाटलं. तिथून ताड्ताड् निघून जावं—तेंच एक उत्तर अशा उपदेशावर द्यायला पाहिजे असा विचार त्याच्या मनांत आला. पण न बोलतां निघून जाण्यांत काय अर्थ ? ज्या भावनाशून्य वृत्तींतून तो उपदेश निघाला तिला तेवढ्याच निश्चयी कठिण शब्दांत उत्तर द्यायला हवं; तेंच आपलं कर्तव्य आहे, तोच प्रामाणिकपणा आहे असा त्यानं निश्चय केला.

" मी शीलाशीं व्यवहार केला नव्हता—सौदा केला नव्हता—प्रेम केलं होतं. त्या प्रेमाला तुमचा आशीर्वाद मिळाला तर मला हवा होता."

" मिळाला तर हवा आहे ? इथं कुणाला आशीर्वाद द्यायची सुरसुरी आली आहे ? सगळं करून—सावरून वर साळसूदपणें आशीर्वाद हवा ! कां द्यायचा आशीर्वाद ? म्हणे प्रेम केलं होतं; सौदा केला नव्हता !"

" हो मीं प्रेम केलं होतं—हिशेब नव्हे. तुमच्या तोंडून असा सल्ला निघेल अशी मला कल्पना नव्हती. मी असा हिशेब करणं लांछनास्पद समजतों."

" जें लांछनास्पद समजायला हवं तें बिनबोभाट करायचं अन् वागण्याचा व्यवहार सांगितला तर तें लांछन म्हणून बोभाटा करायचा. व्यवहार सगळ्यांनाच लागतो. सगळे करतात तोच हिशेब मीं तुला सांगितला."

" तसा हिशेब मला सांगूं नका. मीं तो केला नाहीं आणि कधीं करणारहि नाहीं !"

" ठीक आहे ! थोर आहांत तुम्ही !"

" थोर नसेन पण मुद्दाम लहान होणार नाहीं. "

" जें केलं तें फार मोठं केलंत ! "

" जातों मी. "

" जा. पण एक सांगतों. या मोठेपणाच्या– चांगुलपणाच्या-प्रेमाच्या भ्रमांत राहूं नका. असा भ्रम स्वतःविषयीं तर ठेवूं नकाच, पण इतरांच्या-विषयीं ठेवूं नका. "

" म्हणजे ? "

" म्हणजे एवढंच कीं, तुम्ही हिशेब केला न केला तरी त्यांनीं तो केलाच, तिनं तो केलाच. "

" तुमच्या म्हणण्याचा अर्थ काय ? "

" तेंच सांगतों. एवढे अधीर कां होता ? तुला काय वाटतं, एवढा धोका पत्करून त्यांनीं तुझ्याकडे तिला पाठवलं, तिनं मर्यादा सोडल्या तें काय डोळे मिटून ? तुझ्यासारख्याचं शिक्षण, पिढीजात पैसा सगळं त्यांना दिसत होतं. त्याचा नीट अंदाज घेऊनच त्यांनीं 'सगळं' घडूं दिलं ! यालाच तुम्ही प्रेम म्हणत असाल तर म्हणा. मीं म्हणणार नाहीं. मलाहि जग दिसतं. ज्याचं सगळं व्यवस्थित आहे, शिक्षण आहे, पैसा आहे, कांहीं केलं तरी पोटाशीं घालणारीं माणसं आहेत त्याच्यावर कोण नजर नाहीं ठेवणार ? मुलींनीं पैसा हेरायचा आणि मुलांनीं रूप टिपायचं यालाच ' प्रेम ' म्हणायचं का ? हा झाला हिशेब. हा झाला व्यवहार. व्यवहाराच्या चार गोष्टी सांगायलाच मीं तुम्हांला बोलावलं. पटल्या तर पहा. नाहींतर जें कराल तें भलं मानून घेणं आलंच आमच्या नशिबीं, दुसरं आम्ही तरी काय करणार ? "

—कांहीं तरी भयंकर त्वेषाचं, आवेशाचं उत्तर द्यायचं त्याच्या मनांत आलं; पण सगळा त्वेष, आवेश एकाएकीं थिजला ! त्याच्या तोंडून शब्द निघेना ! त्याच्या मनांत वडिलांच्याविषयीं त्वेषच नुसता नव्हता तर त्यांच्या बोलण्यांत कांहीं तरी खरं असल्याची जाणीव त्याला टोंचूं लागली होती. निश्चित भूमिका त्याला राहिली नव्हती–निश्चित भावना नव्हती–दृढ विचार नव्हते ! त्याच्या डोक्यांत सगळ्या भावनांचा, विचारांचा चेंदामेंदा झाला होता ! !

—पुढं काय करायचं हें त्यानं अगोदरच ठरवलं होतं. तेंच तो करणार होता. पण फाटलेल्या, उसवलेल्या कपड्यांना शिवण घालून ते फाटले नाहींत असं दाखवीत सगळं करणं; आयुष्य जगणं आपल्या नशिबांत आहे हें त्याला स्पष्ट दिसत होतं ! !

* * *

अनुक्रम ...... दि: ......
...... नोंद दि. ......

# मोठ्यांची गोष्ट

१०

दादासाहेबांनीं मोटार बंगल्याबाहेर घेतली तेव्हां त्यांच्या शेजाऱ्यानं त्यांना विचारलं, " काय, आज लौकर निघालात कामावर ! " आणि त्या शेजाऱ्याच्या लक्षांत आलं कीं, दादासाहेब कामासाठीं निघालेले नसावेत. वेळ कामावर जाण्याची असली तरी, कामावर जाणारीं माणसं सपत्नीक जात नसतात हें, गाडींत बाईसाहेबांना बघतांच शेजाऱ्याच्या लक्षांत आलं. " कामावर जरा उशीरां जाणार आहें. आम्ही जरा स्टेशनवर निघालों होतों. "

" का, कुणी पाहुणे येणार आहेत वाटतं ?

दादासाहेबांनीं हंसत उत्तर दिलं, " पाहुणा ? हं, म्हणाल तर पाहुणाच ! पण कांहीं दिवसांसाठीं येऊन जाणारा म्हणजे पाहुणा असं समजत असाल, तर मात्र पाहुणा नाहीं हं ! हिच्यासाठीं एक मित्र आणायला चाललों आहोंत आम्ही. आमच्या उद्योगधंद्यामुळें आम्ही हिच्या मैत्रीच्या हौसेला नीट पुरूं शकत नाहीं. म्हणून म्हटलं, हिच्यासाठीं एक मित्रच आणून द्यावा. "

हें वाक्य ऐकून शेजारी हंसूं लागला.

त्यावर दादासाहेबांच्या पत्नी—शकुंतलाबाई म्हणाल्या, " माझ्यासाठीं खेळणं आणून द्यायला चालल्याचं ह्यांनीं तुम्हांला सांगितलं नाहीं हें माझं नशीबच समजायचं ! आमच्या बेबीसाठीं खेळणीं आणतात हे म्हणून; नाहींतर

खरोखरी ह्यांनीं माझ्यासाठीं रबरी बदकं, स्प्रिंगच्या मोटारी वगैरे आणायला कमी केलं नसतं. काय तर म्हणे, " हिच्यासाठीं मित्र आणायला चाललों. खरं म्हणजे ह्यांचे मित्र यायचेत आज ! "

शेजाऱ्यानं आपल्या हंसण्याची आणखी एक मात्रा उगाळीत म्हटलं, " येणारा पाहुणा तुम्हां उभयतांचाहि मित्र दिसतो ! हो हें बरं. म्हणजे पुढें मित्र तुझा का माझा असा वाद नको व्हायला तुम्हां दोघांत ! तुमचे हे मित्र आले म्हणजे आमच्याशीं ओळख करून द्या हं ! "

" अहो, मुद्दाम ओळख करून द्यायची गरजच पडणार नाहीं ! आमचा बाळू आहेच तसा लाघवी. तुम्हीं नको म्हटलंत तरी तो तुमच्याशीं मैत्री करणारच. बरंय्, जाऊन येतों " म्हणत दादासाहेबांनीं गाडी स्टेशनच्या दिशेनं हांकली.

स्टेशनवर बाळूला पहिल्यांदां पहातांच शकुंतलाबाईंना आश्चर्य वाटलं. खरं म्हणजे बाळूचं वय किती ? बाळू दिसतो कसा ? बाळूचा स्वभाव कसा आहे ?—ही सगळी माहिती दादासाहेबांनीं त्यांना दिलेली होतीच आणि तरीहि त्याला पहातांच शकुंतलाबाईंना आश्चर्य वाटायचं राहयलं नाहीं. आश्चर्य अशासाठीं कीं, बाळू आणि दादासाहेब यांच्यांतला भेद त्या दोघांच्या वयांच्या सारखेपणाशीं अगदीं विसंगत होता. दादासाहेबांनीं जेमतेम पंचविशी ओलांडली असेल. बाळू पंचविशीच्या आंतच असला तरी विशीच्या बाहेरच. म्हणजे त्या दोघांच्या वयांत फारसा फरक नव्हता. हाडपेर बघावं तर बाळू दादासाहेबांच्यापेक्षां थोडा उंच आणि धडधाकट होता. इतकं असूनहि त्या दोघांच्या संबंधांत, वागण्यांत, बोलण्यांत, सामाजिक प्रतिष्ठेत अतिशय तफावत होती.

स्वतःचं शिक्षण चालू असतांच एका विमाकंपनींत नोकरी धरून, थोड्याच अवधींत उच्च पदाला चढलेल्या दादासाहेबांच्या चेहऱ्यावर यश, व्यावहारिक समज, वागण्यांतला मोठेपणा, त्यांच्या वयाचा विसर पाडणारं गांभीर्य, त्या गांभीर्याचा उगीच इतरांना जाच होऊं नये म्हणून वाढविलेली विनोदबुद्धि, इत्यादींची छाप स्पष्ट होती. याउलट बाळू आपल्या नांवाप्रमाणचं

अगदीं लहान वाटत होता. एखाद्या कोंवळ्या पोरांत असवा तसा बुजरेपणा तर त्याच्या चेहेऱ्यावर होताच; पण कुठल्याहि प्रकारचा आत्मविश्वास त्याच्या वागण्यांत दिसत नव्हता. कदाचित् पाहिली भेट म्हणून असेल; पण दादासाहेबांच्या समोर त्याच्या व्यक्तित्वाचं खुजेपण लपूं शकत नव्हतं.

गाडींतून त्याला उतरवून घेतांना, ' कसं काय बाळू ? इथं तूं शिकायला आलाहेस कीं मजा करायला ? कर बेट्या, मजा कर ! ' असं दादासाहेबांनीं म्हणतांच लहान मुलाला न समजतां एखाद्या गोष्टीवर हंसण्याची संवय असते तसा तो क्षणभर हंसला, आणि लगेच हंसण्यांत आपली चूक झाली अशा ओशाळलेल्या भावनेनं त्यानं चेहेरा लपवला.

बरोबरच्या माणसाशीं वडिलकीच्या नात्यानं वागूं शकणाऱ्या दादा-साहेबांच्याबद्दल शकुंतलाबाईना एकदम विशेष आदर वाटूं लागला. अशा मोठ्या माणसाच्या सहचारिणीचं पद आपल्याला लाभलं आहे याबद्दल त्यांना अभिमान वाटला. आपण कदाचित् वयानं बाळूच्या बरोबरीच्याच असूं; पण अधिकारानं आणि मानानं कितीतरी मोठ्या आहोंत अशी त्यांची एकदम खात्री झाली. आपल्या यजमानांनीं बाळूला शिक्षण आणि काम यांचे धडे द्यायची जबाबदारी स्वतःवर घेतली, तशीच जबाबदारी वहिनी म्हणून आपल्या अंगावर आहे; आपल्याच्यानं होईल तेवढं चांगलं वळण त्याला लावण्याची कामगिरी आपल्याला करायची आहे, हें त्यांना त्या वेळीं स्पष्टपणें कळलं. त्या जाणिवेमुळें त्या जरा गंभीर दिसूं लागल्या असाव्यात; कारण घराकडे परततांना दादासाहेब बाळूला म्हणाले,—

" हें बघ बाळू, माझ्या सहवासामुळं तुझ्या वहिनीला गंभीर बनावं लागतं. गंभीरपणा आतां मला कांहीं सुटत नाहीं. पण तिला त्याचा वारा लागायला नको. या वाऱ्याला पिटाळून लावायचं काम तुझं बरं ! पहा ना, आतांच कशी गंभीर झाली आहे ! मला वेळ असता तर दिवसभर हिला हंसवत बसलों असतों रोज. पण तेवढा वेळ होत नाहीं रे ! मोठा पगार, ही गाडी, भाड्याचा कां होईना, पण आम्हांला मिळालेला बंगला, लौकरच आमचा स्वतःचा हक्काचा बंगला असावा अशी महत्त्वाकांक्षा, हें सगळं संभाळायचं

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
३४७६९ २०७० २३।६।६०

म्हणजे गंभीरपणाची संवय माणसाला लावूनच घ्यावी लागते. आतां तूं आणि आमची वेबी या दोघांनीं मिळून घरांत कसा आनंदी आनंद आणायला हवा! संकोचाचं कांहीं कारण नाहीं. सकाळचं तुझं लॉ कॉलेज आणि दुपारची तुझी नोकरी हें संभाळूनहि गप्पागोष्टी, थट्टामस्करी, नाटक-सिनेमा ह्यांच्यासाठीं तुला भरपूर वेळ मिळेल. जमेल तेव्हां मीहि तुमच्या या कार्यक्रमांत भाग घेईन म्हणा; पण मला न जमलं तरी तूं मात्र माझी उणीव भरून काढायलाच हवी..."

पहिल्याच तडाख्याला दादासाहेब इतकं बोलले कीं बाळू आणखीच बुजला. त्या बोलण्यांतनं व्यक्त झालेला नवऱ्याचा मोठेपणा शकुंतलाबाईंना अधिकच पटला. अशा मोठ्या माणसाची बायको म्हणून आपल्यालाहि मोठेपणानं वागायला हवं हें त्यांनीं पुन्हा एकदां मनाशीं ठरवून टाकलं.

"नाहीं हो बाळासाहेब, ह्यांच्या बोलण्याकडे लक्ष देऊं नका. लक्ष द्यायचं तें ह्यांच्या वागण्याकडे द्या. तुम्हांला पण ह्यांच्यासारखं मोठं झालं पाहिजे हें ध्यानांत असूं द्या!"

"अरे बाळू त्याची काळजी तुला नको करायला! तुझं शिक्षण कसं चाललं आहे. तूं आपल्या नोकरींत प्रगति करतो आहेस का नाहीं, ह्या मोठ्या गोष्टी मी बघेन. तूं फक्त एवढंच बघायचंस कीं, आपलं इथलं वास्तव्य आनंदाचं कसं होईल! इतर काळजी तूं करूं नकोस."

"अहो, पण त्यांना असा सल्ला काय देतां? त्यांच्या थोरल्या बधूंनीं त्यांना तुमच्याकडे धाडलं तें तुमच्याकडून कांहीं शिकण्यासाठीं. त्यांना हेंच शिकवणार वाटतं तुम्ही?"

"अग, तसं नाहीं. लहानपणींच माणसं कामाला लागलीं कीं, त्यांच्यांत बाकीची काय कर्तबगारी येत असेल ती असो; पण त्यांचं मन जरड होतं. तसं बाळूचं व्हायला नको. आतां तूंच सांग, मी जरा जरड प्रकृतीचाच मनुष्य नाहीं का?"

"चला! तुमचं आपलं कांहीं तरीच!" असं त्या म्हणत असतांच त्यांची मोटर घरीं येऊन पोंचली.

बाळूनं दादासाहेबांचा तो सल्ला त्यांच्या घरच्या वास्तव्यांत पूर्णपणें गिरवायला सुरुवात केली. पहिल्या दिवशीं स्टेशनवर दिसलेला बुजरेपणा त्याच्या स्वभावांत नव्हता असं नाहीं; पण तो बुजरेपणा त्याचं कॉलेज, त्याची नोकरी अशा बाहेरच्या जगांत तेवढा दिसायला लागला. बुजरेपणा कसचा, चुकारपणाच. सकाळच्या कॉलेजांत त्याचं मन लागत नव्हतं. सकाळीं उठून या अभ्यासाच्या कार्यक्रमासाठीं जायचं त्याच्या जिवावर येऊं लागलं. बर, कॉलेज नाहीं तें नाहीं; दादासाहेबांनीं लावून दिलेल्या नोकरींत तरी त्यानं उत्साह दाखवावा म्हटलं, तर तेंहि नाहीं. दादासाहेबांसारख्या प्रतिष्ठित माणसाच्या शिफारशीमुळें त्याला ती नोकरी मिळाली होती म्हणूनच ती कशीबशी टिकून होती. त्यांच्याऐवजीं जर दुसरा कुणी असता, तर असल्या हलगर्जी, निरुत्साही माणसाला त्या नोकरींतून केव्हांच कमी करण्यांत आलं असतं. बाळूच्या प्रमुखानं एकदां दादासाहेबांच्याजवळ बोलूनदेखील दाखवलं होतं, " दादासाहेब, तुमच्यासारख्या वाकबगार माणसानं शिफारस केली म्हणून आम्ही त्याला कामावर घेतलं. अहो, आमची ही खाजगी व्यापारी संस्था. इथं कामाचा वेग विजेच्या गाडी-सारखा पाहिजे हें तुम्ही जाणतांच. तुमच्या उमेदवाराची चालढकल कशी चालवून घ्यावी आम्हीं ? "

दादासाहेब त्यावर नुसते हंसले होते.

" अहो, हंसतां काय ? तुम्हांला खरं तें सांगतों. " अशी त्या अधि-काऱ्यानं त्रासिक आवाजांत तक्रार करतांच दादासाहेब म्हणाले, " तुम्ही खरं सांगत नाहीं असं मी कुठं म्हणतों ? पण पहा एखाद्या दुसऱ्या शाखेंत चालवून ! माणूस एखाद्या कामाला चालत नसला तर सगळ्याच बाबतींत तो बेफाम असतो असं थोडंच आहे ? तुमच्यासारख्या अनुभवी माणसाला मीं सांगावं असं नाहीं !

त्यावर तो अधिकारी म्हणाला होता, " तुम्ही म्हणतां तर चालवून पहातों; पण हा दाम कांहीं खरा नाहीं ! "

दादासाहेबांनीं त्यावर त्या अधिकाऱ्याला मित्रत्वाच्या भूमिकेवरून सगळीं

प्रकार समजावून सांगितला. ‘ हें पहा दोस्त, हा बाळू मानला तरच माझा नातेवाईक आहे. त्याचं–माझं नातं देखील काय आहे तें मला नीट सांगतां येणार नाहीं. —इतकं तें दूरचं आहे. तेव्हां मी माझा नातेवाईक तुमच्यावर लादतों आहें असं तुम्ही मुळींच समजूं नका. ”

“ पण मग तुम्हीं त्याला आपल्या घरीं आणला कसा ? ”

“ आणला कसा ! सांगतों. ह्याच्या मोठ्या भावाची अन् माझी लहानपणीं दोस्ती होती. त्याचं म्हणणं असं कीं, कोणत्याहि माणसाला जर संधि मिळाली तर तो वर चढूं शकतो. मला कांहीं तसं वाटत नाहीं; पण आमचा दोस्त माझ्याशीं वादविवाद करूं लागला. आतां या गोष्टी कांहीं वादविवादानं सुटतात कां ? तेव्हां म्हटलं, होऊन जाऊं द्या एक प्रयोग. त्या प्रयोगांतनं जर कुणाचं भलं व्हायचं असेल तर होऊं दे. असा हा आमच्याकडे आला. सोय एवढीच आहे कीं, घरीं आमच्या बायकोला सोबत होईल. मी दौऱ्यावर वगैरे जातों तेव्हां सबंध बंगल्यांत एकटी ती आणि आमची बेबी. इथं असलों तरीहि घरीं घालवायला माझ्यासारख्या माणसाला वेळ कुठं आहे ? म्हणून म्हणतो चालेल तर चालू द्या. अर्थात् तुम्हांला अडचणींत टाकायचा माझा हेतु नाहीं हं ! ”

“ नाहीं, नाहीं दादासाहेब, तुमच्या शब्दासाठीं एखादा माणूस चालवून घेणं का आम्हांला जड आहे ? पण म्हटलं तुमच्या कानावर असावं ! ”

“ आहे सगळं लक्षांत आहे. ”

आपल्या कामामध्यें आपण कसे काय आहोंत, आपल्या कामावर लोक खूष आहेत कीं नाखूष आहेत, याची पर्वा बाळूच्या वागण्यांत फारशी दिसतच नव्हती. त्याच्या मोठ्या भावानं ठरवलं आणि दादासाहेबांनीं दुजोरा दिला, म्हणून तो अभ्यासाचं आणि नोकरीचं काम कसंतरी करीत होता. एरवीं यापूर्वीं कधीं न जमलेला अभ्यास पुढं कधींतरी आपल्याला जमेल असं त्यालाहि वाटत नव्हतं. नोकरीचं काय ? नोकरी करणं, कष्ट करणं हें कुणाला आवडतं, तर त्याला आवडणार होतं ? निरुपाय म्हणून करायची गोष्ट म्हणजे नोकरी. ती चांगली जमली काय अन् वाईट जमली

काय! आपल्याच्यानं अशा गोष्टी जमतील असं बाळूला कधींच वाटलं नव्हतं आणि आतांहि वाटत नव्हतं. त्यांतल्या त्यांत बरं हें कीं तो आपल्या वडील बंधूंपासून आणि त्यांच्या कटकटीपासून दूर होता. त्याचं भाग्यहि असं जबर होतं कीं, दादासाहेबांनीं पहिल्याच दिवशीं आनंद करण्याचा त्याला संदेश दिलेला होता. तो मात्र त्यानं तंतोतंत पाळण्याची पराकाष्ठा केली होतीच. त्याबद्दल बोल लावायला निदान दादासाहेबांना तरी तोंड नव्हतं.

बाळूनं आपल्या या आनंदाच्या कार्यक्रमांत शक्य तेवढे लोक सामील करून घेतले.—वहिनी, बेबी आणि जवळपासचे शेजारी. आनंदाला वाव होता. आनंदाचीं साधनं होतीं. अमुक एका सिनेमाची नायिका चांगली कां उपनायिका चांगली, अमुक एका नाटकांत नायकाऐवजीं खलनायकाच्याच गळ्यांत नायिकेनं वरमाला कां घातली नाहीं!—इत्यादि मनोरंजन प्रश्नांची सोडवणूक करण्यांत त्याचा आणि वहिनींचा वेळ कसा भरपूर निघून जात होता! बाहेरच्या नाटकसिनेमांतील आणि घरच्या रेडिओवरलीं निरनिराळीं गाणीं गुणगुणायचीं, त्यांतले शब्द लक्षांत ठेवायचे, एकाची चाल दुसऱ्यापासून वेगळी कशी आहे हें हेरायचं, एवढीच कामं करूं म्हटलं तरी तीं संपतां संपत नव्हतीं; त्यांचा आनंदहि संपतां संपत नव्हता. निरनिराळ्या कपड्यांच्या निरनिराळ्या तऱ्हा बघायच्या आणि त्यांची तुलना करायची म्हटलं तरी वेळ पुरत नव्हता. अशा या कामांत त्याचा आणि वहिनींचा आयुष्यक्रम मोठा मजेंत चालला होता.

एवढ्या मोठ्या घरांत वहिनींना पूर्वीं जें घर खायला उठल्यासारखं वाटत होतं तें वाटेनासं झालं. बरोबरीच्या सवंगड्याची आपल्याला किती गरज होती हें बाळूसारखा सवंगडी मिळाल्यावर वहिनींना पूर्णपणें कळलं. पूर्वीं साधं बाहेर फिरायला जायचं म्हणजे त्यांना दादासाहेबांशीं सारं कांहीं ठरवून घ्यावं लागत असे. आणि ठरवलं तरी तें साधं फिरायला जाणं देखील ऐन वेळेवर जमेलच असा कांहीं भरंवसा नव्हता. पण बाळूच्या आगमनानंतर तसा कांहीं प्रश्नच नव्हता. प्रश्न होता तो वहिनींच्या स्वभावाचा. त्यांचा स्वभाव

असा विचित्र होता कीं, सगळे आनंद त्यांना हवे होते, पण ते आनंद त्यांना मिळाले कीं त्यांचं फार लौकर समाधान होई; 'नको तो आनंद' असं त्यांना फार लौकर वाटे. एखादी उंची साडी घेण्याची त्यांना जशी घाई होई, तशीच ती टाकून पुन्हा आपलं एखादं जुनं साधं पातळ वापरण्याचीहि.

वहिनींच्या या स्वभावानंच उचल खाल्ली आणि त्यांनीं बाळूच्या येण्यामुळें आपला आणि त्याचा काय फायदा झाला हा हिशेब सुरू केला. त्यांना आढळलं कीं, कुणाचाच कांहीं फायदा झालेला नाहीं. उलट बाळूला शक्य तितकं चांगलं वळण लावण्याची पहिल्या दिवशीं ठरवलेली मोठेपणाची योजना मात्र त्या पार विसरल्या होत्या. दादासाहेबांनीं आपल्याला या योजनेची आठवण कशी करून दिली नाहीं, निदान या फालतू आनंदाला हरकत कशी घेतली नाहीं, असा त्या स्वतःलाच प्रश्न विचारूं लागल्या. एखाद्या हट्टी मुलाची युक्तिवाद करून समजूत घालण्यापेक्षां त्याच्या मनाच्या कलाप्रमाणें घेणं बरं, असा मोठेपणाचा विचार तर त्यांनीं आपल्याशीं वागतांना केला नसेल? म्हणजे काय? लहान मुलाना खेळणं देऊन गप्प करायचं धोरण तर त्यांनीं आपल्या बाबतींत अवलंबलं नसेल? ...तसं असेल तर त्यांचं वागणं मोठेपणाचं आणि हुषारीचं खरं; पण आपण मात्र अगदींच लहान ठरलों....

शकुंतलाबाईंना आनंद हवा होता; पण असलं लहानपण नको होतं. दादासाहेबांच्यासारखा मोठेपणा मिळून जर त्यांना आनंदाचाहि लाभ झाला असता तर त्यांना तो हवा होता. पण ज्या आनंदाला केवळ लहान मुलाच्या समजावणीपलीकडे अर्थ नव्हता, असा आनंद त्यांना नको होता. मग घरांत जें चाललं होतं त्याचा अर्थ काय? त्याचं सुख काय? बाहेरून आलेल्या एका उपऱ्याची चैन, एवढाच! ती चैन शकुंतलाबाईंना मान्य नव्हती. तसं त्या दादासाहेबांना स्पष्ट सांगणार होत्या. ते मोठे असतील.—आहेतहि; पण त्यांच्या मोठेपणासारखं आपल्यालाहि वागतां आलंच पाहिजे, असा त्यांनीं निश्चय केला. त्या म्हणजे बाळपण निघून गेल्यावरहि बाळपणची वृत्ति न सोडणाऱ्या बाळूसारख्या कुणी फालतू असामी नव्हत्या! आपण कोण

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि. ....

आहेत याची त्यांनीं स्वतःला जाणीव करून दिली; तीच जाणीव त्या दादासाहेबांना करून देणार होत्या; तीच जाणीव त्या बाळूलाहि करून देणार होत्या. कदाचित् तो आपल्याला एखादी वय वाढलेली पोरगी एवढंच तर समजत नसेल ?....

बाळू घरीं नसतांना शकुंतलाबाईंनीं दादासाहेबांना म्हटलं, " जरा थांबा. मला तुम्हांला कांहीं विचारायचं आहे. "

त्यांच्या बोलण्यांतला सूर ऐकून दादासाहेबांनीं ओळखलं कीं, प्रकरण कांहीं तरी गंभीर असावं. बायको गंभीर व्हायला लागली कीं, आपण गोष्टी हंसण्यावारी न्यायच्या हें त्यांच्या वागण्याचं नेहेमींचं तंत्र होतं. त्याला अनुसरून त्यांनीं आपल्या मनाला पवित्रा दिला आणि विचारलं, " काय बोलणार होतीस ? "

" तुम्ही हें काय आरंभलं आहे ? " शकुंतलाबाईंनीं विचारलं.

" कुठं काय आरंभलं आहे ? " दादासाहेबांनीं प्रतिप्रश्न केला.

" अगोदर मला हें सांगा, बाळूला तुम्हीं जी नोकरी लावून दिलीय्त तिच्यांत त्याचं लक्ष आहे का ? "

" तो प्रत्यक्ष माझ्या हाताखालीं नाहीं तेव्हां तें मी नीट कसं सांगणार ? पण घरच्या आनंदांत तर त्याचं लक्ष असेलच. तेवढं असलं कीं झालं. नाहीं तरी तेवढंच करायला मीं त्याला सांगितलं नव्हतं का ? " दादासाहेब उत्तरले.

" हें बघा, मला अशीं लपेटीचीं उत्तरं नकोय्त. सरळ सरळ सांगा तो आपल्या नोकरींत काय दिवे लावतोय् तें ? "

" आज ना उद्यां लावीलच ग ! माणसाला समज आली कीं, तो नीट काम करायला लागतोच. फक्त त्याला संधि मिळायला पाहिजे. नाहीं का ?"

" खोटं ! बाळूसारख्यांना एकदां नाहीं, शंभरदां संधि मिळाली तरी त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. पण मला हें सांगा, संधि द्यायचीच होती, तर तुम्हीं ती बाळूला कां दिलीत ? " शकुंतलाबाईंनीं हटकलं.

" मग काय, तुझ्या माहेरच्या एखाद्या माणसाला देऊं का ? तशी इच्छा असेल तर बोलाव एखाद्याला ! "

" हें पहा, आडवं बोलूं नका. "

" आडवं नाहीं, सरळच बोलतों आहें. "

" मग सरळ सरळ सांगा कीं, बाळू हा नालायक मनुष्य आहे. दुसऱ्याच्या जिवावर चैन करणारा एक ऐदी आहे. हें सगळं सुख मिळण्याची त्याची मुळींच लायकी नाहीं. सरळ उत्तर द्या. "

" उत्तर तूं दिलंच आहेस. आतां मीं काय बरं सांगायचं ? " दादासाहेब म्हणाले.

" पण मला हें सांगा कीं, तुम्हीं हें सारं केलंत कशासाठीं ? "

दादासाहेबांनीं त्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीं. तो प्रश्न पुन्हा उच्चारण्यांत आला, " हें सारं तुम्हीं केलंत कशासाठीं ? "

दादासाहेबांनीं पुन्हाहि उत्तर दिलं नाहीं.

" मी काय विचारत्यें तें कळलं ना ? बोलत कां नाहीं तुम्ही ? "

" माणसाच्या इच्छा आणि त्याची पात्रता यांच्यांत किती अंतर असतं हें तुला कळावं म्हणून. एकेका इच्छेच्या पूर्तीसाठीं माणसाला काय–काय खर्ची घालावं लागतं हें तुला कळावं म्हणून. वादविवादानं या गोष्टी कळत नाहींत. म्हणून म्हटलं, अनुभवानं तरी तें तुला कळावं. जगाचा तुम्हां बायकांना अनुभव नसतो. अनुभवाच्यामागं धांवत जाऊन तूं स्वतःला शिणवावंस असं मला वाटत नव्हतं, म्हणून अनुभवालाच मीं घरीं पाचारण केलं. पण आतां मला वाटतं कीं, इतकं चातुर्य तुला एखादी गोष्ट पटविण्यासाठीं मीं वापरायला नको होतं. "

" तुम्ही नुसते चतुर आणि मोठेच नाहीं, तर चांगले आंतल्या गांठीचे आहांत. " शकुंतलाबाई उद्गारल्या.

" मोठेपणाला त्याची आवश्यकता असतेच ! "

स्वतःच्या यजमानांचा मोठेपणा पुन्हा एकदां शकुंतलाबाईंच्या प्रत्ययाला आला. त्या मोठेपणाची ती गुंतागुंतीची वीण पाहून त्या मनांतून थोड्याशा घाबरल्या. पण मोठ्या माणसांची त्याच्या मोठेपणाला शोभेल अशीच अर्धांगी व्हायचं त्यांनीं ठरवलं होतं. स्वतःचा हा मोठेपणा दादासाहेबांच्या

जवळ देखील सिद्ध करण्याची त्यांना संधि मिळणार होती. त्या संधीविषयीं त्यांनीं म्हटलं, " तुम्ही एवढे मोठे म्हणवतां आणि आहांत; पण तुम्हांला-देखील जें जमणार नाहीं तें मी आतां करणार आहें. "

" काय ? "

" त्याला हांकलून लावणार आहें. "

" अग, नको. जाईलच तो आपोआप. "

" म्हटलं ना, तुम्ही मोठे असलांत तरी तुमच्यांतहि कांहीं कच्चेपणा आहेच ! " शकुंतलाबाई म्हणाल्या.

" अग, पण— "

" पण नाहीं अन् कांहीं नाहीं ! त्याला मी उद्यांच्या उद्यां हांकलून लवणार."

" अग, पण उद्यां मी दौऱ्यावर जाणार आहें. तेवढीदेखील सोबत तुला नको का ? "

" सोबत अन् त्याची ? स्वतःचं स्वतःला संभाळतां येत नाहीं अशाची सोबत ? उद्यांच मी त्याला विचारणार, हें काय चालवलंय्स ' आणि सांगणार, ' पुरे झाली ही फुकट चैन ! आतां गाशा गुंडाळा ! "

" पहा बुवा ! "

" मीं सर्व पाहून ठेवलंच आहे. "

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं दादासाहेब आपल्या धंद्यासाठीं बाहेरगांवीं निघून गेले. बाळूच्या निरुद्योगी वास्तव्याचा शेवट करायचं शकुंतलाबाईंनीं ठरवलं होतंच. असल्या बाबतींत मऊपणा कामाचा नव्हता. माणसाला मोठं व्हायचं असलं तर मऊ राहून चालत नाहीं. बाळूला त्या साफ विचारणार होत्या, ' बाळू, हें काय चालवलं आहेस ? हा चावटपणा बंद कर; आणि इथून चालता हो. '

अनायासें बाळू घरींच होता. असणारच. दादासाहेब गांवीं असले कीं, निदान त्यांना दाखवण्याठीं तरी कामावर जायचं सोंग करावं लागे. आज त्याचीहि गरज नव्हती. पण हें सोंग शकुंतलाबाई आतां चालू देणार नव्हत्या. करड्या निश्चयानं त्यांनीं बाळूला हांक मारली. बाळूचा ' ओ ' आला नाहीं.

त्या तडक त्याच्या खोलींत शिरल्या. बाळूला अंथरुणावर पडलेला पाहून तर त्याचा संताप अनावर झाला. त्याच्या अंथरुणावर जाऊन त्या ओरडल्या—

" बाळू ! "

बाळूनं पांघरुणांतून डोकं काढून त्यांच्याकडे पाहयलं. त्यांना त्याची नजर असहाय्य वाटली. चेहेरा टापसा वाटला. हालचाली जड वाटल्या. बाळूला ताप तर नसेल आला ? हो, त्याचा चेहरा तापानं लाल झालेला दिसत होता. त्या एकाएकी विरघळल्या. त्यांनीं बाळूच्या कपाळावर हात ठेवला. बाळूला ताप भरलेला होता.

बाळूवर रागवावं कीं त्याची कींव करावी, हें शकुंतलाबाईंना कळेना. त्यांचा हात तेवढा त्याच्या तापलेल्या कपाळावरून फिरत राहिला. त्या स्पर्शानं बाळूला बरं वाटलं. बाळूनं एकदम त्यांचा हात पकडला आणि घट्ट धरून ठेवला. त्या पकडींत शकुंतलाबाईंना कांहींतरी जाणवलं. कांहींतरी असहाय्य, कांहींतरी भुकेलं, कांहींतरी याचना करणारं, कांहींतरी आक्रमण करूं पहाणारं, कांहींतरी नैसर्गिक, कांहींतरी वाईट. त्या मिठाचा अर्थ जाणवतांच त्या ओरडल्या, " बाळू ! पुरे झाला तमाशा ! पुरे झालं सोंग ! पुरे झाला चावटपणा ! हेंच तेवढं व्हायचं होतं. ताबडतोब चालता हो या घरांतून ! पुन्हा तुझा चेहेरा आम्हांला दिसायला नको ! "

बाळूनं चेहरा अंथरुणांत लपवला. अंथरुणांत लपलेल्या त्या चेहेऱ्याची आकृति देखील बघायला नको, म्हणून शकुंतलाबाई ताडकन् खोलींतून निघून गेल्या.

त्याच दिवशीं थोड्याच वेळानंतर बाळू तें घर सोडून निघून गेला. तो कुठें गेला, केव्हां गेला ह्याची चौकशीहि शकुंतलाबाईंनीं केली नाहीं. तशी त्यांना गरजच वाटली नाहीं. त्यांना फक्त एवढंच वाटत होतं, केव्हां एकदांचे दादासाहेब परत येतात, आणि त्यांना आपण सांगतों, ' मीं बाळूला पिटाळून लावलं. बाळूला पिटाळून लावतांना माझं मोठेपण मीं सिद्ध केलं. तुम्ही मोठे आहांतच. मी देखील तुम्ही समजतां तशी लहान नाहीं. तुम्हांला सगळं कळलं तर पटेल....'

दादासाहेब परत येतांच शकुंतलाबाईंनीं मोठ्या अभिमानानं बाळूला घालवल्याची वार्ता त्यांना सांगितली. त्या अगदीं आनंदांत होत्या; पण तितका आनंद दादासाहेबांनीं कसा दाखवला नाहीं? कीं मोठेपण म्हणजे आनंदाचीहि भावना दाबणं तर नव्हे? सगळ्याच भावना दाबणं म्हणजेच मोठेपण तर नव्हे?....

दादासाहेब म्हणाले,—

" तुझ्या या कामगिरीबद्दल खुषी व्यक्त करायला पाहिजे, नाहीं का? आज संध्याकाळीं आपण सिनेमाला जाऊं या. वर्तमानपत्र दे बरं! बघूं या कोणकोणते सिनेमे आहेत आज गांवांत? "

शकुंतलाबाईंनीं वर्तमानपत्र दादासाहेबांच्या हातीं दिलं. तें वाचतां वाचतां दादासाहेब थांबले. त्यांनीं ओरडून विचारलं, " अग, हें बघ! हें वाचलंस का? "

" काय आहे? "

" कांहीं नाहीं. अपघाताची बातमी आहे. शंकर रामचंद्र गुप्ते—"

" म्हणजे बाळू? "

" हो, त्यानं आपलं शरीर धांवत्या गाडीसमोर झोकून दिलं असं दिसतं. चला, त्याच्या भावाला एक दुखवट्याचं पत्र घालूं या.–हं! मग कोणत्या सिनेमाला जायचं? ' एकच मार्ग ' कीं, ' कांटेरी वाट '? "

दुखवट्याचा ठराव आणि संध्याकाळचा सिनेमा यांचा उच्चार दादासाहेब एकाच श्वासांत करीत होते.—अगदीं शांतपणानं! जणूं कांहीं विशेष घडलंच नव्हतं अशा भावनेनं. आणि घडलंच असेल तर नेहेमींचंच कांहींतरी घडलं आहे अशा भावनेनं. ही भावना म्हणजेहि मोठेपणाच का?...

शकुंतलाबाईंचं डोकं भणभणूं लागलं. मोठेपणा म्हणजे काय?–या प्रश्नाचे घण त्यांच्या डोक्यावर बसूं लागले होते आणि ते त्यांना सहन होत नव्हते. मोठेपणासाठीं काय–काय खर्चीं घालावं लागतं?—त्यांच्या स्वतःच्या मोठेपणानं एका जिवाची किंमत घेतली होती. कसाहि झाला तरी तो जीवच. इतकी किंमत आणि कशासाठीं? जिवाचं मूल्य देण्याइतकं जगांत खरोखरीच कांहीं मोठं आहे का?.... बाळूनं असं काय केलं होतं? बाळूच्या त्या स्पर्शांत अशा कुठल्या मोठेपणाला आव्हान होतं?....

शकुंतलाबाईंना कांहीं कळेना. त्या पार गोंधळून गेल्या. मोठेपणाची वाट ही आपली नव्हे, असं त्यांना एकाएकीं वाटूं लागलं. आपण किती लहान आहोंत, किती अशक्त आहोंत, याची त्यांना जाणीव झाली. बाळूसारख्याच आपण दुबळ्या आहोंत ही कल्पना त्यांच्या मनांत येतांच त्यांच्या डोळ्यापुढें अंधारून आलं. तोंच त्यांच्या पाठीवर थाप देऊन दादासाहेब हंसत म्हणाले, " अग, आज आपल्याला सिनेमाला जायचय् ना ? तुझ्या कल्पनेप्रमाणं आनंद करायचा ना ? मग तूं खूष नाहींस ? "

दादासाहेब खूष होते. ते मोठे; आपण लहान ,....अतिशय लहान आहोंत. अगदीं बाळूसारख्याच लहान दर्जाच्या आहोंत, हें शकुंतलाबाईंनीं ओळखलं.

" अग, खूष हो ! ....अग, आनंदांत रहा ! ... " असं दादासाहेबांनीं म्हणतांच, छडीच्या भीतीनं एखाद्या लहानग्या पोरानं सांगितल्याप्रमाणं वागावं, तसं त्या हंसल्या;—सांगितल्याबरहुकूम हंसल्या. निरुपाय म्हणून असहायपणें, क्षीणपणें हंसल्या.

* * *

... संग्रहालय, ठाणे, स्थळप्र.
क्रमांक ... दि. ...
अनुक्रम ... वों दि. ...
शाखा ———

# अण्णा

११

सगळ्यांचं जेवण आटोपायच्या आंतच अण्णा आपल्या पानावरून उठलेले पहातांच घरांतल्या सर्व माणसांना आश्चर्य वाटलं. सगळ्यांनीं बरोबर जेवायला बसायचं आणि बरोबरच उठायचं हा नियम त्यांनींच घरांत घालून दिलेला आणि त्यांनींच तो मोडला. पानांत कांहीं टाकायचं नाहीं हा नियम मोडला गेला. बरचसं अन्न पानांत टाकून अण्णा आंचवायला गेले तेव्हां सगळ्यांनीं एकमेकांकडे पाहिलं —वहिनींनीं, (अण्णांच्या सौभाग्यवतीनं) मुलांनीं, सुनेनं आणि नातवानंहि. त्या सगळ्यांच्या पाहण्यांत एकच आशय होता — कांहीं तरी चुकतं आहे, अण्णांना बरं नसावं, हें बरं नसणं साधं नाहीं, कांहीं तरी भय जवळपासच दडलं आहे. पानावरून उठतांना अण्णांच्या चेहऱ्यावर जेवल्याचं समाधान दिसत नव्हतं. इतरांच्या-पासून लपवण्याचा प्रयत्न करूनहि न लपणाऱ्या वेदना त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत्या.

" काय झालं ? " असा प्रश्न प्रत्येकाच्या ओंठावर आला पण अनुभवानं येणाऱ्या समजूतदारपणानं त्या प्रश्नाला स्वस्थ केलं. अण्णांचा नातू लहानच होता. आठ वर्षांच्या त्या पोराला अनुभव नव्हता आणि म्हणून समजूतदारपणाहि नव्हता. आण्णा आपल्या खोलींत जाऊन लवंडतात न लवंडतात तोंच त्यानं त्यांचा तिथपर्यंत पाठपुरावा केला आणि विचारलं, " अण्णा, तुम्हीं

जेवणांतनं मध्येंच उठलांत आज ? आम्हांला तर तुम्ही तसं करूं नये असं सांगतां हो ! ”

नातवाच्या त्या प्रश्नाला हंसून उत्तर देण्याचा अण्णांनीं प्रयत्न केला. पण त्यांना हसतां आलं नाहीं. जेवणाच्या वेळीं त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेली कळ पुन्हा आली आणि त्यांनीं सांगितलं, “ मीं शिकविलेला नियम तुम्हीं पुष्कळदां मोडतां तेव्हा मीं विचार केला कीं, आपणहि आज तुमच्यासारखं वागावं. म्हणजे कळेल तरी मला कीं, नियम मोडतांना तुम्हांला कसला आनंद होतो तो ! ”

अण्णांचा नातू लहान असला तरी वयाच्या मनानं चाणाक्ष होता. आनंद झाला म्हणजे चेहरा कसा डवरून येतो एवढं त्याला कळत होतं. त्यानं आजोबांना तसं सांगितलंहि.

“ पण अण्णा, तुम्हांला आनंद झाला नाहीं ! ”

“ नाहीं रे, खरंच मला खूप आनंद झाला ! ” असं अण्णांनीं सांगितलं खरं पण नातवाला अण्णांचा चेहरा तशी साक्ष देईना.

“ नाहीं अण्णा, तुम्हांला आनंद नाहीं झाला, त्रास होतोय. नातवाच्या त्या वाक्यामुळें अण्णांना वाटलं कीं, त्या लहानग्या पोरानं आपल्याला पकडलं आहे; खरी गोष्ट आपण लपवून ठेवतोय हें त्यानं ओळखलं आहे. त्यानंच ओळखलं, तेव्हां घरांतल्या इतरांनीं ओळखलं असलंच पाहिजे हें त्यांना कळलं; पण अण्णा तसं कबूल करणार नव्हते. नातवाच्या हातीं एक आणेली ठेवून त्यांनीं त्याला हंसत हंसत विचारलं, “ आतां सांग बरं मला आनंद होतो कीं त्रास ? ” त्या आणेलीनं नातवाला जिंकलं आणि त्यानं उत्तर दिलं, तुमचं बरोबर आहे अण्णा; मी जाऊन सगळ्यांना सांगतो कीं, तुम्हांला कांहीं झालेलं नाहीं. ”

“ आतां कसं बोललास, जा सगळ्यांना सांग. वहिनीला तर पुष्कळदां सांग. एकदां सांगून तिला पटायचं नाहीं. उद्यां तुला आणखी बक्षीस देईन.” नातवानं त्या आणेलीशीं इमान राखलं आणि सगळ्यांना पटवून सांगितलं, “ अण्णांना कांहींहि झालेलं नाहीं. ” कुणाला पटलं मात्र नाहीं. ज्यानं त्यानं

आपल्या मगदुराप्रमाणें परिस्थिति समजून घेतली आणि कसं वागायचं हें ठरवून टाकलं. वहिनींनीं सुनेकडून मुलींना त्यांच्या वडिलांची प्रकृति बरी नसल्याचीं पत्र लिहवून टाकलीं. सुनेनं मामंजींच्या जिभेला चव आणण्यासाठीं त्यांचे आवडते पदार्थ करण्याचं मनाशीं पक्कं केलं. थोरल्या मुलानं परगांवीं असलेल्या काकांना पत्र घातलं आणि लहान मुलानं डॉक्टरला कळवायचं निश्चित केलं.

सुनेनं ठरविल्याप्रमाणें दुपारच्या फराळासाठीं मामंजींच्या आवडीचे जिन्नस केले पण अण्णांनीं "चांगले झाले आहेत" एवढं सांगण्यासाठींच त्यांना बोट लावलं. फराळाची बशी अण्णांच्या खोलींत जशी गेली तशीच परत आलेली पाहून सगळ्यांच्या मनाला भीतीचा आणखी एक पीळ बसला. वहिनींनी कधीं नव्हे तें दुपारीं त्यांच्या खोलींत जाऊन विचारलं, "तुम्हांला बरं नाहीं; काय होतंय् तें सांगत कां नाहीं तुम्ही?" पत्नीच्या त्या प्रश्नानं अण्णा रागावले. अण्णांना रागावलेले पाहून तिला बरं वाटलं. जवळच्या माणसाशीं अण्णा प्रेमांत आले कीं नेहमींच रागावून बोलत असत. "कुठं काय झालंय मला?" अण्णांनीं रागावून विचारलं.

"खाण्यांत लक्ष नाहीं तें आज?"

"अग खाण्यांत किती लक्ष घालायचं? आज अडुसष्ट वर्षं खाण्यांत लक्ष घालीत आलोंच कीं! अग आतां मी म्हातारा झालोंय. तूं देखील म्हातारी झालीस बरं का! माझ्याहून चारच वर्षं कमी नाहीं कां? लग्न झालं तेव्हां मी एकवीसाचा होतों आणि तूं सतरांची. त्या वेळीं दिसायचीस मात्र तूं थोराड." नवऱ्याच्या त्या बोलण्याला हंसावं, रागवावं कीं लाजावं हें तिला कळेना. तिचे ओंठ तेवढे थरथरले आणि कपाळ घामाळलं.

"खरंच आतां खाण्यापिण्यांत संयम बाळगण्याचे दिवस आले. केव्हां तरी हें आपण ओळखायलाच हवं. केव्हां तरी करायची सुरुवात. आज केली तों तुम्ही लोक एकदम घाबरलांत....मला कांहीं झालं नाहीं."

वहिनी दीनवाण्या नजरेनं अण्णांच्याकडे नुसती बघत राह्यली. त्या दृष्टीनं अण्णांना भडभडून आलं. कांपऱ्या आवाजांत ते म्हणाले, "असं

नको बघूस ग माझ्याकडे ! मला कांहीं झालं नाहीं. वयोमानाप्रमाणें हें चालायचंच ! खरंच, मला कांहींच झालेलं नाहीं !"

वहिनी बोलत नाहीं हें पाहून अण्णांच्या आवाजांत गहिंवर आला. "तूं बोलायची एकाएकी कां थांबलीस ? खरंच तूं अशी गप्प उभी राह्यलीस कीं माझ्या जिवांत कालवाकालव होते. तूं बोल ना कांहीं तरी ! हवं तर रागावून घे. हवं तर कांहीं मागून घे." अण्णांच्या चेहऱ्यावरील गहिंवर पाहून वहिनी विरघळली. गोठलेले शब्द वाहूं लागले. "संध्याकाळीं डॉक्टर येणार आहेत. तपासून घ्यावं. कांहीं होत असलं तर लपवूं नये. मुक्यानं तुम्ही त्रास अंगावर काढला तर मला काय वाटेल ? मुला-मुलींना काय वाटेल ? भावजींना काय वाटेल ? आम्हांला देखील तुम्ही दुखणं खुपणं सांगणार नाहीं का ?"

"बरं. बरं. डॉक्टरांच्याकडनं तपासून घेईन. औषध घेईन. तुम्ही म्हणाऽऽल तें करीन. कांऽऽहीं लपवणार नाहीं."

वहिनींचा चेहरा खुलला. तो खुललेला चेहरा पाहून अण्णांना नेहमींसारखं रागवावंसं वाटलं. मनासारखं त्यांनीं रागावून घेतलं. "नको त्या गोष्टींत तुम्ही लक्ष घालतां अन् मलाहि लक्ष घालायला सांगतां. जिकडे लक्ष द्यायचं तिकडे केव्हां देणार ?"

"कशाकडे ?"

"अग छोट्याचं लग्न केव्हां करायचं ? लहान आहे का घोडा ? कुठली अप्सरा निवडायची ती निवड म्हणावं आणि उरकून टाक. सूनबाईला आणि तुम्हांला त्रास देतांना शरम नाहीं वाटत त्याला ? आणि वर तुमचं उत्तेजन !"

अण्णांना तसं रागावलेलं पाहून वहिनी स्वतःशींच हंसल्या. दिवसभर ढगाळलेल्या अभाळांतून उन्हं फुटावींत तशी प्रसन्नता सांडल्याचा त्यांना प्रत्यय आला आणि तो प्रत्यय घरांतल्या एकापासून दुसऱ्यापर्यंत सहज पोंचला.

संध्याकाळीं छोट्यानं आणलेल्या नेहमींच्या डॉक्टरांनीं अण्णांना तपासलं. घाबरावयाचं कारण नाहीं, असं आश्वासन अण्णांना डॉक्टरांनीं दिलं. कांहीं जुजबी पथ्यं आणि औषध सांगून डॉक्टर निघून गेले. अण्णांच्या तब्येतीवर लागू पडणारा मुख्य उपाय त्वरित करण्याचा सगळ्यांनीं छोट्याच्या मागें

लकडा लावला. अण्णांची प्रकृति एकूण आपल्यावरच उलटल्याचं छोट्यानं ओळखलं.

अण्णांना हवा असणारा उपाय फारसा कठीण नव्हताच. ऋतूहि त्या उपायला अनुकूल होता. अण्णांच्या तब्येतीविषयीं ज्यांना ज्यांना निरोप गेला होता ते सगळे—मुलांचे काका, वहिणी, जांवई, नातवंडं—छोट्याच्या लग्नासाठीं हजर झाले.

लग्नांत अण्णा, उत्साहानं मिरवले, बेफिकीरीनं त्यांचं खाणंपिणं चाललेलं पाहून मुलांचे काका मिस्किलपणें म्हणाले, "वहिनी, अण्णांची ही नेहमींचीच युक्ति आहे. तुला आठवतं कां माझ्याहि वेळेला त्यांनीं असाच कांगावा केला आणि मला खोड्यांत पाडला." ज्याच्यामुळें आपल्याला 'वहिनी' हें नांव मिळालं त्या दिराला वहिनींनीं लगेच प्रश्न केला, "कसल्या खोड्यांत पाडलं हो तुम्हांला ह्यांनीं ? दोहोंचे चार हात करून दिले. हक्काचं माणूस तुम्हांला देणं म्हणजे खोड्यांत पाडणं वाटतं ?"

"बरं, बरं, तें एक चुकलं माझं. पण असं नाटक करायची अण्णांना संवयच आहे. नाहीं म्हणूं नकोस. तुझ्याइतकी या गोष्टीची कुणालाच ओळख नाहीं. तुझ्या खालोखाल मला. म्हणूनच अण्णांची प्रकृति बरी नसल्याचं मला पत्र येतांच मीं हिला सांगितलं कीं आपल्या घरांत कार्याचा योग दिसतोय."

घरांत चाललेलीं हीं संभाषणं आपल्याला ऐकूं येत नाहींत असं अण्णांनीं कितीहि दाखवण्याचा प्रयत्न केला तरी त्यांचं त्यांना माहीत होतं की ते अतिशय खुष आहेत; त्यांना अगदीं अनिवार सुख झालंय.

लग्नानंतर अण्णांचा भाऊ त्यांना आपल्या घरीं चलण्याचा व तिथं आराम करण्याचा आग्रह करूं लागला. मुलींनीं वडिलांची सेवा करण्याचा पहिला हक्क आपला आहे असं जाहीर केलं. मोठा मुलगा आणि सून त्या मुद्यावर सगळ्यांशीं भांडायची तयारी करूं लागलीं. लहान मुलगा आणि त्यांची नवी सून न बोलतां सुचवूं लागली, "आम्हांला एकत्र आणायला तुम्ही नाटक रचलं. तुम्ही रचलेलं नाटक कसं रंगतं हें तुम्हाला इथं राहून

बघायलाच हवं. " मायेच्या पावसांत अण्णा ओलेचिंब झाले आणि सुखाच्या असोशीनं त्यांचा जीव आधमुसा झाला.

लग्नाचे पाहुणे घरोघरीं गेले. अण्णांच्या हातचं शेवटचं कार्य उरकलं. नवी सून नव्या घरांत एकरूप झाली. मुली चांगल्या घरीं पडलेल्या मुलं, संसाराच्या मार्गाला नीट लागलेलीं, मुलासारख्या पाळलेल्या लहान भावानं नांव काढून उपकारांचं स्मरण ठेवलेलं, आवतीं भोंवती नातवंडांचा किलकिलाट भरलेला, सुखाचा वास सर्वत्र दरवळलेला—ही सगळी भाग्याची बरसात पाहून ओळखीचे लोक अण्णांची स्तुति करीत होते आणि अण्णा परमेश्वराला स्मरीत होते. अण्णा बोलत मात्र फारसे नव्हते. अण्णांच्यानं बोलवत नव्हतं. पुनः भरल्या ताटावरून उठणं, पुढ्यांत आलेल्या पदार्थांना हात लावण्याचं नुसतं शास्त्र करणं सुरू झालं होतं. भरीला अण्णांनीं बोलणं टाकलं होतं. वहिनींशीं ते बोलत नव्हते; फार काय नातवांशीं बोलायलाहि ते उत्सुक नव्हते. आपल्या खोलींत बसल्या बसल्या ते कांहीं तरी लिहून काढीत होते आणि फाडून टाकीत होते. तावडतोब अण्णांची प्रकृति मोठ्या डॉक्टरांना दाखवण्यांत आली. मोठ्या डॉक्टरांनीं निदान केलं कीं दुखणं जुनं झालं आहे; पूर्वींच दाखवण्यांत आलं असतं तर अधिक सहज बरं झालं असतं. मुलांनीं खुलासा केला कीं, फार तर दोन महिन्यांहून दुखणं अधिक जुनं असणं शक्यच नाहीं. अण्णांच्या खाण्यापिण्यांत एवढासा बदल होतांच घरांतल्या माणसांनीं तो तावडतोब हेरून डॉक्टरांच्याकडून तपासणी करून घेतली होती. मोठ्या डॉक्टरांनीं स्पष्ट केलं कीं आपल्या दुखण्याचा अण्णांनीं शक्य होतं तोंवर कुणाला सुगावाच लागूं दिला नव्हता. साध्या डॉक्टरच्या देखील लक्षांत येणार नाहीं इतक्या शिताफीनं अण्णांनीं सगळ्यांच्या पासून व्याधि लपवून ठेवली होती. आतां मात्र ती लपणं शक्य नव्हतं.

" मग आतां काय करायचं ? " मुलांनीं घाबरून विचारलं.

" शस्त्रक्रिया करावी लागेल. घाबरायचं कारण नाहीं. अजूनहि तब्येत हाताबाहेर गेलेली नाहीं. पण शस्त्रक्रिया तावडतोब करावी लागेल. मुंबईला त्यांना नेऊन ती केली तर अधिक चांगलं. तिथं खर्च थोडासा जास्त

आला तरी तज्ज्ञांची मदत मिळेल. "

" खर्चाची पर्वा नाहीं आम्हांला, उद्यांच त्यांना मुंबईला नेतों आम्ही ! "

" मग तर घाबरायचं कारणच नाहीं ! "

" मुलांचं आणि मोठ्या डॉक्टरांचं भाषण अण्णांनीं बराच वेळ मुकाट्यानं ऐकून घेतलं. तें संपलेलं पाहून त्यांनीं डॉक्टरांना एकीकडे नेऊन दाटायला सुरुवात केली. अण्णांचं बोलणं मुलांना नीट ऐकूं येत नव्हतं. पण बऱ्याच दिवसांनंतर अण्णा नेहमींप्रमाणें भिवया चढवून बोलूं लागलेले पाहून त्यांना बरं वाटलं.

अण्णांनीं डॉक्टरांना सांगितलं, " डॉक्टर माझं ऐकाल का ? "

" हो, सांगा काय तें. "

" मला औषधांची गरच नाहीं; शस्त्रक्रियेची तर मुळींच नाहीं. "

" अहो पण—"

" माझं ऐकायचं कबूल केलंय तुम्ही ! "

" हो. "

" मग ऐका तर. मला तुमचीं औषधं नकोत, तज्ज्ञ नकोत, शस्त्रक्रिया नको, मुंबई नको, मला नवीन घर हवंय ! "

" म्हणजे ? "

" अहो काय करणार ? या जीर्ण घराची डागडुजी करून कांहीं केलं तरी जुनं घर नवं व्हायचं नाहीं, ऐवढंसुद्धां तुम्हांला कळूं नये ! "

" अहो पण– "

" पण नाहीं अन् बिण नाहीं. अडुसष्ट वर्षं म्हणजे थोडींथोडकीं का झालीं ! आणखी किती लोभ धरायचा ? "

" हें पहा अण्णा, असा वैताग करण्यांत काय अर्थ ? जितकं जगतां येईल तितकं माणसानं नको का जगायला ? "

" कशासाठीं ? "

" तुमच्या मुलाबाळांसाठीं. त्यांची भरभराट, सुख नको का पहायला ? छोट्याचं लग्न तुम्ही उत्साहांत पार पाडलं. त्याचा मुलगा बघायची इच्छा

३५०६९ दि: १।५।६१ ... ३।६।६०

नाहीं का तुम्हांला ! ”

“ आहे. लहान मुलाचा मुलगा बघायची इच्छा आहे; मोठ्या मुलीच्या मुलीचं लग्न झालेलं बघायचं आहे. ”

“ त्यासाठीं तुम्हांला औषध घ्यावं लागेल; शस्त्रक्रियेसाठीं तयार व्हावं लागेल ! ”

“ आहे, पण एका अटीवर—”

“ तुमची कुठलीहि अट मला आणि तुमच्या मुलांना मान्यच होईल ! ”

“ माझ्या मनांत जें जें सुख बघायचं आहे तें तें सगळं मनाप्रमाणें घडेल, दुर्भाग्याचा वारा देखील माझ्या परिवाराला लागणार नाहीं अशी कुणी खात्री देईल तर मी तुम्ही सांगाल त्याला तयार आहे ! ”

“ अशी खात्री देणं कुणाच्या हातांत आहे ? ”

“ बरोबर. मी तेंच सांगतों तुम्हाला. मी खूप सुख पाहिलं. आतां कांहीं दुःख बघायची, माझी तयारी नाहीं. स्वतःचं आयुष्य गरज नसतां वाढवून घ्यायचं आणि दुःख बघत बसायचं हा वेडेपणा कशाला ? दुःख पाहाण्याची, भोगण्याची एके काळीं अंगांत ताकद होती, आज ती नाहीं. भोगणं तर जाऊंच दे पण बघणंसुद्धां माझ्याच्यानं होणार नाहीं ! ”

“ पण दुःख तुमच्या वांट्याला येईल अशी शंका कां येते तुम्हांला ? ”

“ शंका नाहीं. खात्री आहे. सुखानंतर दुःख यायचंच. तुम्ही माझ्यापेक्षां वयानं लहान आहांत. हें अनुभवाचं शहाणपण ऐका आणि मला स्वस्थपणें जगूं द्या, नाहीं तर मरूं द्या. ”

डॉक्टर कांहीं न बोलतां निघून गेले. अण्णांच्या मुलांना तेवढं त्यांनीं अण्णांचं म्हणणं कळवलं. मुलं तरी काय बोलणार ? बोलण्यापेक्षां रडूंच त्यांच्या गळ्यांत अधिक दाटूं लागलं. पण रडतांहि येईना. अण्णांना तेंहि सहन व्हायचं नाहीं हें ते जाणून होते.

अण्णा वाटेल तें खाऊं लागले; वाटेल तेव्हां खाऊं लागले, वाटेल तेव्हां उठूं लागले. त्यांना आणि त्या घरांतील माणसांना बांधणारे– अण्णांनींच एके काळीं घालून दिलेले – नियम तुटले. अण्णांनीं कसं वागायचं यासंबंधीं

कुणाच्याच कांहीं अपेक्षा उरल्या नाहींत. जणूं ते त्या घरांतले नव्हते. परमुलुखांतला कुठला तरी पाहुणा त्या घरांत कांहीं दिवसांसाठीं येऊन राहिला होता आणि केवळ आतिथ्याचा संकेत म्हणून त्या घरांतलीं माणसं त्याला निभवून घेत होतीं. तें करतांना त्यांना भीति वाटायला लागली. अण्णांचा दरारा ज्याला पूर्वीं कधीं शिवला नाहीं तो अण्णांचा नातू देखील घाबरूं लागला. अण्णांच्यापासून चार पावलं दूर राहूं लागला. अण्णांचा चेहरा त्याला भिववूं लागला. अण्णांच्या डोळ्यांत मध्येंच एक भेसूर छटा उमटे. मध्येंच अण्णांचे डोळे पाणावल्यासारखे दिसत. त्यांच्याकडे पाहून त्यांच्याशीं बोलायचं कुणी धैर्य करीत नव्हतं. पण वहिनींना धैर्य न करून चालणार नव्हतं. अण्णा रागावले तर त्या मनांतल्या मनांत हंसत ही उभ्या आयुष्याची त्यांना संवय. अण्णांच्या बदललेल्या चेहऱ्याकडे पाहून तें हंसणं पळालं असलं तरी वहिनी पूर्णपणें धैर्यगळित झाल्या नव्हत्या. हिय्या करून त्यांनीं अण्णांना विचारलंच, " असं काय वेड्यासारखं करता ? "

वहिनींचा प्रश्न ऐकतांच अण्णा गरजले. आभाळ गरजावं तसे गरजले, " हो मी वेडा. तुम्ही तेवढीं सगळीं शहाणी. झालं ! "

" तसं नाहीं. "

" तसंच. तुमचं शहाणपण मला नको. मुलांना माझं शहाणपण मी शिकवूं इच्छित नाहीं; पण तुला कसं कळत नाहीं ? "

" काय ? "

" अग चल. सोड आतां हा मोह. तुला आठवतं, आयुष्याच्या आरंभाला आपण दोघांनीं मिळून सुख पाहिलं, त्यानंतर दुःखं आलीं. ऐकमेकांच्या साहाय्यानं आपण त्यांना तोंड दिलं. आपण थकत आलों होतों. वाटलं दुःख आपल्याला बुडवणार, तोंच नशीब बदललं. पुन्हा सुखाची भरती आली. ती आजपर्यंत चालू आहे. आज ना उद्यां ओहोटी येणार. आजार, अपयश चिंता, मृत्यु– सगळं आपण एकदां पाहिलं आहे. तें जगरहाटीप्रमाणें आपल्या मुलांच्या आयुष्यांत बघावं लागेल. तें आपल्याच्यानं पाहावणार नाहीं. म्हणून म्हणतों त्याआधींच पळ. हें तुला लिहून कळवणार होतों. पण

लिहिलेलं तुला समजलं नसतं म्हणून फाडून टाकलं. आतां बोलून तुला कळलं का !"

"कळलं, पण काय करूं मी ?"

"तेंच मला कळत नाहीं. मी जाणार हें कळतं. तुला कशी न्यायची तेवढं कळत नाहीं. परमेश्वराला हांक मार !"

अण्णांच्या डोळ्यांत दीप पाजळला आणि दुसऱ्याच क्षणांत तो विझला. अण्णांच्या डोळ्यांतला हा बदल घरच्या मंडळींना संवयीचा झाला. पण हळूहळू तोच बदल वहिनींच्याहि डोळ्यांत दिसूं लागला. तिचं जेवण तुटलेलं पाहून अण्णांना विलक्षण आनंद झाला. तीं दोघं खात विशेष नसत; पण रोज आग्रहानं सूनबाईंना सांगूं लागलीं, "तुम्हांला आम्हांला काय काय खाऊं घालायचं तें लवकर लवकर घाला. आम्हांला घाई झाली आहे." डोळ्यांत बळें बळें हंसूं आणून दोन्ही सुना त्यांना नवे नवे पदार्थ घालूं लागल्या. दोन्ही मुलं आपल्या आईवडिलांना कांहीं तरी वेड लागलं आहे या जाणिवेनं अस्वस्थ झालीं. तीं करूं कांहीं शकत नव्हतीं. अण्णा त्यांना कांहीं करूं द्यायला तयार नव्हते. अण्णा कसल्या तरी उन्मत्त अवस्थेत सर्व कांहीं विसरले होते आणि इतरांना विसरायला लावीत होते.

* * *

# झुंज

१२

उंबरगांवच्या एखाद्या शेतकऱ्याच्या वारशास जमिनीचा तुकडा आला नसेल, पण वडिलोपार चालत आलेला एक हक्क अन् षोक सगळ्यांच्या वांट्याला आला होता. भांडणें करायचा, झुंज लढवायचा, सामने पाहायचा हक्क सर्वांच्या हिश्श्याला आला होता. त्यांची ही वतनदारी जितकी पुराणी तितकीच विविध आणि समाईक होती.

दसऱ्याच्या दिवशीं गांवाला वळसा घालून उंबरगांवकर मंडळी शिवेबाहेर पडत. गांवापासून दूर जंगलांत शतकानुशतकें पहुडलेल्या रावणाच्या अजस्त्र शिळेवर लहान-लहान दगड भिरकावून व शमीचे नुसतें सोनें लुटून ही मंडळी खूष होत नसत. रावणाच्या मूर्तीसमोर होणाऱ्या एडक्याच्या व हेल्याच्या टकरा पाहिल्यावरच त्यांच्या मनाला दसऱ्याचें समाधान लाभे.

शरदांतल्या निळ्या आकाशांत वारे झुळझुळूं लागले की, या मंडळींची आकाशगामी आकांक्षा जागृत होई. शरदाचें चटक ऊन्ह बाधक असतें हा शहरी सिद्धांत या गांवकऱ्यांच्या गांवीं नव्हता. आवकाशांत वारा खेळायला लागला आणि अनेक आकारांचे ढग हिंडूं लागले की, त्यांचा पतंगाचा खेळ चालू होई. निरनिराळ्या रंगांच्या, रूपांच्या पतंगांसह त्यांचीं मनें आकाशांत विहरूं लागत; एकमेकांशीं स्पर्धा करूं लागत, एकमेकांना खालीं पाडूं लागत. पतंग, नाग, कन्ना, पेचा, ढील, मंजा, वगैरे पारिभाषिक

शब्दांचा मुबलक वापर होई. संक्रांतीला नदीच्या परिसरांत पतंगांच्या काटछाटींचे सामुदायिक सामने आटोपूनच आपल्या या शोकाला मंडळी वर्षभराची रजा देत.

संक्रांत संपून दिवस तिळतिळ वाढूं लागला कीं गोड बोलण्याची व वागण्याची एकमेकांना दिलेलीं अभिवचनें ही मंडळी शंकरपटांत पुरीं करीत; हौशीनें, स्पर्धेनें, ईर्षेनें बैल पेटवीत व दवडवीत. दशरथ पाटलांच्या हस्तें मिळालेल्या घुंगरांनीं व बेगडीनें सजवून यशस्वी जोडीची गांवकरी मिरवणूक काढीत. पट संपला कीं कुस्त्यांचा फड सुरू होई. हिंवाळ्याच्या थंडींत मऊ-मऊ मातींत कसलेलीं व धरतीमातेनें आपल्या रसांनीं पोसलेलीं शरीरें एकमेकांची ताकद व रग अजमावून घेत. हरलेला गडी पुढच्या वर्षाकडे डोळे लावी. फड जिंकणाऱ्या गड्याला दशरथ पाटील चांदीचें सलकडें बहाल करीत. त्याच्या वस्तादाच्या डोक्यावर कोशाचा नवा फेटा चमकूं लागे. वसंत अवतरल्याचा आनंद सृष्टि रंगांत येऊन दाखवूं लागली, सावरीचा निष्पर्ण देह तांबड्या फुलांनीं डवरूं लागला, पळसाची केशरी शोभा खुलूं लागली कीं, सारे जीव उन्मादानें बेहोष होत. वसंताचा पहिला माद छटेलपणांत–रंगेलपणांत व क्वचित् बीभत्सपणांत शमविण्यांत होळीला उंबरगांवकर मंडळी आसपासच्या खेड्यांवर ताण करीत.

सुगी संपून पिकाची विकवाक व ठेवरेव संपली कीं, ग्रीष्माचा ताप सुरू होई. उन्हांत कावून गेलेली म्हातारमंडळी कलगी-तुऱ्याचीं भांडणें करीत व उन्हाची काहिली वेदान्ताच्या वादांत विसरायचा प्रयत्न करीत. तरुण लोक कळशांशीं कुजबुजत जाणाऱ्या सख्यांचा पाणवठ्यापर्यंत पाठपुरावा करीत व नसतीं भांडणें उकरून काढीत. नदीच्या थडीवर उश्रमा काढीत बसलेल्या सासुरवाशिणींच्या कलागती, लावालावी व भांडणें चोरून बघायचा व ऐकायचा खेळ होताच. शिवाय गांवकऱ्यांच्या पांचवीला पुजलेले हेवेदावे, कज्जेखटले होतेच.

सारांश, ही मंडळी झुंजप्रिय होती. चुरशीला घाबरणारे हे लोक नव्हते. चुरस हाच त्यांच्या जीवनाचा रस. हंसावें आणि लढावें हाच त्यांचा आयुष्यक्रम.

लढणें आणि रडणें यांचा संबंध ते जाणत नव्हते. असें असूनहि उंबरगांवांत सुरू झालेली एक झुंज त्यांना नेहमींच्या बेफिकिरीनें पाहतां येईना. दशरथ पाटील व लोणकरण शेठ यांच्यांत सुरू झालेली झुंज पाहतांना त्यांच्या मनाची विचित्र कालवाकालव होत होती. उंच मलखांबावर डाव कसणाऱ्या कसरती गड्याकडे पाहतांना त्यांच्या चित्तवृत्ति रुद्ध व्हाव्या तशा त्या ही झुंज पाहतांना होत होत्या. साऱ्या गांवाचें काळीज जणूं या अभूतपूर्व द्वंद्वांत गुंतलें होतें. उंबरगांवकर मंडळीचा या झगड्यानं थरकांप उडाला. त्यांची हिम्मत तशी कायम होती. सगळ्यांच्या डोक्यांत झुंजीचा फुंद चढला होता. पण त्याचबरोबर एक अननुभूत हूरहूरहि त्यांच्या हृदयांत घर करीत होती. म्हणून जेव्हां गांवांत बातमी पसरली कीं, लोणकरण शेठजींनीं पाटलांच्या-विरुद्ध आणखी एक केस जिंकली, तेव्हां त्यांचीं मनें चरकलीं. दशरथ पाटील म्हणजे गांवचें हृदय. हृदयावर बसलेला आघात इतर अवयवांना जाणवणारच.

दशरथ पाटील म्हणजे गांवचा दागिना; गांवदेवीच्या गळ्यांतला ताईत; श्रीमंतीचा आणि औदार्याचा मानदंड; सत्तेचा आणि पिढीजात आढ्यतेच पुतळा; गांवचा धनी आणि सगळ्यांच्या सेवेचा मानकरी. पाटलावर येऊं घातलेल्या जप्तीचा गांवकऱ्यांच्या जीवनाशीं प्रत्यक्ष संबंध नव्हता. पण विश्वांतल्या दोन प्रचंड शक्तींत चाललेल्या संघर्षाची झळ सर्वत्र पोहोंचावी तशी पाटील आणि शेठजी यांच्यांत चाललेल्या झुंजीची आज सर्व उंबरगांवला लागली होती.

लोणकरण शेठजींनीं पाटलाविरुद्ध फिर्याद जिंकली ही भुमका गांवांत शिरतांच गांवकऱ्यांना हादराच बसला. हृदयांत उसळलेल्या भावनांना व डोक्यांत उठलेल्या तर्ककुतर्कांना वाट करून देण्यासाठीं नेहमींप्रमाणें मंडळी संध्याकाळीं मारुतीच्या पारावर जमली. जो तो पाटलाच्या भवितव्याचा निराश विचार प्रगट करूं लागला. लोणकरण शेठजी पाटलांच्या कच्छपीं लागते ते त्यांना नामोहरम केल्यावरच संतुष्ट होतील हीच भाषा प्रत्येकाच्या तोंडीं होती. मारुतीच्या देवळाच्या कडेशीं असलेल्या आखाड्यांत चिन्या पहेलवान त्या वेळीं पठ्यांना पेटी कशी कसावी हें शिकवीत होता. त्याच्या

कानावर पारावरील बोलणीं पडतांच त्यांची कानशिलें गरम झालीं. तालीम अर्ध्यांतच सोडून तो टांक्याबाहेर आला व मंडळींत येऊन गरजला, “ काय बायकी बडबड चालवली आहे ? पाटलांना शेळी समजतां काय ? पाटलांचं दिल वाघाचं आहे ही सय असूं द्या. कुडकी काय नवीन आहे ? कुडक्या मागें येऊन गेल्या तेव्हांहि पाटील हलले नाहीत व आतांहि हलणार नाहींत. पाटील डगमगणारे नव्हत हें लक्षांत असूं द्या. ”

चिन्याचें म्हणणें खरें होतें. दशरथ पाटलांच्या निडर स्वभावाचा त्याला साक्षात् अनुभव होता. पहिल्यादां जेव्हां पाटलावर जप्ती आली तेव्हां घरांतील जंगम सामान भराभर सडकेवर आलें. लोक विस्फारलेल्या डोळ्यांनीं तें दृश्य पाहत होतें. चिन्या त्याच वेळीं नदीच्या घाटावर धुणीं धुवायला आलेल्या गांवकरणींशीं नेहमींप्रमाणें थट्टामस्करी करीत बसला होता. त्याच्या कानावर बातमी येतांच आपला आवडता खेळ सोडून तो पाटलांच्या वाड्याकडे धांवला. लोकांची गर्दी फोडून वाड्यांत शिरला. जप्तीचा माल शांतपणें अदा करीत असलेल्या पाटलांच्या पायांवर हात ठेवून त्यानें विचारलें, “ मालक, आमच्यासारख्यांच्या देखत तुमचा हा अपमान ? जोंवर तुम्हीं दिलेलं कडं या चिन्याच्या मनगटावर शाबूत आहे तोंवर कुणाची माय व्याली आहे तुमच्या इभ्रतीला धक्का लावायला ? नुसता डोळ्यांनीं इशारा करा कीं, या शेठजींची अन् पोलिसांची पाठ भुईला लावतों. ” पण पाटलांनीं त्याला मागें सारलें व दम भरला, “ चिन्या, मागें सर. जप्तीचा हक्क शेठजींना कायद्यानें दिला आहे. खबरदार त्यांच्या केंसाला हात लागला तर ! ” आणि मग जप्ती आटोपल्यावर स्वतः पाटलांनीं चिन्याची समजूत घातली. “ अरे, कुडकी माझ्या सामानावर आली. माझं हृदय तर कोणी हिसकावून नाहीं घेतलं ? माझी इज्जत काय माझ्या सामानांत आहे ? सामान आज गेलं, उद्यां पुन्हा घेतां येईल. हिम्मत कायम आहे तोंपर्यंत अशा एक नाहीं दहा कुडक्या येऊं दे. वेडा कुठला ! उगीचच त्रागा करून घेतला. हं, हें घे. मारुतीला नारळ फोडून खिरणी वाट. त्याच्या कृपेनें ही कुडी अन् तिच्यांतील हृदय खंबीर आहे. ”



ज. मा....१२.

पाटलांनीं पांच रुपये कडोसरींतून काढले व चिन्या " नको-नको " म्हणत असतां त्याला घ्यायला लावले. पाटलांचा निर्भय हंसरा चेहरा पाहून त्यांच्यावर जप्ती नुकतीच येऊन गेली आहे असें खुद्द चिन्यालादेखील वाटेना.

त्यानंतर अशाच जप्त्या आल्या अन् गेल्या. प्रत्येक वेळीं पाटलांचें मन प्रफुल्लित होतें. नव्हे, प्रत्येक जप्तीनंतर त्यांच्या चेहऱ्यावर एक नवीनच तजेला चढत असे; त्यांच्या बोलण्यांत अधिक बेफिकिरी शिरत असे; त्यांच्या वागण्यांत वाढती दिलदारी खेळत असे; जळलेली जमीन जास्त कसदार व्हावी तशी त्यांच्या वागणुकींत जप्तीनंतर अधिक रंगत येई. जप्ती आटोपली की पाटील वाड्याबाहेर येत, जमलेल्या मंडळींवर मुक्त हास्य उधळीत आणि म्हणत, " असे भेदरलेले कां दिसतां तुम्ही लोक ? " लगेच कनवटीला हात लावीत व हातीं येतील तेवढे रुपये लोकांकडे फेकीत आणि सांगत, " जा, खुषी करा ! "

जमलेले गांवकरी पाटलांच्या हिम्मतीचे गोडवे गात, " खरा मर्द आहे ! " म्हणत, आपपल्या घरीं जात. जत्रेंतल्या शर्यती पाहून आल्यावर चालाव्या तशा त्यांच्या गप्पा त्यानंतर कितीतरी दिवस चालत.

जप्ती येणार असें ठरलें कीं पाटील वाड्यांतल्या पुष्कळशा वस्तूंची हालवाहालव करीत. त्यानंतर किती वस्तू परत आल्या व किती लोकांकडेच पचल्या ही मोजदाद त्यांनीं कधींच केली नाहीं. वाघाचें चमडें, हरिणांचीं शिंगें, झुंबराचे लोलक तर केव्हांहि परत आले नाहींत. जप्तींत लाभलेल्या लोलकांतून लहान मुलांना सप्तरंगी जग दिसे: बुजरुकांना पाटलांच्या बहुरंगी दिलदार स्वभावाची प्रचीति येई.

पाटलांच्या या खुषरंग स्वभावाची आठवण चिन्यानें करून देतांच मंडळीचा नूर बदलला. त्यांच्या चर्चेंतील नैराश्य नाहींसें झालें. पाटलांच्या उदार हृदयाचा इतिहास आतां प्रत्येकजण चविष्टपणें सांगूं लागला. शाळीच्या साहेबांपासून " तों " काळीच्या साहेबांपर्यंत " सर्वांपाशीं पाटलांची पैठ कशी आहे, सरकारदरबारीं ज्यांची राजनिष्ठा रुजू झाली आहे त्या स्वामिभक्तांपासून तों सरकारशीं सतत लढणाऱ्या देशभक्तांपर्यंत सगळ्यांच्या

स्वागतासाठीं आणि आतिथ्यासाठीं पाटलांचें हृदय व वाडा दिनरात कसा मोकळा असतो, मागली कुडकी येऊन गेली न गेली तोंच सत्र्याच्या आणि जांबाच्या केवढ्या मोठ्या बागा उभवून पाटलांनीं गांवाला कसें चकित केलें, जप्त्या सारख्या येत असूनहि हवें तेवढें कर्ज उभें करण्यांत पाटील कसे पटाईत आहेत, वगैरे गोष्टी मंडळी एकमेकांस मिटक्या मारीत सांगूं लागली. मंडळीच्या मैफलींत आपण हिम्मत ओतली हें पाहतांच चिन्याची आधींच फुगलेली छाती अधिक फुलली. जातां-जातां त्यानें बजावलें, " घाबरट कुठले ! पाटलांची हिम्मत म्हणजे काय कुडाची भिंत आहे की असल्या धक्कयांनीं ती खचेल ? त्यांच्या चिरेबंदी वाड्यासारखंच त्यांचं धैर्य मजबूत अन् भक्कम आहे. "

पाटलाचा चिरेबंदी वाडा म्हणजे गांवकऱ्यांच्या आशांचें व इच्छांचें विश्रंभस्थान.

" चांदोबा, चांदोबा, भागलास का ?
निंबोणीच्या झाडांमागें लपलास का ?
निंबोणीचं झाड करवंदी,
मामाचा वाडा चिरेबंदी,
मामाच्या वाड्यांत जाऊन येऊं,
तूपरोटी खाऊन येऊं "

हें अंगाई गीत म्हणत गांवातल्यां आयाबहिणी जेव्हां तान्ह्या बाळाला खेळवीत तेव्हां दशरथ पाटील आणि त्यांच्या वाड्याची आठवण त्यांच्या मनांत झरकन् येऊन जाई. लाल काळसर दगडाच्या त्या भव्य वाड्याचा पाया जमिनींत पक्का रुतलेला दिसे. त्या हवेलीची चंद्राच्या आभाळाशीं गोष्टी करीत आहेशी वाटे, वाड्याच्या देवडीवरील द्वारपाल त्या वाड्याचेच नव्हे तर सगळ्या गांवाचे संरक्षक होते. दरवाज्याच्या आंत दोन्ही बाजूंच्या खणांत दिवाणजींनीं चालविलेल्या आंकडेमोडींत पाटलांचा नफातोटा नुसता सामावला नव्हता, तर दर दिवशीं गांवच्या भवितव्याचा हिशेब पाटलांच्या वहिखात्यांत लिहिला जाई. दरवाज्याच्या व बालेखानीच्या

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

मधोमध असलेली गणपतीची मूर्ति पाटलांची कुलदेवता होती तशीच ती गांवाची वास्तुदेवताहि होती. वाड्याच्या भिंतींतील तिरकस झरोके तळघरांतील गूढतेचीं व गंभीरतेची साक्ष देत. भिंतींच्या चिऱ्यांत उगवलेली वडाचीं रोपटीं व माडीवरच्या दिवाणखान्यांतील झुंबरांत पक्ष्यांनीं बांधलेले खोपे म्हणजे पाटलांच्या अफाट वैभवांत व विशाल हृदयांत लहानलहान प्राण्यांनीं शोधलेल्या आसऱ्याची प्रतीकेंच. त्या वाड्याच्या जुनाटपणानें एका विवक्षित समाजरचनेनें काळाशीं खेळलेल्या द्वंद्वाची आठवण गांवकऱ्यांना पिढ्यान्‌पिढ्या दिली होती व गांवकऱ्यांनींहि ती आठवण आदरानें व नम्रतेनें हृदयाशीं बाळगली होती. त्या वाड्याच्या धन्यांनीं आजवर दाखविलेला अस्ताव्यस्त अलिजाही कारभार म्हणजे ग्रामापित्यानें आपमतलबी आदर्शांचा केलेला पराभवच.

दशरथ पाटलाचा स्वभाव मऊ खचित नव्हता, त्यांच्या घराण्यालाच मऊ स्वभाव ठाऊक नव्हता. एखाद्या कास्तकारानं बिगार देण्यांत टंगळमंगळ केली तर पाटील त्याला चांगला नरम करीत. एखादा गांवकरी वांकडा ठाकायला लागला कीं लगेच पाटलांनीं त्याला सरळ केलाच. गांवाच्या कोपऱ्यांत राहणाऱ्या शहाजादाखान रोहिल्यानें मागें एकदां शरारत केली. तेव्हां त्याला रानांत गाठून पाटलांनीं असा दम भरला कीं, शहाजाद्याला एकदम त्याचें काबूल-इ-वतन आठवलें. विरोध ठेचून काढण्याइतपत क्रूरता पाटलांच्या रक्तांत होती. त्यांचा परंपरागत हक्क गाजवितांना ते कशाची कधीं पर्वा करीत नसत. एखाद्या वेळीं पाटलांच्या खानदानी मग्रुरीचा सगळ्या गांवाला त्रास होई. पण काय असेल तें असो, संस्कार म्हणा अगर पाटलांचा बाणा म्हणा, गांवकरी पाटलांचा हा गुन्हा माफ करायला नेहमींच तयार असत. पाटलांच्या बेमुर्वत बेगुमान वर्तनाचा त्यांना विसर पडे. पण दरवर्षीं देवीच्या नवरात्रांत अख्ख्या गांवाला मिळालेल्या मोहनभोगाची व पुरणपोळीची लज्जत कधीं कुणी विसरत नसे.

पाटील गरम झाले कीं, थोड्याच वेळांत ते आपल्या रागाची भरपाई करीत. त्यानंतर कांहींतरी भरभक्कम खैरात ही व्हायचीच. रात्रीच्या वेळीं वाघ

शेतांत येऊन गेला की दुसऱ्या दिवशीं वाघाच्या पावलांचे ठसे पाहून शेतकरी समजत की हीं पाउलें म्हणजे येत्या भाग्याची चाहूलच. रात्रींबेरात्रीं अडीअडचणीच्या वेळीं पाटलापुढें हात पसरविला की पाठीवर बुक्क्या व हातावर अपेक्षित मदत पडायचीच.

पाटलांची प्रासंगिक क्रूरता विसरून गांवकरी त्यांना वाघ म्हणत ते उगीचच नव्हे. उलट, लोणकरण शेठच्याबद्दल त्यांच्या मनांत कायमची अढी बसली होती. शेठजींनीं लोट्यासह गांवांत प्रवेश केल्यावर दर शनिवारीं तेलाचें भांडें फिरवून ते शनीचा पैसा मागत. पै-पैसा जमवून शेठजी आज धनको झाले होते; मालदार बनले होते; खुद्द पाटलांचे सावकार झाले होते. तथापि त्यांचें तेंच बसकें घर कायम होतें; वागण्यांत मार्दव होतें, बोलण्यांत नरमाई होती, चालण्यांत अजिजी होती. तरीहि शेठजींचे सारे आर्जवी गुण गांवाला मोहवूं शकत नव्हते. या सर्व गुणांचें श्रेय शेठजींना देण्याऐवजीं गांवगुंडांनीं त्यांना ‘ लुच्चा कोल्हा ’ ही उपाधि बहाल केली होती. शेठजींच्या तोंडावर ‘ जयगोपाल ’ करणारी मंडळी त्यांची पाठ वळतांच या पदवीचा कुचेष्टापूर्वक उच्चार करीत व कुचाळीच्या खाक्यांत हंसत.

पाटील आणि शेठजी यांच्यांत चाललेल्या झुंजींत गांवचा हार्दिक पाठिंबा अर्थातच पाटलांच्यामागें असणार. तरीपण शेठजींच्या वाढत्या शक्तीची व पाटलांच्या ढळत्या वैभवाची तुलना त्यांना अस्वस्थ करी. कधीं कधीं हें द्वंद्व त्यांच्या मनाला डिवचून जाई. पाटलांच्या घराची झोपलेली लक्ष्मी खडबडून जागी कां होत नाहीं या प्रश्नानें ते स्वतःशींच चिडत. पाटलांच्या धनाचें रक्षण करणारा नागोबा फणा काढून शेठजींना दंश कां करीत नाहीं हा सवाल त्यांना हवालदिल करी.

परिस्थितीचा सांगोपांग विचार करून भडकलेलीं डोकीं जेव्हां शांत होत तेव्हां त्यांना वाटे, ‘ नको ही जीवघेऊ झुंज. ’ त्या समराचा त्यांच्या मेंदूवर जबरदस्त ताण पडे. ‘ इडा पीडा टळो व नवा मुकदमा पाटील हरले ही बातमी खोटी ठरो ! ’ अशी मूक प्रार्थना त्यांच्या हृदयांत स्रवूं लागे.

त्यांची ही प्रार्थना परमेश्वराला ऐकूं आली असें त्यांचें त्यांनाच वाटूं

लागलें. " पाटील मुकदमा हरले " ही कुणकुण गांवांत पसरून पंधरवडा लोटला तरीहि गांवगप्पेप्रमाणें तिच्यांतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. गांवकऱ्यांनीं मारुतीला नारळ फोडला.

हृदयांत लावलेल्या आशेचें बीज इच्छासिंचनानें वाढलें न वाढलें तोंच वास्तवतेनें तें उपटून काढलें. एक दिवस कोतवालानें " पाटलांच्या वाड्यावर जप्ती आली आहे, सबब त्याबाबत कुणी सौदा करूं नये " असें मुनादी देऊन जाहीर केलें. ही बातमी देतांना ज्या क्षणीं कोतवालानें गळ्यांतल्या ढोलक्यावर टिपरी वाजवली त्या क्षणीं गांवकऱ्यांच्या हृदयावर त्यानें मर्मांतिक प्रहार केला. मुनादीच्या आवाजांत लोकांचे व खुद्द कोतवालाचे दुस्वास मिसळून गेले.

ज्याच्या त्याच्या तोंडीं तोच विषय. विषय काढावा कीं न काढावा हीच प्रत्येकाला विवंचना. प्रत्येकजण ओंठावर बोट ठेवून पाटलांच्या वाड्यावर येऊं घातलेल्या जप्तीचाच विचार करूं लागला. या अप्रिय विषयाची चर्चा करतांना त्यांचें हृदय तिळतिळ तुटूं लागलें. पण कां कोण जाणे, या आत्मक्लेशांत त्यांना आनंद वाटूं लागला. ' आपला गडी हरला तर ! ' ही कुशंका आणि ' छे ! छे ! तो काय भितो या सामन्याला ! ' अशी श्रद्धा असल्या परस्परविरोधी भावनांच्या दोरीवर त्यांचीं मनें झळकूं लागलीं—घुसळून निघूं लागलीं.

पाटलांच्या चिरेबंदी वाड्याचा लिलांव म्हणजे गांवाच्या इज्जतीचाच लिलांव. लिलांवाची सूचना देणारा कागद सरकारी मजकुऱ्यानें वाड्याच्या दरवाजावर चिकटविला. आपली पुरातन अब्रू बाजारांत आलेली पाहतांच उंबरगांव खिन्न झाला. गांवावर सुतकी कळा आली. मंडळी कष्टी झाली, तडफडली, बावचळली. एक दुसऱ्याच्या तोंडावर आश्वासन व सांत्वन शोधूं लागला. भावनांनीं कोंदटलेल्या कंठांतून शब्द निघणें कठिण जाऊं लागलें. गांवांत चाललेल्या या भयंकर द्वंद्वाचा कुणी उडता उल्लेख केला तर तो ताबडतोब बंद करायचा प्रयत्न होऊं लागला. भीतीच्या बोचऱ्या लाटेनें त्यांचा उत्साह, त्यांची हौस गोठून टाकली.

अनुक्रम ३५०.५८ विभाग क्रमांक दि.

स्वतः पाटलांच्या मनोधैर्यांत मात्र कोणताच फरक पडला नव्हता. त्यांचें औदार्य कायम होतें; हास्यविनोद कायम होता; रुबाब कायम होता. स्वभावांतील तमाम लकबा शाबूत होत्या, नव्हे, वाढल्या होत्या. लिलावाचा कागद वाड्यावर लागल्यानंतरच्या आठवड्यांतच पाटलांनी एक गांवभोजन दिलें. सर्वांनीं विस्मयानें तोंडांत बोटें घातलीं. अजूनहि अशी कोणती युक्ति उरली आहे कीं, जिच्या साहाय्यानें डाव शेठजीवर उलटवितां येईल? गंगा उत्तरवाहिनी करून पाटलांवर आलेलें अरिष्ट धुऊन काढतां येईल? याच प्रश्नाचा जो तो विचार करूं लागला. चिन्यानें आपलें डोकें चालविलें. मल्लानें आपली शकल सगळ्यांच्या कानांत भरली. कांहीं झालें तरी पाटलांच्या ओंठावरील हंसती मावळूं द्यायची नाहीं असा गांवकऱ्यांनीं विडा उचलला.

लिलावाचा कुदिन येऊन ठेपला. कुमंगल दिवसच, पण गांवकऱ्यांनीं नव्या धैर्यानें आलेल्या आपत्तीला तोंड द्यायचा पण केला होता. पाटलांचें वागणेंहि त्यांच्या मसलतीला पोषक असेंच होतें. परजलेल्या हत्यारासारखें त्यांचें स्मित तळपूं लागलें.

ग्रहणग्रासित चंद्रानें पुन्हा प्रगट व्हावें व पूर्ववत् आपली चंदेरी दौलत धरणीवर ओतावी हें दृश्य उंबरगांवच्या नित्याच्या परिचयाचें होतें. त्याच स्वर्गीय चमत्काराचा प्रत्यय धरतीवर बघायला उंबरगांव बद्धपरिकर झाला होता.

लिलावाचें काम सुरू झालें. पाटलांचा प्रशस्त वाडा सहानुभूतीनें भरून गेला, कानाकोंपरा माणसांनीं फुलून गेला. बाहेरच्या मंडळीच्या कानांवर हरासाची बोली पडे व स्वतःच्या हृदयाची धडपड त्यांना ऐकूं येई.

एका बाजूला चिन्या वस्ताद व दुसऱ्या बाजूला लोणकरण शेठजी असा सामना सुरू झाला होता. एकमेकांच्या बोलीवर मात होत होती. दरवाजाबाहेर उभ्या असलेल्या लोकांची आतुरता शब्दागणिक वाढत होती. सरकारांत भराव्या लागणाऱ्या चौथाईच्यीं अभिवचनें गांवकरी एकमेकांना देत होते. स्वतःची व गांवची अब्रू राखायची युक्ति गांवकऱ्यांनीं

केली होती. सामुदायिक इभ्रत आपल्याच खांद्यावर आहे असा प्रत्येकाचा आत्मविश्वास होता.

दशरथ पाटलांना हें दृश्य नवीन होतें. त्यांच्या मानरक्षणासाठीं गांवकऱ्यांनीं आपली हिम्मत इरेला घातली होती. त्या दृश्यानें त्यांचा कंठ सद्गदित झाला होता; तोंडून कृतज्ञतेचे शब्द निघत नव्हते. आपण क्वचित् ज्यांना त्रास दिला त्याच शेतकऱ्यांनीं आपल्या रक्षणासाठीं धांवून यावें ही घटना पाहून त्यांचें हृदय पिळवटून निघालें. पश्चात्तापाचे अनुतप्त अश्रु त्यांच्या गालावर ओघळले. जणूं काळाला कृतकर्माची खंत वाटत होती.

वाड्याची किंमत भराभर वाढूं लागली. शेठजीच्या बोलीवर चिन्याची चढबोली ठरलेलीच. सगळा गांव पाठीशीं असतां त्याला भीति ? वाड्याची किंमत दशकांनीं वाढूं लागली. चिन्या जिद्दीला पेटला. आपल्या मिठ्ठास शब्दांनीं व मोहक नजरेनें चिन्याचें मन वळविण्याचा शेठजींचा प्रयत्न चालू होता. पण त्या पायफसणीच्या वाटेनें हुरळायच्या मनस्थितींत चिन्या नव्हता; गांवहि नव्हता. त्यांच्या श्रद्धेची, इभ्रतीची अधिष्ठात्री भवानीच त्यांच्या अंगांत संचरली होती.

शेठजींनीं ही कटमस्ती बराच वेळ सहन केली. आपल्या व्यवहारचातुर्याची कास धरून सुरुवातीला शेठजी बोली देत होते. पण गांवानें त्यांचा स्वाभिमान दुखवायचा चंग बांधलेला. मानाची मोजमाप पैशानेंच करायची तर सगळा गांव विकत घेतां येईल इतका पैसा शेठजींजवळ होता. त्याची त्यांना एकदम आठवण झाली. त्यांची महत्त्वाकांक्षा प्रदीप्त झाली. सगळ्या गांवाचें प्रतीक असा तो वाडा वाटेल ती किंमत देऊन घेतलाच पाहिजे असा त्यांनीं कृतांतनिश्चय केला. आपला व्यवहारीपणा त्यांनीं बाजूला सारला. प्रश्न व्यवहाराचा नव्हता, मानाचा होता.

बोली शतकांनीं वाढूं लागली. सर्वत्र असह्य स्तब्धता पसरली. सर्वत्र श्वास रोधले गेले. चिन्यानेंहि बोली शंभरांनीं वाढवायला सुरुवात केली. बोली हजारांनीं वाढूं लागली. गोष्ट त्यांच्या आवाक्याबाहेर जात होती. "....हजार एक, ....हजार दोन." नाझराचा आवाज थांबला. सर्वांनीं

एकमेकांकडे पाहिलें. विजा चमकाव्या तशा नजरा चमकल्या. गांवकऱ्यांनीं चिन्याकडे पाहिलें. चिन्यानें गांवकऱ्यांकडे आशाळभूत दृष्टि लावली. लगेच आपण हरलों या जाणिवेनें त्याच्या शिरा ताठर झाल्या. त्याची प्रतिकार-शक्ति उफाळून आली. शेठजीवर वार करण्यासाठीं त्यानें हात उंचावला. सर्व प्रकार भरल्या हृदयानें, विस्मित नजरेनें अतीव धैर्यानें पाहत असलेल्या दशरथ पाटलांनीं चिन्याचा उगारलेला हात हवेंत धरून ठेवला.

"....हजार एक,...हजार दोन,....हजार तीन." नाझरानें निर्णायक बोलीचा त्रिवार उच्चार केला. तो पुरातन चिरेबंदी वाडा शेठजींचा झाला. सगळ्या माना लवल्या. पराभवानें पताकाच खालीं आल्या. जणूं गांव डाव हरला.

सारे डोळे शून्यांत भिरभिरूं लागले. त्या भिरभिरत्या डोळ्यांच्या कडा लगेच पाणावल्या. त्या डबडबलेल्या नेत्रांना थोड्याच वेळांत दशरथ पाटलांचें निष्प्राण कलेवर तिरडीवर आलेलें दिसूं लागलें...

* * *

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
REFBK-0010286